कांड ५

प्रपाठक १

सर्वप्रेरक सवितादेवाकडून यजमानाला 'अग्निचयन' करण्याची प्रेरणा व्हावयासाठी सविता देवतेचे प्रतिपादन ज्यात केले आहे, अशा मंत्रांनी आज्याहुती द्यावी. स्रुचीमध्ये चार स्रुवे आज्य घेऊन त्याची आहुती द्यावी. कारण, पशू हे चतुष्पाद असतात. म्हणून चार स्रुवे आज्य भरून घेतल्याने चतुष्पाद अशा पशूंना जवळ केल्यासारखे होते. पूर्व इत्यादि दिशा चार आहेत. यास्तव चार स्रुवे आज्य घेऊन आहुती दिल्याने चारही दिशांचे ठिकाणी यजमान प्रतिष्ठित होतो. नानाविध छंदांनी युक्त अशा पुरोनुवाक्यादि मंत्रांच्या अभिमानिनी देवता हविर्भाग सेवन करणाऱ्या देवांच्यापासून दूर निघून गेल्या. जातांना त्या म्हणाल्या, हे देव हो, भागरहित अशा आम्ही तुम्हाला दिल्या जाणाऱ्या हविर्द्रव्यांची वार्ता देखील तुम्हाला सांगणार नाही. तेव्हा देवांनी विचार करून होम करते वेळी आज्याचे जे चार वेळ अवदान घेतले जाते, ते छंदोभिमानी देवांचा संतोष करण्यास उपयुक्त होईल असे ठरविले. ह्यास्तव, पहिले अवदान पुरोनुवाक्यासंज्ञक गायत्री छंदाच्या देवतेसाठी, दुसरे अवदान याज्यानामक त्रिष्टुप् छंदाच्या देवतेसाठी, तिसरे अवदान देवतासंज्ञक जगती छंदाच्या देवतेकरिता आणि चौथे अवदान 'वषट्कार' संज्ञक अनुष्टुप् छंदाभिमानी देवतेसाठी, अशाप्रकारे स्रुचीमध्ये चार वेळ आज्याचे अवदान घेऊन जर आहुती दिली, तर ते चार वेळ घेतलेले अवदान गायत्र्यादि छंदोभिमानिनी देवतांचा संतोष करते आणि त्या संतुष्ट झालेल्या छंदोभिमानिनी देवता त्या त्या देवतांना त्यांचा त्यांचा हविर्भाग निवदेन करतात.

आपला यजमान अत्यंत दरिद्री व्हावा असे ज्या यजमानाबद्दल अध्वर्यूला वाटेल त्याने त्या यजमानासाठी सवितृदेवतात्मक आठ मंत्रांपैकी एक एक मंत्र वेगळा म्हणून आहुती द्यावी. अशा प्रकारे दिल्या जाणाऱ्या आठ आहुतींच्या योगाने त्या आहुतींच्याकडून अध्वर्यूने आपल्या यजमानाला धनापासून दूर केल्याप्रमाणे होऊन तो दरिद्री होतो. आपला यजमान धनसंपन्न व्हावा, असे ज्याच्यांबद्दल वाटत असेल, त्या यजमानाकरिता अध्वर्यूने सवितृदेवतात्मक आठही मंत्रांचा सलग उच्चार करून एकच आहुती द्यावी. म्हणजे त्या आहुतीने

अध्वर्यू जणू काय आपल्या यजमानाला धनप्राप्ती होईल अशा सर्व ठिकाणी हिंडवितो. आणि तो धनिक होतो. शिवाय, अशा प्रकारे आठ मंत्र म्हणून दिलेली एक आहुती हीच यज्ञाची अभिक्रांती म्हणजे अग्निचयनरूप यज्ञाची स्वाधीनता होय. एवं च, अशाप्रकारच्या एका आहुतीने यज्ञालाही आपल्या आधीन केल्या सारखे होते.

जो यजमान अग्निदेवतेपासून दूर जातो, तो यज्ञाच्या प्रारंभापासून समाप्ती पर्यंतच्या यज्ञफलरूपी समृध्दीपासून दूर जात असतो. याचा परिहार असा की, सविता देवतेचे प्रतिपादक मंत्र आठ आहेत आणि गायत्री छंदाच्या चरणाची अक्षरे आठच असतात. अग्नी हा गायत्रीछंदसंबध्दच आहे. अर्थात् गायत्री छंदाच्या चरणाक्षरसंख्येशी साम्य असलेल्या आठ मंत्रांच्या संघाने आहुती देऊन यज्ञाचे जणू मुखच अशा अग्नीला प्रसन्न केल्यासारखे होते. आणि त्यामुळे यजमान अग्निदेवतेपासून दूर होत नाही व यज्ञाच्या प्रारंभापासून समाप्तीपर्यंतच्या यज्ञफलरूपी समृध्दीपासूनही दूर होत नाही. सवितृदेवतात्मक आठ मंत्र व आहुती ही नववी मिळून नऊ संख्येने सिद्ध होणारा 'त्रिवृत्' नांवाचा स्तोमच निर्माण होतो व तो स्तोमच जणू अध्वर्यूने यज्ञमुखाच्या ठिकाणी विशेषतेने प्रसारित केल्यासारखे होते.

यज्ञाचे यश मी छंदांना अर्पण करीन, असे जो अध्वर्यू मनात आणील त्याने 'इमं नो देव सवित:' हा यजुर्मंत्र अगोदर म्हणून 'देव सवित: प्रसुव' ही ऋचा नंतर म्हणजे शेवटी म्हणावी. म्हणजे त्याने जणू काय यज्ञाचे यश छंदोभिमानिनी देवतांनाच अर्पण केल्यासारखे होते. यज्ञाचे यश आपल्या यजमानालाच मी अर्पण करीन, असे जो अध्वर्यू म्हणत असेल त्याने 'इमं नो देव सवित:' हा यजुर्मंत्रच शेवटी म्हणून आहुती द्यावी. म्हणजे त्याने यज्ञाचे यश आपल्या यजमानाला अर्पण केल्याप्रमाणे होते.

पूर्वोक्त आठ मंत्रांनी आहुती दिल्यावर पुन्हा चार स्रुवे आज्य स्रुचीत घेऊन दुसरी आहुती देताना 'ऋचा स्तोमं समर्धय' हा मंत्र म्हणावा. म्हणजे या मंत्रात असलेल्या 'समर्धय' ह्या पदाच्या प्रभावाने अध्वर्यू आपल्या यजमानाला समृध्दी प्राप्त करून देण्याला कारणभूत होतो. 'देवस्य त्वा' इत्यादि चार मंत्रांनी अभ्री उचलून घ्यावी. कारण गायत्री, त्रिष्टुप् जगती व अनुष्टुप् हे चार छंदच मुख्य आहेत. यास्तव चार मंत्रांनी अभ्री उचलून घेतली असता

गायत्र्यादि चार छंदांच्याकडूनच ती उचलविल्याप्रमाणे होते. अभ्री घेतांना 'देवस्य त्वा.... प्रसवे.' हा मंत्र म्हणावा म्हणजे तो अग्निचयनाविषयी यजमानाला प्रेरणा करण्याला कारणभूत होतो.

पूर्वी एकदा काही कारणाने अग्नी देवांच्यापासून दूर पळून गेला आणि देवांना आपण दृष्टीस पडू नये म्हणून कळकांत शिरला. आणि उंदीर जसा आपल्याला राहण्याकरता भूमीमध्ये बीळ तयार करतो, तसेच अग्नीने आपल्याला राहण्यासाठी कळकाचा आतील भाग पोखरून बीळ तयार केले. सारांश, कळकांमध्ये जो पोकळपणा असतो ते अग्नीचे राहण्याचे बीळच होय. यास्तव अग्निचयनाच्या विटांच्या करता माती खणण्यासाठी पोकळ कळकाची अभ्री करावी. म्हणजे अध्वर्यूने अग्नीला त्याच्या प्रिय अशा निवासस्थानातच बसविल्यासारखे होते.

कळकाच्या आतील पोकळीत संचार करताना अग्नीने जेथे जेथे वस्ती केली तेथे तेथे त्याच्या ठिकाणच्या दाहकतेने काळे डाग निर्माण झाले. यास्तव, ज्या पोकळ कळकावर काळे डाग असतील त्या कळकाची अर्थात् कृष्णबिंदुलांछित अशी अभ्री करावी. अशाप्रकारे कृष्णबिंदूंनी युक्त असलेली अभ्री चित्रासारखी दिसते. आणि हीच त्या अभ्रीची सत्यसमृध्दी होय. एवं च, काळ्या बिंदूंनी युक्त असलेली अभ्री यजमानाच्या रूपसमृध्दीला कारणभूत होते. अभ्रीची दोन्ही टोके तासून तीक्ष्ण केलेली असावीत. म्हणजे ती या भूलोकापासून व वरच्या स्वर्गलोकापासून यजमानाला पूज्यत्वरूपी संपत्ती प्राप्त करून देण्याला उपयोगी पडते. अभ्री एक वाव लांब असावी. उभ्या राहिलेल्या पुरुषाचे वीर्य इतके लांब असते. अर्थात् वावभर लांबीची अभ्री पुरुषवीर्याशी समानरूप होते. अथवा अभ्रीची लांबी याहीपेक्षा जास्त लांब म्हणजे अपरिमित लांबीची करावी. म्हणजे ती यजमानाला अपरिमित अशी अन्नादिकांची समृध्दी प्राप्त करून देण्याला कारणभूत होते.

वृक्षामध्ये फळग्रही म्हणजे फळे येणारा जो जो वृक्ष असेल त्यापेक्षा कळक हा सालीच्या ठिकाणी अधिक वीर्यवान् व अधिक फळे देणारा असतो, यास्तव, अभ्री कळकाची करावी म्हणजे ती यजमानाच्या ठिकाणी वीर्याचे अधिकतेने संपादन करण्याला कारणभूत होते. (अनुवाक १).

यज्ञासंबंधी जे जे अंग मंत्र न म्हणता केले जाते, ते ते अंग समृध्दिहीन

होते. यास्तव, 'इमामगृभ्णन् रशनामृतस्य' या यजुमंत्राने अश्वाला बांधावयाची दोरी उचलून घ्यावी. म्हणजे दोरी उचलून घेण्याचे कार्य समंत्रक केल्यासारखे होऊन ते समृध्दीला प्राप्त होते. 'प्रतूर्तं वाजिन्नाद्रव' ह्या मंत्राने अश्वाच्या गळ्याला दोरी बांधावी. म्हणजे त्या अश्वाच्या स्वरूपाचे माहात्म्यच प्रकाशित केल्यासारखे होते, 'युजाथां रासभं युवं' हा मंत्र म्हणून गाढवाच्या गळ्याला दोरी बांधावी. या मंत्रात व्यक्त झालेले माती वाहून नेण्याचे कार्य 'असत्' म्हणजे निकृष्ट प्रतीचे होय. यास्तव ह्या मंत्राच्या पठणाने निकृष्ट प्रतीच्या कार्याचे ठिकाणी गाढवाची स्थापना केल्यासारखे होते. आणि म्हणून लोकव्यवहारात अश्वापेक्षा गाढव हलक्या प्रतीचे लेखले जात असते. अश्वाला पुढे करून माती खणून आणण्यासाठी जाताना 'योगे योगे तव स्तरं' हा मंत्र म्हणावा. म्हणजे योग्य अशा कामाचे ठिकाणीच त्या अश्वाची योजना केल्यासारखे होते. याच मंत्राचा 'वाजे वाजे हवामहे' हा दुसरा चरण म्हटला जातो. अन्न हाच 'वाज' शब्दाचा अर्थ आहे. यास्तव या चरणाचा उच्चार केल्याने अन्नाचेच जणू संपादन केल्यासारखे होते. 'सखाय इंद्रमूतये' असा पूर्वोक्त मंत्राचा तिसरा चरण आहे. तो म्हटला असता इंद्रियशक्तीच जवळ केल्यासारखे होते.

काही अपराधामुळे देवांच्यापासून निघून गेलेल्या अग्नीला प्रजापतीने शोधून परत आणला. प्रजापतीपासूनच अश्वाची उत्पत्ती झाली असल्यामुळे अश्व हा प्राजापत्य म्हणजे प्रजापतिसंबध्द आहे. यास्तव, अश्वाला बरोबर घेऊन माती खणून आणण्यासाठी जावे. म्हणजे मृत्तिकारूपी अग्नी कोठे आहे याचे ज्ञान व्हावयास तो अश्व उपयोगी होतो.

अग्निचयनासाठी माती आणण्याच्या कामी अश्वासारख्या उत्कृष्ट व गाढवासारख्या निकृष्ट अशा दोन साधनांचा उपयोग बरोबर करणे, म्हणजे पातकाचीच धन करण्यासारखे होय. म्हणून तसे न होण्याकरिता उत्तम असलेल्या अश्वाला अगोदर पुढे चालवितात आणि त्याच्या मागून अधम अशा गाढवाला चालवितात. असे केल्याने पातकाची धन पदरात घेतल्या सारखे न होता उत्कृष्ट असे श्रेयच संपादन केल्याप्रमाणे होते. आणि याच कारणाने लोकव्यवहारात देखील विद्वान् किंवा धनवान मनुष्य पुढे जातो आणि दरिद्री मागे राहतो, असे दृष्टीस पडते.

'चांगल्या कामाला विघ्ने फार' या म्हणीप्रमाणे ऐश्वर्याला प्राप्त झालेल्या पुरुषाला विघ्न करणारा शत्रू उत्पन्न होतच असतो. जो 'अग्निचयन' करतो, तो निश्चयाने ऐश्वर्याला प्राप्त होत असतो. यास्तव, अशा यजमानाला कोणी विघ्नकारी शत्रू उत्पन्न होऊ नये म्हणून अश्वाला पुढे चालविताना 'प्रतूर्वनेह्यवक्रामन्नशस्तिः' हा मंत्र म्हणावा. अश्व हा वज्रधारी इंद्रासमान शत्रुनाशक आहे. यास्तव, ह्या मंत्रात 'शत्रूंचा नाश करीतच तू आमच्या बरोबर ये' असा अर्थ व्यक्त होत असल्यामुळे, त्या अश्वाची यथार्थ स्तुती केल्यासारखे होते. आणि त्यायोगे अध्वर्यूने जणू काय अश्वरूपी वज्रानेच यजमानाला विघ्न करणाऱ्या शत्रूचे निराकरण केल्यासारखे होते. याच मंत्रातरुद्रस्य गाणपत्यात्' असा अंश म्हटला जात असतो. त्या योगाने पशूंचा अधिपती असलेल्या रुद्रदेवाच्याकडूनच सर्व पशू मागून घेऊन त्यांच्या साहाय्यानेच आपले कार्य अध्वर्यूने केल्याप्रमाणे होते. पूषादेव हाच उत्पन्न होणाऱ्या उपद्रवांचा परिहार करून सर्व मार्गांचे संरक्षण करीत असतो. म्हणून त्याच्या संमतीनेच माती खणावयाचे ठिकाणी जाणाऱ्या मार्गाचे आक्रमण केल्यासारखे व्हावे, म्हणूनच अश्वाला पुढे धालून जाताना 'पूष्णा सयुजा सह' हा तिसरा मंत्र म्हणावा. अग्नी हा मृत्कणरूपी निवासस्थानात राहत असतो. पूर्वी अंगिरस ऋषींनी देवतांचे संपादन करावयाचे अगोदर मृत्कणरूपी निवासस्थळी राहणाऱ्या अग्नीचेच संपादन केले होते. यास्तव, ह्या मंत्रामध्ये व्यक्त होणाऱ्या 'पुरीष्य' व 'अंगिरस्वत्' या दोन शब्दांच्या उच्चारामुळे अंगिरसांच्याप्रमाणे देवतांच्या बरोबरच अग्नीला त्याच्या निवासस्थानासह संपादन केल्यासारखे होते. माती खणण्याचे ठिकाणाकडे जाणाऱ्या पुरुषांना वाटेत एखादा द्वेष्टा माणूस भेटलाच तर 'आम्ही मृत्कणस्थ अग्नीला आणण्यासाठी जात आहो' असा अर्थ व्यक्त करणारा 'अग्निं पुरीष्यमंगिरस्वदच्छेम' हा मंत्र म्हणावा. न भेटला, तर अशा माणसाचे मनात स्मरण करून मंत्र म्हणावा. कारण, ह्या मंत्राचे पठण केले असता, ज्या द्वेष्ट्याची वाटेने गाठ पडते, त्याचे अन्नच तोडल्यासारखे होते. प्रजापतीनेच सर्वांच्या पूर्वी अग्नीचे संपादन केले असल्यामुळे 'आपण मृत्कणरूपी अग्नी आणावयास जात आहो' हे वर्तमान प्रजापतीला कळवून त्याच्या आज्ञेनेच अग्नी आणावा, असे तज्ज्ञ विद्वान् म्हणत असतात. प्रजापतीला वर्तमान कळविण्याची युक्ती अशी की, प्रजापतीने निर्माण केलेली पृथिवी ही प्रजापतिरूप असून तिच्या ठिकाणी उत्पन्न झालेले 'वारूळ' हा तिचा कान आहे.यास्तव,

'मृत्कणरूपी अग्नीला आम्ही आणणार आहो' असा अर्थ व्यक्त करणारा 'अग्निं पुरीष्यमंगिरस्वद् भरिष्यामः' हा मंत्र म्हणून वारुळाचे उपस्थान करावे. म्हणजे प्रत्यक्ष प्रजापतीला कळवून त्याच्या आज्ञेनेच अध्वर्यूने अग्नीला आणल्यासारखे होते. खणलेली माती घेऊन परत येताना जर कोणी द्वेष्टा माणूस भेटला तर 'मृत्कणरूपी अग्नी आम्ही घेऊन चाललो आहो' असा भावार्थ असलेला 'अग्निं पुरीष्यमंगिरस्वत् भरामः' हा मंत्र म्हणावा. म्हणजे वाटेत भेटणाऱ्या द्वेष्ट्या मनुष्याचे अन्नच तोडल्यासारखे होते. वारुळाचे उपस्थान केल्यानंतर तेथून पुढे जाताना 'अन्वग्निरुषसामग्रमख्यत्' हा मंत्र म्हणावा. म्हणजे तो अग्नीने केलेल्या उषःकालाचा अंत व दिवस इत्यादिकांच्या प्रकाशनाची सर्वत्र प्रख्याती करण्याला कारणभूत होतो. माती खणावयाच्या जागेचे अश्वांकडून आक्रमण करवीत असताना 'आगत्य वाज्यध्वनः' व 'आक्रम्य वाजिन् पृथिवीं' या दोन ऋचा म्हणाव्या. पहिल्या ऋचेत 'अग्निचयनाला आवश्यक अशा मातीची अश्व इच्छा करतो', असा भावार्थ दर्शविणाऱ्या 'निचिकीषते' या पदाचे उच्चारण होत असल्याने या ऋचेच्या पठणाने मृत्तिकारूपी अग्नीचे संपादन करण्याची तीव्र इच्छा केल्याप्रमाणे होते. दुसऱ्या ऋचेमध्ये असलेल्या 'मृत्तिकारूपी अग्नी कोठे आहे हे आम्हाला सांग' अशा अर्थाच्या 'नो ब्रूहि' या पदाच्या उच्चारणाने अग्नीची प्राप्ती होणाऱ्या भूप्रदेशाचा लाभ होतो. इच्छा आणि लाभ या दोन्ही गोष्टींना अनुरूप अशा ह्या दोन ऋचा अध्वर्यूकडून म्हटल्या जातात आणि त्यांच्या प्रभावामुळे यजमानाच्या अग्निहोत्रादि अनुष्ठानाला अनुरूप असे गाई वगैरे पशू त्याला प्राप्त होतात. अश्वाच्या पाठीवरून हात फिरविताना 'द्यौस्ते पृष्ठं पृथिवी सधस्थं' हा मंत्र म्हणावा. कारण, पूर्वी प्रजापतीने द्युलोकादि तिन्ही लोकांना धुंडाळून अश्वाला शोधून आणला असल्यामुळे या मंत्राचे पठण केले असता अश्वाच्या माहात्म्याचे यथार्थ रूपाने प्रकटण केल्यासारखे होते.

माती खणण्याच्या जागेवरून अश्व चालत जात असता त्याच्या पावलाखाली आपला द्वेष करणाऱ्या मनुष्याचे आपल्या मनात ध्यान करावे. कारण, वज्राप्रमाणे तीक्ष्ण असणाऱ्या दातांच्या दोन पंक्ती ज्याच्या मुखात आहेत, असा अश्व म्हणजे जणू वज्राचेच धारण करणारा आहे. आणि म्हणूनच ज्यांच्या मुखात दातांची ओळ एकाच बाजूला असते, अशा गाई इत्यादि पशूंच्याहून दातांच्या संख्येने अश्व अधिक मोठा आहे. त्याचप्रमाणे ज्यांच्या मुखात दोन्ही बाजूला

दंतपंक्ती असतात, अशा गाढवासारख्या पशूंच्याहून अंगावरच्या व शेपटावरच्या केसांच्या संख्येने अश्वच अधिक श्रेष्ठ आहे. यास्तव, तो माती खणावयाच्या स्थलावरून चालू लागला असता त्याच्या पायाच्या टाचेखाली जो आपला द्वेष्टा असेल त्याचे ध्यान करावे, म्हणजे वज्याप्रमाणे कणखर असलेल्या अश्वाच्या टापेनेच द्वेषी माणसाचा चुराडा केल्यासारखे होते. (अनुवाक २).

'उत्क्राम महते' व 'उदक्रमीत् द्रविणोदा' ह्या प्रकृत कर्माला अनुरूप असलेल्या दोन ऋचांचे पठण करीत असताना अश्वाला उत्तरेस मुख करून माती खणावयाच्या जागेतून पलीकडे न्यावे. म्हणजे यजमानाच्या इच्छेनुरूप अशा पशूंची त्याला प्राप्ती होते. माती खणावयाचे ठिकाणी 'अपो देवीरुपसृज' हा मंत्र म्हणून उदक ओतावे. म्हणजे ते उदक जितक्या प्रदेशापर्यंत जाऊन पोचेल, तितक्या प्रदेशात फलपुष्पांनी डवरणारे वृक्ष उत्पन्न होऊन राहतील व असे वृक्ष उत्पन्न होण्याबरोबरच सर्व पशूही सुस्थितीत राहतील. इतकेच नव्हे तर पशूंच्या मागोमाग यज्ञ, यज्ञाच्या मागोमाग यजमान व त्याच्या मागोमाग पुत्रपौत्रादि प्रजा ह्याही प्रतिष्ठित होतील. म्हणून अशा प्रकारे सर्वांची प्रतिष्ठा होण्यासाठी पूर्वोक्त मंत्राने माती खणावयाचे जागी उदक ओतावे. अश्वाचे पाऊल उमटलेल्या ठिकाणी सुवर्ण ठेवून त्यावर 'निघर्म्यग्निं.' व 'आ त्वा जिघर्मि' ह्या दोन मंत्रांनी एक आज्याहुती द्यावी.

ज्या ठिकाणी अग्नी नाही तेथे आहुती दिली तर अध्वर्यू आंधळा होईल आणि राक्षस यज्ञाचा विध्वंस करतील. यास्तव, अश्वाच्या पावलाच्या जागी सुवर्ण ठेवून त्यावर आज्याहुती द्यावी. सुवर्ण हे अग्नीसारखेच तेजस्वी असल्यामुळे ते अग्निरूपच आहे. अर्थात् त्यावर दिलेली आहुती अग्नीवरच दिल्याप्रमाणे होऊन अध्वर्यू आंधळा होत नाही आणि राक्षस यज्ञाचा विध्वंसही करीत नाहीत. पहिल्या 'जिघर्म्यग्निं मनसा घृतेन' ह्या मंत्रातील पहिल्याच चरणात 'मनसा' ह्या तृतीयांत मन:शब्दाचा उच्चार केला जात असतो. आणि त्यामुळे यज्ञकर्ता पुरुष आपल्या मनानेच यज्ञाच्या संमुख जातो. 'प्रतिक्ष्यंतं भुवनानि विश्वा' अशा ह्या मंत्राचा दुसरा चरण अध्वर्यू म्हणत असतो. त्या योगाने यज्ञाचे सर्व फळ यजमानाला देण्याच्या उद्देशानेच जणू काय मृतिकारूप अग्नी त्याच्या समोर येऊन उभा राहतो. 'पृथुं तिरश्चा वयसा बृहंतं' असा ह्या मंत्राचा तिसरा चरण आहे यातील, पृथुं व बृहंतं ह्या दोन पदांच्या

उच्चारामुळे उत्पन्न होताना अल्प असलेला अग्नी आहुतीच्या योगाने देश आणि काळ यांना व्यापून मोठा होतो. पूज्यार्थाचे व स्वादुत्वाचे निदर्शन करणारा 'व्यचिष्टमंन्नं रभसं विदानं' असा ह्या मंत्राचा चौथा चरण अध्वर्यू म्हणतो. त्या योगाने स्वादिष्ट असे अन्नच अग्नीला सेवन करविल्यासारखे होते. ह्या चरणाचे हे महत्त्व जो जाणतो, त्यालाही अग्नी स्वादिष्ट असे सर्व प्रकारचे अन्न सेवन करवितो. स्तुतिरूपी मंत्रवाणीने व घृताने मी तुला सिंचित करतो, असा अर्थ व्यक्त करणारा 'आ त्वा जिघर्मि वचसा घृतेन' हा दुसऱ्या मंत्राचा पहिला चरण आहे. मागच्या म्हणजे पहिल्या मंत्रात 'मनसा' व या मंत्रात 'वचसा' अशी दोन पदे अनुक्रमाने व्यक्त झाली आहेत. आणि म्हणूनच लोकव्यवहारात देखील कोणीही मनाने ज्या गोष्टीचे चिंतन करतो तीच गोष्ट वाचेने बोलत असतो. या मंत्राच्या दुसऱ्या चरणात 'अरक्षसा' म्हणजे 'क्रौर्यरहित मनाने' असा अर्थ व्यक्त करणारी जी पदे उच्चारली जात असतात, ती क्रूर अशा राक्षसांचा नाश करण्यास समर्थ होतात. 'मर्यश्री: स्पृह्यद् वर्णो अग्नि:' असा या मंत्राचा तिसरा चरण असून मनुष्यांनी आश्रय करण्यास योग्य व यजमानाच्याकडून वाखाणणी होण्याइतका सुखरूप असा अग्नी, असा भावार्थ त्या चरणात व्यक्त झाला आहे. या चरणाच्या पठणाने अग्नीच्या ठिकाणी असलेले पूज्यत्व अध्वर्यूने यजमानाच्या ठिकाणी संपादन केल्यासारखे होते. इतकेच नव्हे तर या चरणाच्या पठणाचे माहात्म्य जो जाणतो तो अध्वर्यूही लोकांच्याकडून पूज्यतेला प्राप्त होतो. प्रत्यक्ष अग्नी नसताना त्याला जी आहुती दिली जाते, ती मनानेच त्याला पोचण्याला पात्र होत असते. कारण, असे करण्यात 'मी अग्नीला आहुती दिली' एवढी केवळ कल्पनाच करता येणे शक्य होत असते. यास्तव, मानसिक आणि प्रत्यक्ष अशा दोन्ही प्रकारच्या आहुती अग्नीला पोचल्याचे श्रेय मिळावे म्हणून 'मन:शब्दयुक्त' अशा पूर्वोक्त दोन ऋचा म्हणून एक आहुती द्यावी. शिवाय, दोन मंत्रांनी दिलेली आहुती यजमानाच्या प्रतिष्ठेला कारणभूत होते. सुवर्ण काढून टाकून त्या माती खणावयाच्या ठिकाणाभोवती 'परि वाजपति: कवि:' इत्यदि तीन मंत्र म्हणून अभ्रीने एका बाहेर एक अशा प्रदक्षिणाकार तीन रेघा ओढाव्यात. बाहेरची (तिसरी) रेघ इतर दोहींच्याहून मोठ्या घेराची असावी. यज्ञाचा जो प्रारंभ तेच यज्ञमुख होय. अर्थात् जेव्हा जेव्हा यज्ञाचा प्रारंभ केला जातो, तेव्हा तेव्हा त्या ठिकाणी राक्षस येतात व यज्ञ हाणून

पाडण्याची इच्छा करतात. असे असल्यामुळे अश्वाचे पाऊल उमटलेल्या स्थानावर जेव्हा आहुती दिली जाते तेव्हा ते अश्वाच्या पावलाने चिन्हित झालेले स्थान यज्ञाच्या प्रारंभरूपाला प्राप्त होत असते. यासाठी त्या ठिकाणी यज्ञनाशार्थ येणाऱ्या राक्षसांचा नाश करण्यासाठी आता सांगितल्याप्रमाणे माती खणावयाच्या ठिकाणाबाहेर अभ्रीने प्रदक्षिणाकार तीन रेघा ओढाव्यात म्हणजे त्या राक्षसांचा नाश करण्याला कारणभूत होतात. तीन ऋचांनी तीन वेळ परिलेखन करावे. म्हणजे पूर्वीच्या स्थलाच्या बाहेरच्या बाजूने प्रदक्षिणाकार तीन रेघा काढाव्यात. कारण, अग्नी हा आहवनीय, गार्हपत्य व दक्षिणाग्नी या तीन स्वरूपांनी युक्त आहे. व त्यामुळे जेवढा अग्नी आहे त्या सर्वच अग्नीपासून राक्षस नष्ट होतात. प्रथमत: 'परि वाजपति: कवि:' ह्या गायत्री छंदातील ऋचेने परिलेखन करावे. कारण गायत्री ही अग्नीबरोबरच प्रजापतीच्या मुखापासून उत्पन्न झाली असल्यामुळे तेजोरूप आहे. अर्थात् गायत्रीछंदात्मक ऋचेने परिलेखन केले असता तेजानेच त्या मृत्तिकारूपी अग्नी असलेल्या स्थलाचा परिग्रह केल्यासारखे होते. नंतर 'त्वमग्ने द्युभि:' ह्या त्रिष्टुप्छंदात्मक ऋचेने दुसरे परिलेखन करावे. त्रिष्टुप् छंद हा इंद्रियरूप आहे. म्हणून ह्या ऋचेने परिलेखन केले असता इंदियजन्य सामर्थ्यानेच जणू काय मृत्तिकारूप अग्नी असलेल्या स्थलाचा परिग्रह केल्याप्रमाणे होते. तिसरे परिलेखन 'परि त्वाग्ने पुरं वयं' ह्या अनुष्टुप्छंदात्मक ऋचेने करावे. अनुष्टुप् छंद हा सर्व छंदांच्या भोवती व्यापून राहणारा आहे. यास्तव, ही ऋचा मृत्तिकारूपी अग्नी असणाऱ्या सर्व स्थलाची प्राप्ती करून देण्याला पुरेशी होते. वस्तुत: तिसऱ्या परिलेखनाचे वेळी म्हणावयाची अनुष्टुप् छंदातील ऋचा गायत्री व त्रिष्टुप् ह्या दोन छंदांच्या पूर्वोक्त दोन ऋचांच्या मध्येच पठित झालेली आहे. कारण, अनुष्टुप् छंद हा वाग्रूप आहे. आणि ज्या अर्थी वाग्रूपी असलेली 'परि त्वाग्ने.' ही अनुष्टुप्छंदात्मक ऋचा मध्यंतरी पठित झाली आहे त्या अर्थी आम्ही देखील मुखाच्या मध्यंतरी असलेल्या जिव्हेनेच साध्य होणाऱ्या वाणीने संभाषण करीत असतो. गायत्रीछंदात्मक पहिल्या ऋचेने प्रथम परिलेखन करावे, मग अनुष्टुप्छंदात्मक ऋचेने व त्यानंतर त्रिष्टुप्छंदात्मक ऋचेने परिलेखन करावे. कारण, गायत्रीछंद तेजोरूप असून अनुष्टुप् छंद हा यज्ञरूप आहे. आणि त्रिष्टुप्छंद हा इंद्रियरूप आहे. यास्तव आता सांगितल्याप्रमाणे तीन वेळ परिलेखन केले असता अध्वर्यूने जणू काय तेज व इंद्रियसामर्थ्य ह्या दोघांच्या कडूनच यज्ञाचा परिग्रह केल्या सारखे

होते. (अनुवाक ३).

'देवस्य त्वा सवितुः प्रसवे' व 'ज्योतिष्मंतं त्वा' ह्या दोन मंत्रांनी माती खणावी. अशा प्रकारे मंत्रपूर्वक खणलेली माती यजमानाची यज्ञाकडे प्रवृत्ती करण्यास कारणभूत होते. पहिल्या मंत्राने अध्वर्यू जणू काय त्या मृत्तिकारूप अग्नीच्या ठिकाणी केवळ धूर उत्पन्न करतो व 'ज्योतिष्मंतं त्वाग्ने सुप्रतीकं' हा मंत्र म्हणून त्या मृत्तिकारूप अग्नीच्या ठिकाणी तो जणू काय ज्वाला निर्माण करतो. अशा प्रकारे मृत्तिकारूपी अग्नी ज्वालारूपाने उत्पन्न होताक्षणी त्याने प्रजांना संतप्त करून पीडा उत्पन्न केली तेव्हा देवांनी पूर्वोक्त दुसऱ्या मंत्रातील 'शिवं प्रजाभ्योऽहिंसंतं' ह्या उत्तरार्धातील अर्ध्या ऋचेने त्या अग्नीला शांत केले. यासाठी ह्या अर्ध्या ऋचेचे पठण करून अध्वर्यूने प्रजांच्यावर उपकार व्हावा म्हणून अग्नीला शांत केल्यासारखे होते. दोन मंत्रांनी जी माती खणली जाते, ती यजमानाला प्रतिष्ठा प्राप्त करून देते. 'अपां पृष्ठमसि' ह्या मंत्राने एक कमळाचे पान काढून आणावे. कारण कमळाचे जे पान असते, ते जणू काय उदकाचा पृष्ठभाग आहे. यास्तव, ह्या मंत्राने ते काढून आणले असता अनुरूप अशा मंत्राने ते आणल्यासारखे होते. खणलेली माती कमळाच्या पानावर भरून घ्यावी. कारण, कमळाचे पान हे अग्नीचे जन्मस्थान आहे. यास्तव, कमळाच्या पानावर माती भरून घेतली असता मृत्तिकारूपी अग्नीला त्याच्या जन्मस्थानासह संपादन केल्याप्रमाणे होते. कृष्णाजिनावर खणलेली माती भरून घ्यावी. कारण, कृष्णाजिन हे यज्ञरूप आहे. ह्यास्तव, त्यावर माती भरून घेतली असता यज्ञानेच यज्ञाला (कारणभूत होणाऱ्या मृत्तिकारूप अग्नीला) संपादन केल्याप्रमाणे होते. गाईसारख्या एखाद्या ग्राम्य पशूच्या कातड्यावर जर मृत्तिकारूपी अग्नी घेतला गेला तर तो गाई, म्हशी इत्यादि ग्राम्य पशूंना पीडा उत्पन्न करतो. यास्तव, कृष्णाजिनावर मृत्तिकारूप अग्नी भरून घ्यावा म्हणजे तो केवळ अरण्यात राहणाऱ्या पशूंना पीडा देतो. आणि म्हणूनच लोकव्यवहारात देखील चार पाय इत्यादि आकाराने सारख्याच स्वरूपाने निपजणाऱ्या पशूंमध्ये केवळ अरण्यात संचार करणाऱ्या पशूंनाच अग्नीने पीडित केले असल्यामुळे ते गाईसारख्या ग्राम्य पशूंच्याहून कनिष्ठ प्रतीचे ठरले गेले आहेत. आणि म्हणूनच श्रेष्ठ अशा गाई इत्यादि पशूंच्याप्रमाणे त्यांना कोणी घरी बाळगीत नाहीत किंवा खावयासही घालीत नाहीत. कृष्णाजिनाच्या केस असलेल्या बाजूवर माती भरून घ्यावी. कारण, त्याची केसांकडीज बाजूच

पवित्र असते. कृष्णाजिनाच्या केसांची बाजू वर करून ते प्रथम जमिनीवर पसरून त्यावर कमळाचे पान पसरावे. कृष्णाजिन हे पृथ्वीरूप असून कमळाचे पान हे द्युलोकरूप आहे. यास्तव, कृष्णाजिन व त्यावर कमळाचे पान ठेवून त्यावर माती भरून घेतली असता, पृथ्वी व द्युलोक ह्या दोघांच्याहीकडून मृत्तिकारूप अग्नीचे संपादन केल्यासारखे होते. अग्नी देवांच्यापासून जेव्हा पळून दूर गेला, तेव्हा 'अथर्वा' ऋषीने त्याला शोधून पाहिला व परत आणला. म्हणून माती खणण्याचे जागी स्पर्श करताना 'अथर्वा त्वा प्रथमो निरमन्यदग्ने' हा मंत्रांश अध्वर्यूने म्हणावा म्हणजे त्याने ज्याने अग्नी शोधून आणला त्याच्याकडूनच त्या मृत्तिकारूप अग्नीचे ग्रहण केल्यासारखे होते. अध्वर्यूने 'त्वामग्ने पुष्करादधि' हा मंत्र म्हणावा. कारण, अथर्व्याने जेव्हा अग्नीचा शोध केला, तेव्हा एका कमळाच्या पानावर तो बसलेला त्याला आढळला व तेथूनच त्याने त्याला परत नेला. यास्तव, कमळाच्या पानावर मृत्तिकारूपी अग्नी भरून घेताना हा मंत्र म्हणणे युक्तच होय. नंतर 'तमु त्वा दध्यङ्. ऋषि:' हा मंत्र म्हणावा. कारण, अथर्वा ऋषीचा पुत्र 'दध्यङ्.' हा तेजस्वी होता. म्हणून ह्या मंत्राने मृत्तिकारूपी अग्नीचे कमळाच्या पानावर केलेले संपादन अध्वर्यूच्या ठिकाणी 'तेज' स्थापन करते. ह्यानंतर 'तमु त्वा पाथ्यो वृषा' हा मंत्र म्हणावा म्हणजे पूर्वीच्या 'तमु त्वा दध्यङ्.' ह्या मंत्रात व्यक्त केलेल्या 'दध्यङ्.' ऋषीविषयक अर्थाचेच अधिक स्पष्टीकरण ह्या मंत्राने केल्यासारखे होऊन सन्मार्गाने वागत असल्यामुळे त्या 'दध्यङ्.' ऋषीला 'पाथ्य' म्हणजे 'सन्मार्गवर्ती' असे नांव पडले व तो श्रेष्ठ मानला जाऊ लागला, हा वृत्तांत प्रतिपादित केल्यासारखा होतो. चार ऋचांचे पठण करून मृत्तिकारूप अग्नीचे 'संभरण' म्हणजे संपादन करावे. कारण, मुख्य छंद चारच आहेत. यास्तव, छंदांच्याशी संख्यासाम्य असणाऱ्या चार ऋङ्.मंत्रांनी मृत्तिकारूप अग्नीचे संपादन केले असता, ते चार छंदांच्याकडूनच केल्यासारखे होते. ब्राह्मण यजमान असेल तर त्याच्यासाठी अध्वर्यूने गायत्री छंदातील ऋचांनी अग्नीचे संपादन करावे, कारण, गायत्री छंदाबरोबरच प्रजापतीच्या मुखापासून ब्राह्मण जन्मला असल्याने तो गायत्रसंबध्द आहे. क्षत्रिय यजमानासाठी 'त्रिष्टुभ्' छंदातील ऋचांनी मृत्तीकारूपी अग्नीचे संपादन करावे. कारण, त्रिष्टुप्छंदाबरोबर प्रजापतीच्या बाहूपासून क्षत्रिय उत्पन्न झाला असल्यामुळे तो त्रैष्टुभ म्हणजे त्रिष्टुप्छंदसंबद्ध असतो. ज्या यजमानाला अनुलक्षून तो अधिक धनवान् व्हावा, असे अध्वर्यूला

वाटत असेल, त्या यजमानाकरिता अध्वर्यूने गायत्री व त्रिष्टुप् या दोन्ही छंदांतील ऋङ्.मंत्रांनी पूर्वोक्त अग्नीचे संपादन करावे. असे केले असता, अध्यर्यूने जणू काय त्या यजमानाच्या ठिकाणी तेज आणि इंद्रियसामर्थ्य ह्या दोन्हींचे स्थापन केल्यासारखे होते. व तो यजमान अधिक 'धनवान्' होतो. गायत्री छंदातील चार व त्रिष्टुप् छंदातील चार मिळून आठ ऋचांनी मृत्तिकारूप अग्नीचे ग्रहण करावे. गायत्री छंद हा चरणाक्षरसंख्येने अष्टाक्षरी आहे व अग्नी हा गायत्रीछंदसंबद्ध आहे. यास्तव, गायत्री छंदाने ग्रहण केले असता अग्नी जसा आहे तशाच स्वरूपात त्याचे ग्रहण केल्यासारखे होते. त्रिष्टुप् छंदातील 'सीद होत:' ही पहिली ऋचा जेव्हा अध्वर्यू म्हणतो, तेव्हा तो जणू काय त्या अग्नीजवळ देवतांना आणून ठेवतो. दुसऱ्या ऋचेत 'होतृषदत' हे होता इत्यादिऋत्विज वाचक मनुष्यांचे व्यक्तीकरण झाले आहे. ह्यास्तव 'निहोता होतृषदने' ही दुसरी ऋचा म्हटली असता अध्वर्यूने अग्नीच्याजवळ होता इत्यादि ऋत्विजरूपी मनुष्यांना आणून बसविल्यासारखे होते. तिसऱ्या ऋचेत 'विधूममग्ने' म्हणजे 'हे अग्नी, शांत असा धूर निर्माण कर', असा भावार्थ व्यक्त झाला आहे, ह्यास्तव 'संसीदस्व' या तिसऱ्या ऋचेच्या पठणाने अध्वर्यूने जणू काय 'धूम' शब्दाने सूचित होणाऱ्या आकाशसंचारी अशा पक्ष्यांना अग्नीजवळ आणून ठेवल्यासारखे होते. आणि 'जनिष्व' म्हणजे 'उत्पन्न हो' या अर्थाचे व्यक्तीकरण करणाऱ्या 'जनिष्वा हि जेन्यो अग्रे अह्नां' ह्या त्रिष्टुप्छंदात्मक चौथ्या ऋचेचे पठण केले असता, अध्वर्यूने जणू काय त्या मृत्तिकारूप अग्नीकडूनच त्याच्या सन्निध देव, मनुष्ये आणि पक्षी यांना अधिकतेने उत्पन्न केल्यासारखे होते. (अनुवाक ४).

पृथ्वीच्या ठिकाणी कुदळीचे घाव घालून खणणे म्हणजे तिच्या शरीराचाच जणू विच्छेद करण्यासारखे क्रूरपणाचे कृत्य केल्याप्रमाणे होय. म्हणून माती खणलेल्या जागी अध्वर्यूने उदक ओतावे. कारण, उदके ही स्वभावत:च शांत आहेत. यास्तव, माती खणलेल्या जागी उदक ओतले असता शांत अशा उदकांकडून पृथ्वीचा विच्छेद करून तिला दिलेल्या दु:खाचे शमन केल्यासारखे होते. उदक ओतताना 'तुझे विच्छिन्न झालेले अंग वायू पूर्ववत् करो' अशा अर्थाचा 'सं ते वायुर्मातरिश्वा दधातु' हा मंत्र म्हणावा. कारण, वायू हा प्राणरूप असल्याने प्राणाकडूनच पृथ्वीच्या दुखावलेल्या प्राणाला पूर्ववत् सुस्थित केल्यासारखे होते. शिवाय 'सं ते वायु:' ह्या मंत्रांशामध्ये 'वायू'

हा शब्द उच्चारला जात असल्यामुळे द्युलोकापासून वायूच्याकडूनच पर्जन्यवृष्टी पृथ्वीवर केली जाते. या मंत्राच्या 'तस्मै च देवि वषडस्तु तुभ्यं' हा चौथा चरण अध्वर्यू म्हणत असतो. ह्या चरणात ' हे देवि (त्या वायूला आणि) तुला हे (तृणासह जल) अर्पण असो', असा अर्थ व्यक्त झाला आहे. या चरणात उच्चारला जाणारा 'षट्' हा शब्द सहा ऋतूंनाच जणू व्यक्त करणारा आहे. यास्तव तो उच्चारला असता सहाही ऋतूंच्या ठिकाणी पर्जन्यवृष्टीचे धारण केल्यासारखे होते आणि त्यामुळे सहाही ऋतूंत पाऊस पडतो. या चरणात असलेल्या 'वषट्' शब्दाचा उच्चार करावा किंवा नाही? असा एक विचार या ठिकाणी उद्भवतो. 'वषट्' हा शब्द उच्चारला तर 'वषट्कार'संज्ञक मंत्रच शिळा म्हणजे नि:सार होईल. आणि न उच्चारला तर वज्ररूप अशा 'वषट्' काराच्या अभावी राक्षस यज्ञाचा विध्वंस करतील. यासाठी 'वषट्' असे न म्हणता 'वट्' असाच उच्चार करावा. म्हणजे अप्रत्यक्षपणे वषट्कार मंत्राचाच उच्चार केल्याप्रमाणे होते. अर्थात् त्या यजमानाचा 'वषट्कार' मंत्र शिळा किंवा गतसार होत नाही आणि राक्षसही यज्ञाचा नाश करीत नाहीत. 'सुजातो ज्योतिषा सह' हा अनुष्टुप् छंदातील मंत्र म्हणून खणलेली माती कृष्णाजिनात गुंडाळून बांधून घ्यावी. अनुष्टुप् छंद हा सर्वछंदस्वरूप आहे. आणि छंद हे जणू अग्नीला प्रिय असलेले शरीरच आहेत. यास्तव ह्या मंत्राने मृत्तिकारूप अग्नीला कृष्णाजिनात बांधून घेतले म्हणजे असलेल्या छंदोरूप शरीरानेच त्याचे परिधान केल्यासारखे होते. ह्या मंत्राचे जो माहात्म्य जाणतो, त्यालाही उत्तम अशा वस्त्राचा लाभ होतो. कृष्णाजिनात गुंडाळून घेतलेला मृत्तिकारूपी अग्नी उपद्रव करणाऱ्या 'वरुण' देवाच्या स्वाधीन होत असतो. यास्तव, तो वरुणाच्या आधीन न व्हावा म्हणून 'उदु तिष्ठ' व 'ऊर्ध्व ऊषुण ऊतये' ह्या सविता देवाला व्यक्त करणाऱ्या ऋचांनी कृष्णाजिनात बांधलेला मृत्तिकारूप अग्नी घेऊन उठावे. ह्या दोन ऋचांपैकी दुसऱ्या ऋचेत 'सविता' हे पद आहे. त्यामुळे ह्या दोन्हीही सवितृलिंगात्मकच ठरतात. एवं च, ह्या दोन ऋचा म्हणून उठले असता सविता देवाच्या आज्ञेवरून अध्वर्यूने मृत्तिकारूपी अग्नीला वरुणाकडून होणाऱ्या उपद्रवाचा परिहार केल्यासारखे होते. शिवाय, दोन ऋचांनी मृत्तिकारूपी अग्नी घेऊन उठणे हे यजमानाच्या प्रतिष्ठेलाही कारणभूत होते. 'स जातो गर्भो असि रोदस्यो:' हा मंत्र म्हणून मृत्तिकारूपी अग्नी घेऊन परत निघावे. या मंत्रात व्यक्त होणारा 'रोद:'

हा शब्द पृथ्वीचा व वरच्या द्युलोकाचा वाचक आहे. आणि अग्नी हा ह्या उभयतांचा गर्भ आहे. यास्तव, 'आता उत्पन्न झालेला तू द्यावापृथिवींचा गर्भच आहेस', असा अर्थ व्यक्त करणारा मंत्र मृत्तिकारूपी अग्नी घेऊन परत निघताना म्हणणे योग्यच आहे. 'हे अग्ने तू पूजनीय अशा सुंदर व भक्षण केल्या जाणाऱ्या अन्नरूप औषधींच्या ठिकाणी जठराग्निरूपात विशेषत्वाने पोषित असा आहेस', अशा अर्थाचा ह्या मंत्राचा दुसरा चरण म्हटला जात असतो. कारण, अन्नरूपाला प्राप्त झालेल्या औषधी जेव्हा जठराग्निरूपाने त्याला धारण करतात तेव्हा तो अधिकतेने सुंदर व पूजनीय होतो व जेव्हा त्या ओषधी त्याचे विशेषतेने पोषण करतात तेव्हा तो विशेषच चतुरतेला प्राप्त होतो. 'तू आपल्या ओषधीरूप मातांच्याकडे त्यांच्या नांवाने मोठ्याने हाक मारीत जा', अशा अर्थाचा ह्या मंत्राचा चौथा चरण आहे. याचे पठण केले असता ह्या अग्नीच्या ओषधी ह्या माता असल्यामुळे त्यांच्याकडेच त्याला पाठविल्यासारखे होते. गाढवावर मृत्तिकारूप मातीचे ओझे वाहतांना 'स्थिरो भव वीड्वंग' हा मंत्र म्हणावा. म्हणजे या ऋड्.मंत्राने त्या मृत्तिकारूप अग्नीला स्थिरतेने गाढवाच्या पाठीवर लादल्यासारखे होते. बैलासारख्या जनावराच्या पाठीवर न लादता गाढवाच्याच पृष्ठभागी मृत्तिकारूप अग्नीचे ओझे लादण्यात येत असते. यामुळेच इतर पशूंच्यापेक्षा गाढव हा अधिक भार वाहण्यास समर्थ झाला आहे. याशिवाय गाढवावरच मृत्तिकारूपी अग्नीचे ओझे लादण्याचे कारण असे की, यागद्वारा अन्नप्राप्तीला कारणभूत होणारी ती माती अन्नरूपच आहे. आणि अन्न हे केव्हाही अर्चनार्ह असल्याने 'अर्क' या शब्दाने त्या अन्नाचा उल्लेख केला जात असतो. एवं च, अन्नस्वरूप अशा मृत्तिकेचे ओझे गाढव वाहून नेत असल्यामुळेच तो बैल वगैरे इतर पशूंच्यापेक्षा तृणरूप अन्न कमी खात असूनही त्यांच्यापेक्षा अधिक धष्ट पुष्ट असतो. आणि म्हणूनच अर्चनीय अशा मृत्तिकारूपी अन्नाचे ओझे गाढवाच्या पाठीवर लादीत असतात. मृत्तिकारूप अग्नीचे ओझे गाढवावर अध्वर्यू लादतो, याचे आणखीही एक कारण आहे. गाढवाने आपल्या पाठीवर घेतलेला मृत्तिकारूप अग्नी त्याच्या ठिकाणचे प्रजोत्पादनसामर्थ्य दग्ध करीत असतो. आणि त्यामुळेच गाढवाचे आणि खेचरीचे अशा दोन रेतांच्यापासून उत्पन्न होणारा असूनही गाढव इतर पशूंच्याहून कनिष्ठ प्रतीच्या अर्थात् कमी किंमतीच्या अपत्याला उत्पन्न करतो. अल्प किंमतीच्या दृष्टीने जरी गाढव कनिष्ठ प्रतीचे असले तरी, ओझे वाहण्याच्या

कामी अधिक उपयोगी असते. आणि म्हणूनच त्यावर मृत्तिकारूपी अग्नीचे ओझे लादण्यात येत असते. गाढवाच्या पाठीवर जेव्हा मृत्तिकारूप अग्नी आरूढ होतो तेव्हा तो जणू काय प्रजांच्याच ठिकाणी आरूढ होतो. आणि तो प्रजांना आपल्या दाहक शक्तीने दग्ध करण्यास समर्थ होत असतो. यासाठी 'प्रजांना तू शांत ठेवणारा हो' अशा अर्थाचा 'शिवो भव प्रजाभ्य:' ह्या मंत्राने गाढवाच्या पाठीवर लादलेल्या मृत्तिकारूप अग्नीचे अध्वर्यूने अभिमंत्रण करावे. म्हणजे प्रजांच्या जीवनासाठी त्याला शांत केल्यासारखे होते. मनुष्यांप्रमाणेच हरिणे, गाई इत्यादि सर्व पशू मनूनेच निर्माण केले असल्यामुळे तेही मनूचीच प्रजा आहेत. अर्थात् पशूंच्या सहवर्तमान सर्व मनुष्यांच्यासाठी मृत्तिकारूपी अग्नीने शांत व्हावे म्हणून या मंत्राच्या 'मानुषीभ्यस्त्वमंगिर:' हा 'मनुष्य व सर्वपशू या दोन्ही प्रकारच्या प्रजांना सुख देण्यासाठी तू शांत हो', असा अर्थ व्यक्त करणारा दुसरा चरण पठण करण्यात येतो. नंतर ह्या मंत्राच्या 'मा द्यावापृथिवी... मा वनस्पतीन्' ह्या उत्तरार्धाचे पठण करावे. त्या योगाने अध्वर्यूने जणू काय या मंत्राच्या पूर्वार्धात चेतन स्वरूपाच्या प्रजांच्या शांतीसाठी जशी अग्नीची प्रार्थना केली, त्याचप्रमाणे आता उत्तरार्धाच्या पठणात अचेतन रूपाने असणाऱ्या वनस्पती इत्यादिकांच्या करिता अग्नीची प्रार्थना केल्यासारखे होते. अश्वाला पुढे घालून गाढवावर लादलेला मृत्तिकारूपी अग्नी घेऊन जात असताना 'प्रैतु वाजी कनिक्रदत्' इत्यादि तीन ऋचा अध्वर्यूने पठण करावयाच्या असतात. 'प्रैतु वाजी कनिक्रदत्' असा पहिल्या ऋचेचा पहिला चरण पठण करावा.'वेगवान् असा हा अश्व हर्षाने खिंकाळत आमच्यापुढे चालो' असा या चरणाचा अर्थ आहे. अश्व हा वेगवान् असल्याचे सर्वप्रसिद्ध आहे. 'गमनशील असा रासभ म्हणजे गाढवही हर्षयुक्त होऊन मोठ्याने शब्द करीत अश्वाच्या मागोमाग चालो', अशा अर्थाचा पूर्वोक्त मंत्राचा चरण म्हणावा. कारण, गाढवाला रासभ असे पूर्वीचे ऋषीच म्हणत असत. 'मृत्तिकारूपी अग्नीला वाहत असताना' असा अर्थ व्यक्त करणारा ह्या मंत्राचा तिसरा चरण अध्वर्यूने म्हणावा. कारण, मृत्तिकारूपी अग्नीला हा गर्दभ खरोखर वाहून नेतच असतो. 'मा पाद्यायुष: पुरा' म्हणजे आयुर्मर्यादा पूर्ण होण्याच्या आत हा गर्दभ अपमृत्यूने न मरो' या अर्थाचा चौथा चरण म्हणावा. म्हणजे त्याच्या पाठीवर असलेला मृत्तिकारूपी अग्नी त्या गर्दभाच्या ठिकाणी आयुष्याची स्थापना करतो आणि त्यामुळेच कोणताही गर्दभ सर्व आयुष्याला प्राप्त होतो. कदाचित् एखादा गर्दभ आयुष्याची

पूर्ण मर्यादा होण्याच्या आत मेलाच तर हा भयसूचक असा उत्पातच घडला किंवा अपशकुनच झाला अशी लोकांची समजूत होऊन लोक भयभीत होत असतात. तिसऱ्या मंत्राचा 'वृषाग्निं वृषणं भरन्' हा पहिला चरण असून 'वीर्याचे अर्पण करणारा हा गर्दभ उपासकाच्या इच्छित फलांचा वर्षाव करणाऱ्या मृत्तिकारूपी अग्नीला घेऊन', असा त्याचा अर्थ आहे. वीर्याचे वर्षण करून अपत्योत्पादन करणारा असाच हा गर्दभ असून अभिमत फलाची वृष्टी करणारा असाच मृत्तिकारूप अग्नी असल्यामुळे ह्या चरणाचे पठण करणे युक्तच आहे. 'अपां गर्भं समुद्रियं' असा त्या मंत्राचा दुसरा चरण असून त्यामध्ये प्रतिपादिल्याप्रमाणे अग्नी हा समुद्राच्या उदकांमध्ये राहणारा वाडवाग्निरूपी गर्भच असल्यामुळे ह्या चरणाचे पठण योग्यच आहे. 'अग्न आ याहि वीतये' हा मंत्राचा तिसरा चरण आहे. पूर्वी द्युलोक व पृथ्वी ही एकमेकाला चिकटलेली होती. ती पुढे वेगळी झाली आणि त्या दोघांनी 'हे अग्ने तू ये आणि आम्हा दोघांच्या मध्ये गर्भरूपाने राहून जन्माला प्राप्त हो', असे सांगितले. यास्तव, पूर्वोक्त चरणाचे पठण केले असता द्युलोक व पृथ्वी ही एकमेकांपासून वियुक्त करून त्यांच्यामध्ये गर्भरूपाने संचार करण्यास अग्नीला जणू काय अवकाश करून दिल्याप्रमाणे होते. ज्या ठिकाणी खणले त्या जागेपासून प्रकर्षाने च्युत झालेला मृत्तिकारूपी अग्नी म्हणजे आपल्या स्वस्थानापासूनच च्युत झालेला असून दुसऱ्या एखाद्या जागी प्रतिष्ठितही झालेला नसतो. अशा अवस्थेत तो अग्नी अध्वर्यू व यजमान यांना मारण्याच्या विचारात असतो. यास्तव, तो योग्य जागी प्रतिष्ठित व्हावा म्हणून पूर्वोक्त चरणाच्या शेवटी द्युलोक व पृथ्वी यांचे वाचक असलेल्या ऋत व सत्य या शब्दांचा उच्चार करावा. म्हणजे द्युलोक व पृथ्वी यांच्या अंतर्भागाचे ठिकाणी अग्नीला स्थापन केल्यासारखे होऊन अध्वर्यू व यजमान हे दोघेही नष्ट होत नाहीत.

अग्निशाळेच्या उत्तर दिशेस बंदिस्त केलेल्या एका ठिकाणी फलपुष्पांनी युक्त अशा ओषधींच्यावर तो मृत्तिकारूप अग्नी ठेवताना 'ओषधय: प्रतिगृण्हीत' व 'ओषधय: प्रतिमोदध्वं' ह्या दोन ऋचा म्हणावयाच्या असतात. कृष्णाजिनात बांधलेला मृत्तिकारूपी अग्नी हा जणू काय वरुणपाशानेच बध्द झालेला असल्यामुळे वरुणरूपच होऊन यजमानावर आपली क्रूर दृष्टी रोखतो व त्याला ठोकण्यासाठी त्याच्यावर चालून जातो. अर्थात् तो शांत व्हावा म्हणून 'हे ओषधींनो, तुम्ही या अग्नीचा प्रतिग्रह करा, त्याला आपल्या जवळ घ्या', असा अर्थ

असणारा पूर्वोक्त दोन ऋचांपैकी पहिल्या ऋचेचा पहिला चरण पठण करावा. म्हणजे त्या पलपुष्पसंपन्न ओषधी त्या अग्नीला आपल्याजवळ घेतात व तो अग्नी शांत होऊन यजमानाला त्रास देत नाही. 'शत्रूप्रमाणे त्रास देणाऱ्या सर्व राक्षसांना मारीत मारीत' असा अर्थ व्यक्त करणाऱ्या व्यस्यन् विश्वा अमतीररातीः' हा तिसरा चरण म्हणावा. म्हणजे तो राक्षसांचा नाश करण्याला कारणभूत होतो. 'निषीदन् नो अपदुर्मतिं हनत्' हा चौथा चरण म्हणावा, या चरणात 'दुर्मतिं हनत्' म्हणजे आमच्या ठिकाणच्या आलस्यादिरूपी दुर्बुध्दीचा नाश करीत हा अग्नी तुमच्या जवळ बसो', अशा अर्थाची पदे असल्यामुळे ह्या चरणाच्या पठणाने तो मृत्तिकारूपी अग्नी अध्वर्यू व यजमान यांच्या ठिकाणी असलेल्या दुर्बुध्दीचा परिहार करतो. आणि ते दोघेही यज्ञानुष्ठानाच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात. ' ओषधयः प्रतिमोदध्वमेनं' हा दुसऱ्या ऋचेचा पहिला चरण असून 'हे ओषधींनो, या मृत्तिकारूप अग्नीला पाहून तुम्ही आनंदित व्हा' असा त्यात अर्थ व्यक्त झाला आहे. ओषधी हा अग्नीचा भाग आहे. अर्थात् ह्या चरणाच्या पठणाने अग्नीचा भाग असणाऱ्या ओषधींनीच त्या अग्नीला समृद्ध केल्यासारखे होते. ओषधी ह्या अन्नरूपाने जाठराग्नीचा भाग होत असतात. आणि पुरोडाशरूपाने यज्ञातील अग्नीचा भाग होत असतात. यास्तव, ओषधींच्या ठिकाणी मृत्तिकारूपी अग्नीचे स्थापन केले असता दोन्ही प्रकारच्या अग्नींची ओषधींच्या योगाने समृध्दी होत असते. 'पुष्पावतीः सुपिप्पलाः' हा त्या ऋचेचा दुसरा चरण होय. ह्याच्या पठणामुळेच ओषधी ह्या योग्य त्या ऋतूत फळांचे ग्रहण करतात. म्हणजे सुफलित होतात. 'अयं वो गर्भ ऋत्वियः प्रत्नं सधस्थमासदत्' असा पूर्वोक्त ऋचेचा उत्तरार्ध आहे. ह्याचे पठण करावे. म्हणजे ज्या मृत्खननभूमीमध्ये पूर्वी उत्पन्न झालेल्या ओषधींच्यापासून काढून घेऊन मृत्तिकारूपी अग्नी आणलेला असतो, तोच बंदिस्त जागेत ठेवलेल्या ओषधींच्या ठिकाणी पुन्हा स्थापन केल्यासारखे होते. शिवाय, दोन ऋचा म्हणून ओषधींच्या ठिकाणी अग्नीची स्थापना केली असता, ती अध्वर्यू व यजमान यांच्या प्रतिष्ठेला कारणभूत होते. (अनुवाक ५).

कृष्णाजिनात गुंडाळून त्यावर दोरीचे वेढे दिलेला मृत्तिकारूपी अग्नी हा जणू काय वरुणाच्या घट्ट फासानेच वेढलेला असतो. ह्यास्तव 'विपाजसा पृथुना' हा मंत्र म्हणून अध्वर्यूने कृष्णाजिनावर वेढलेली दोरी सोडून टाकावी. असे केल्याने लोकदृष्टीला मृत्तिकारूप अग्नीला दोरीच्या वेढ्यातून मोकळा

केल्यासारखे होतेच, पण तत्त्वदृष्ट्या देखील पूर्वोक्त मंत्राने दोरी सोडली म्हणजे सविता देवाच्या प्रेरणेवरून वरुणाच्या घट्ट पाशाने जखडल्याच्या योगाने होत असलेल्या दु:सह पीडेपासूनच अध्वर्यूने मृत्तिकारूपी अग्नीची सुटका केल्यासारखे होते. नंतर, कृष्णाजिनावर मोकळ्या करून ठेवलेल्या मृत्तिकेवर 'आपो हि ष्ठा मयोभुव:' इत्यादि तीन मंत्रांनी ती चांगली भिजली जाईल इतके उदक ओतावे. उदकबिंदू स्वभावत:च शांत असल्याने ओतल्या जाणाऱ्या उदकातील शांत अशा बिंदूंनी त्या मृत्तिकारूपी अग्नीच्या दाहशक्तीलाच शीत केल्याप्रमाणे होते. तीन मंत्रांनी उदक ओतावे. कारण अग्नी हा त्रिवृत् म्हणजे आहवनीय, गार्हपत्य व दक्षिणाग्नी अशा तीन स्वरूपांनी युक्त असतो. म्हणून तीन मंत्रांनी उदक ओतले असता जेवढा अग्नी आहे तेवढ्या सर्व अग्नीच्याच दहनशक्तीला शांत केल्यासारखे होते. 'मित्र: संसृज्य पृथिवीं' हा एक व 'अयक्ष्माय त्वा संसृजामि' हा दुसरा मंत्र म्हणून पाणी ओतलेल्या त्या मातीत खापराची भुकटी, कोळशाची पूड, इत्यादि मसाल्याचे पदार्थ घालावेत. कारण 'मित्र' नांवाचा देवच सर्व देवांना शांत ठेवीत असतो. यास्तव, त्या देवाला व्यक्त करणाऱ्या मंत्रांनी मसाल्याचे पदार्थ ओल्या मातीवर घातले म्हणजे ते त्या मित्रदेवाकडूनच घातल्यासारखे होऊन त्या मृत्तिकारूप अग्नीला शांत केल्यासारखे होते.

गावात आढळणाऱ्या फुटक्या मडक्यांच्या भुकटीचा जर ओल्या मातीत मिसळण्याकडे उपयोग केला तर प्रसंगविशेषी गावात राहणाऱ्या लोकांना स्वयंपाकपाण्याला उपयोगी पडणारी धड असलेली मडकी फोडून त्यांची खापरे कुटण्याकडेही मन:प्रवृत्ती होईल आणि त्यामुळे गावात ह्या लोकांना उपयोगी पडणाऱ्या मडक्यांवर दु:खाची धाडच पडण्याचा प्रसंग येईल. यास्तव, वस्ती असलेल्या गावात किंवा नांदत्या घरात आढळणाऱ्या फुटक्या मडक्यांची खापरे मुळीच न घेता, फार दिवस वस्ती नसलेल्या ओसाड गावात किंवा घरात पडलेल्या फुटक्या मडक्यांच्या खापराची भुकटी ओल्या मातीत मिसळण्यासाठी उपयोगात आणावी. कारण अशा प्रकारची ओसाड जागेतील फुटकी मडकी कशाच्याही उपयोगी न येणारी, अर्थात् टाकाऊच असतात. म्हणून तशाच प्रकारच्या खापरांवर कुटण्याची धाड घातल्याने त्या निरुपयोगी खापरांचाही योग्य उपयोग अध्वर्यूने केल्यासारखे होते. जमिनीत खिळून असलेले लहान लहान शिरगोळे म्हणजे खडे जमा करून त्यांचे बारीक पीठ करावे आणि

तेही त्या मातीत घालावे. म्हणजे ते त्या मृत्तिकेला अवश्य तो घट्टपणा आणण्याला व त्या मृत्तिकेने पुढे बनविली जाणारी शेगडी भाजण्यासाठी पेटलेल्या भट्टीत घातल्यावर अभंग राखण्याला कारणभूत होते. बोकडाचे केस ओल्या मातीत मिसळावेत. अग्नी व बोकड हे दोघेही प्रजापतीच्या मुखापासून उत्पन्न झालेले असल्यामुळे 'अज' म्हणजे बोकड हा जणू काय अग्नीचे आवडते शरीरच आहे. इतकेच नव्हे तर अग्निसंबध्दतेमुळे बोकड हा तेजोरूपही आहे. यास्तव, बोकडाचे केस मृत्तिकारूप अग्नीच्या ठिकाणी मिसळले असता त्याला प्रिय अशा शरीराने तेजाने समृध्द केल्यासारखे होते. कृष्णाजिनाचे केस ओल्या मातीत मिसळावे. कृष्णाजिन हे यज्ञरूप आहे. म्हणून त्याचे केस मिसळले असता यज्ञाशीच जणू काय मृत्तिकानिविष्ट अशा यज्ञरूपी अग्नीलाच एकरूपतेने संलग्न केल्यासारखे होते. मसाल्याचे पदार्थ मिश्र केलेली माती दोनही हातांनी चांगली चिवडून ती घट्ट करीत असता 'रुद्राः संभृत्य पृथिवीं' हा मंत्र म्हणावा. कारण, प्राचीन काळी सर्वांच्या अगोदर याच रुद्रदेवतांनी माती आणून तिचे संघटण केलेले आहे. यास्तव, पूर्वोक्त मंत्राने माती घट्ट केली असता त्या रुद्रदेवतांच्या कडूनच तिचे संघट्टण केल्याप्रमाणे होते. 'संसृष्टां वसुभी रुद्रैः' इत्यादि तीन मंत्रांनी ती घट्ट केलेली माती 'उखा' तयार करणाराला द्यावी. त्या 'उखा' करणाऱ्याने, त्या घट्ट मातीचा एक गोळा तयार करताना 'मखस्य शिरोऽसि' हा मंत्र म्हणावा कारण 'मख' म्हणजे यज्ञ असून 'उखा' नांवाची शेगडी हे त्या यज्ञाचे मस्तकच आहे. यास्तव घट्ट मातीचा उखेसाठी गोळा बनविताना हा मंत्र म्हणणे योग्यच आहे. कृष्णाजिनाला व कमळाच्या पानाला स्पर्श करताना 'यज्ञस्य पदे स्थः' असे म्हणावे. कारण, हे दोन्ही पदार्थ म्हणजे यज्ञपुरुषाचे जणू दोन पायच आहेत. यास्तव त्यांना स्पर्श करताना तसे म्हणणे हे प्रकृत कर्माला अनुरूपच होय. शिवाय, द्विपाद अशा यजमानाच्या प्रतिष्ठेलाही ते दोन्ही पदार्थ त्यांची यथार्थ स्तुती केल्याने कारणभूत होतात. पूर्वोक्त 'संसृष्टां वसुभिः' इत्यादि तीन मंत्रांनी दिलेल्या मातीची उखा करणाराने एक गोळा केल्यावर त्यातला अवश्य तितका भाग काढून घेऊन त्याने 'वसवस्त्वा' इत्यादि मंत्राने 'उखा' नामक शेगडीचा पहिला भाग (मजला) तयार करावा. व तो करीत असताना त्याच मंत्राने यजमानाने त्या उखेच्या प्रथम विभागाचे अनुमंत्रण करावे. याचप्रमाणे मातीच्या गोळ्यातील आणखी

एक भाग काढून घेऊन,त्याने 'रुद्रास्त्वा कृण्वंतु' या मंत्राने उखेच्या पहिल्या भागावरच तिचा मध्यभाग (मधला मजला) तयार करावा. तो करताना यजमानाने त्याच 'रुद्रास्त्वा' ह्या मंत्राने त्या भागाचे अनुमंत्रण करावे. घट्ट मातीच्या त्या गोळ्यातील थोडासा भाग राखून ठेवून बाकीचा गोळा घेऊन त्याने उखेच्या मधल्या भागावरच (मधल्या मजल्यावरच) तिचा तिसरा भाग (म्हणजे वरचा मजला) 'आदित्यास्त्वा' या मंत्राने तयार करावा. त्यावेळी 'आदित्यास्वा' हाच मंत्र म्हणून यजमानाने त्याचे अनुमंत्रण करावे. उरलेल्या भागातील मातीने उखेच्या ठिकाणी जे जे अवयव आणखी करावयाचे असतील ते करावेत व ते करताना 'विश्वे त्वा देवा वैश्वानरा:' हा मंत्र म्हणावा. यजमानाने तोच मंत्र म्हणून त्याचे अनुमंत्रण करावे.

सारांश,'वसवस्त्वा' इत्यादि यजुमंत्रांहून भिन्न असलेल्या 'संसृष्टां वसुभी रुद्रैः' इत्यादि ऋड्.मंत्रांनी मातीचे ग्रहण केल्याने व त्या ऋड्.मंत्रांच्याहून भिन्न अशा 'वसवस्त्वा' इत्यादि मंत्रांनी त्या उखा तयार केल्याने पूर्वोक्त ऋड्.मंत्ररूपी स्त्रिया आणि 'वसवस्त्वा' इत्यादि यजुमंत्ररूपी पुरुष यांचा परस्परांच्याशी 'दांपत्य' भाव उत्पन्न केल्यासारखे होते.'उखा' नांवाची शेगडी तयार करावयाची ती तीन मजली म्हणजे तीन भांड्यांच्या उतरंडीच्या आकाराची करावी. कारण पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु असे तीन लोक आहेत. यास्तव, तीनमजली म्हणजे त्रैलोक्यस्वरूपाची उखा केली म्हणजे त्या यजमानाला तीनही लोक प्राप्त करून देण्याला कारणभूत होते. 'छंद' शब्दाने युक्त अशा 'वसव: त्वा कृण्वंतु' इत्यादि मंत्रांनी उखा करावी. कारण छंद हे जणू मूर्तिमंत वीर्यच आहेत. यास्तव, छंद:शब्दघटित अशा यजुमंत्रांनी उखा केली असता ती वीर्यानेच तयार केल्यासारखे होते 'अदितिस्ते बिलं गृह्णातु' ह्या यजुर्मंत्राने बिळासारखा उखेचा अंतर्भाग तयार करावा. म्हणजे मंत्र न म्हणताच अंतर्भाग तयार केल्या जाणाऱ्या इतर शेगड्यांपेक्षा ह्या उखानामक शेगडीचा वेगळेपणा स्पष्ट केल्यासारखा होतो. उखेची उंची टीचभर करावी. कारण, यज्ञपुरुषाच्या मुखाची हनुवटीच्या तळापासून कपाळाच्या वरच्या मर्यादेपर्यंतची उंची एक टीचभर असते. यज्ञपुरुषाचे मुख प्रजापतीने निर्माण केलेले आहे. यास्तव टीचभर उंचीची उखा केली असता ती प्रजापतीने निर्माण केलेल्या यज्ञपुरुषाच्या मुखाच्या उंचीइतक्याच परिमाणाची केल्याप्रमाणे होते. उखेच्या दोन बाजूला मातीचे दोन स्तन करावेत, म्हणजे त्यांच्या द्वारे द्युलोक व पृथ्वी यांच्या

ठिकाणच्या सारभूत अशाचेच दोहन केल्यासारखे होते. उखेच्या चार बाजूंना चार स्तन करावेत. म्हणजे चतुष्पाद अशा सर्व पशूंच्या ठिकाणी असलेल्या सारांशाचेच दोहन केल्यासारखे होते. उखेच्या चार दिशांना चार आणि आग्नेयादि विदिशांचे ठिकाणी चार मिळून आठ स्तन करावेत. म्हणजे गायत्रीप्रभृति आठ छंदांच्या ठिकाणी असलेल्यां सारभूत अंशांचे दोहन केल्याप्रमाणे होते. यजमानाच्या शत्रूला ठार करावयाचा असेल, तर उखा नऊ कोणांची करावी. कारण, 'त्रिवृत्' नांवाचा 'स्तोम' नऊ ऋचांनी युक्त असतो व त्रिवृत् स्तोम हा वज्ररूप आहे. यास्तव उखा नऊकोणी तयार केली असता अध्वर्यूने जणू काय नऊ धारांचे वज्रच तयार करून त्या वज्राने यजमानाच्या शत्रूवर प्रहार केल्याप्रमाणे होते व तो प्रहार यजमानाच्या शत्रूच्या मृत्यूला कारणभूत होतो. मग तयार केलेली ती उखा 'कृत्वाय सा महीं' या मंत्राने भूमीवर पसरलेल्या वाळूवर ठेवावी. म्हणजे देवतांच्या सान्निध्यातच तिला प्रतिष्ठित केल्याप्रमाणे होते. (अनुवाक ६).

सात मंत्रांनी उखेला अश्वाच्या लेंड्यांची धुरी देऊन धुपवावी. कारण मनुष्याच्या मस्तकाच्या ठिकाणी असलेल्या दोन कान, दोन नाकपुड्या, दोन डोळे व मुख या सात छिद्रांत संचार करणारे प्राण सातच आहेत. उखा हे यज्ञपुरुषाचे मस्तक आहे. म्हणून सात मंत्रांनी उखेला धुरी दिली असता यज्ञपुरुषाच्या मस्तकाच्या ठिकाणीच जणू सात प्राणांची स्थापना केल्याप्रमाणे होते. आणि म्हणून प्रत्येक मनुष्याच्या मस्तकावरील पूर्वोक्त सात छिद्रांच्या ठिकाणी सात प्राण संचारत असतात. अश्वाच्या लेंड्यांची धुरी देऊन उखेला धुपवावी. कारण, अश्व हा प्रजापतीपासून निर्माण झाला असल्याने प्रजापतीचा संबंधी आहे. आणि अग्नीही तसाच आहे. यास्तव अश्वाच्या लेंड्यांची उखेला धुरी दिली म्हणजे अश्व व उखारूपी अग्नी यांचे सयोनित्व म्हणजे प्रजापतिजनकत्व किंवा सख्या बंधुत्वाचे नाते जणू काय व्यक्त केल्यासारखे होते. उखा भाजण्यासाठी भट्टी तयार करण्याकरता जमिनीवर खळगा खणीत असताना अध्वर्यूने 'अदितिस्त्वा देवी' हा मंत्र म्हणावा. कारण या मंत्रात उच्चारली जाणारी अदिती म्हणजे ही भूमीच होय. आणि खळगा खणला जातो तो ह्याच भूमीवर. यास्तव, खळगा खणण्याचे कार्य अदितिसंज्ञक भूदेवतेकडून घडले, म्हणजे खणण्याचे निमित्ताने भूमीची हिंसा केल्यासारखे होत नाही. अदितीनेच अदितीच्या ठिकाणी खणणे, हे हिंसारूप क्रूर कर्मच होत नाही. स्वतःची हिंसा कोणीही करीत

नाही. यास्तव, भूमीचे ठिकाणी खळगा खणण्याचे कर्तृत्व अदिती देवीकडे जावे, आणि भूमिखननरूपी क्रूर कर्म केल्याचा दोष स्वत:ला लागू नये म्हणून पूर्वोक्त 'अदितिस्त्वा देवी' हा मंत्र खळगा करताना अध्वर्यूने म्हणणे युक्तच आहे.

भट्टीमध्ये पेटवणासाठी जे पदार्थ घालावयाचे ते घातल्यानंतर त्यांच्यावर 'उखा' ठेवताना 'देवानां त्वा पत्नी:' हा मंत्र म्हणावा. कारण, देवांच्या पत्न्यांनीच पूर्वी उखा तयार करून ती भाजण्यासाठी भट्टीत ठेवली आहे. यास्तव, ह्या मंत्राचे पठण केले असता त्या देवपत्न्यांच्या हातूनच उखा भट्टीमध्ये ठेवल्याप्रमाणे होते. उखेवर पेटवणाचे पदार्थ घातल्यानंतर त्या उखेभोवती अग्नी प्रज्वलित करताना 'धिषणास्त्वा देवी:' इत्यादि चार मंत्र म्हणावेत. कारण, धिषणा म्हणजे विद्या. म्हणून या मंत्राने उखेच्या भोवती अग्नी प्रज्वलित केला असता विद्यांच्याकडूनच ती भट्टी पेटविल्याप्रमाणे होते. 'ग्नास्त्वा देवी:' हा दुसरा मंत्र होय. छंदाच्या अभिमानिनी देवता ह्याच 'ग्ना' या संज्ञेने प्रसिद्ध आहेत. ह्यास्तव हा मंत्र म्हटला असता छंदांच्या अभिमानिनी देवतांच्या कडून उखेची भट्टी प्रज्वलित केल्याप्रमाणे होते. सात होत्रकांच्या अभिमानिनी ज्या 'होत्रा' नामक देवता त्याच 'वरूत्री' संज्ञक देवता होत. यास्तव 'वरूत्रयो देवी:' हा मंत्र म्हटला असता 'होत्रा' देवतांच्या कडून उखा भाजण्याची भट्टी पेटविल्याप्रमाणे होते. देवांच्या पत्न्यांनाच 'जनय:' ही संज्ञा आहे. यास्तव, 'जनयस्त्वा देवी:' हा चौथा मंत्र म्हटला असता अध्वर्यूने जणू काय देवांच्या पत्न्यांच्या हस्तेच उखा भाजवयाची भट्टी प्रज्वलित केल्यासारखे होते. उखा भट्टीमध्ये ठेवली गेली म्हणजे तेव्हापासून तिच्या भाजण्याचा उपक्रम सुरु होतो. एवं च अदितिस्त्वा देवी:' इत्यादि सहा मंत्रांनी उखा भाजण्याचे कार्य करावे. वसंतादि ऋतू सहाच आहेत. अर्थात् सहा मंत्रांचे ऋतूंच्याशी संख्यासाम्य असल्याकारणाने पूर्वोक्त सहा मंत्रांनी उखा भाजली असता सहा ऋतूंच्या कडूनच जणू ती भाजल्याप्रमाणे होत असते. ह्या सहा मंत्रांपैकी शेवटच्या दोन मंत्रांत मिळून 'पचंतु' हा शब्द दोनवेळ उच्चारला जातो. या कारणानेच एका संवत्सरात-खरीपाचे पहिल्या हंगामात व रब्बीचे दुसऱ्या हंगामात असे-दोनदा शेतात धान्य पिकत असते. भट्टीत घातलेली उखा चोहोकडून पेटविली गेली म्हणजे ती 'वारुणी' होते म्हणजे क्रूर अशा वरुणदेवतेचे स्वरूप धारण करते. यास्तव, उखा भाजली जात असताना

'मित्र' शब्दाने युक्त अशा मंत्राचे पठण केले असता, ते 'मित्र' संज्ञक देवाकडून त्या उखेला शांत करण्याला कारणभूत होते. भाजली गेलेली उखा भट्टीतून बाहेर काढताना 'देवस्त्वा सवितोद्वपतु' हा मंत्र म्हणावा. म्हणजे त्यायोगाने अध्वर्यूने जणू काय सविता देवाच्या प्रेरणेने मंत्र व देवता यांच्यासहच त्या उखेला भट्टीतून बाहेर काढल्याप्रमाणे होते. भट्टीच्या बाहेर काढलेली उखा भूमीवर पसरलेल्या वाळूवर ठेवताना 'अपद्यमाना पृथिवि' हा मंत्र म्हणावा. ह्या मंत्रात 'तू दिशांना व्यापून रहा' अशी उखेला उद्देशून प्रार्थना केली जात असते. आणि त्यामुळेच उखेच्या ठिकाणी पुढे प्रस्थापित करण्यात येणारा अग्नी दशदिशांना व्यापून प्रकाशमान होत असतो. या मंत्राच्या 'उत्तिष्ठ बृहतीभव' इत्यादि उत्तरार्धात 'तू एका जागी निश्चल उभी रहा' अशी उखेची प्रार्थना केली जात असते. ती यजमानाच्या प्रतिष्ठेला स्थिरता आणण्याला कारणभूत होते. यज्ञाचे साधनभूत असलेले कोणतेही पात्र अग्नीमध्ये दग्ध केले जाते, ते पातळ अशा एखाद्या द्रव्याने शिंपले जाईपर्यंत असुरांना योग्य असे होत असते. व पातळ द्रव्याने जेव्हा ते सिंचित केले जाईल तेव्हाच ते देवयोग्य, अर्थात् यज्ञाचे साधन म्हणून उपयोगात आणण्याला पात्र होते. यास्तव, वाळूवर ठेवलेल्या उखेवर शेळीच्या दुधाचे सिंचन करावे. कारण अजा म्हणजे शेळी ही 'आग्नेयी' म्हणजे अग्निदेवतात्म आहे, असे श्रुतीने तिचे महत्त्व वर्णिले आहे. अर्थात् अग्निदेवतात्म अशा शेळीचे सर्व व्याधींचा परिहार करणारे दूध परमश्रेष्ठ होय. आणि म्हणूनच अध्वर्यूने परमश्रेष्ठ अशा शेळीच्या दुधाने उखेला सिंचित करणे अत्यंत योग्य होय. लोकव्यवहारामध्ये अग्नीने दग्ध होऊन लाल झालेले एखादे पात्र मंत्र न म्हणताच त्यावर पातळ असा एखादा पदार्थ किंवा पाणी शिंपून थंड करीत असतात. परंतु तसे न करता यज्ञोपयुक्त अशा उखारूपी पात्राला मंत्र म्हणूनच शेळीच्या दुधाने थंड करणे युक्त आहे. उखा तयार करताना छंदःशद्बघटित अशा मंत्रांनी ज्या अर्थी ती तयार केली जाते, त्या अर्थी 'छंद' हा शब्द ज्यामध्ये आहे, अशा 'वसवस्त्वाऽच्छृंदन्तु' इत्यादि मंत्रांनीच त्या उखेच्या ठिकाणी शेळीचे दूध शिंपणे योग्य आहे. शिवाय छंदोलिंगक मंत्रांनी केली जाणारी उखा ही छंदोरूप होय. अर्थात् अध्वर्यूने जणू काय उखारूपी छंद मंत्ररूपी छंदांनीच सिंचित केल्यासारखे होते. (अनुवाक ७).

एकवीस उडदांचे दाणे आपल्या हाती घेऊन युद्धात बाण लागून किंवा

वीज पडून मेलेल्या क्षत्रिय किंवा वैश्य पुरुषाचे मस्तक जेथे मिळण्याचा संभव असेल त्या ठिकाणी जावे. कारण, उडीद हे अमेध्य म्हणजे यज्ञाला अयोग्य असे असून मृत पुरुषाचे मस्तकही यज्ञाला अयोग्य असेच असते. यास्तव मलरूप असलेल्या खाऱ्या मातीने वस्त्राचा मळ जसा छाटून काढतात त्याप्रमाणे अमेध्य अशा उडदांचे दाणे मृत पुरुषाच्या मस्तकावर टाकून त्या मस्तकाच्या ठिकाणचा अमेध्यपणा काढून टाकावा, आणि ते मस्तक घेऊन यावे. हाताची दहा बोटे, पायांची दहा बोटे व शरीर मिळून एकवीस अंशांच्या समवायाने पुरुष निर्माण झालेला असतो. यास्तव, एकवीस उडीद मृत पुरुषाच्या मस्तकावर टाकले म्हणजे त्या पुरुषाचे सर्वांशाने ग्रहण केल्यासारखे होते. त्या मृत पुरुषांच्या धडापासून त्याचे मस्तक शस्त्राने तोडून वेगळे करावे आणि सात छिद्रे असलेली 'वपे' सारखी म्हणजे तलम कापडाप्रमाणे दिसणारी वारुळावरील मातीची एक कपरी त्या धडावेगळ्या केलेल्या मस्तकावर ठेवावी. कारण, धडावेगळे मस्तक प्राणवियुक्त असल्यामुळे अपवित्र, अर्थात् यज्ञयोग्य नसते. जिवंत मनुष्यांच्या मस्तकाचे ठिकाणी असणाऱ्या सात छिद्रांमध्ये संचार करणारे प्राण सात असतात, यास्तव, सात ठिकाणी छिद्रे असलेली वपेसारखी दिसणारी वारुळावरील मातीची कपरी त्या मस्तकावर ठेवली असता त्याच्या सात छिद्रांच्या ठिकाणी जणू काय, सात प्राणांचीच स्थापना करून ते प्राणयुक्त केल्यासारखे होते आणि ते यज्ञयोग्यतेला पात्रही होते.

काल अंतक, इत्यादि नांवानी प्रसिद्ध असे जे मृत्यूचे बंधू आहेत त्यांचे आधिपत्य यमाला प्राप्त झाले आहे. यास्तव, यमाला संतुष्ट करण्यासाठी यमाच्या पराक्रमांचे वर्णन ज्यामध्ये आहे अशी 'यमगाथा' नांवाची 'योऽस्य कौष्ठ्य.' इत्यादि ऋचांच्या आधाराने रचलेली गाणी गावी. म्हणजे यमाच्या कडूनच जणू काय त्या मस्तकाला त्याच्या सत्तेतून मुक्त करून त्याचे संपादन केल्यासारखे होते. तीन 'यमगाथा' गाव्या. कारण, पृथ्वी, अंतरिक्ष व द्यौ हे लोकही तीनच आहेत. यास्तव, तीन 'यमगाथा' गाइल्याने तिन्ही लोकांच्या कडूनच मृतपुरुषाचे ते मस्तक संपादन केल्यासारखे होते. यमगाथांचे गायन ज्या ब्राह्मणाकडून करविले असेल त्या गाणाऱ्या गवयाला काहीही दक्षिणा म्हणजे बिदागी देऊ नये. कारण गाथारूपी गानविद्येनेच गानविद्येवर मिळविल्या जाणाऱ्या 'शास्त्रीय' दक्षिणाद्रव्याला अमेध्य ठरवून अशा द्रव्याचा प्रतिग्रह करणाऱ्या गवयाला देवपितृकार्याच्यापासून वर्ज्य केले आहे. पुत्र, पशू इत्यादिकांच्या

प्राप्तीविषयी यजमानाकडून केल्या जाणाऱ्या कामना पूर्ण करणारे जे अग्नी, तेच कामनारूप होत. यास्तव, यजमानाने केलेल्या कामना पूर्ण होण्यासाठी त्या अग्नींच्याच उद्देशाने पशूंचे आलभन म्हणजे हनन करावे. म्हणजे त्या अग्नींच्या यजमानाने इच्छिलेल्या कामना निश्चयाने पूर्ण होतात.

या ठिकाणी अशा शंका उत्पन्न होतात की, अग्नींच्या उद्देशाने पशूंचे हनन करावे, की करू नये? किंवा त्या पशूंचा 'उपाकरण' संस्कार केल्यानंतर ते पशू सोडून द्यावेत? की, त्या पशूंच्या संबंधी समाप्तीपर्यंतचे सर्वच अनुष्ठान करावे? अग्नींच्या उद्देशाने पशूंचे हनन न केले, तर यजमानाला त्याच्या इच्छेप्रमाणे पशूंची प्राप्तीच न होण्याचा प्रसंग उद्भवेल. पशूंचा उपाकरण संस्कार करून ते जर सोडून दिले तर यज्ञाचे अनुष्ठान अपुरे राहून यज्ञाचा भ्रंश होईल. बरे, त्या पशूंच्या संबंधी सर्वच अनुष्ठान संपविले तर अश्व, वृषभ, इत्यादिकांच्या शिरांच्या ठिकाणी असणारे सार नष्ट होईल, आणि मग पुढे त्या शिरांची अग्निचयनक्षेत्रावर मांडणी करणेच प्रशस्त होणार नाही! परंतु या शंकांचे समाधान असे की, पशूंचे हनन केले तर यजमानाला पशूंची प्राप्ती होण्याचा अभावरूप दोष टळेल आणि उपाकरणानंतर पशू सोडून दिले, तर अश्व, वृषभ, इत्यादिकांच्या शिरांच्या ठिकाणी असणारे सार नष्ट होण्याचाही संभव राहणार नाही. आता, उपाकरणानंतर पशूंना सोडून देण्याचा पक्ष स्वीकारला, तर यज्ञानुष्ठान अपुरे राहिल्यामुळे यज्ञ भ्रष्ट होण्याची आपत्ती येण्याचा संभव शिल्लक राहतो. परंतु, त्यावर असा उपाय आहे की, 'प्रजापति' देवतेच्या उद्देशाने 'तूपर' म्हणजे शिंगे नसलेल्या पशूचे यजन करून अग्निदेवताविषयक पशूंचे अनुष्ठान संपवावे म्हणजे यज्ञ भ्रष्ट होण्याचीही आपत्ती उरत नाही. कारण, प्रजापती हाच यज्ञाचा उत्पादक असल्यामुळे, त्याच्या उद्देशाने पशुयाग केला, म्हणजे यज्ञरूप अशा प्रजापतीच्याच ठिकाणी अनुष्ठित केलेल्या यज्ञाची प्रतिष्ठा म्हणजे समापन केल्यासारखे होते.

प्रजापतीने सर्व प्रजा उत्पन्न केल्या. परंतु, त्या करण्यात आपले सर्व सामर्थ्य खर्च झाले आणि आता आपण रिकामे म्हणजे सामर्थ्यहीन झालो, असे प्रजापतीला वाटले. तेव्हा आपल्या ठिकाणी पूर्वीप्रमाणे सामर्थ्य उत्पन्न होण्याच्या कामी मागील अनुवाकात सांगितलेल्या 'आप्री' नांवाच्या ऋचा उपयोगी पडतील असे आपल्या मनाशी विचार करून त्याने निश्चित ठरविले. आणि नंतर प्रजापतीने आपल्या स्वतःच्या संतुष्टतेसाठी स्वतःच यज्ञाचा प्रारंभ

करून तत्संबंधी प्रयाज व अनुयाज यांचे अनुष्ठान करताना आप्रीसंज्ञक ऋचांचा उपयोग करून त्याने सर्व यज्ञाचे अनुष्ठान केले. आणि त्या यज्ञानुष्ठानाने स्वत:ला प्रसन्नता मिळविली. यासाठी आताच्याही यजमानांनी प्रजापती देवाच्या तृप्ततेसाठी पशुयाग करताना 'प्रयाज' व 'अनुयाज' यांच्या यजनाचे वेळी 'आप्री' संज्ञक ऋचाच होत्यांकडून म्हणवाव्यात. कारण यज्ञ हा प्रजापतीरूप असून प्रजापती यज्ञरूप आहे. यास्तव, प्रजापतीप्रमाणे आपणही 'उर्ध्वा अस्य समिधो भवन्ति' इत्यादि'आप्री' संज्ञक ऋचांनी प्रजापतिस्वरूप अशा यज्ञाचे अनुष्ठान केले असता ते यज्ञस्वरूप अशा प्रजापतीदेवाला प्रारंभापासूनच संतुष्ट व तृप्त करण्याला कारणभूत होते. ह्या 'आप्री' नामक ऋचा अपरिमित म्हणजे ऱ्हस्व, दीर्घ प्रमाणात कमीजास्त असणाऱ्या अनेक छंदांमध्ये ग्रथित झालेल्या आहेत. प्रजापतीही अपरिमित व अनेकरूप आहे. यास्तव, पठण केल्या जाणाऱ्या त्या आप्रीसंज्ञक ऋचा अपरिमितरूपी प्रजापतीच्या संतोषाला कारणभूत होतात. शिवाय या ऋचांचे कमजास्त अक्षरांनी युक्त असलेले मधले चरण या ऋचांच्या ठिकाणी प्रमाणदृष्ट्या उत्पन्न होणाऱ्या न्यूनत्व व अधिकत्व ह्या दोघा स्त्रीपुरुषांची दांपत्येच जणू निर्माण करतात.

हातापायांच्या बोटांपेक्षा त्यांच्या वरचे केस लहान असतात, त्याप्रमाणे ज्या छंदाचे मधले चरण केसांसारखे लहान असतात त्या छंदाला 'लोमश' असे नांव आहे. प्रजापतीने उत्पन्न केलेले सर्व पशू 'लोमश' म्हणजे केसाळ आहेत. यास्तव, पूर्वोक्त 'आप्री' संज्ञक ऋचांमध्ये पशुसदृश अशा छंदांच्या पठणाने यजमानाला पशूंची प्राप्ती करून दिल्यासारखे होते. 'ऊर्ध्वा अस्य समिध:' इत्यादि आप्री ऋचा छंदांच्या भिन्नत्वामुळे विविधरूपाच्या भासतात. त्याचप्रमाणे चयनरूपाने मांडण्यात येणारा अग्नीही विविधरूप म्हणजे नानाप्रकारच्या आकारांनी याज्ञिक मांडीत असतात. आणि म्हणूनच समानरूप असलेल्या आप्रीसंज्ञक ऋचा अग्निचयनपूर्वक होणाऱ्या सोमयागात योजण्यास अत्यंत योग्य आहेत.

इध्मातील समिधा अनुक्रमाने अध्वर्यूने अग्नीवर द्यावयाच्या असतात. त्यावेळी 'होता' ज्या ऋचा पठण करतो, त्यांना 'सामिधेनी' अशी संज्ञा आहे. अग्निचयनपूर्वक केल्या जाणाऱ्या सोमयागामध्ये 'प्रवोवाजा अभिद्यवो' इत्यादि नेहमी म्हणण्यात येणाऱ्या अकरा व मागे सांगितलेल्या 'समास्त्वाऽग्न

ऋतव:' ह्या दहा मिळून होत्याने एकवीस 'सामिधेनी' म्हणाव्यात. कारण, 'दीप्ती' एकवीस प्रकारची असते. त्याचप्रमाणे 'प्रतिष्ठा' ही देखील एकवीस प्रकारची आहे. यास्तव, एकवीस सामिधेनी होत्याने म्हटल्या असता यजमानाच्या शरीराला दीप्ती प्राप्त होते. आणि शिवाय, तो प्रतिष्ठेलाही प्राप्त होतो. शाखांतरात पठित असलेल्या 'उपेम सृक्षि वाजयु:' इत्यादि तीन ऋचांची भर घालून चौवीस सामिधेनी म्हणाव्यात, असाही एक पक्ष किंवा पध्दती आहे. कारण, एका संवत्सरात चौवीस पंधरवडे असतात व सर्व जगाचे कल्याण करणारा 'वैश्वानर' अग्नीही 'संवत्सर' रूप आहे. यास्तव, चौवीस सामिधेनी म्हटल्या असता प्रत्यक्ष 'वैश्वानर' अग्नीच यजमानाला अनुकूल करून घेतल्यासारखे होते.

नेहमीप्रमाणे सामिधेनींच्या पैकी पहिली व शेवटची ऋचा तीन तीन वेळ न म्हणता एक एक वेळच म्हणावी. म्हणजे त्या ऋचांची आवृत्ती करू नये. कारण, स्वर्गलोक हा आवृत्तिरहित आहे. म्हणून अशा पध्दतीने सामिधेनी म्हटल्या असता स्वर्गलोकाला प्राप्त झालेला यजमान इहलोकी परत येत नाही. नेहमीच्या अकरा सामिधेनींच्या नंतर म्हणावयास सांगितलेल्या दहा ऋचांपैकी 'समास्त्त्वाऽग्न ऋतवो वर्धयंतु' हा पहिल्या ऋचेचा पहिला चरण आहे. ह्या चरणात संवत्सरवाचक 'समा' आणि 'ऋतु' हे दोन शब्द आहेत, ह्या चरणाचे पठण केले असता संवत्सरांच्याकडून अग्नीला व ऋतूंच्याकडून संवत्सराला वृद्धिंगत केल्याप्रमाणे होते. ह्याच ऋचेचा 'विश्वा आभाहि प्रदिश: पृथिव्या:' असा चौथा चरण असून त्यामध्ये 'आभाहि' म्हणजे 'प्रकाशित हो' असे अग्नीला उद्देशून म्हटले जात असते. यास्तव या चरणाचे पठण केले असता, त्यापासून सर्व दिशांच्या ठिकाणी अग्नी प्रकाशमान होतो. नवव्या ऋचेत 'प्रत्यौहतामश्विना मृत्युमस्मात्' असा तिसरा चरण असून त्यात 'मृत्यूला आमच्यापासून दूर न्या' अशी अश्विनीकुमारांची प्रार्थना केली जात असते. म्हणून हा चरण पठण केला असता, अश्विनीकुमारांच्याकडून यजमानाच्या अपमृत्यूला दूर केल्याप्रमाणे होते. दहाव्या ऋचेत 'उद्वयं तमसस्परि' असा पहिला चरण असून त्यात 'अंधकाराचा' निर्देश केला जात असतो. या चरणाचे पठण केले असता यजमानाच्या ठिकाणी असणारा पातकरूपी अंधकार त्याच्यापासून दूर केल्यासारखा होतो. ह्या ऋचेचा 'अगन्म ज्योतिरुत्तमं' असा चौथा चरण असून त्यात 'ज्योति' असा शब्द उच्चारला जात असतो. द्युलोकाचे

ठिकाणी प्रकाशित होणारा आदित्य म्हणजे भगवान् सूर्यनारायण हाच परमोत्कृष्ट अशी ज्योती आहे. यास्तव ह्या चरणाच्या पठणाने यजमान आदित्याच्याच सान्निध्याला प्राप्त होतो.

ज्या यजमानाच्या 'साग्निचित्य' म्हणजे अग्निचयनपूर्वक केल्या जाणाऱ्या सोमयागात आता सांगितलेल्या 'समास्त्वाऽग्न ऋतवः' इत्यादि सामिधेनी पठण केल्या जातात त्या यजमानाच्या स्वर्गलोकप्रकाशनाला साधनभूत अशा उख्याग्निधारणाला कारणभूत असा संवत्सर व अग्निसाधनसमूहरूप श्री किंवा संपत्ती ही पूर्णतेला जात नाहीत. म्हणजे यजमानाच्या स्वर्गलोकप्रकाशनाचे साधन म्हणून पुरी पडत नाहीत. यासाठी 'ज्योतिष्मती' म्हणजे 'ज्योति' या शब्दाने युक्त असलेली 'उद्वयं तमस्परि' ही ऋचा पूर्वोक्त दहा ऋचांच्या नंतर शेवटी पठण करावी. त्या योगाने सर्व ऋचांच्यावर 'ज्योति' ह्या प्रकाशवाची शब्दाचे स्थापन केल्यासारखे होते व त्यामुळे यजमानाला स्वर्गलोक स्पष्टपणे प्रकाशित होतो. (अनुवाक ८).

नेहमीच्या 'आकूत्यै प्रयुजेऽग्नये' इत्यादि मंत्रांनी दीक्षाहुती दिल्यानंतर साग्निचित्य क्रतुसंबंधी 'आकूतिमग्निं प्रयुजं स्वाहा' इत्यादि सहा आहुती द्याव्यात आणि नंतर यजमानाला 'दीक्षा' द्यावी. 'वसंत' इत्यादि ऋतू सहाच आहेत. यास्तव अशा प्रकारे सहा आहुतींच्या योगाने यजमानाला 'दीक्षा' दिली असता, अध्वर्यूने जणू काय सहा ऋतूंच्या कडूनच यजमानाला दीक्षित केल्यासारखे होते. पूर्वोक्त सहा आहुती दिल्यावर 'विश्वे देवस्य नेतुर्मर्तो' या मंत्राने सातवी आहुती द्यावी. कारण, गायत्री, त्रिष्टुप्, जगती, अनुष्टुप्, पंक्ती, उष्णिक् व ककुत् हे सात छंदच सर्व छंदांत प्रमुख आहेत. यास्तव, पूर्वोक्त सात आहुतींनी यजमानाला दीक्षा दिली असता, सात छंदांच्याकडूनच यजमानाला दीक्षा दिल्याप्रमाणे होते. 'विश्वे देवस्य नेतुः' ह्या अनुष्टुप् छंदातील शेवटच्या ऋचेने अध्वर्यू दीक्षाहुती देतो. कारण वाणी ही अनुष्टुप्रूप आहे. आणि म्हणूनच सात प्राणांच्यापेक्षा वाणी ही श्रेष्ठ आहे. आता सांगितलेल्या ऋचेतील पहिला चरण एका अक्षराने न्यून असल्यामुळे तो अपूर्णरूप आहे. आणि म्हणूनच वाणीच्या अपूर्ण म्हणजे अस्पष्ट अशा स्वरूपावरच मनुष्ये आपले उपजीवन करीत असतात. म्हणजे मनुष्ये अस्पष्ट अशा वाणीने जेव्हा मनामध्ये अगोदर बोलतात तेव्हाच ती स्पष्टपणाने पुढे बोलू शकतात. संपूर्ण अशा

पूर्वोक्त ऋचेने आहुती द्यावी. कारण, प्रजापती देव सर्व सृष्टीमध्ये पूर्णपणे व्यापून राहिलेला आहे. यास्तव, पूर्ण अशा ऋचेने आहुती दिली असता सर्वव्यापी प्रजापती देवालाच प्राप्त करून घेतल्यासारखे होते. पहिला चरण एका अक्षराने कमी असल्यामुळे न्यून किंवा अपूर्ण अशा अक्षरांनी युक्त असलेल्या पूर्वोक्त ऋचेनेच एक प्रकारे अध्वर्यू आहुती देत असतो. प्रजापती देखील न्यून म्हणजे नामरूपरहित अशा अव्याकृत जगद्बीजापासूनच नामरूपसहित प्रजा उत्पन्न करीत असतो. यास्तव अक्षरसंख्येच्या दृष्टीने न्यून असलेल्या पूर्वोक्त 'विश्वेदेवस्य' या ऋचेने अध्वर्यू जी आहुती देतो ती प्रजापतीशी समानरूप होत असल्याने यजमानापासून पुत्रपौत्रादि प्रजा उत्पन्न करण्याला कारणभूत होते.

'सण' नांवाच्या तृणाने किंवा पक्ष्याच्या घरट्याने उखेचे तोंड झाकावे आणि ती उखा आहवनीयावर तापत ठेवावी. आहवनीयाग्नीच्या ज्वालेवर उखा तापत ठेवली तर आजपर्यंत जेवढे धन यजमानाने संपादन केले असेल, तेवढेच त्याच्याजवळ टिकून राहील. पुढे मिळणारे टिकणार नाही. ज्वालारहित अशा अंगारांच्यावर जर उखा तापत ठेवली, तर घरामध्ये आज जे द्रव्य नाही, ते भविष्यकाळी मिळते. यास्तव, ज्वाला नसलेल्या झळझळीत अंगारांच्या वरच उखा तापत ठेवली असता भविष्यकाळी प्राप्त होणाऱ्या धनाचाच जणू परिग्रह केल्याप्रमाणे होते. आजपर्यंत मिळविलेल्या धनापेक्षा पुढे संपादन होणाऱ्या धनाचेच महत्त्व सर्व लोक मानीत असतात, हे आपण पाहतोच. 'मा सु मिथ्या मा सु रिषः' व 'दृंहस्व देवि पृथिवि' या दोन मंत्रांनी उखा अग्नीवर तापत ठेवावी म्हणजे द्विपाद अशा यजमानाच्या प्रतीक्षेला ती कारणभूत होते. उखा ब्रह्मरूप अशा 'वसवस्त्वा कृण्वन्तु' इत्यादि यजुमंत्रांनी तयार केलेली असते. ती जर फुटली किंवा भेगळली तर यजमानावर मरणाचे संकट गुजरेल व त्याच्या यज्ञाचाही नाश होईल. यास्तव, 'मित्रैतामुखां तप' हा मंत्र म्हणून उखेच्या भोवती प्रदक्षिणाकार अंगार घालावेत. या मंत्रांत व्यक्त होणारा मित्र हाच ब्रह्मरूप आहे. म्हणून या मंत्राने उखेभोवती अंगार घातले असता मित्ररूपी ब्रह्माच्याच सान्निध्यात उखेची प्रतिष्ठा म्हणजे स्थापना केल्यासारखे होते. आणि त्यामुळे यजमानावर मरणाचे संकट कोसळत नाही व त्याच्या यज्ञाचाही नाश होत नाही. कदाचित् उखा फुटलीच, तर तिचे फुटलेले तुकडे चांगले कुटून बारीक मातीसारखे करावेत आणि त्यांतच दुसरी माती

मिसळून पुन्हा नवी उखा तयार करावी. हेच पूर्वीची उखा फुटल्याच्या दोषाचे निराकरण करणारे प्रायश्चित होय. जो यजमान 'गतश्री' म्हणजे वेदशास्त्रवेत्ता, ग्रामाधिपती अथवा क्षत्रिय असेल त्याच्या उखेमध्ये मंथनाने उत्पन्न केलेला अग्नी घालावा. आहवनीयाग्नीवर त्याची उखा तापवू नये. कारण या तिहीपैकी कोणत्याही प्रकारचा जो यजमान असतो, तो ऐश्वर्याने युक्त असतो. यास्तव, स्वतःच्या प्रभुत्वामुळेच मथिताग्निरूपी स्वकीय देवतेला जवळ करण्यालाच तो पात्र झालेला असतो. आहवनीयाग्निरूपी अन्य देवता उखा तापविण्यासाठी जवळ करण्याची त्याला अवश्यकताच नसते. गतश्री म्हणजे ऐश्वर्ययुक्त असूनही जो यजमान पुन्हा अधिक ऐश्वर्याची इच्छा करीत असेल त्याची उखा आहवनीयावर तापत ठेवावी आणि त्याच्या उष्णतेमुळेच उखेतील सणाचे तृण किंवा पक्ष्याचे घरटे पेट घेऊन उखेमध्ये जो अग्नी निर्माण होईल, तोच त्या यजमानाला अधिक ऐश्वर्य प्राप्त करून देईल. अशा प्रकारे उखेत निर्माण होणारा अग्नी हा 'स्वयंभू' या नांवाने उल्लेखिला जात असतो. आणि असा स्वयंभू अग्नी ज्याच्या उखेत निर्माण केला जातो, तो यजमान विशेष ऐश्वर्याला प्राप्त होतो. ज्या यजमानाला उद्देशून 'याच्याशी शत्रुत्व करणारा भाऊबंद मी उत्पन्न करीन' अशी अध्वर्यू इच्छा करील त्या यजमानाच्या उखेत दुसऱ्या घरातून अथवा इतर प्रदेशातून आणलेला अग्नी घालावा. असे केले असता फार विलंब न लागताच त्या यजमानाशी शत्रुत्व करणारा भाऊबंद निर्माण होईल. जो यजमान अन्नप्राप्तीची इच्छा करीत असेल त्याच्या उखेमध्ये तळणाची एखादी लोखंडी कढई खूप तापवून तीमध्ये तूप ओतताक्षणीच ते पेट घेऊन मोठी ज्वाला उत्पन्न होते, तोच अग्नी आणून घालावा. तुपात भाजीपाला परतण्याचे किंवा भज्यासारखे पदार्थ तळण्याचे जे कढई इत्यादि पात्र असते त्यास 'अंबरीष' अशी संज्ञा आहे. आणि म्हणून आताच सांगितल्याप्रमाणे खूप तापल्यावर त्यात तूप सोडताच ज्वालारूप अग्नी निर्माण होत असतो. सारांश, अशा प्रकारचा अंबरीषोत्पन्न अग्नी उखेत आणून घातल्याच्या योगाने तुपावर परतून भाजी वगैरे करण्याचे किंवा पुऱ्या, भजी, इत्यादि तळण्याचे जे कढई किंवा खोलगट तव्यासारखे लोखंडी भांडे असते त्यास 'अंबरीष' अशी संज्ञा आहे. अशा प्रकारचे 'अंबरीष' खूप तापवून त्यात तूप ओतताक्षणीच त्यात ज्वालारूप अग्नी उत्पन्न होतो. अन्नप्राप्तीची जर यजमान इच्छा करीत असेल, तर त्याच्या यज्ञातील उखेमध्ये आता सांगितलेल्या पद्धतीने 'अंबरीष'

पात्रात उत्पन्न झालेला अग्नी आणून घालावा. 'अंबरीष' संज्ञक पात्र भाजी इत्यादि तयार झालेले पदार्थ ठेवण्याच्याही कामी उपयोगात आणले जात असते. यास्तव, यजमान इच्छित असलेले अन्न व आता सांगितलेला अंबरीषोत्पन्न अग्नी यांचे समानयोनित्व म्हणजे एकाच स्थानी उत्पन्न झाल्याचे नाते असल्यामुळे, उखेमध्ये अंबरीषोत्पन्न अग्नी घातला असता, यजमानाला त्याच्या अपेक्षेप्रमाणे निश्चयाने अन्न मिळते. मुंज म्हणजे 'मोळ' नांवाच्या गवताच्या काड्या तापविण्यासाठी उखा आहवनीयावर ठेवण्यापूर्वी तिच्यामध्ये घालाव्यात. म्हशी वगैर पशू ते गवत खात असल्यामुळे मुंज नांवाचे गवत रसयुक्त आहे. यास्तव, त्या गवताने उखा झाकली म्हणजे ती यजमानाला दूध,दही इत्यादि रसांनी झाकून टाकते. म्हणजे यजमानाला दूध, दही इत्यादि पुष्कळ रस संपादन करून देते. अगदी लहान अशा काष्ठशकलाला 'क्रुमुक' असे नांव आहे. एकदा काही कारणाने अग्नी देवांच्या जवळून दूर पळून गेला. तो क्रुमुक संज्ञक लहान काष्ठात दडून बसला यास्तव, आता सांगितल्याप्रमाणे उखेमध्ये 'क्रुमक' संज्ञक काष्ठ किंवा लाकडाचा बारीक 'भुस्सा' घालावा म्हणजे त्यामध्ये दडून बसलेल्या अग्नीलाच उखेत आणून घातल्याप्रमाणे होते. त्या भुश्यामध्ये तूप मिसळावे. कारण, तूप हे जणू अग्नीचे आवडते गृहच आहे. यास्तव, तुपात मिश्र केलेला लाकडाचा भुस्सा उखेत घातला असता. तीमध्ये झटकत् अग्नी उत्पन्न होऊन तो ज्वालारूप तेजाने समृध्द होतो. उखेत उत्पन्न झालेल्या अग्नीवर 'परस्या अधिसंवतः' ह्या मंत्राने वेकळीची एक समिध द्यावी. म्हणजे त्या अग्नीला अधिक दीप्ती प्राप्त होते. नंतर शमीची एक समिध त्या अग्नीवर द्यावी. म्हणजे तो अग्नी शांतपणे प्रदीप्त होतो. उखेमध्ये उत्पन्न झालेल्या अग्नीचे 'सिद त्वं मातुरस्या उपस्थे' इत्यादि तीन मंत्रांनी उपस्थान करावे. कारण, पृथ्वी इत्यादि लोक तीनच आहेत. यास्तव तिन्ही लोकांच्याशी संख्यासाम्य असलेल्या पूर्वोक्त तीन ऋचांनी उखेतील अग्नीचे उपस्थान केले असता, तिन्ही लोकांच्या ठिकाणी यजमान प्रख्यातीला प्राप्त होतो व आपल्या ठिकाणी प्राण, अपान व व्यान ह्या तिन्ही प्राणांचेही स्थापन करतो. (अनुवाक ९).

पूर्वकाली कुऱ्हाड किंवा कोणत्याही शस्त्राचा आघात करून न तोडलेले काष्ठ अग्नी केव्हाही दग्ध करीत नसे. म्हणजे वाऱ्याच्या झोताने किंवा आपल्या ठिकाणच्या शुष्कतेमुळे वृक्षावरून तुटून खाली पडलेले काष्ठ अग्नीवर घातले

तरी ते जळून भस्म होत नसे. फार तर अग्नीच्या ज्वालेची धग लागून ते थोडे काळे होत असे इतकेच. पण, एका ऋषीने 'यदग्ने यानि कानि चाऽऽते दारूणि' इत्यादि पांच ऋचा म्हणून अशा प्रकारचे शस्त्राघाताविरहित तुटून पडलेले काष्ठ समिधेप्रमाणे अग्नीवर देऊन त्याला खाऊ घातले. आणि तेव्हापासून अशा प्रकारची मंत्रपूर्वक दिलेली शुष्क काष्ठे अग्नी खाऊ लागला म्हणजे अशा काष्ठांना दग्ध करून त्यांचे भस्म करू लागला. यास्तव, आताच्या काळातला जो अध्वर्यू उखेमध्ये उत्पन्न झालेल्या अग्नीवर शस्त्राघातविरहित अशी शुष्क काष्ठे पूर्वोक्त मंत्रांनी देतो, त्याची ती काष्ठे अग्नी आनंदाने भक्षण करतो. शस्त्राघातविरहित शुष्क काष्ठे मंत्रक अग्नीवर देण्याचे हे महत्त्व जो जाणतो त्यालाही तो अग्नी भक्षणीय अशा पदार्थांचे भक्षण करवितो. प्रजापतीने अग्नी जेव्हा निर्माण केला, तेव्हा त्याचा नाश करण्यासाठी राक्षस धाऊन आले. त्या राक्षसांना मारण्याला शस्त्रासारखे उपयोगी पडणारे 'यदग्ने यानि कानि' येथपासून 'उन्नयामि स्वामहम्' येथपर्यंतचे मंत्रसंघात्मक असे 'राक्षोघ्न' नांवाचे एक सूक्त प्रजापतीने आपल्या ज्ञानदृष्टीने पाहिले. आणि त्या सूक्ताचाच प्रयोगरूपाने उपयोग करून त्याच्या प्रभावाने प्रजापतीने अग्नीवर चालून आलेल्या राक्षसांना ठार केले. यासाठी उख्याग्नीवर काष्ठे देताना जर या 'राक्षोघ्न' सूक्ताचा उपयोग केला तर त्या काष्ठांच्या सेवनाने पुष्ट झालेल्या अग्नीकडूनच त्याच्या नाशासाठी धाऊन येणाऱ्या राक्षसांचा नाश अध्वर्यूने केल्यासारखे होते.

अश्वत्थ वृक्ष सर्व वृक्षांमध्ये सापत्न बुध्दीने शत्रुत्व करणाराचा पराभव करणारा आहे. ह्यास्तव, उखेमध्ये उत्पन्न झालेल्या अग्नीवर 'दंष्ट्राभ्यां मलिम्लून्' या मंत्राने अश्वत्थ वृक्षाची समिध द्यावी. म्हणजे ती यजमानाशी सापत्न भावाने शत्रुत्व करणाऱ्याचा पराभव करून त्याला जय मिळवून देण्यास कारणभूत होते. 'ये जनेषु मलिम्लव:' ह्या मंत्राने 'वेकळी' ची समिध त्या अग्नीवर द्यावी. ती त्या अग्नीला प्रदीप्त करते. 'यो अस्म्यभ्यमराती यात्' ह्या मंत्राने शमीची समिध उखेतील अग्नीवर द्यावी. म्हणजे ती त्या अग्नीला शांतता प्राप्त करण्यास कारणभूत होते. या 'राक्षोघ्न' सूक्ताच्या शेवटी असलेल्या 'संशितं मे ब्रह्म' व 'उदेषां बाहू अतिरं' ह्या दोन ऋचा अध्वर्यूने यजमानाला सांगाव्या आणि त्याच्याकडून म्हणवाव्यात आणि दोन उंबराच्या समिधा त्या उख्याग्नीवर द्याव्यात. ह्या दोन ऋड्.मंत्रांपैकी पहिल्या 'संशितं मे ब्रह्म' या

मंत्रात ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्या ठिकाणच्या तीक्ष्ण अशा कार्यक्षमतेचे जे विवेचन व्यक्त केले गेले आहे, त्यावरून ह्या दोन वर्णांतील समाजात एकमेकाविषयी परोपकार बुध्दीच असल्याचे कळून येते. ब्राह्मण पुरोहिताच्या शिक्षणाने राजा आपल्या स्वधर्मविषयक कर्तव्यात अत्यंत तीक्ष्ण होतो, आणि क्षत्रियांच्या म्हणजे राजाच्या नियमनशक्तीच्या आश्रयाने ब्राह्मण आपल्या आचारधर्मात तत्पर होऊन राहत असतो. आणि यावरूनच दिसून येते की, राजाश्रयाने युक्त असलेला ब्राह्मण राजाश्रयरहित ब्राह्मणाला न जुमानता पुढे जातो. आणि स्पष्ट व हितप्रद अशा धर्मोपदेशक पुरोहिताने युक्त असलेला राजा अधार्मिक अशा राजाला खाली घालतो.

आपल्या दहनशक्तीने इतरांचा नाश करणारा हा अग्नी म्हणजे मूर्तिमंत मृत्यूच असून सुवर्ण हे अग्नीच्या दहनशक्तीचा कितीही संपर्क झाला तरी जळून भस्म न होता जसेच्या तसेच टिकून राहत असल्यामुळे 'अमृतरूप' होय. यासाठीच सुवर्णाचा रुक्मनामक अलंकार यजमानाने घातला म्हणजे त्याने जणू काय मृत्युरूप अग्नीच्या व आपल्या मध्ये अमृतरूपी सुवर्णच आड धरल्यासारखे होते. एवं च, त्याच्याकडून स्वतःच्या उराशी धारण करण्यात येणारा उखाग्नी त्याला दग्ध करीत नाही.

चतुष्कोण किंवा चौकटीच्या आकारासारख्या तयार केलेल्या त्या रुक्मावर एकवीस ठिपके उठविलेले असावेत. कारण, बारा महिने, वसंत इत्यादि चार आणि हेमंत व शिशिर मिळून एकच धरून पांच ऋतू, तीन लोक व एक आदित्य मिळून देवांचे लोकही एकवीसच आहेत. यास्तव, देवलोकांच्या संख्यासाम्यत्वामुळे समानरूप असा सुवर्णमय रुक्म धारण केल्याच्या योगाने ह्या एकवीस देवलोकांतून यजमानाने आपल्या शत्रूला हुसकून लावल्यासारखे होते.

शत्रूंना नितांत बाधा उत्पन्न करणारे, ते निर्बाध होत. गेंड्याच्या जाड चामड्याची ढाल आणि तरवार बाळगणाऱ्या देवांनी आपल्या चर्ममय ढालीच्या बाजूला मोठमोठ्या फोडांच्या सारखे दिसणारे काशासारख्या धातूचे सुळे बसविले होते. आणि आपल्यावर घाला घालण्यासाठी असुर चाल करून येत आहेत तोच त्यांच्या मस्तकात आपल्या ढालीचे तडाखे दिले. त्याक्षणी त्या ढालींच्या बाहेरच्या बाजूस जडविलेल्या सुळ्यांच्या आघाताने ते असुर

भूमीवर आडवेच झाले. सारांश, अशा प्रकारे देवांनी असुरांना नितांत बाधेमध्ये पाडले. यासाठी फोडासारखे दिसणारे एकवीस ठिपके उठविलेला रुक्म यजमानाने धारण केला असता तो त्याच्या शत्रूंना नितांत बाधेमध्ये पाडतो.

'विश्वा रूपाणि प्रतिमुंचते' ह्या 'सवितृ' लिंगात्मक ऋचेने शिंक्याचा पाश यजमानाने आपल्या गळ्यात बांधावा म्हणजे तो सवितादेवाकडून पुढे करण्यात येणाऱ्या यज्ञकार्याविषयी उत्तमप्रकारे प्रेरणा संपादन करतो. नंतर तिच्याच पुढच्या 'नक्तोषासा समनसा' या ऋचेने कृष्णाजिन पांघरावे म्हणजे त्या मंत्रात प्रतिपादित झालेल्या अहोरात्रांच्याकडून शिंक्यामध्ये ठेवलेल्या उख्याग्नीला उंच धरले जाते. या ऋचेचा 'देवा अग्निं धारयन् द्रविणोदा:' असा चौथा चरण असून यजमानाच्या शरीरामध्ये संचार करणाऱ्या व यजमानाला यज्ञफलरूपी धन मिळवून देणाऱ्या प्राणांनी अग्नीला धारण केले', असा त्या चरणाचा भावार्थ आहे. प्राणरूपी देवच यजमानाला यज्ञपलरूपी धन देत असतात. यास्तव या चरणाचे पठण केले असता अहोरात्रांच्याकडून उंच धरलेल्या अग्नीला प्राणांच्याकडून त्या ठिकाणी सुस्थितपणे धारण केले जाते.

यजमानाने आपल्या स्थानी बसून रुक्म, शिंक्याचा पाश व कृष्णाजिन यांचे धारण करावे. आणि असे केले जात असल्यामुळेच 'प्रजा' आसीन म्हणजे बसलेल्या स्थितीतच उत्पन्न होत असतात. यजमानाने शिंक्याच्या बाहेरून कृष्णाजिन पांघरावे. रुक्मरूपाने असणारे सुवर्ण हे तेजोरूप असून कृष्णाजिन हे ब्रह्मरूप आहे. अर्थात् आतल्या बाजूने तेजाकडून आणि बाहेरच्या बाजूने ब्रह्माकडून अशा दोन्ही बाजूंनी शिंक्याचा परिग्रह केल्यासारखे होते. शिंके सहा पदरांचे केलेले असावे. कारण ऋतू सहा आहेत. म्हणून सहापदरी शिंके केले असता, ते सहा ऋतूंच्याकडून वर उचलले जाते. अथवा बारापदरी शिंके करावे. म्हणजे बारा महिन्यांनी पूर्ण होणाऱ्या संवत्सराकडूनच ते वर उचलल्याप्रमाणे होत असते. शिंके मोळाच्या गवताचे करावे. कारण 'मोळ' हा रसयुक्त असतो. यास्तव, मोळाचे शिंके केले असता ते यजमानाला दुग्धादि रसांनी समृध्द करण्यास कारणभूत होते. 'सुपर्णोऽसि गरुत्मान्' इत्यादि मंत्र म्हणून यजमानाने उखेतील अग्नीकडे अवलोकन करावे. असे केले असता

यजमानाने त्या उख्याग्नीच्या स्वरूपाचेच माहात्म्य वर्णन केल्याप्रमाणे होते. 'दिवं गच्छ ध्रुव: पत' असा पूर्वोक्त मंत्राचा शेवट आहे. याचे पठण केले असता उखेत असलेला अग्नी यजमानाला स्वर्गलोकाच्या ठिकाणी नेऊन पोचवितो. (अनुवाक १०).

१ हे जातवेदा, अग्निदेवा, उत्कृष्ट प्रकारे प्रज्वलित झालेला व अन्नांचा संपादक असा तू यज्ञकर्माभिज्ञ अशा याज्ञिकांचे बुद्धिरूपी धान्य साठविण्याचे जणू पोतेच असलेल्या त्यांच्या शरीरावरील त्वचेला प्रकाशित करीत, आम्ही समर्पित केलेल्या मधुर घृताचे प्राशन करीत आणि आम्ही अर्पण केलेली हविर्द्रव्ये देवांच्याकडे वाहून नेत नेतच देवांना प्रिय व सभोवतालच्या इतर पशूंच्या समुदायात उभ्या असलेल्या ह्या अश्वाला देवांच्याकडे नेऊन पोचीव. २ हा अश्व आपल्या शरीरास चोपडलेल्या घृताच्या बिंदूंनी देवलोकाला जाण्याच्या मार्गांना भिजवून चिंब करीत, आणि त्या घृतबिंदूंच्या खुणेने त्या मार्गातील प्रत्येक मार्ग स्पष्ट दिसेल असे करीत करीत हा अश्व देवांच्याजवळ जाऊन पोहचो. हे अश्वा, उत्कृष्ट प्रकाशलेल्या सर्व दिशा तुला देवलोकी जाण्याचे कामी अनुकूल अशा होवोत. तू यजमानाला अन्न संपादन करून दे. ३ हे अश्वा, तू आमच्याकडून स्तुती करण्याला योग्य व वंद्य असा आहेस. हे अश्वा, तू अत्यंत वेगाने गमन करणारा व यागयोग्य आहेस. जन्मजात ज्ञानी व सर्व जगाच्या वसतीला कारणभूत असणाऱ्या देवांच्याशी समानतेने प्रीती करणारा असा जातवेद नामक अग्निदेव, प्रीतीचा विषय होणाऱ्या व पाठीवरून ओझे वाहणाऱ्या तुज अश्वाला देवांच्या सन्निध घेऊन जावो. ४ अश्वाला मारताना त्याला आडवा निजविण्यासाठी पसरण्याला अगदी योग्य व जेथे अश्व निजवावयाचा तेथील भूमीवर अगदी दाट आणि लांबरुंद पसरलेल्या दर्भांचे सेवन करणारी आणि सर्व देवांच्याशी समानतेने प्रीती करून त्यांचे बसावयाचे स्थान योग्य व सुखकर करणारी अदिती नामक भूमिदेवता कल्याणप्राप्तीला कारणभूत होणाऱ्या योग्य स्थानी अश्वाला स्थापन करो. ५ तुम्हा यजमान - ऋत्विजांना सौभाग्य प्राप्त करून देणाऱ्या, नाना प्रकारची रूपे धारण करणाऱ्या, एकसारखे गमन करण्यास साधनभूत होणाऱ्या वाहनरूपी पंखांनी उंच जाणाऱ्या व जाण्यायेण्यास योग्य अशा दारांनी शोभिवंत असणाऱ्या ह्या द्वारदेवता अश्वाला योग्य रीतीने इच्छित स्थली आणून पोचवोत. ६ मित्र व वरुण यांची रूपे धारण करून यज्ञाच्या आरंभापासून शेवटपर्यंत

त्याच्याकडे एकमताने मुख करून बसणाऱ्या, सुवर्णाप्रमाणेच मकणाऱ्या, सूर्यचंद्राप्रमाणे प्रकाशयुक्त असणाऱ्या आणि सर्व प्रकारच्या व्यवहारास कारणभूत होणाऱ्या उत्कृष्ट शिल्पज्ञानाने युक्त अशा हे अहोरात्रदेवतांनो, तुम्हा दोघींनाही यज्ञाचे मुख्य कारण असलेल्या ह्या अश्वाच्या ठिकाणी स्थापन करतो. ७ यज्ञामध्ये मुख्यत्वाने असणाऱ्या, यज्ञरूपी एकाच रथाची दोन चाकेच असल्याप्रमाणे भासणाऱ्या, देदीप्यमान, सर्व लोकांच्या ठिकाणी अवलोकनदृष्टी ठेवणाऱ्या, दोघांनाही विहित असलेली विहित कर्मे आचरणाऱ्या, प्रकृष्ट अशा सर्व दिशांच्या ठिकाणी स्वत:चा प्रकाश पाडणाऱ्या आणि देवांच्या समुदायात बसून त्यांचे भक्तिभावाने यजन करणाऱ्या हे यजमानपत्नीरूपी दंपती हो, तुम्हा दोघांनाही मी आपल्या कर्तव्यतत्परतेने संतुष्ट करीन. ८ आदित्यांच्या सह असणारी 'भारती' देवी आमच्या ह्या यज्ञाची इच्छा करो. रुद्रांच्या सह असणारी सरस्वतीदेवी आमचे संरक्षण करो. वसूंच्या सह असणारी इडादेवी आमच्यावर समानतेने प्रीती करणारी होऊन आम्हाला यज्ञ करण्याची अनुज्ञा देवो आणि आमचे रक्षण करो. हे देवींनो, आम्ही करीत असलेला सर्वयज्ञ अमर अशा देवांच्या ठिकाणी स्थापन करा. ९ ज्या त्वष्टृनामक देवाने देवांची इच्छा करणारा, व सर्व कार्यात निष्णात असा शूर पुत्र उत्पन्न केला त्याच त्वष्टृदेवापासून गमनकुशल व शीघ्रगामी असा अश्व उत्पन्न होत असतो. किंबहुना हे सर्व त्रिभुवन त्या त्वष्टृदेवांनेच निर्माण केले आहे. हे होत्या अत्यंत विस्तीर्ण अशा जगाला निर्माण करणाऱ्या त्या त्वष्टृदेवाचे या यज्ञामध्ये तू यजन कर. १० स्वत:च आपल्या शरीराला घृत चोपडून घेतल्याप्रमाणे असलेला हा अश्व अत्यंत रुचकर असे देवांचे उपाहारोपयोगी अन्न होऊन, देवांना इच्छा होईल त्या त्या वेळी देवांना प्राप्त होवो. वनस्पती नांवाचा देव देवलोकाचे स्वरूप नीट ध्यानात घेऊन अग्नीच्यासह स्वादिष्ट अशी बनलेली हविर्द्रव्ये देवांना नेऊन पोचवो. ११ हे अग्निदेवा, जगदीश्वर प्रजापतीच्या पर्यालोचन रूप तपश्चर्येने वृध्दिंगत असलेला तू, जन्मास येताक्षणीच यज्ञाचे धारण करतोस. 'स्वाहा' असे म्हणून आम्ही देवांना समर्पण केलेल्या हविर्द्रव्यासह तू पुढे चालू लाग आणि देवांच्याजवळ जाऊन पोहोच. आमच्याकडून पूजनीय असे असलेले देव आम्ही त्यांना समर्पण केलेले हविर्द्रव्य भक्षण करोत. (अनुवाक ११).

प्रपाठक २

विष्णूला आपला प्रमुख करून देवांनी गायत्र्यादि छंदांच्या अभिमानी देवांच्या साहाय्याने इतर कोणाकडून पुन्हा जिंकले जाणार नाहीत अशा प्रकारे हे पृथिव्यादि लोक जिंकले. 'विष्णुक्रम' संज्ञक मंत्रांनी जर यजमान चार पावले टाकील, तर तो विष्णूसारखाच होऊन छंदोभिमानी देवांच्या साहाय्याने इतरांच्याकडून कधीही जिंकले जाऊ न शकणारे हे लोक सर्वतोपरी जिंकतो. यास्तव, पावले टाकताना 'विष्णोः क्रमोऽस्यभिमातिहा' इत्यादि चार मंत्र यजमानाने पठण करावेत. गायत्री छंद पृथ्वीरूप असून त्रिष्टुप्छंद हा अंतरिक्षरूप आहे. जगतीछंद हा द्युलोकरूप असून अनुष्टुप्छंद हा दिशांच्या स्वरूपाचा आहे. अर्थात् 'विष्णोःक्रमोऽसि.' इत्यादि चार मंत्रांचे पठण केल्याच्या योगाने यजमान त्या छंदोमंत्रांच्या अभिमानी देवांच्या साहाय्याने हे पृथिव्यादि लोक अनुक्रमाने जिंकतो. प्रजापतीने अग्नी उत्पन्न केला. परंतु, तो उत्पन्न होताक्षणीच पुन्हा परत न येण्याच्या संकल्पाने प्रजापतीपासून दूर निघून गेला. तेव्हा, 'अक्रंददग्निः' ही ऋचा पठण करीत प्रजापती अग्नीच्या मागोमाग गेला व ह्या ऋचेच्या प्रभावाने अग्नीला प्रिय असलेल्या स्थानाला जाऊन पोचला. यास्तव, 'अक्रंददग्निः' या ऋचेचे यजमानाने पठण करावे म्हणजे ते यजमानाला अग्नीचे आवडते स्थान प्राप्त करून देते. 'विष्णुक्रम' संज्ञक मंत्रांचे पठण करून जो यजमान चार पावले चालतो, तो पृथिव्यादि लोकांना ओलांडून पार जाण्यास समर्थ होतो व आपल्या स्थानी पुन्हा परत येत नाही. यास्तव, आपल्या स्थानी पुन्हा परत येण्यासाठी यजमानाने 'अग्नेऽभ्यावर्तिन्' इत्यादि चार ऋचांचे पठण करून परत फिरावे. गायत्री, त्रिष्टुप् जगती व अनुष्टुप् हे चार छंद आहेत व ते चार छंद म्हणजे खरोखर अग्नीला प्रिय असलेले जणू शरीरच होत. म्हणून या चार ऋचांचे पठण करून परत फिरले असता, अग्नीला प्रिय असलेल्या शरीरासच अनुलक्षून परत फिरल्यासारखे होते.

परत फिरताना उजव्या हाताकडून वळून परत फिरावे म्हणजे स्वतःच्या सामर्थ्याला अनुलक्षून परत फिरल्यासारखे होते. कारण, पुरुषाच्या शरीराचा उजव्या बाजूचा भाग अधिक सामर्थ्यवान् असतो. शिवाय, असे केल्याच्या योगाने मेरू पर्वताला सूर्य प्रदक्षिणा घालतो, त्याचेही अनुकरण केल्याप्रमाणे

होते. 'आजीगर्ति' नामक ऋषीचा शुन:शेप नांवाचा एक पुत्र होता. त्याला वरुणाने आपला पाश टाकून घेतला. अर्थात् त्याला 'जलोदर' रोगाने पछाडले. तेव्हा, वरुणाच्या पाशातून मुक्त होण्याला 'उदुत्तमं वरुण पाशं' ही ऋचा योग्य आहे, असे शुन:शेपाने वैचारिक दृष्टीने पाहिले व त्या ऋचेच्या पठणप्रभावाने त्याने स्वत:ला वरुणपाशापासून मुक्त करून घेतले. अर्थात् त्याचा 'जलोदर' रोग नाहीसा झाला. जो यजमान अग्नी प्रज्वलित केलेली उखा शिंक्यात ठेवून ते शिंके आपल्या गळ्यात अडकवितो, त्याला वरुणाने आपल्या पाशामध्ये जखडलेला असतो. यास्तव, 'उदुत्तमं वरुण पाशं' ह्या ऋचेचे पठण करून यजमानाने आपल्या गळ्यातील शिंक्याचा पाश मोकळा केला असता, तो त्या ऋचेच्या प्रभावाने, वरुणाच्या पाशातून मुक्त होतो.

'आ त्वाऽहार्षमंतरभू:' हा चरण पठण करावा. म्हणजे आसंदीवर स्थापन करण्यासाठी अग्नीचे आहरण केल्यासारखे होते. 'ध्रुवस्तिष्ठाविचाचलि:' हा दुसरा चरण पठण करावा. त्या योगाने अग्नीला आसंदीच्या ठिकाणी प्रतिष्ठित केल्याप्रमाणे होते. 'विशस्त्वा सर्वा वांछंतु' हा तिसरा चरण म्हटला असता, सर्व प्रजेच्या योगाने यजमानाला समृध्द केल्याप्रमाणे होते व 'अस्मिन्राष्ट्रमधिश्रय' ह्या चौथ्या चरणाच्या पठणाने यजमानाला त्याच्या राष्ट्राचे ठिकाणी स्थिरतेने स्थापित केल्यासारखे होते.

आपल्या यजमानाला राज्य प्राप्त व्हावे असे ज्याच्याविषयी वाटत असेल त्याला राज्य प्राप्त व्हावे म्हणून अध्वर्यूने पूर्वोक्त चौथा चरण पठण करताना, 'यजमानाला राज्य प्राप्त होवो', अशी आपल्या मनात भावना करावी. म्हणजे त्या यजमानाला राज्य प्राप्त होते. उख्याग्नीचे उपस्थान करताना 'अग्ने बृहन्नुषसामूर्ध्वो अस्थात्' इत्यादि ऋचेचा पहिला चरण म्हणावा. म्हणजे अध्वर्यूने आपल्या यजमानाला त्याच्या बरोबरीच्या सर्व लोकांच्या अग्रभागी स्थापन केल्यासारखे होते. 'निर्जग्मिवान् तमस:' असे म्हटले असता यजमानापासून अंधकाराला दूर केल्यासारखे होत असून 'ज्योतिषाऽगात्' हा मंत्रांश पठण केल्याच्या योगाने यजमानाच्या ठिकाणी प्रकाशाचे स्थापन केल्याप्रमाणे होते. 'सीद त्वं मातुरस्या:' इत्यादि चार ऋचांनी उंबराच्या लाकडाच्या घडवंचीवर उख्याग्नी स्थापन करावा. कारण, मुख्य छंद चार आहेत. यास्तव पूर्वोक्त ऋचांनी उख्याग्नीचे स्थापन केले म्हणजे छंदोभिमानिनी देवतांच्या कडूनच त्या अग्नीचे स्थापन केल्यासारखे होते. चार ऋचांपैकी शेवटच्या 'हंस: शुचिषत्' ह्या

'अतिच्छंद'घटित ऋचेचे पठण करावे. कारण, अतिच्छंदात्मक ऋचा ही जणू छंदाचे शरीरच आहे. यास्तव, ह्या शेवटच्या उत्कृष्ट ऋचेने अग्नीचे स्थापन केले असता आपल्या यजमानाला त्याच्या बरोबरीच्या लोकांचे जणू शरीरच, अशा महत्त्वाला तो अध्वर्यू प्राप्त करतो. आता सांगितलेल्या 'हंस: शुचिषत्' या शेवटच्या ऋचेत 'चिरकाल टिकणारा' अशा अर्थाला व्यक्त करणारे 'सत्' हे पद अनेकवार आलेले आहे. 'सत्' पदाने युक्त अशी ही ऋचा पठण केली असता यजमानाला 'चिरकालावस्थात्व' स्थितीला प्राप्त केल्याप्रमाणे होते. 'दिवस्परि प्रथमं जज्ञे' असा प्रारंभ होत असलेल्या अकरा ऋचांच्या 'वात्सप्र' संज्ञक सूक्ताने उख्याग्नीचे उपस्थान करावे. कारण, 'भलंदना'चा पुत्र 'वत्सप्री' याने या 'वात्सप्र' सूक्ताच्या प्रसारानेच अग्नीचे अत्यंत प्रिय असे स्थान मिळविले. अर्थात् 'वात्सप्र' सूक्ताने अग्नीचे उपस्थान करणारा यजमानही अग्नीला अत्यंत प्रिय असलेल्या स्थानाला प्राप्त होतो. हे 'वात्सप्र' सूक्त म्हणजे अकरा ऋचांचा एक समूह आहे. यास्तव, समूहरूप असलेल्या या सूक्ताने उपस्थान केले असता, यजमानाच्या ठिकाणी सर्व प्रकारचे वीर्य एकदमच स्थापन केल्यासारखे होते. ज्या ऋचांच्या आधाराने साम गाइले जाते, त्या ऋचांच्या आवृत्तींनी उत्पन्न होणारा जो ऋक्समूह, त्यास 'स्तोम' असे म्हणतात. स्तोमाच्या प्रभावानेच देवांनी इहलोकी, आणि समूहरूप नसलेल्या विशिष्ट अशा छंदांच्या प्रभावाने परलोकी आपली समृध्दी करून घेतली. 'वात्सप्र' नामक सूक्त हे अकरा ऋचांच्या समूहाने बनले असल्यामुळे ते 'स्तोम'रूपच आहे. यास्तव, 'वात्सप्र' सूक्ताने जर उख्याग्नीचे उपस्थान केले, तर त्या सूक्ताच्या प्रभावाने यजमान इहलोकाला जिंकतो. आणि 'विष्णुक्रम' संज्ञक छंदोमंत्रांनी जर यजमान चार पावले चालत गेला, तर मंत्रपठणपूर्वक टाकलेल्या त्या चार पावलांच्या प्रभावाने यजमान परलोकही हटकून जिंकतो. पूर्व दिवशी यजमानाने 'विष्णुक्रम' संज्ञक मंत्रांनी चार पावले टाकून चालावे, आणि दुसरे दिवशी 'वात्सप्र' संज्ञक सूक्ताने उख्याग्नीचे उपस्थान करावे. केवळ आपल्याला मिळाले नसलेले द्रव्य संपादन करणे हेच परमोच्च असे कर्म आहे, अशा प्रकारची काही लोकांची मनोवृत्ती असते तर काही लोक जे मिळाले आहे ते द्रव्य रक्षण करणे हीच उच्च प्रकारची कर्तबगारी आहे, अशा मनोवृत्तीचे असतात. मिळालेल्यापेक्षा अधिक मिळविण्याची स्वत:च्या ठिकाणी धमक नसलेले हे लोक आपल्या जवळच्या धनाचा व्यय करण्यास

भीत असतात. ज्या अर्थी प्रयाणशील म्हणजे नेहमी फिरत्या राहणाऱ्या पुरुषाला धनार्जन करण्यास वावच मिळत नाही, त्या अर्थी तो प्रयाणशील पुरुष जवळ असलेल्या धनाचे संरक्षण करण्याचा धनी होतो, असे आपणास आढळते. यासाठी, देवयजन प्रदेशात संचार करणाऱ्या यजमानाने अन्य साधनांची अपेक्षा न करता, उपलब्ध असलेल्या अन्यादिरूप साधनाचेच उपस्थानादि क्रियांनी संरक्षण करण्यात आपल्या कर्तव्याचे पर्यवसान करावे, हे उचित होय. 'स्वाहा यज्ञं मनसा' इत्यादि मंत्रांनी आपल्या हाताची बोटे मिटून मूठ वळावी आणि मौन धारण करून बसावे. असे मुकाट्याने गप्प बसणे यज्ञाच्या धारणाला कारणभूत होते. यज्ञ त्या यजमानाच्या जवळ राहतो, दूर पळून जात नाही. (अनुवाक १).

यजमानाने व्रतांगभूत दुग्धप्राशन करते वेळी अग्नीवर एक उंबराची समिध द्यावी. ती देताना 'अन्नपतेऽन्नस्य' ही ऋचा म्हणावयाची असते.'अन्नपतेऽन्नस्य नो देहि' अशा या ऋचेचा पहिला चरण आहे. याचे पठण केले असता अन्नाचा पालक असलेला तो अग्नीच यजमानाला अन्न देतो. 'अनमीवस्य शुष्मिणः' हा या ऋचेचा दुसरा चरण होय. या चरणाच्या पठणाने 'रोगरहित' असे अन्न मला प्राप्त करून दे, असे यजमानाने अग्नीला उद्देशून म्हटल्याप्रमाणे होते. 'प्रप्रदातारं तारिष ऊर्जं नो धेहि द्विपदे चतुष्पदे' हा ऋचेचा उत्तरार्ध आहे. याचे पठण करावे. त्या योगाने या उत्तरार्धात व्यक्त केलेली आशा पूर्ण करण्याविषयी अग्नीची प्रार्थना केल्यासारखे होते. उख्याग्नी उचलताना 'उदु त्वा विश्वेदेवाः' हा ऋचेचा पहिला चरण म्हणावा. कारण, प्राण हेच विश्वेदेव होत. यास्तव या चरणाचे पठण केले असता, यजमानाने आपल्या प्राणांच्याकडूनच उख्याग्नी उचलविल्याप्रमाणे होते. 'अग्ने भरन्तु चित्तिभिः' हा या ऋचेचा दुसरा चरण होय. याच्या पठणाने ज्या कार्याचा उद्देश मनात धरून उख्याग्नी उचलावयाचा, त्या कार्यानेच त्या अग्नीला समृध्द केल्यासारखे होते. 'सीद त्वं मातुरस्या' इत्यादि चार ऋचांनी शकटाच्या दोन्ही दांड्या एकमेकीशी जोडल्या जातात त्या ठिकाणी उख्याग्नी ठेवावा. कारण, चार छंदच मुख्य आहेत. यास्तव त्या चार छंदांनीच उख्याग्नीचे स्थापन केल्यासारखे होते. या चार ऋचांतील शेवटची ऋचा अतिच्छंदातील आहे. त्या ऋचेने अग्नीचे स्थापन करावे. अतिच्छंदातील ही ऋचा म्हणजे जणू छंदांचे शरीरच आहे. यास्तव, या ऋचेने अग्नीचे स्थापन केले असता, यजमानाला त्याच्या

बरोबरीच्या लोकांच्या शरीरासमान श्रेष्ठत्व प्राप्त करून दिल्याप्रमाणे होते. या ऋचेत 'सत्' हे पद अनेकदा आलेले असल्यामुळे ती 'सद्वती' म्हटली जाते. या ऋचेच्या पठणाने यजमानाला चिरकाल टिकण्याची अवस्था प्राप्त करून दिल्याप्रमाणे होते. उख्याग्नी घेऊन पुढे जाताना 'प्रेदग्ने ज्योतिष्मान् याहि' हा पहिला चरण पठण करावा. या चरणात 'ज्योति' हे पद आहे. यास्तव, हा चरण पठण केला असता यजमानाच्या ठिकाणी ज्योतीचे म्हणजे प्रकाशाचे स्थापन केल्यासारखे होते. अग्नी, ज्या पुरुषाला मारावयाचे, त्यास शस्त्राच्या आघाताने न मारता आपल्या ज्वालारूपी शरीराने दग्ध करून मारीत असतो. यास्तव, पूर्वोक्त ऋचेचा 'मा हिंसीस्तनुवा प्रजाः' हा चौथा चरण पठण करावा. म्हणजे प्रजांच्या संरक्षणासाठी त्या अग्नीची प्रार्थना करून त्याला शांत केल्यासारखे होते. ज्या शकटावर उख्याग्नी ठेऊन नेला जात असतो, त्या शकटाचा जर तो चालताना गडगडाट झाला, तर त्या यजमानाच्या यज्ञावर राक्षस येऊन धाड घालतात. यास्तव शकट चालू असताना जर तो 'गडगड' असा आवाज करू लागला, तर 'अक्रंददग्निः' ही ऋचा पठण करावी. म्हणजे ते पठण यज्ञावर हल्ला करणाऱ्या राक्षसांचा नाश करण्याला कारणभूत होते. उख्याग्नीला देवयजन प्रदेशाच्या ठिकाणी शकटावर आरूढ करून न्यावा. म्हणजे यजमानाने त्या अग्नीच्या ठिकाणी पूज्यता संपादन केल्यासारखी होते. लोकव्यवहारात देखील शकटावर किंवा रथावर आरूढ होऊन ग्रामांतर करणारे पाहुणे इतर पाहुण्यांच्याहून अधिक पूज्य गणले जातात. यास्तव, अग्नीसारख्या थोर अतिथीस शकटावर आरूढ करून देवयजनाचे ठिकाणी घेऊन जाणेच युक्त आहे. अशाप्रकारे शकटावर आरूढ करून अग्नीला घेऊन जाण्याचे महत्त्व जो जाणतो, तो लोकांच्याकडून पूज्यता संपादन करतो. प्रयाण पूर्ण झाल्यावर म्हणजे देवयजनाच्या ठिकाणी जाऊन पोचल्यावर घृताने चोपडलेली एक समिध अग्नीवर देतांना 'समिधाग्निं दुवस्यत' हा मंत्र म्हणावा. म्हणजे आपल्या घरी आलेल्या पाहुण्याला भरपूर घृताने युक्त असलेल्या अन्नाने पाहुणचार करतो, त्याप्रमाणे अग्नीचे घृतयुक्त अशा अन्नानेच जणू आतिथ्य केल्याप्रमाणे होते. ब्राह्मण यजमानाच्या उख्याग्नीवर 'समिधाग्निं दुवस्यत' ह्या गायत्री छंदातील ऋचेने समिध द्यावी. कारण, ब्राह्मण हा गायत्रीछंदाबरोबरच उत्पन्न झालेला असल्यामुळे गायत्रीछंदोरूपच आहे. क्षत्रिय यजमानाच्या उख्याग्नीवर 'प्रप्रायमग्निर्भरतस्य' या त्रिष्टुप् छंदातील मंत्राने समिध द्यावी. कारण, क्षत्रिय

हा त्रिष्टुप् छंदासह उत्पन्न झाला असल्यामुळे तो त्रिष्टुपछंदस्वरूपच आहे. उख्याग्नीचे ठिकाणी साठलेले भस्म उदकामध्ये टाकावे. कारण अग्नी उदकापासूनच उत्पन्न झाला आहे. अर्थात् त्याच्या ठिकाणचे भस्म उदकात टाकले असता, स्वकीय अशा जन्मस्थानाचे ठिकाणीच अग्नीला पोचविल्यासारखे होते. 'आपो देवी: प्रतिगृह्णीत' इत्यादि तीन ऋचांनी भस्म उदकात टाकावे. कारण, अग्नी हा 'त्रिवृत्' म्हणजे आहवनीय इत्यादि तीन रूपे धारण करणारा आहे. यास्तव तीन ऋचांनी भस्म उदकात टाकले असता अग्नी जेवढ्या विस्ताराचा आहे तेवढ्या विस्ताराचे ठिकाणी त्या अग्नीला प्रतिष्ठित केल्यासारखे होते. जो यजमान उख्याग्नीचे भस्म उदकांत टाकतो, तो जणू काय त्या अग्नीचा नाश करतो. यास्तव, अग्नीचा नाश न व्हावा, म्हणून उदकात टाकलेले भस्म घट्ट पिळून सुकवावे व ते 'ज्योतिष्मत्' शब्दाने युक्त अशा 'प्रसद्य भस्मना' इत्यादि ऋचांनी उखेमध्ये घालावे. म्हणजे त्या उख्याग्नीच्या ठिकाणी ज्योतीचे पुन्हा स्थापन केल्यासारखे होते. 'प्रसद्य भस्मना' व 'पुनरासद्य सदनं' ह्या दोन ऋचांनी घट्ट पिळून कोरडे केलेले भस्म उखेमध्ये घालावे. म्हणजे ते अग्नीच्या प्रतिष्ठेला कारणभूत होते. जो यजमान उख्याग्नीचे भस्म उदकात टाकतो, तो आपली प्रजा व पशू यांचा नाश करणारा होतो. त्याच्या प्रजा व पशू नष्ट होतात. उदकात भस्म टाकणाऱ्याच्या प्रमादाने होणारा प्रजा व पशूंचा नाश टळावा आणि त्या दोहोचाही आपणास लाभ व्हावा म्हणून पिळून कोरडे केलेले भस्म पुन्हा तिच्यात ओतलेल्या उखेमध्ये 'पुनरूर्जा सह रय्या' व 'सह रय्या निर्वतस्व' या दोन मंत्रांनी अग्नीचे स्थापन करावे. म्हणजे त्या मंत्रद्वयाच्या प्रभावाने यजमानाने प्रजा व पशू यांचे आपल्या ठिकाणी धारण केल्यासारखे होते. 'पुनस्त्वाऽदित्या रुद्रा वसव:' हा मंत्र म्हणून उख्याग्नीवर काष्ठे घालून तो चांगला प्रज्वलित करावा. कारण, वसू, रुद्र इत्यादि देवतांनीच प्राचीन काळी उख्याग्नीला प्रज्वलित केले होते. यास्तव, त्या ऋचेचे पठण करून अग्नी स्थापन केला असता तो वसुरुद्रादिदेवतांच्या कडूनच जणू काय स्थापन केल्याप्रमाणे होते. 'बोधा नो अस्य वचस:' व 'स बोधिसूरिर्मघवा' ह्या दोन 'बोधवती' संज्ञक ऋचांनी प्रज्वलित अशा उख्याग्नीचे उपस्थान करावे. म्हणजे त्या योगाने निद्रेने शांत झालेल्या अग्नीलाच पुन्हा जागा केल्यासारखे . होते. आणि म्हणूनच रात्री निजून शांत झालेले लोक उजाडताक्षणी पुन्हा जागे होतात, हे लोकव्यवहारात

आपणास दृष्टीस पडते. आहवनीयाच्या दक्षिणेकडील भाग ही यजमानाची अग्न्युपस्थानाची जागा होय. यास्तव, या वेळीही उख्याग्नीच्या दक्षिण भागी उभे राहूनच यजमानाने त्याचे उपस्थान करावे. यामुळेच, सकाळी रानात चरावयास गेलेले पशू सायंकाळी परत येऊन आपआपल्या जागी राहत असतात. (अनुवाक २).

या पृथ्वीचा जेवढा म्हणून विस्तार आहे; त्या सर्वावर यज्ञाचे आधिपत्य आहे. ही सारी पृथ्वी यमाच्या मालकीची आहे. व असे असल्यामुळे एखादा यजमान यमाजवळ देवयजनासाठी भूमीची याचना न करता एखाद्या स्थली देवयजनाची अर्थात् यज्ञभूमीची आखणी करून तेथे अग्निचयन करील, तर त्या यज्ञाचे फल यमाकडे जाईल. यज्ञकर्त्या यजमानाला मिळणार नाही. यासाठी अग्निचयन करणाऱ्या यजमानाने यमाजवळ यज्ञभूमीची याचना करण्यासाठीच 'अपेत वीत विच सर्पतात:' ह्या मंत्राचा जप करून यज्ञभूमीची आखणी करावी आणि तेथे अग्निचयनपूर्वक देवांचे यजन करावे. असे केल्याने यमाजवळ याचना करून देवयजनस्थळ संपादन केल्यासारखे होते आणि तेथे केल्या जाणाऱ्या अग्निचयनाचे फल यजमानास मिळते.

मृत झालेल्या प्राण्यांनी आक्रमण केलेले नाही, म्हणजे ज्या ठिकाणी कोणीही प्राणी मृत होऊन त्याचे प्रेत कधीही पडलेले नाही असे एखादे स्थल संपादन करण्याची देवांनी अत्यंत अपेक्षा केली. परंतु या पृथ्वीच्या पृष्ठभागावर जेथे मृत प्राण्यांच्या प्रेतांनी आक्रमण केलेले नाही असे बाणाच्या अग्राइतकेही स्थल देवांना आढळून आले नाही. जेथे म्हणून शोध करावा, तेथे कितीक प्राणी मृत होऊन त्यांची प्रेते कितीकदा पडून गेली असल्याचे त्यांना दिसले. तेव्हा सर्व देवांनी पुष्कळ विचार केल्यानंतर यजुर्वेदातील 'अपेत वीत विच सर्पतात:' हा मंत्र त्यांच्या दृष्टीला योग्य दिसला. आणि त्या मंत्राच्या प्रभावाने प्रेतांच्या आक्रमणाने रहित असे स्थल देवांनी पृथ्वीवर संपादन केले. यास्तव, 'अपेत वीत' या मंत्राचे पठण केले असता पृथ्वीच्या यज्ञभूमीच्या ठिकाणातून प्रेतांचे नि:सारण केल्यासारखे होऊन प्रेतांनी अनाक्रांत अशा स्थानी अग्निचयन केल्यासारखे होते. 'गार्हपत्यचिति' जेथे मांडावयाचा ती जागा खणावी. म्हणजे त्या भूमीवर थुंकणे, अथवा दुसऱ्या कोणत्या कारणांनी जी काही अपवित्रता उत्पन्न झाली असेल, तिचे निवारण होऊन

ती जागा 'गार्हपत्य' संज्ञक अग्निचयन करण्यास योग्य अशी पवित्र होते. खणलेल्या जागी पाणी शिंपडावे. म्हणजे ते स्थल शांत होते. नंतर त्या स्थलावर वाळू पसरावी. कारण, वाळू ही वैश्वानर अग्नीचे जणू स्वरूपच आहे. यास्तव, वाळू पसरली असता त्या स्थलाचे ठिकाणी वैश्वानर अग्नीच आपल्या स्वरूपाने प्राप्त होतो. मग, त्या जागी खारी माती घालावी. कारण खारी माती ही यज्ञाच्या द्वारा पुष्टी आणि प्रजोत्पत्ती करण्याला कारणभूत होणारी आहे. यास्तव, खारी माती घातल्याच्या योगाने पुष्टिकर व प्रजोत्पत्तिकारक प्रदेशाच्या ठिकाणीच गार्हपत्यचिती केल्याप्रमाणे होते. शिवाय, संज्ञानाला म्हणजे उत्कृष्ट ज्ञान होण्याला कारणभूत अशा स्थली अग्निचयन केल्यासारखेही होते. कारण, खारी माती असलेल्या स्थलाचे पशूंना नुसत्या हुंगण्यानेच ज्ञान होत असते आणि ते त्या ठिकाणचे खारे पाणी पिण्यासाठी जातात आणि पुष्ट होतात. एवंच, खारी माती अग्निचयनस्थानी घालणे हे संज्ञानाला - सहज रीतीने प्राप्त होणाऱ्या ज्ञानाला व पुष्टीला कारणभूत होते. प्रजापतीने पूर्वी सृष्टी उत्पन्न केली, तेव्हा द्युलोक व पृथ्वी एकमेकांना चिकटलेली होती. पण, प्रजापतीच्याच आज्ञेने जेव्हा ती दोघे परस्परांपासून वेगळी झाली, तेव्हा त्यांनी, परस्परांवरील प्रेमामुळे आपआपल्या ठिकाणचे यज्ञयोग्य असे सार एकमेकांच्या जवळ असावे, असे ठरविले. द्युलोकाने आपल्या ठिकाणचे जे यज्ञयोग्य सार पृथ्वीच्या ठिकाणी ठेवले, तीच आज पृथ्वीच्या ठिकाणी दिसून येणारी खारी माती होय. आणि पृथ्वीने आपल्या ठिकाणचे जे यज्ञयोग्य सार द्युलोकाच्या ठिकाणी ठेवले, तोच चंद्राच्या ठिकाणी आज दिसत असलेला काळा डाग होय. यास्तव, खारी माती अग्निचयनस्थली घालतेवेळी चंद्रावर असलेल्या काळ्या डागाचे मनामध्ये ध्यान करावे. म्हणजे द्युलोक व पृथ्वी ह्या दोघांच्या ठिकाणी असणाऱ्या यज्ञयोग्य साराच्याच ठिकाणी 'गार्हपत्य' संज्ञक अग्निचयन मांडल्यासारखे होते. 'अयं सो अग्निर्यस्मिन्' असा प्रारंभ असलेले 'सूक्त' विश्वामित्राने रचिलेले आहे. ह्या सूक्ताच्या प्रभावानेच विश्वामित्र अग्नीला प्रिय अशा स्थानाला प्राप्त झाला. यास्तव, या सूक्तातील मंत्रांनी इष्टका मांडल्या म्हणजे त्या सूक्ताच्या प्रभावाने यजमान अग्नीला प्रिय असलेल्या स्थानाला प्राप्त होतो. छंदोबध्द अशा ऋचांच्या प्रभावानेच देव स्वर्गलोकाला प्राप्त झाले यास्तव, छंदोबध्द अशा 'अयं सो' इत्यादि चार ऋचांनी अग्निचयनस्थलाच्या मधोमध चार इष्टका ओळीने उभ्या मांडाव्यात. छंदांमध्ये

चारच छंद मुख्य आहेत. अर्थात् छंदोबध्द अशा ऋचांनी चार इष्टका मांडल्या म्हणजे त्या छंदोबद्ध ऋचांच्या प्रभावानेच यजमान स्वर्गलोकाला प्राप्त होतो. छंदोबद्ध मंत्रांनी चार इष्टका मांडल्यावर जेव्हा देव स्वर्गलोकी जावयास निघाले, तेव्हा त्या चार इष्टकांच्याशी संबध्द अशा चार दिशा 'आपल्याला आता पालन कोण करणार?' अशा चिंतेने विव्हल झाल्या, म्हणजे चारही दिशांना राहणारे लोक पालकाच्या अभावी विव्हल झाले. तेव्हा त्यांनी विव्हल होऊ नये म्हणून देवांनी पूर्व दिशेस ऋचात्मक मंत्रांनी दोन व पश्चिमेस यजुमंत्रांनी दोन अशा चार इष्टका मांडल्या आणि दिशांना स्थिर अर्थात् चिंतारहित केले. यास्तव, यजमानानेही देवांचे अनुकरण करून प्रथम मांडलेल्या चार इष्टकांचे पूर्वेस दोन व पश्चिमेस दोन इष्टका उभ्या मांडाव्यात म्हणजे त्या दिशांचे स्थिरतेने धारण करण्यास समर्थ होतात. शिवाय, पशू हे छंदोरूप आहेत. यास्तव, छंदोबध्द मंत्रांनी इष्टका मांडल्या असता यजमानासाठी पशूंचे जणू संपादनच केल्याप्रमाणे होते. मध्ये चार व पूर्वेस आणि पश्चिमेस दोन दोन मिळून आठ इष्टका मांडाव्यात. कारण गायत्री छंद हा आठअक्षरी चरणांनी युक्त असतो. अग्नी हा गायत्री छंदाशी संबध्द आहे. अर्थात् आठ इष्टका मांडल्या असता, जेवढा अग्नी आहे, तेवढ्या अग्नीचीच मांडणी केल्यासारखे होते. आठ इष्टका मांडाव्यात, याचे कारण असे की, चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने गायत्री छंद हा अष्टाक्षरी आहे. गायत्री ही स्वर्गलोकाला नीट रीतीने जाणणारी आहे. अर्थात् गायत्री छंदाशी साम्य असलेल्या आठ इष्टका मांडल्या असता, गायत्री छंदाच्या प्रसादाने यजमानाला स्वर्गलोकाचे उत्कृष्ट ज्ञान प्राप्त होते. पूर्वोक्त आठ इष्टका मांडल्यावर उरलेली रिकामी जागा भरून काढणाऱ्या इष्टकांना 'लोकपृणा' असे नांव आहे. यास्तव, 'लोकं पृण छिद्रं पृण' या मंत्राने तेरा इष्टका मांडाव्यात. पूर्वीच्या आठ व आता मांडलेल्या तेरा मिळून एकवीस विटा होतात. 'एकविंश' स्तोम हा 'त्रिवृत्' इत्यादि स्तोमांची प्रतिष्ठा असून सतत धारण केला जाणारा 'गार्हपत्य' हा आहवनीयादि अग्नीची प्रतिष्ठा आहे. यास्तव, एकवीस इष्टकांची मांडणी केली असता, यजमान 'एकविंश' नामक स्तोमाच्या व गार्हपत्याच्या, अशा दोनही प्रकारच्या प्रतिष्ठांनी प्रतिष्ठित होतो. अशा प्रकारे एकवीस इष्टका मांडण्याचे महत्त्व जो जाणतो, तोही 'अग्निचयन' करणारा होऊन प्रतिष्ठेला प्राप्त होतो.

पहिल्या खेपेस 'गार्हपत्य' संज्ञक अग्निचयन करताना विटांचे एकावर एक

असे पांच थर मांडावेत. कारण, यज्ञ हा धाना, करंभ, परिवाप, पुरोडाश आणि आमिक्षा या पांच प्रकारच्या हविर्द्रव्यांनी युक्त असतो. शेपूट व चार पाय मिळून पशूही पांच अवयवांनी युक्त असतात. अर्थात् विटांचे एकावर एक असे पांच थर मांडून अग्निचयन केले असता, यज्ञ व पशू या दोघांचीही यजमानाने प्राप्ती करून घेतल्यासारखे होते. दुसरे अग्निचयन करते वेळी एकावर एक असे विटांचे तीन थर मांडून करावे. ते कारण, पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु असे हे तीन लोक आहेत. म्हणून विटांचे तीन थर मांडल्याने यजमान तिन्ही लोकांच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतो.

तिसऱ्या खेपेस अग्निचयन करताना विटांचा एकच थर मांडावा. कारण, जो प्राप्त झाल्यानंतर यजमानाच्या कर्माची समाप्ती होते व त्याला पुन: जन्म प्राप्त होत नाही, व जो स्वभावत: सुखमय असतो अशा प्रकारचा स्वर्गलोक हा एकच आहे. यास्तव, विटांचा एक थर मांडून तिसऱ्या खेपेस अग्निचयन करणारा यजमान सुखमय अशा एकमेव स्वर्गलोकाला प्राप्त होतो. विटांचा थर मांडून झाला म्हणजे त्यावर बारीक माती पसरावी. हाडांच्या प्रमाणे कठिण असलेल्या इष्टका मांसाप्रमाणे मृदु असलेल्या बारीक मातीने आच्छादित केल्या जातात, म्हणूनच जगातल्या प्राण्यांच्या शरीरातील हाडे मांसाने आच्छादित झालेली असतात. विटांच्या थरावर बारीक माती पसरण्याचे महत्त्व जो जाणतो, तो कसल्याही प्रकारच्या चर्मरोगाने पीडित होत नाही.

एकंदर पांच थर मांडले जातात व प्रत्येक थरावर बारीक मातीही पसरली जाते. अशा प्रकारे विटांचे पांच व बारीक मातीचे पांच मिळून दहा थर होतात. 'विराट्' छंद हा चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने दहाअक्षरी असतो. 'विराट्' छंद हा अन्नरूप आहे. अर्थात् विटांचे व बारीक मातीचे मिळून दहा थर मांडणारा यजमान 'विराट्' छंदाच्या द्वारा सेवनीय अशा अन्नाच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतो. (अनुवाक ३).

पूर्वी स्थापन केलेला व आता उखेमध्ये असलेला हे दोन अग्नी, 'सर्व आहुतींचा मीच आधार होणार, तू होणार नाहीस', अशा प्रकारे परस्परांशी द्वेष करू लागतात. यासाठी ते दोन्ही अग्नी एकत्र करावेत. म्हणजे 'समितं संकल्पेथाम्' इत्यादि चार छंदोमंत्रांनी उखेतील अग्नी पूर्वस्थापित अग्नीत मिसळावा. छंदांमध्ये चार छंदच मुख्य आहेत व छंद हे जणू काय अग्नीचे अत्यंत

प्रिय असे शरीरच आहे. यास्तव, चार छंदोमंत्रांनी उख्याग्नीचे पूर्वस्थापित अग्नीशी संयोजन केले असता, अग्नीला प्रिय अशा शरीरानेच त्या अग्नीचे ऐक्य करून ते परस्परांशी निर्मत्सर व अनुकूल वृत्तीने राहतील, अशा प्रकारे त्या दोघा अग्नींची यजमानाने समजाविशी केल्याप्रमाणे होते.
'समितं संकल्पेथां' हा मंत्र म्हणावा. हा मंत्र 'तुम्ही एकमेकांशी सुसंगत व्हा' असा उपदेश करीत असल्यामुळेच ब्राह्मण पुरोहिताशी क्षत्रिय राजा एकचित्ताने वागत असतो. दोन्ही अग्नींच्या एकीकरणाने संयुक्त झालेल्या अग्नीच्या ठिकाणी पुढे होणारे सर्व अनुष्ठान केले जाते. आणि म्हणूनच ब्राह्मण व क्षत्रिय यांची एकी झाल्यावर ब्राह्मणाने यथोचित दिलेल्या सल्ल्यास अनुसरून निरनिराळ्या रीतीने राज्याचे यथाशास्त्र परिपालन क्षत्रिय करीत असतो.

वसंतादि सहा ऋतूंनी यजमानाला पूर्वीच दीक्षित केले असल्यामुळे त्या यजमानाने निर्मित केलेला उख्याग्नी ऋतूंच्याकडूनच शिंक्यातून मोकळा होणे योग्य आहे. यास्तव, उख्याग्नी ठेवलेली उखा शिंक्यातून बाहेर काढताना 'मातेव पुत्रं पृथिवी पुरीष्यं' हा मंत्र म्हणावा अग्नीला शिंक्यातून मोकळा करण्यास साधनभूत अशा ह्या मंत्रामध्ये 'ऋतु' शब्दाचा उल्लेख असल्यामुळे यजमानाच्या दीक्षेचा व उख्याग्नीला शिंक्यातून मुक्त करण्याचा तो एकमेव साधन होत असतो. अर्थात् त्या मंत्राच्या पठणाने यजमान ऋतूंच्याकडून दीक्षित केला जातो, तसाच उख्याग्नीही शिंक्यातून मोकळा केला जातो. 'यदस्य पारे रजस:' ह्या 'वैश्वानरी' म्हणजे 'वैश्वानर' शब्दाने युक्त अशा ऋचेने शिंके उचलावे. म्हणजे त्या मंत्राच्या प्रभावाने अन्नाच्या ठिकाणी स्वादुत्व उत्पन्न करणाऱ्या 'वैश्वानर' अग्नीकडूनच जणू शिंक्याच्या ठिकाणी स्वादुत्व निर्माण केल्यासारखे होते.

निर्ऋती देवतेसाठी मांडल्या जाणाऱ्या व कृष्णवर्ण अशा इष्टका भाताच्या कोंड्यामध्ये भाजलेल्या असाव्यात. कारण, भाताचा कोंडा हा निर्ऋतिदेवतेचा भाग असून निर्ऋतिदेवतेचे स्वरूप कृष्णवर्ण आहे. यास्तव, भाताच्या कोंड्यात भाजलेल्या व करपल्यामुळे कृष्णवर्ण (खंगर) झालेल्या विटा मांडल्या असता, निर्ऋती देवतेला अनुरूप अशा भागाने व रूपाने यजमानाने निर्ऋतिदेवतेला यज्ञभूमीतून दूर केल्यासारखे होते. निर्ऋती देवतेच्या उद्देशाने इष्टका मांडण्यासाठी नैर्ऋत्य दिशेस जावे. कारण

'नैर्ऋत्य' ही निर्ऋतिदेवतेची दिशा आहे. यास्तव, नैऋत्य दिशेस जाऊन इष्टका मांडल्या म्हणजे स्वकीय अशा दिशेच्या ठिकाणीच निर्ऋतिदेवतेला नेऊन पोचविल्यासारखे होते.

निसर्गत:च उखिर किंवा भेगळलेल्या जमिनीवर कृष्णवर्ण अशा तीन इष्टका मांडाव्यात. कारण, उखिर जमीन किंवा भेगा असलेली जमीन हे निर्ऋतिदेवीचे निवासस्थान आहे. म्हणून उखिर किंवा भेगळलेल्या जमिनीवर इष्टका मांडल्या म्हणजे यज्ञभूमीपासून दूर करून स्वकीय अशा निवासस्थलाच्या ठिकाणीच यजमानाने निर्ऋतिदेवतेला स्थापन केल्याप्रमाणे होते.

शिंके जमिनीवर पसरावे आणि त्याचा मुळाकडील जाळ्याचा भाग सोडून देऊन त्याच्या शेवटाकडील फासासारख्या दिसणाऱ्या भागावर इष्टका मांडाव्यात. कारण शिंक्याचा फासासारखा जो भाग असतो, तोच निर्ऋतिदेवतेचा पाश होय. यास्तव, फासाच्या जागी इष्टका मांडल्या म्हणजे यजमानाला प्रत्यक्ष निर्ऋतिदेवतेच्या पाशातून मुक्त केल्यासारखे होते.

तीन इष्टका मांडाव्यात. कारण, यजमानरूपी पुरुष हा अधर, मध्य व ऊर्ध्व अशा तीन भागांनी युक्त असलेल्या शरीराचे धारण केलेला असतो. यास्तव, तीन इष्टका मांडल्या असता यजमानरूपी पुरुष जेवढा आहे तेवढ्यापासून, अर्थात् यजमानाच्या शरीराच्या तिन्ही भागापासून उचलून निर्ऋतिदेवतेला तीन वेळ दूर करून तिचा नाश केल्याप्रमाणे होते.

दक्षिणाभिमुख बसलेल्या अध्वर्यूने एक इष्टका मांडल्यावर तिच्या दक्षिणेस किंचित् अंतर टाकून दुसरी, व तशाच प्रकारे तिच्या पलीकडे तिसरी इष्टका मांडावी. असे केल्याच्या योगाने देवयजनस्थलापासून किंवा यजमानापासून निर्ऋतिदेवतेला पाठमोरी करून बाहेर घालविल्याप्रमाणे होते. इष्टका मांडून झाल्यावर त्यांच्याकडे न पाहता देवयजनात परत यावे. म्हणजे निर्ऋतिदेवतेला दृष्टीआड केल्याप्रमाणे होते. यज्ञभूमीत परत आल्यानंतर उदकाने आपल्या मस्तकावर मार्जन करावे आणि नंतर 'निवेशन: संगमनो वसूनां' ह्या मंत्राने अग्नीचे उपस्थान करावे. त्या योगाने यजमान पवित्र, अर्थात् यज्ञयोग्य होतो. इष्टका मांडावयाचे ठिकाणी गेलेल्या अध्वर्यू, यजमान इत्यादिकांनी गार्हपत्याग्नीचे परत यज्ञभूमीत आल्यानंतर उपस्थान करावे. असे केले असता निर्ऋतिदेवतेच्या स्थानाला जाऊन परत आल्यावर मार्जनाने शुध्द होऊन सर्वांनी गार्हपत्याजवळ

असलेल्या देवलोकाच्याच जणू सन्निध येऊन पोचल्यासारखे होते. पूर्वोक्त एकाच ऋचेने उपस्थान करावे. म्हणजे यजमानाच्या ठिकाणी एकाच वेळी सर्व प्रकारच्या वीर्याचे स्थापन केल्यासारखे होते. 'निवेशनः संगमनो वसूनां' असा पूर्वोक्त ऋचेचा पहिला चरण म्हणावा. कारण, पुत्रपौत्रादि प्रजा व गाई, म्हशी, घोडे इत्यादि पशू हेच संसारी मनुष्याचे खरे धन होय. यास्तव, पूर्वोक्त चरण म्हटला असता अध्वर्युप्रभृति ऋत्विज यजमानाला प्रजा व पशू यांच्या योगाने समृध्द करतात. (अनुवाक ४).

पुरुषाच्या उंचीइतक्या लांबीच्या काठीने अग्निचयनाच्या भूमीची मापणी करावी. यज्ञाभिमानी देवाच्या प्रमाणाइतकेच पुरुषाच्या उंचीचे प्रमाण असते. यास्तव, पुरुषाच्या उंचीइतक्या लांब काठीने अग्निचयनाच्या भूमीची मापणी केल्याने यज्ञाच्या प्रमाणानेच अग्निचयनस्थलाची मापणी केल्यासारखे होते. दोन्ही हात उंच करून उभ्या राहिलेल्या पुरुषाच्या उंचीइतकी लांब अग्निचयन स्थलाचे मापन करावयाची काठी असावी. कारण, पुरुषांचे वीर्य, किंवा सामर्थ्य इतक्याच उंचीचे असते. कारण, दोन्ही हात वर करून उभ्या राहिलेल्या पुरुषाच्या उंचीपेक्षा अधिक उंचीवर ठेवलेल्या वस्तूला पुरुष स्पर्श करू शकत नाही. यास्तव उंच हात करून उभ्या राहिलेल्या पुरुषाच्या प्रमाणाच्या काठीने अग्निचयनाच्या भूमीची मापणी केली असता पुरुषवीर्याच्याच प्रमाणाने ती केल्यासारखे होते.

अग्निचयनरूपी पक्ष्याच्या दोन्ही बाजूला दोन पंख असावेत. कारण, पंख नसतील तर तो उडण्यास असमर्थ होईल. पुरुषाच्या उंचीचे पूर्वीचे प्रमाण सांगितले, त्यापेक्षा एका अरत्नीने म्हणजे चोवीस अंगुलांनी अधिक अशी दोन्ही पंखांची लांबी असावी. कारण, पक्ष्याच्या शरीराच्या मानाने त्याच्या पंखाची लांबी अधिक असलेली आपण पाहतो. दोन्ही पंखांची व शेपटाची रुंदी वावभर असावी. पुरुषाचे वीर्य याच प्रमाणाने असते. यास्तव, पंखाची व शेपटाची रुंदी वावभर ठेवली असता, तो अग्निचयनरूपी पक्षी पुरुषाच्या वीर्याइतक्या प्रमाणाचा होतो.

कळकाच्या काठीने अग्निचयन स्थलाचे माप करावे. कारण, कळक अग्निसंबध्द आहे. कळकामध्ये अग्नी समाविष्ट झालेला असतो. यास्तव कळकाच्या काठीने माप केल्याच्या योगाने अग्नीच्या स्वकीय स्थानाचेच माप केल्याप्रमाणे

होते. अग्निचयनाच्या भूमीची मापणी केल्यानंतर ती भूमी नांगरावी. सामान्य व्यवहारात जमिनीची नांगरट मंत्र न म्हणता केलेली असते. तिच्यापेक्षा या नांगरटीचे स्वरूप भिन्न असल्याचे स्पष्ट दिसण्यासाठी अग्निचयनाच्या भूमीची नांगरणी मंत्रपठणपूर्वक करावी. नांगराला बैल जोडतांना मंत्र म्हणावेत व जमीन नांगरतानाही मंत्र म्हणावेत.

नांगराला सहा बैल जोडून नांगरट करावी. कारण ऋतू सहा आहेत. यास्तव, सहा बैल जोडलेल्या नांगराने नांगरणी केली म्हणजे सहा ऋतूंच्या कडूनच अग्निचयनस्थलाची नांगरणी केल्यासारखे होते. अथवा बारा बैल जोडून नांगरणी करावी. म्हणजे बारा महिन्यांनी पूर्ण होणाऱ्या संवत्सराकडूनच नांगरणी केल्याप्रमाणे होते.

अग्निचयनासाठी मापणी केलेले सर्व स्थल नांगरून त्यावर अग्नी मांडला तर तो भूमीला अत्यंत दग्ध करतो. आणि त्या अत्यंत दग्धतेची भूमीला भीती वाटत असते. यास्तव, अशा प्रकारची भीती निवारण होण्याचा उपाय आपल्या विचाराच्या दृष्टीने स्वत: भूमीनेच असा निश्चित केला की, आपल्या ठिकाणचा काही भाग नांगरला जावा व काही भाग नांगरला जाऊ नये. असे झाले म्हणजे अग्निचयन यज्ञभूमीला अत्यंत दग्ध करणार नाही. यास्तव, अग्निचयनाने भूमीला अत्यंत दग्ध करू नये म्हणून मापणी केलेल्या स्थलापैकी काही भाग नांगरावा व काही नांगरू नये.

गार्हपत्यातून थोडा अग्नी घेऊन तो उत्तरवेदीकडे नेताना वाळूने भरलेल्या एका पात्रावर दुसरे परळासारखे एक पात्र ठेवून त्यात तो अग्नी ठेवून नेत असतात. याच न्यायाने नांगरलेले व नांगरट न केलेले, असे दोन प्रकारचे अग्निचयनाचे स्थान करावे. म्हणजे ते अग्नी उचलण्यास योग्य आहे.

नांगरण्याचे काम संपल्यावर नांगरट करणारे द्विपाद (मानव) व नांगराला जोडलेले बैल हे चतुष्पाद पशू यांना जर पूर्व दिशेकडून नांगरलेल्या क्षेत्राबाहेर जाऊ दिले, तर त्या दिशेचा अधिपती असलेला रुद्र त्यांच्यावर धाड घालण्यासाठी टपून राहील. अर्थात् त्या बिचाऱ्यांना रुद्राच्या तोंडी आयतेच दिल्यासारखे होईल. बरे, त्या नांगरणाऱ्या लोकांना व नांगराला जोडलेल्या त्या बैलांना दक्षिण दिशेकडे जाऊ दिले, तर त्या दिशेस राहणाऱ्या पितरांनाच जणू त्यांना अर्पण केल्याप्रमाणे होईल. पश्चिमेकडून त्यांना बाहेर सोडले तर वरुणाच्या

प्रेरणेने राक्षस तेथे येतील व त्यांचा नाश करतील. यास्तव, त्यांना नांगरलेल्या क्षेत्राबाहेर जाताना उत्तर दिशेने जाऊ द्यावे. उत्तर दिशा ही देव आणि मनुष्ये यांना शांतता देणारी आहे. शिवाय 'आदित्य' प्राणरूप आहे. यास्तव, मेरूपर्वताभोवती प्रदक्षिणा करताना उत्तर दिशेस येऊन पोचलेल्या प्राणरूपी आदित्यालाच जणू अनुलक्षून त्यांना बाहेर जाऊ दिल्यासारखे होते.

अग्निचयनाचे क्षेत्र नांगरताना उजव्या बाजूने प्रदक्षिणाकार नांगर त्या क्षेत्रातून फिरवून नांगरावे. म्हणजे अधिक बलवान असलेल्या स्वत:च्या उजव्या भागाला अनुलक्षून नांगर फिरविल्यासारखा होतो. मनुष्याच्या उजव्या बाजूचे अवयव हे डावीकडील अवयवांच्याहून अधिक बलवान असतात हे सांगावयासच नको. शिवाय, अशा प्रकारे प्रदक्षिणाकार फिरून क्षेत्र नांगरल्याने मेरूपर्वताला प्रदक्षिणा घालणाऱ्या आदित्याचेही अनुकरण केल्याप्रमाणे होते.

एवं च, नांगरटीला प्रारंभ केलेल्या स्थानापासून अग्निचयनक्षेत्राभोवती प्रदक्षिणाकार नांगर फिरवून पुन्हा त्या ठिकाणी यावे. अशा प्रकारे अग्निक्षेत्र नांगरले जाते, म्हणूनच गाई इत्यादि पशू सकाळी गोठ्यातून अरण्यात लांबवर वाटेल तिकडे संचार करतात, आणि सायंकाळी पुन्हा आपल्या गोठ्याकडे माघारी येतात.

नांगराने उखळून जमिनीवर पडलेल्या खोल रेषेस 'सीता', शेतकऱ्यांच्या भाषेत 'तास' - अशी संज्ञा आहे. अग्निचयनरूपी श्येनपक्ष्याच्या पुच्छापासून मस्तकापर्यंतच्या क्षेत्रात तीन 'तासे' करावीत. त्याचप्रमाणे उजवीकडील पंखापासून डावीकडील पंखापर्यंत तीन, दक्षिण श्रोणीपासून उत्तरांसापर्यंत तीन व उत्तर श्रोणीपासून दक्षिणांसापर्यंत तीन अशी एकंदर बारा 'तासे' करून अग्निचयनक्षेत्र नांगरावे. तीन ही संख्या 'त्रिवृत्' नामक स्तोमाचेच जणू रूप आहे. यास्तव, अशा प्रकारे तीन तीन तासांच्या चार रांगा निर्माण केल्याने यज्ञाच्या प्रारंभी 'त्रिवृत्' स्तोमाचाच जणू प्रस्तर केल्याचे श्रेय मिळते. या सर्व 'तासां'च्या ठिकाणी मंत्रपठणपूर्वक धान्ये पेरावीत. म्हणजे पठण केल्या जाणाऱ्या मंत्रांच्या सामर्थ्याने अन्नरूप असे धान्य त्या क्षेत्राला चोहोकडून व्यापून टाकते. म्हणजे त्या धान्यांना भरपूर पीक येते. शिवाय, मंत्रांच्या योगाने पूजनीय झालेल्या त्या अग्निचयनक्षेत्राच्या ठिकाणी पूजनीय अशा अग्नीची मांडणी केल्यासारखे होते.

तीळ, उडीद, साळीचे जाड भात, सातू, राळे, साळीचे वरिकाचे भात व गहू ही सात 'ग्राम्य' धान्ये आणि कळकाचे बी, सावे, देवभात, रानतीळ, गवताचे बी, बडबडे व रानमूग ही सात 'आरण्य' धान्ये मिळून चौदा धान्ये त्या तासांच्या ठिकाणी पेरावीत. असे केले असता, ग्राम्य व आरण्य या दोन्ही प्रकारच्या अन्नरूप धान्याची भरपूर प्राप्ती होते नानाप्रकारचे बीजरूपी अन्न पेरले तर नाना प्रकारचे धान्य भरपूर प्राप्त होते. हे उघड आहे. नांगरट करून निर्माण झालेल्या त्या 'तासांच्या' ठिकाणी धान्ये पेरावीत. कारण, जमीन नांगरून मोकळ्या केलेल्या जमिनीत बीजांची मुळे चोहोकडे पसरून ती जोमाने वाढीला लागतात हा अनुभवच आहे.

प्रत्येक तासाच्या मुळापासून शेवटापर्यंत धान्याची पेरणी करीत जावी. म्हणजे ती पेरणी पीक भरपूर येण्याला कारणभूत होते.

बारा सीतांच्या म्हणजे तासांच्या ठिकाणी धान्ये पेरावीत. संवत्सर हा बारा महिन्यांचा असतो. अर्थात् संवत्सराशी संख्यासाम्य असलेल्या बारा तासांमध्ये पेरलेल्या धान्याचे एका संवत्सराच्या अवधीत पीक पूर्णपणे वाढून परिपक्व होते.

'अग्निचयन' करणाऱ्या यजमानाने तासांमध्ये ज्या जातींच्या धान्यांची पेरणी केलेली नसेल ते धान्य भक्षण केले तर तासांच्या ठिकाणी पेरलेल्या धान्यांनाही तो मुकेल. यास्तव, तासांमध्ये पेरल्या न गेलेल्या जातीचेही धान्य पेरल्यासारखे व्हावे म्हणून फुले न येताच फळे धारण करणाऱ्या उंबरासारख्या वृक्षांच्या टाळ्या इध्माशी बांधून घ्याव्या आणि त्या इध्म्याने पेरणी केलेल्या अग्निचयन क्षेत्राचे प्रोक्षण करावे. म्हणजे तासांच्या ठिकाणी पेरलेले व न पेरलेले धान्य यजमानास खावयास मिळते. नांगरणी करताना कळकाच्या काठीने मोजणी करून घेतलेल्या अग्निचयनक्षेत्राच्या बाहेर जी मातीची ढेकळे निरनिराळ्या दिशांच्या ठिकाणी उडून पडली असतील, ती सर्व जमा करून अग्निचयनक्षेत्रात परत आणून टाकावीत. असे केले असता सर्व दिशांच्या ठिकाणी असणारे सामर्थ्यच जणू अग्निचयन क्षेत्रात आणून त्यावर अग्निचयनाची मांडणी केल्याप्रमाणे होते. बाहेर उडालेली ढेकळे परत अग्निचयन क्षेत्रात टाकताना 'मा नो हिंसीज्जनिता' इत्यादि जे मंत्र म्हटले जातात त्यांपैकी 'इषमूर्जमहमित आददे' हा मंत्र यजमान ज्या माणसाचा

द्वेष करतो, तो माणूस ज्या दिशेस असेल त्या दिशेतील ढेकळे अग्निचयन क्षेत्रात टाकताना म्हणावा. असे केले असता त्या माणसाचे अन्न व रस ही दोन्ही आपल्या हस्तगत केल्यासारखी होतात. आणि ज्या दिशेस तो यजमानाने द्वेष्य म्हणून गणलेला माणूस असेल तो अन्न न मिळाल्यामुळे सर्वदा भुकेने पीडिला जातो.

अग्निचयनक्षेत्राच्या ठिकाणी, पशुबंधात करावी लागते, त्या पद्धतीने उत्तरवेदी करावी. म्हणजे उत्तरवेदिविषयक विधी करावा. कारण, उत्तरवेदीच्याच ठिकाणी अग्निचयन मांडावयाचा असतो. उत्तरवेदीजवळच यज्ञिय पशू यूपस्तंभाला बांधला जात असल्याने उत्तरवेदी ही जणू पशुरूपच आहे. यास्तव, उत्तरवेदीचा विधी केल्याने पशूंचीही प्राप्ती होते. शिवाय 'उत्तरवेदिकरण' रूप जे एक यज्ञाचे अंग ते करण्याचे अंतरल्याचाही दोष लागत नाही. (अनुवाक ५).

'अग्ने तव श्रवो वय:' असा प्रारंभ असलेल्या सूक्ताने अग्निचयनक्षेत्रावर वाळू घालावी. हे सूक्त 'वैश्वानर' अग्नीचे आहे. या सूक्ताचे पठण करून घातलेल्या वाळूला 'वैश्वानर' अग्नीचेच स्वरूप प्राप्त होते.

ह्या सूक्तात असलेल्या सहा ऋचांनी वाळू घालावी. 'संवत्सर' हा ऋतुरूपी सहा अवयवांनी युक्त असतो. त्याचप्रमाणे हे 'वैश्वानर' सूक्तही ऋग्रूपी सहा अवयवांनी युक्त असेच आहे. संवत्सरात्मक काल हाच 'वैश्वानर' अग्नी होय. अर्थात् संवत्सराशी स्वरूपसाम्य असलेल्या ह्या सूक्ताने अग्निचयन क्षेत्रावर वाळू घातली असता, तिला प्रत्यक्ष वैश्वानरशक्तीचेच स्वरूप प्राप्त होणे युक्तच आहे.

समुद्र जसा बहुविध अशा उदकाने भरलेला असतो, तसे हे सूक्त बहुविध छंदांतील ऋचांनी निर्माण झाले असल्यामुळे या सूक्तातील छंदसमूहाला 'समुद्र' असे नांव आहे. समुद्राचेच जणू अनुकरण करून 'प्रजा' देखील बहुविध म्हणजे अनेक जातीच्या निर्माण होत असतात. अर्थात् समुद्ररूप अशा सूक्ताने घातलेली वाळू बहुविध अशी प्रजा निर्माण होण्याला कारणभूत होते. इंद्राने वृत्रासुरावर वज्राचा प्रहार केला त्याबरोबर त्याचे तीन तुकडे झाले. एका तुकड्यापासून 'स्फ्य', दुसऱ्या तुकड्यापासून 'रथ' व तिसऱ्या तुकड्यापासून 'यूप' निर्माण झाला. वज्राचे तुकडे होत असताना त्यातील जे कण भूमीवर पडले, त्यापासून अत्यंत कणखर असे चुनखडे निर्माण

झाले भूमीवर पडलेल्या वज्रातील अवयवांना 'शर' अशी संज्ञा असून शरांच्याकडून निर्माण केल्या जाणाऱ्या ह्या चुनखड्यांना 'शर्करा' असे म्हणतात. वज्रापासून बनलेल्या या 'शर्करा' वज्ररूप होत. पशूंच्या प्राप्तीला साधनभूत होणारा अग्नी हा पशुरूप आहे. यास्तव, पशुरूप अशा अग्निचयनक्षेत्राभोवती 'शर्करा' म्हणजे चुनखडीचे खडे एकसारखे पसरावेत. असे केले असता अध्वर्यूने जणू काय वज्रासारख्या पाशाने सर्व पशूंना आपल्या यजमानाकडे आकर्षित केल्यासारखे होते. अग्निक्षेत्राच्या दृढतेसाठी त्याच्या सभोवती कणखर अशा चुनखडीचाच आश्रय करण्याची अपेक्षा असते. लोकव्यवहारात दुर्बलांना प्रबलाचा आश्रय करावा लागतो. प्रबल दुर्बलांचा आश्रय करीत नाहीत.

अग्निक्षेत्राभोवती शर्करा म्हणजे चुनखडीचे खडे तीन सप्तके म्हणजे सात सात संख्येच्या तीन विभागांनी बसवावेत. चुनखडींची एकंदर संख्या अर्थातच एकवीस होत असावी. आपल्या शिरोभागाचे ठिकाणी (१ मुख, २ नासिका, ३ कर्ण, २ नेत्र अशी) सात छिद्रे असून त्यांच्या ठिकाणी सात प्राणांचे वास्तव्य असते. पशू हे या सात प्राणांनी युक्त असल्यामुळे ते प्राणरूपच होत. अर्थात् सातसातांचा एकेक विभाग करून चुनखडे बसविले असता, अध्वर्यूने आपल्या यजमानाला सप्तप्राणयुक्त अशा पशूंचीच जणू प्राप्ती करून दिल्याप्रमाणे होते.

यजमान शत्रूच्याकडून पीडिला जात असेल, तर अध्वर्यूने चुनखड्यांना बसविताना नऊ नऊंच्या तीन विभागांनी त्यांना बसवावे. तीन विभागांनी चुनखडे बसविले म्हणजे 'त्रिवृत्' स्तोमाचे स्वरूप त्या चुनखड्यांना प्राप्त होते. म्हणजे एकंदर चुनखडे सत्तावीस होतात. नऊ नऊ संख्यांच्या तीन ऋग्विभागांनीच 'त्रिवृत्' स्तोम निष्पन्न होत असतो. यास्तव तीन विभागांनी चुनखडे मांडून अध्वर्यूने त्रिवृत्-स्तोमरूपी वज्राचेच जणू संपादन करून आपल्या यजमानाच्या शत्रूवर त्याचा प्रहार केल्यासारखे होते.

आपल्या यजमानाला पशूंची प्राप्ती होऊ नये, असे ज्या यजमानाबद्दल अध्वर्यूला वाटत असेल, त्या अध्वर्यूने अग्निचयनक्षेत्राभोवती चुनखडे न बसविता पूर्वी ओतून ठेवलेली वाळू अग्निचयनक्षेत्रावर सारखी पसरावी. असे केल्याने ते अग्निचयनक्षेत्र त्याच्या कडेला खड्यांचा आधार नसल्यामुळे स्थिर राहणार नाही. ते विस्कळित होईल. आणि असे झाल्याने यजमानाच्या ठिकाणी असलेले

वीर्यही अनेक प्रकारे निष्कारण खर्ची पडून तो पशुरहित होईल. आणि आपल्या यजमानाला गाई, म्हशी इत्यादि पशूंची प्राप्ती व्हावी, असे ज्याच्याबद्दल वाटत असेल, त्याच्या अध्वर्यूने आपल्या यजमानाच्या अग्निचयनाभोवती प्रथमतः चुनखडे बसवून नंतर त्यांवर वाळू पसरावी. म्हणजे त्याच्या यजमानाच्या वीर्याचे उत्तम प्रकारे धारण होऊन तो सर्व प्रकारच्या पशूंचे संपादन करील.

'सौमी' म्हणजे 'सोम' देवतेचा निर्देश जीत केला जातो, त्या ऋचेने वाळू पसरावी. 'सोम' हा रेताचे म्हणजे वीर्याचे धारण करणारा देव आहे. अर्थात् 'सोमा'चे प्रतिपादन करणाऱ्या मंत्राने वाळू पसरल्याचे योगाने यजमान वीर्याचे धारण करतो. ब्राह्मण यजमान असेल तर 'आप्यायस्व समेतु ते' ह्या गायत्रीछंदात्मक ऋचेने वाळू पसरावी. कारण, ब्राह्मण हा 'गायत्र' म्हणजे गायत्री छंदाबरोबरच जन्मलेला असल्याने गायत्रीछंदस्वरूप आहे. यजमान क्षत्रिय असेल, तर 'सं ते पयांसि समु यन्तु' ह्या त्रिष्टुप्छंदात्मक मंत्राने वाळू पसरावी. कारण, त्रिष्टुप् छंदाबरोबर जन्मलेला असल्यामुळे क्षत्रिय हा त्रैष्टुभ म्हणजे त्रिष्टुप्छंदस्वरूप असतो.

बृहस्पतीच्या 'शंयु' नामक पुत्राला यज्ञ सोडून गेला. कोणत्याही प्रयत्नाने त्याला यज्ञाची प्राप्ती होईना. 'शंयू' त्याला एकसारखा शोधीतच राहिला होता. परंतु यज्ञ जो त्याच्यापासून निघून गेला तो अग्नीच्या ठिकाणी शिकून दडून बसला ! तरी शंयू त्याचा पाठलाग करीत तेथे आलाच. त्याबरोबर यज्ञ काळवीट जातीच्या हरणाचे रूप धारण करून अग्नीपासून दूर पळाला, आणि अश्वाच्या शरीरात शिरून त्याच्या पायाच्या एका खुराच्या ठिकाणी तद्रूप होऊन बसला. यास्तव, अग्निक्षेत्राच्या ठिकाणी पुरलेल्या दर्भस्तंबाच्या ठिकाणी प्राङ्मुख अशा अश्वाकडून त्याच्या उजव्या पायाने आक्रमण करवावे म्हणजे त्या घोड्याकडून त्याच्या उजव्या पायाचा खूर दर्भस्तंबावर ठेवावा. नंतर तो घोडा उजव्या बाजूने पुन्हा पूर्ववत् उभा करावा आणि 'यदक्रंदः प्रथमं' या मंत्राने त्याच्या उजव्या पायाचा खूर दर्भस्तंबावर पुनः त्याजकडून ठेववावा. शिवाय अश्वाकडून अग्निचयनक्षेत्राच्या ठिकाणी पदाक्रमण करावयाचे आणखी एक कारण असे की, सृष्टिकर्त्या प्रजापतीकडून अग्निचयनाची मांडणी करवावी असे विद्वान् लोक म्हणत असतात. अश्व हा प्रजापतीपासून निर्माण झाला असल्यामुळे तो प्रजापतिरूपच आहे. यास्तव, त्याच्याकडून अग्निचयन

क्षेत्राच्या ठिकाणी आक्रमण करविल्याच्या योगाने प्रजापतीकडूनच अग्निचयनाची मांडणी केल्या सारखे होते.

अश्वाचे पाऊल जेथे ठेवले गेले आहे, त्या ठिकाणी एक कमळाचे पान उताणे ठेवावे. कमळाचे पान हे अग्नीचे जन्मस्थान आहे. म्हणून कमळाचे पान ठेवून त्यावर पुढे अग्निचयनाची मांडणी केली असता अग्नीच्या जन्मस्थानासह त्याची मांडणी केल्याप्रमाणे होते. 'अपां पृष्ठमसि' हा मंत्र म्हणून कमळाचे पान ठेवावे. कारण, कमळाचे पान ही उदकाची पाठच आहे. यासाठी अनुरूप अशा मंत्राने ते कमळाचे पान ठेवल्यासारखे होते. (अनुवाक ६).

'ब्रह्म जज्ञानं प्रथमं' या मंत्राने त्या कमळाच्या पानावर सुवर्णाचा 'रुक्म' म्हणजे पुतळीसारख्या आकाराचे एक सोन्याचे पदक ठेवावे. मंत्रातील पहिलाच 'ब्रह्म' हा शब्द ब्राह्मणवर्णाचा व्यंजक आहे. सृष्टिकर्त्या ब्रह्म प्रजापतीने ब्राह्मणप्रमुख अशा सर्व प्रजा निर्माण केल्या. यास्तव 'ब्रह्म' शब्दाने युक्त असलेल्या मंत्राने 'रुक्म' मांडला असता अग्निचयनकर्ता यजमान देखील आपल्या राष्ट्रात ब्राह्मणप्रमुख अशा प्रजा निर्माण करू शकतो.

इतर कोणत्याही वर्णाचा उद्बोधक शब्द प्रारंभी न येता ब्राह्मणवर्णवाचक असा 'ब्रह्म' शब्दच या मंत्रात आला असून सृष्टिकर्त्याने उत्पन्न केलेल्या सर्व प्रजांच्यामध्ये ब्राह्मणवर्णाची प्रजा प्रथम निर्माण केली असा उपन्यास या मंत्रात केला आहे. आणि म्हणून अखिल मानवसमाजात ब्राह्मण हा मुख्य मानला गेला आहे.

ब्रह्मशब्दान्वित अशा 'बह्म जज्ञानं' या मंत्राने सुवर्णरुक्माचे उपधान कमळाच्या पानावर करण्याचे माहात्म्य जो जाणतो तो पुरुष समाजामध्ये प्रमुख गणला जातो. 'ब्रह्मवादी' पंडित असे म्हणतात की, पृथिवी, अंतरिक्ष आणि द्युलोक या तिहीपैकी कोणत्याही लोकात अग्निचयन म्हणजे इष्टकांची मांडणी करून त्यावर अग्नी प्रज्वलित करू नये. कारण पृथ्वीवर अग्निचयन केला तर पृथ्वीलाच त्या अग्नीच्या धगीत लोटल्यासारखे होईल. अर्थात् सत्र अग्नीच्या धगीने संतप्त झालेल्या पृथ्वीत कोठेही धान्ये पिकणार नाहीत आणि कसले वृक्षही उत्पन्न होणार नाहीत. सर्व पृथ्वी रखरखीत होऊन बसेल. अंतरिक्षात अग्निचयन करून त्यावर अग्नी चेतविला तर सारे अंतरिक्ष त्याच्या उष्णतेच्या खाईत टाकल्यासारखे होईल. अत्युष्ण असे वातावरण

सर्वत्र पसरलेल्या त्या अंतरिक्षात एक चिटपाखरू देखील उत्पन्न होणार नाही. बरे, द्युलोकात अग्निचयन मांडला तर त्यावर चेतविलेला अग्नी सर्व द्युलोक आपल्या प्रखर धगीने व्यापून टाकील आणि असे झाल्यावर त्या द्युलोकापासून पर्जन्याचा एक थेंबही जमिनीवर पडणार नाही. परंतु, ही अडचण दूर होण्याला एकच उपाय आहे. आणि तो हा की, अग्निचयन क्षेत्राच्या ठिकाणी पूर्वी सांगितल्याप्रमाणे सुवर्णाचा रुक्म मांडून त्यावर मग अग्निचयनाची मांडणी करावी. अग्नीची कितीही आच लागली तरी निवळ सोने केव्हाही नष्ट होत नाही, ते अमर असते. एवं च, सुवर्ण हे अमर आहे. यास्तव, अमृतरूप अशा सुवर्णरुक्मावर अग्निचयन मांडला, तर तो अमृताच्याच ठिकाणी मांडल्यासारखा होईल आणि त्या अग्निचयनावर चेतविला जाणारा अग्नी पृथ्वीला संतप्त करणार नाही. तिच्या ठिकाणी सर्व वस्तू निर्माण करण्याला तो अनुकूलच होईल त्या सुवर्णरुक्मावर सुवर्णमय अशा पुरुषाचे उपधान करावे. म्हणजे ज्याच्या ठिकाणी पुरुषाची आकृती रेखली आहे असे एक सोन्याचे तकट त्या रुक्मावर मांडावे. अशा प्रकारे रुक्मावर केलेले सुवर्णमय पुरुषाचे उपधान यजमानाचे स्थान दृढ करण्याला कारणभूत होते.

सुवर्णमय पुरुषाच्या खाली ठेवलेले रुक्मसंज्ञक सुवर्णपदक म्हणजे जणू सुवर्णाची इष्टकाच होय. त्या इष्टकारूपी सुवर्णपदकाच्या ठिकाणी ते गळ्यात बांधताना दोरा ओवण्यासाठी जे छिद्र ठेवलेले असते ते झांकले जाईल अशा रीतीने जर पुरुषप्रतिमा मांडली जाईल, तर यजमानाच्या पशूंच्या व त्याच्या स्वतःच्या श्वासनलिकेचेही छिद्र झांकले जाऊन त्यांचा जीव कोंडेल. यास्तव, रुक्माच्या ठिकाणचे छिद्र पश्चिम बाजूस मोकळे राखून ह्या रुक्माच्या दक्षिण बाजूस, पूर्वेस मस्तक होईल अशा प्रकारे सुवर्णमय पुरुषाचे उपधान करावे. असे केले असता आहवनीयाच्या दक्षिणेस असलेले यजमानाचे स्थान अचल होईल आणि त्याच्या पशूंचे व त्याचे स्वतःचे श्वासही कोंडले जाणार नाहीत. यावर, दुसरा एक पक्ष दर्शविला जातो, तो असा की, खाली ठेवलेल्या रुक्माच्या छिद्रावरच पुरुषप्रतिमा मांडावी. कारण, रुक्माचे छिद्र मोकळे ठेवले, तर यजमानाचे व त्याच्या पशूंचे श्वास कायमचेच बाहेर जावयाचे व त्याबरोबर त्यांचा प्राणच जावयाचा ! असो. 'द्रप्सश्चस्कंद' या मंत्राने त्या सुवर्णमय पुरुषाला स्पर्श करावा म्हणजे होमयोग्य अशा सातही दिशांना

त्या सुवर्णमय पुरुषाचे प्रतिष्ठान केल्याप्रमाणे होते.

अग्निचयनक्षेत्रावर कमळाचे पान, सुवर्णरुक्म व सुवर्णमय पुरुष जसा मांडला जातो, तशीच त्यानंतर उखा म्हणजे एक शेगडीही मांडली जात असते. कमळाच्यापासून शेगडीपर्यंतच्या ह्या सर्व वस्तू म्हणजे जणू अमृण्मय अर्थात् मृत्तिकारहित अशा इष्टकाच होत. अशा प्रकारच्या आणखीही अमृण्मय इष्टका मांडावयाच्या असतात. ' कार्ष्मर्यमय' म्हणजे शिवणीच्या लाकडाची आज्याने भरलेली एक व उंबराच्या लाकडाची दह्याने भरलेली एक अशा दोन स्रुच्या मांडाव्यात. ह्या दोन स्रुच्या म्हणजे जणू दोन लोकच होत. शिवणीच्या लाकडाची स्रुची जणू पृथ्वीरूप असून उंबराच्या लाकडाची स्रुची ही जणू अंतरिक्षरूप आहे.

स्रुचीरूप असलेल्या या दोन अमृण्मय इष्टकांचे उपधान मंत्र न म्हणता करावे. या दोन्ही इष्टका मंत्रपूर्वक उपधान करण्यास योग्य नाहीत. प्रथम शिवणीची स्रुची सुवर्णमय पुरुषाच्या दक्षिणेस व नंतर उंबराची स्रुची त्याच्या उत्तरेस मांडावी. कारण, प्रथम भूलोक व त्यानंतर अंतरिक्षलोक असाच निसर्गाचा अनुक्रम आहे. आज्याने भरलेली शिवणीची स्रुची वज्ररूप आहे. कारण तिच्यामध्ये भरलेले आज्य वज्रासारखे तेजस्वी असून ती ज्या वृक्षाची बनविली आहे तो शिवणीचा वृक्षही वज्रासारखा कणखर आहे. एवं च, सुवर्णमय पुरुषाच्या दक्षिणेस ही वज्ररूप स्रुची मांडली, म्हणजे त्या वज्राकडून यज्ञाच्या दक्षिण दिशेस असलेले राक्षस मारले जातात. दह्याने भरलेली दुसरी उंबराची स्रुची ही पशुरूप होय. कारण तिच्यात भरलेले दही बलोत्पादक असून ती ज्या वृक्षाची बनविली आहे, तो उंबराचा वृक्षही बळकट असतो. यास्तव त्या स्रुचीचे उपधान केले असता यजमानाच्या पशूंच्या ठिकाणी बळाचे धारण केले जाते.

या दोन्ही स्रुच्या अनुक्रमे आज्याने व दह्याने अगदी पूर्ण भरलेल्या असाव्या. म्हणजे त्या तशाच स्वरूपात यजमानाला तो शेवटी स्वर्गलोकी गेल्यावर त्याच्या सन्निध सादर असतात. 'अग्निचयन' मांडण्यामध्ये अभिज्ञ असे याज्ञिक म्हणतात की, विशेष सुशोभित अशा स्थानी अग्निचयन मांडावा. आता सांगितलेल्या दोन स्रुच्या हेच विशेष सुशोभित असे स्थान होय. यास्तव, ह्या दोन स्रुच्यांच्या वर अग्निचयन मांडला, म्हणजे तो विशेषत्वाने

सुशोभित अशा ठिकाणी मांडल्यासारखे होते.

यज्ञासंबंधाने केले जाणारे एक एक अंगभूत कर्म म्हणजे यज्ञाचे जणू एक एक मुखच होय. अर्थात् यज्ञाचे मुख म्हणून गणले जाणारे ते ते कर्म करू लागले, म्हणजे राक्षस त्या यज्ञाचा नाश करण्यास प्रवृत्त होत असतात. मांडलेला रुक्म हा देखील एक यज्ञाचे मुखच होय. अर्थात् रुक्मरूपी यज्ञमुखाच्या ठिकाणी राक्षसांचा हल्ला न व्हावा म्हणून त्या रुक्मावर जर आज्याने आहुती देऊन व्याघारण केले, तर त्या आज्याहुतींच्या देवता रुक्मरूपी यज्ञमुखापासून राक्षसांना दूर हांकून देऊन त्यांचा नाश करतात.

'व्याघारण' करताना पांच आहुती द्याव्यात. पांच ही संख्या पूर्णत्वाची निदर्शक आहे. धाना, करंभ, परिवाप, पुरोडाश व आमिक्षा या पांच हविर्द्रव्यांनी युक्त असणारा यज्ञ पांक्त म्हणजे परिपूर्ण होत असतो. यास्तव, पांच आहुती दिल्या म्हणजे यज्ञाच्या प्रारंभापासून तो पूर्ण होईपर्यंत त्या आहुतींच्या अधिष्ठात्री देवता यज्ञाच्या परिपूर्णतेला विघ्न करणाऱ्या राक्षसांना यज्ञापासून दूर करून त्यांचा नाश करतात. (अनुवाक ७).

चुनखड्यामध्ये निसर्गसिध्द अशी छिद्रे असलेला जो चुनखडीचा मोठा खडा असतो, त्याला 'स्वयमातृण्णा' हे नांव आहे. अग्निचयनक्षेत्राच्या मध्यभागी ही 'स्वयमातृण्णा' नांवाची इष्टका मांडावी. पृथ्वीपासूनच स्वयमातृण्णेतेची उत्पत्ती झाली असल्यामुळे ती पृथ्वीरूपच असते. यास्तव, तिचे उपधान केले असता पृथ्वीचेच उपधान केल्यासारखे होते. ही मांडण्यापूर्वी अश्वाकडून तिला हुंगवावी. म्हणजे तिच्या ठिकाणी प्राणच उत्पन्न करून ठेवल्यासारखे होते. शिवाय, अश्व हा प्रजापतिनिर्मित असल्यामुळे प्रजापतिरूपच होय. यास्तव, त्याच्याकडून हुंगवून स्वयमातृण्णा मांडली म्हणजे ती प्रजापतीकडूनच मांडल्यासारखी होते.

कमळाचे पान इत्यादिकांप्रमाणेच या स्वयमातृण्णेचेही उपधान केले जात असल्यामुळे तिलाही कोणाही पुरुषाने न बनविलेली इष्टकाच मानली जाते. यापुढे पुरुषनिर्मित अशा ज्या इष्टका मांडल्या जाणार आहेत, त्यांच्या अपेक्षेने ही प्रथमच मांडली जाणारी स्वयमातृण्णारूप इष्टका छिद्रे नसलेल्या चुनखडीची मांडली, तर पशूच्या व यजमानाच्या श्वासनिर्गमनाचा मार्ग बंद होऊन त्यांचा जीव कोंडेल. यास्तव, ही स्वयमातृण्णा 'सच्छिद्र' अशी असावी. म्हणजे

ती पशूंच्या व यजमानाच्या प्राणाचा निरोध करीत नाही. इतकेच नव्हे तर यजमानाला ती स्वर्गलोकाचे प्रकाशन करते.

अग्नीचा आधार घेऊन त्याच्या ठिकाणी अग्निचयन मांडावा, असे अभिज्ञ याज्ञिक म्हणतात. ब्राह्मण हा जणू वैश्वानर अग्नीच होय. यास्तव मंत्राने सुसंस्कृत केलेली स्वयमातृण्णा इष्टका एका ब्राह्मणाच्या हातावर द्यावी आणि नंतर अध्वर्यू व तो ब्राह्मण या दोघांनी मिळून ती इष्टका मांडावी. सारांश, वैश्वानराग्निरूप ब्राह्मणाच्या हाती ती प्रथम दिल्याने सहज अग्नीचा आधार घेऊन त्यावर अग्निचयनाची मांडणी केल्यासारखे होते.

जो अविद्वान ब्राह्मण अध्वर्यूबरोबर स्वयमातृण्णा इष्टका मांडतो तो एखाद्या प्राणसंकटात पडण्यास पात्र होतो. यास्तव, आपणावर येणाऱ्या संकटाचा परिहार होण्याकरता त्या ब्राह्मणाने अध्वर्यूला तीन गाई 'वर' म्हणून द्याव्यात. प्राण, अपान व व्यान हे तीन प्राण आहेत. यास्तव, तीन गाई दिल्या म्हणजे तिन्ही प्राणांना स्थैर्य येते. किंवा प्राण व अपान हे दोनच प्राणवायू समजून दोन गाई द्याव्या अथवा एकच प्राण मुख्य समजून एकच गाय 'वर' म्हणून अध्वर्यूला द्यावी. पशुप्राप्तीला कारणभूत होणारा असल्यामुळे चितिरूपी अग्नीही पशुरूप होय. ज्या ठिकाणी गवत इत्यादि खावयास मिळत नाही, अशा रखरखीत जागी पशूंचे मन रमत नाही. यास्तव, स्वयमातृण्णे नंतर दूर्वारूपी इष्टका मांडावी. म्हणजे ज्याच्या बुडाशी जमिनीतील मातीची ढिखळे चिकटलेली आहेत असे एक दूर्वांचे (जमिनीतील उपटलेले) ठोंब इष्टका म्हणून मांडावे. दोन मंत्रांनी ती दूर्वेष्टका मांडावी. म्हणजे ती यजमानाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याला कारणभूत होते. 'कांडात् कांडात् प्ररोहन्ति' हा मंत्र ती मांडताना प्रथम म्हणावा. कारण, दूर्वा ही कांड्याकांड्यानेच वाढून प्रतिष्ठित झालेली असते. या मंत्रात 'एवा नो दूर्वे प्रतनु सहस्रेण शतेन च' हा उत्तरार्ध म्हटला जात असतो. प्रजापती हा हजारो प्राण्यांना उत्पन्न करीत असतो. यास्तव, या उत्तरार्धाच्या पठनाने जणू प्रजापतीलाच अनुकूल करून घेतल्याप्रमाणे होते.

इष्टका म्हणजे मातीची वीट हे उघडच आहे. 'अषाढाऽसि सहमाना' इत्यादि दोन मंत्र म्हणून 'आषाढा' नांवाची इष्टका मांडावी. ज्या इष्टकेवर ती ओली असताना त्रिपुंड्राप्रमाणे तीन रेषा कोरलेल्या असतात त्या इष्टकेस

'आषाढा' अशी संज्ञा आहे. 'त्रिपुंड्र' हे देवांचे मानचिन्ह आहे. आणि म्हणून देवांनी मांडलेल्या अग्निचयनामध्ये त्यांनी 'त्रिपुंड्र' चिन्ह वरच्या बाजूस करून आषाढाइष्टका मांडली व असुरांनी मांडलेल्या चयनात त्यांनी त्रिपुंड्र चिन्हाची बाजू खाली करून आषाढेष्टकेची मांडणी केली. आपला यजमान धनसंपन्न व्हावा असे ज्याच्याविषयी वाटत असेल, त्या यजमानाच्या अध्वर्यूने त्रिपुंड्र चिन्ह वर होईल अशी आषाढेष्टका मांडावी म्हणजे त्याचा यजमान धन संपन्न होतोच. आपला यजमान दरिद्री असावा असे ज्याच्या बद्दल वाटते, त्या यजमानाच्या अध्वर्यूने त्रिपुंड्र चिन्ह खाली करून आषाढेष्टका मांडावी. म्हणजे त्याचा यजमान दरिद्री होतो, आणि अधोमुख इष्टका मांडल्याने असुरांची जाती जशी अधोगतीला गेली तसा तोही अधोगतीला जातो.

'आषाढा' ही इष्टका त्र्यालिखिता असते. म्हणजे तिच्या ओलेपणी तिच्यावर तीन बोटांनी तीन रेषा ओढलेल्या असतात. पृथ्व्यादिलोकही तीनच आहेत. तेव्हा त्रिरेखांकित अशी आषाढा म्हणजे त्रैलोक्यरूपच होय. यास्तव, तीन लोकांशी स्वरूपसाम्य असलेली आषाढेष्टका मांडली असता अध्वर्यूने जणू आपल्या यजमानाच्या शत्रूला तिन्ही लोकांतून बाहेर हांकलल्यासारखे होते.

अंगिरसमहर्षी जेव्हा स्वर्गलोकी गेले, तेव्हा पुरोडाशही कूर्माचे म्हणजे कासवाचे रूप धारण करून त्यांच्या मागोमाग स्वर्गाला गेला. सारांश, कूर्म हा स्वर्गलोकाचा मार्ग जाणणारा आहे. यास्तव, अग्निचयनामध्ये कूर्माचे उपधान केले म्हणजे अज्ञात प्रदेशामध्ये जसा त्या प्रदेशातील माहितगार वाटाड्या प्रवाश्याला त्या अज्ञात प्रदेशातून सरळ रीतीने घेऊन जातो, त्याप्रमाणे उपधान केलेला कूर्म अग्निचयकर्त्या यजमानाला सरळ रस्त्याने स्वर्गलोकाला घेऊन जातो.

'मेध' म्हणजे यज्ञ. 'मेध' जसा इच्छित फलाची प्राप्ती करून देणारा आहे, त्याचप्रमाणे पशुवर्गामध्ये कूर्म हा मेधरूप अर्थात् इच्छित फल प्राप्त करून देणारा आहे. यास्तव, कूर्माचे उपधान करून अग्निचयन मांडला असता हा मेधरूप कूर्म आपल्याच जातीचा आहे असे पाहून सर्व पशू त्या कूर्माजवळ येतात व अशा प्रकारे चयनकर्त्या यजमानाला सर्व पशूंचा लाभ होतो.

अग्निचयनक्षेत्राच्या ठिकाणी अश्व, वृषभ इत्यादि मृत पशूंची 'शिरे'

उपधान करण्यात येत असतात. आणि अशा प्रकारे मृत पशूंच्या शिरांची मांडणी केले जाणारे ते अग्निचयनक्षेत्र म्हणजे यजमानाने जणू स्मशानच निर्माण केल्यासारखे होते. यास्तव, त्या चयनक्षेत्रात जिवंत अशा कूर्माचे जर उपधान केले तर त्या अग्निचयनक्षेत्राला स्मशानाचे रूप येत नाही. पृथ्वी देखील कूर्माच्या पृष्ठभागावर स्थिर राहिली आहे. यावरून कूर्म हे निवासयोग्य असे जणू स्थलच आहे. एवं च, कूर्माचे उपधान अग्निचयन क्षेत्रात अवश्य करावे. उपधान करण्यापूर्वी दही व मध यांच्या मिश्रणाने त्या कूर्माला अभ्यंजन करावे, म्हणजे ते मिश्रण त्या कूर्माच्या शरीराला चोपडावे, म्हणजे अध्वर्यूने त्या कुर्माला अधिक चविष्ठ केल्यासारखे होते.

दही हे ग्राम्य अन्न असून मध हे आरण्य अन्न आहे. यास्तव या दोन्ही अन्नांच्या मिश्रणाने कूर्माला केलेले अभ्यंजन यजमानाला ग्राम्य व वन्य असे दोन्ही प्रकारचे योग्य पदार्थ प्राप्त करून देते. कूर्माचे उपधान करताना 'मही द्यौ: पृथिवी च न' हा मंत्र म्हणावा. म्हणजे द्युलोक व पृथ्वी ह्या दोन्ही लोकांकडून त्या अध्वर्यूने कूर्माचा परिग्रह म्हणजे स्वीकार करविल्याप्रमाणे होते. 'स्वयमातृण्णा' इष्टकेच्या पुढेच पूर्व दिशेस कूर्माचे उपधान करावे. म्हणजे ते पूर्व दिशेस असलेल्या स्वर्गलोकाची प्राप्ती यजमानाला करून देण्याला कारणभूत होते. स्वयमातृण्णेच्या पूर्वेस कूर्माची मांडणी करताना त्याचे मुख पश्चिमेस करावे. कारण, आहवनीयाच्या पूर्वेस पश्चिमाभिमुख उभे राहूनच पशू यज्ञाची सेवा करीत असतात.

जो यजमान 'नाभिस्थान'रहित अशा अग्निचयनाची मांडणी करतो, त्याच्या नाभिस्थानात तो चित्तिरूपी अग्नी शिरतो आणि त्या यजमानाचा नाश करण्यास समर्थ होतो. यास्तव, अग्निचयन क्षेत्राच्या ठिकाणी एक उखळ मांडावे. उखळ हेच जणू त्या चित्तिरूपी अग्नीचे नाभिस्थान होय. सारांश, उलूखलरूप नाभीसह अग्निचयन मांडला गेला असता तो यजमानाची हिंसा करण्यास प्रवृत्त होत नाही.

'उखळ' उंबराच्या लाकडाचे केलेले असावे. कारण, 'उंबर' हा अन्नरूप आहे. यास्तव, उंबराच्या लाकडाचे उखळ मांडले म्हणजे यजमानाला ते अन्न मिळवून देते. अग्निचयनक्षेत्राच्या मधोमध उखळाचे उपधान करावे. म्हणजे अग्निचयनाच्या मध्यभागी जणू अन्नच साठवून ठेवल्याप्रमाणे होते.

आणि त्या योगाने त्या अग्निचयनाच्या मध्यभागात उत्पन्न होणाऱ्या धान्यरूपी अन्नाने यजमान सदैव भोजन करतो. प्रजापतीने निर्मिलेल्या यज्ञाच्या मुखाइतक्या प्रमाणाचे अर्थात् एक टीचभर उंचीचे ते उखळ असावे. उखळाचे उपधान करण्यापूर्वी त्या उखळात उपलब्ध होतील त्या सर्व प्रकारची धान्ये कांडावीत आणि मग त्याचे उपधान करावे. 'इदं विष्णुर्विचक्रमे' ह्या विष्णुदेवतात्मक ऋचेने उखळाचे उपधान करावे. कारण विष्णू म्हणजे यज्ञ होय. उखळासारख्या वस्तू ज्या लाकडाच्या करतात ते वृक्ष देखील विष्णुरूपच होत. सारांश, पूर्वोक्त विष्णुदेवात्मक मंत्र म्हणून उखळ मांडले असता यज्ञाच्या ठिकाणी जणू यज्ञाची स्थापना केल्याप्रमाणे होते. (अनुवाक ८).

'उखा' नांवाची अष्टकोनी शेगडी, ही तिन्ही लोकांमध्ये जितका काही प्रकाश म्हणून आहे तितका सर्व प्रकाश जिच्या ठिकाणी एकत्र झाला आहे अशी एक सदैव प्रकाशात राहणारी 'ज्योती'च आहे. यास्तव, 'उखेचे' उपधान करावे. म्हणजे तीन्ही लोकांना त्या ज्योतीच्या प्रकाशाचा लाभ करून दिल्याप्रमाणे होईल. 'उखा' अग्निचयनक्षेत्राच्या मधोमध ठेवावी. म्हणजे त्या मध्य स्थानावरून सभोवारच्या सर्व प्रदेशाला त्या उखारूपी ज्योतीचा प्रकाश मिळतो. आपण आपल्या शरीराच्या मध्यभागी असलेल्या जठराग्निरूपी ज्योतीच्या प्रकाशाचा अनुभव प्रत्येक दिवशी घेतच असतो.

उखा मांडल्यावर तिच्यामध्ये तोंडापर्यंत एकसारखी वाळू घालावी. 'वाळू' हे वैश्वानर अग्नीचे जणू स्वरूपच आहे. यास्तव, उखेमध्ये वाळू पसरली म्हणजे वैश्वानर अग्नीचेच त्या ठिकाणी संपादन केल्याप्रमाणे होते. ज्या यजमानाबद्दल तो नेहमी भुकेने पीडिलेला असावा, त्याला भुकेचे शमन करण्यापुरते अन्न मिळू नये, असे अध्वर्यूला वाटत असेल, त्याने उखेत वाळू तोंडापर्यंत न भरता कमी भरावी. म्हणजे त्याच्या यजमानाला अन्न कमी मिळेल व तो भुकेलेलाच राहील. परंतु ज्या यजमानाविषयी त्याला अन्नाचा तुटवडा कधीही पडू नये, त्याला पोटभर अन्न सदैव भरपूर मिळावे, असे ज्याला वाटत असेल, त्या अध्वर्यूने उखेमध्ये अगदी पुरेपुर वाळू भरावी. म्हणजे त्याच्या यजमानाला अन्नाची कमतरता कधीच भोगावी लागत नाही.

या उखेच्या अगदी जवळ एक मृत पुरुषाचे शिर मांडून ठेवावे. हा शिरोरूपाने मांडला जाणारा 'पुरुष' यजमानाला हजार पशू मिळवून देतो.

ह्या पुरुषाच्या शेजारी चारी दिशेला अश्व, वृषभ, मेंढी व बोकड या चार प्रकारच्या मृत पशूंची अनुक्रमे चार शिरे मांडावयाची असतात. ती मांडल्याच्या योगाने, यजमानाला ती सर्व मिळून एक हजार पशू मिळवून देतात. उखेच्या अगदी समीप पुरुषशिराचे उपधान करावे. म्हणजे ते त्या ठिकाणी सुप्रतिष्ठित होते व ते यजमानालाही प्रतिष्ठेला चढविते.

मृत पुरुषाचे प्राणरहित शरीर असे ते शिर वस्तुत: अमेध्य म्हणजे यज्ञामध्ये उपयोगी आणण्याला अयोग्य असे होय. 'प्राण' हे अमर आहेत, आणि म्हणून त्यांना अमृत असे नांव आहे. सुवर्ण हेही अमर असल्यामुळे अमृतरूप आहे. ह्यास्तव त्या पुरुष शिराच्या ठिकाणी सुवर्णाचे काही लहान लहान तुकडे घालावे. म्हणजे अध्वर्यूने जणू निर्जीव अशा पुरुषाशिराच्या ठिकाणी प्राणांची स्थापना केल्यासारखे होते. आणि अशा रीतीने सजीव केलेल्या पुरुषशिराचे केलेले उपधान यजमानाच्या प्रतिष्ठेला कारणभूत होऊन त्याला पंचप्राणांच्या योगाने ते समृध्द करते.

मी मधुर अशा सर्व प्रकारच्या रसांचा उपभोग घेण्यास पात्र होईन अशी भावना मनात धरलेली असताना दह्यात मध मिसळून तयार केलेले मिश्रण त्या पुरुषाशिरावर सर्वत्र ओतावे.

दुधाचे दह्यात रूपांतर दोन प्रकाराने होत असते. रुप्याचा तुकडा दुधात टाकून ठेवला, तर ते दूध आपोआप विरजून त्याचे दही होते, हा एक प्रकार असून तापलेल्या दुधात ताकाचे किंवा इतर कशाचे मुरवण घातले म्हणजे ते दूध विरजून त्याचे दही होते, हा दुसरा प्रकार होय. पुरुष शिरावर ओतण्यासाठी जे दही उपयोगात आणावयाचे ते पुरूषाशिराच्या ठिकाणी पावित्र्य उत्पन्न व्हावे म्हणून ताकाचे विरजन घालून तयार केलेले असावे. दही हे ग्राम्य म्हणजे गावात निष्पन्न होणारे एक अन्न असून मध हे अरण्यात निर्माण होणारे अन्न होय. यासाठी या दोन्ही प्रकारच्या अन्नरसाचे मिश्रण पुरूषाशिरावर ओतले म्हणजे यजमानाला ग्राम्य व अरण्य असे दोन्ही प्रकारचे अन्न प्राप्त होते. मृत पुरुषाच्या मांडलेल्या त्या शिराच्या चार दिशांना चार प्रकारच्या मृत पशूंची शिरे मांडावीत. म्हणजे यजमानाच्यासाठी अध्वर्यूने जणू पशूंनाच आपल्या जवळ केल्यासारखे होते.

ज्या यजमानाविषयी तो पशुसंपत्तिरहित व्हावा, अशी अध्वर्यूची इच्छा

असेल त्याने मृत पशूंची मस्तके मांडतांना पुरुषमस्तकाकडे त्यांचे मुख न करता उलट दिशेस मुख करून ती मांडावीत. म्हणजे त्याचा यजमान पशुसंपत्तिरहित होतोच. आणि आपल्या यजमानाला पशूंची समृध्दी प्राप्त व्हावी असे ज्या यजमानाबद्दल वाटत असेल त्या अध्वर्यूने त्या मृत पशूंची मस्तके पुरुषमस्तकाकडे मुख करून मांडावीत. म्हणजे अग्निचयन करणारा यजमानही पशुसमृध्दीने युक्त होतो. मृत अश्वाचे मस्तक पुरुषमंस्तकाच्या पूर्व दिशेस पश्चिमाभिमुख मांडावे. बैलाचे शिर पुरुषमस्तकाच्या पश्चिमेस पूर्वाभिमुख मांडावे. गाय किंवा बैल आणि घोडा या दोन जातींच्या खेरीज इतर सर्व पशू हे पशू या संज्ञेस पात्र असले तरी आता सांगितलेल्या दोन जातींच्या पशूंच्या महत्त्वाच्या दृष्टीने अपशूच होत. यास्तव, वर सांगितल्याप्रमाणे अश्व व वृषभ या दोनच पशूंची शिरे पुरुषमस्तकाकडे मुख करून मांडली म्हणजे इतर शिरेही तशीच मांडल्यासारखी होतात, व असे केल्याने अध्वर्यूने जणू गाई, घोडे इत्यादि पशूंचे यजमानाच्या ठिकाणी धारण केल्यासारखे होते.

द्विपाद असे मानव व गाई घोडे इत्यादि चतुष्पाद या दोनच वर्गातील पशू जगात महत्त्वाचे गणले जातात. म्हणून द्विपाद अशा मृत मानवाचे व इतर चार जातींच्या चतुष्पाद अशा मृत पशूंची मस्तके अग्निचयन क्षेत्रावर जर मांडली, तर अध्वर्यूने जणू काय त्यावर रचिल्या जाणाऱ्या चित्तिरूपी अग्नीच्या धगीत विद्यमान असलेल्या दोन्ही प्रकारच्या पशूंना लोटल्यासारखे होईल. पण तसे होऊ नये, चित्तिरूपी अग्निलाही काही खाद्य मिळावे व त्याने आपल्या धगीने द्विपाद व चतुष्पाद अशा सर्व ग्राम्य पशूंना दग्ध करू नये म्हणून 'हे चित्तिरूपी अग्ने तुला हे अरण्यपशूंचे - काळवीटजातीच्या मृत हरिणाचे - शिर दाखवून ठेवतो ते तू भक्षण कर', असा अर्थ व्यक्त करणारा 'अमुमारण्यमनु ते दिशामि' हा मंत्र म्हणावा. द्विपाद व चतुष्पाद या ग्राम्यपशूंना अग्नीच्या उपद्रवापासून वेगळे करून म्हणजे अग्नीकडून त्यांचे रक्षण करवून मृत काळविटाच्या शिराच्या मिषाने अध्वर्यूने जणू काय आरण्य पशूंनाच चित्तिरूपी अग्नीला खाद्य म्हणून देऊन टाकल्यासारखे होते. लोकव्यवहार सुद्धा असाच आहे. सर्वनाशाच्या प्रसंगी महत्त्वाचे तेवढे जतन करून क्षुद्र असेल, त्याचाच त्याग निरुपाय म्हणून करावा लागतो. आणि म्हणूनच प्राणी या दृष्टीने ग्राम्य व आरण्य पशू यांचे साम्य असले, तरी ग्राम्य पशू हेच व्यवहारात श्रेष्ठ ठरले असून अरण्यपशू हे कनिष्ठ गणले गेले आहेत.

अग्निक्षेत्राच्या पूर्व व दक्षिण दिशांच्या कोपऱ्यांत एक मृत शिर मांडावे. म्हणजे सर्पांच्या ठिकाणी जी तेजस्विता असते ती त्या मृत पशूंच्या मांडलेल्या शिरांच्या ठिकाणी अध्वर्यूने संपादन केल्याप्रमाणे होते. मृत सर्पाचे शिर पशुशिरांच्याकडे मुख करून मांडले तर ग्राम्य पशूंना सर्प दंश करतील व पशुशिरांच्याकडे पृष्ठभाग करून सर्पशिर मांडले तर आरण्य पशूंना सर्प दंश करतील. सर्पशिराचे उपधान न केले तर सर्पांच्या ठिकाणी असलेली चमकदार कांती मृत पशूंच्या ठिकाणी निष्पन्न होणार नाही. यास्तव, अशी युक्ती करावी की, मृत सर्पाचे शिर न मांडता ते मांडताना जे मंत्र म्हणावयाचे असतात, ते मंत्र तेवढे म्हणावेत. असे केल्याने सर्पाच्या ठिकाणची चमकदार कांती मृत पशुशिरांच्या ठिकाणी निर्माण होईल आणि ते केवळ मंत्रपठणरूपाने केलेले (मृतसर्पशिराचे) उपधान ग्राम्य व आरण्य या दोन्ही प्रकारच्या पशूंची हिंसा करणार नाही. परंतु, याहीपेक्षा उत्कृष्ट मार्ग असा की, मृतसर्पशिराचे उपधान करणेच अवश्य असल्याप्रमाणे ते करावेच व ते करताना मंत्रही म्हणावेत. म्हणजे सर्पांच्या ठिकाणची दिव्यकांती त्या मृतपशुशिरांच्या ठिकाणी निर्माण होईल, आणि मंत्रपाठाच्या प्रभावाने सर्पाच्या ठिकाणी शांतता उत्पन्न होऊन ग्राम्य व आरण्य पशूंना सर्पदंश होण्याची भीतीही निर्माण होणार नाही. (अनुवाक ९).

चितिरूपाने मांडला जाणारा अग्नी पशुप्राप्तीला कारणभूत होत असल्याने अग्निक्षेत्रावर मांडणी करण्यापूर्वी जे अंगभूत कर्म केले जाते, त्याच्या योगाने पशुरूप अग्नीचे जन्मस्थानच विकृत होत असते. म्हणजे ऋतुकाली स्त्रीची योनी जशी विकृत होऊन पुरुषरेताचे धारण करण्याची अपेक्षा करते, त्याचप्रमाणे विकृत झालेले पशुरूपी अग्नीचे जन्मस्थान विकृत होऊन योग्य अशा इष्टकारूपी रेताचे धारण करण्यास उत्सुक होत असते. 'अपस्या' नांवाच्या इष्टका रेतस्थानीय होत. यास्तव, 'अपस्या' नांवाच्या इष्टका मांडाव्यात. म्हणजे पशुरूप अग्नीच्या विकृत अशा जन्मस्थानरूपी योनीचे ठिकाणी इष्टकारूपी रेताचेच जणू अध्वर्यूने धारण केल्यासारखे होते. पूर्व दिशेस पश्चिमाभिमुख अशा 'अपस्या' नांवाच्या पांच इष्टका मांडाव्यात. चार पाय व पुच्छ मिळून पांच अवयवांनी युक्त असल्यामुळे पशू हे पांक्त आहेत. यास्तव पशूंच्या अवयवांच्याशी संख्यासाम्य असलेल्या या पांच अपस्येष्टका मांडल्या असता अध्वर्यूने यजमानासाठी पांक्त अशा पशूंची जणू निर्मिती केल्यासारखे होते.

पांच अपस्येष्टका दक्षिण दिशेस मांडाव्यात. 'अपस्या' या वज्ररूप आहेत. अर्थात् दक्षिणेस अपस्या मांडल्या म्हणजे त्या वज्रानेच दक्षिण दिशेने यज्ञास उपद्रव देण्यासाठी येणाऱ्या राक्षसांचा नाश करतात. पश्चिम दिशेस पूर्वाभिमुख अशा पांच अपस्येष्टका मांडाव्यात. पश्चिमेच्या बाजूस असलेल्या प्राङ्.मुख पुरुषाकडूनच त्याच्या समोर असलेल्या गर्भाशयाच्या ठिकाणी 'रेत' स्थापन केले जात असते. त्याचप्रमाणे अध्वर्यूने आपल्या यजमानासाठी पूर्व दिशेस मुख करून अपस्येष्टकारूपी रेताचे स्थापन केल्यासारखे होते.

पूर्व दिशेस पश्चिमाभिमुख पांच व पश्चिमेस पूर्वाभिमुख पांच अपस्येष्टका मांडाव्यात. या योगाने अध्वर्यूने जणू काय लोकव्यवहारात देखील पूर्वेस असलेल्या योनीकडे मुख करून रेताची स्थापना केली जात असते, व उत्पन्न होणाऱ्या प्रजा मात्र पश्चिमामुख म्हणजे योनीच्या बाहेर मुख करून जन्मास येतात.

उत्तर दिशेस 'छंदस्या' नांवाच्या पांच इष्टका मांडाव्यात. पशू हेच 'छंदस्य' आहेत. यास्तव, छंदोरूप अशा पांच इष्टकांची मांडणी केली असता यजमानापासून दूर गेलेल्या पशूंना अध्वर्यूने पुन्हा स्वस्थानी अर्थात् यजमानाजवळ परत आणल्याप्रमाणे होते.

ही पृथ्वी अग्नीच्या तापाला भ्याली! अग्नीची धगधग तिला सोसवेना! तेव्हा तिच्या विचारदृष्टीला 'अपस्या' नांवाच्या इष्टका आपल्याला अग्नीपासून उत्पन्न होणाऱ्या दाहाचे शमन करण्यास योग्य आहेत असे दिसले आणि तिने अपस्या इष्टकांचे उपधान केले. तेव्हा त्याच्या प्रभावाने अग्नीपासून तिला होणारा दाह शांत झाला. यासाठी, अपस्येष्टकांचे उपधान केल्याने आपल्या यजमानाला अग्नीपासून होणाऱ्या दाहाचा अध्वर्यूने परिहारच केल्याप्रमाणे होते. ज्या यजमानाच्या अग्निचयनात अपस्या इष्टका मांडल्या जातात तो यजमान आणि जो कोणी विद्वान् अध्वर्यू अपस्येष्टकांच्या उपधानाचे महत्त्व जाणतो तो अध्वर्यू ब्राह्मणाला उचित अशा वर्तनाने भरपूर अन्न संपादन करतो. असे स्वत: पृथ्वीच बोललेली आहे. 'अपस्या' संज्ञक इष्टका मांडून झाल्यानंतर 'प्राणभृत्' नांवाच्या इष्टका मांडाव्यात. त्या योगाने गर्भाशयात स्थापन केलेल्या रेताच्या ठिकाणी प्राणांचे स्थापन केल्याप्रमाणे होते. व तसे झाले म्हणजे त्या रेतापासून उत्पन्न होणारा प्रत्येक पशू बोलणे, श्वास घेणे, पाहणे, ऐकणे

इत्यादि व्यापार करण्यास समर्थ होऊन निपजतो.

'अयं पुरो भुवः' इत्यादि दहा मंत्रांनी पूर्व दिशेस दहा प्राणभृत् इष्टका मांडाव्यात. म्हणजे चितिरूपी अग्नीच्या व यजमानाच्या ठिकाणी प्राणादिकांचे धारण केल्यासारखे होते. 'अयं दक्षिणा' इत्यादि मंत्रांनी दक्षिण दिशेस दहा इष्टका मांडाव्यात. म्हणजे चितिरूपी अग्नी व यजमान यांच्या ठिकाणी मनाचे धारण केल्यासारखे होते. 'अयं पश्चात् विश्वव्यचाः' इत्यादि मंत्रांनी पश्चिमेस दहा इष्टका मांडाव्यात. त्या योगाने चितिरूपी अग्नी व यजमान यांच्या ठिकाणी नेत्रेंद्रियाची स्थापना केल्याजोगे होते. आणि 'इदमुत्तरात् सुवः' इत्यादि दहा मंत्रांनी उत्तर बाजूस दहा इष्टका मांडाव्यात. त्या योगाने अग्नी व यजमान यांच्या ठिकाणी कर्णेंद्रियाची धारणा केल्याप्रमाणे होते. आणि 'इययुपरिमितिः' इत्यादि दहा मंत्रांनी मध्य भागावर दहा इष्टका मांडाव्यात. म्हणजे त्यांच्याकडून अध्वर्यूने जणू चितिरूप अग्नी व यजमान यांच्या ठिकाणी वाणीचे धारण केल्यासारखे होते.

अग्निचयनाच्या ठिकाणी दृढता उत्पन्न होण्यासाठी आता सांगितल्याप्रमाणे पांच दिशांच्या ठिकाणी अनुक्रमे दहा दहा 'प्राणभृत्' इष्टका मांडाव्यात.

'प्राणभृत्' इष्टकांची मांडणी करावयाची, ती दिशांच्या वक्र पध्दतीने करावी. म्हणजे नैर्ऋत्य दिशेस उपधानाचा प्रारंभ करून ईशान्य दिशेस उपधान संपवावे. कारण, पशू देखील चालू लागताना आपल्या चार पायांपैकी उजवीकडचा पुढचा पाय प्रथम पुढे टाकून मग डावीकडचा मागचा पाय त्याच्यामागे टाकतात. एवं च, अशाप्रकारे वक्र पध्दतीने प्राणभृत् इष्टकांची मांडणी केली असता चितिरूपी अग्नीच्या स्थिर प्रतिष्ठेला, अर्थात् दृढतेला कारणभूत होते.

पूर्वेस मांडल्या जाणाऱ्या इष्टकांच्या प्रभावाने वसिष्ठ समृध्दतेला प्राप्त झाला. दक्षिण दिशेला मांडल्या जाणाऱ्या इष्टकांच्या अनुग्रहाने भरद्वाज समृध्दी पावला. पश्चिमेस मांडलेल्या प्राणभृत् इष्टकांच्या सामर्थ्याच्या योगाने विश्वामित्राने समृध्दी संपादन केली. उत्तरेस मांडलेल्या इष्टकांच्या प्रसादाने जमदग्नी समृध्द स्थितीचा उपभोक्ता झाला. आणि उर्ध्व दिशेस म्हणजे मध्यभागी मांडलेल्या इष्टकांच्याकडून विश्वकर्म्याने स्वतःची समृध्दी संपादन केली. सारांश, प्राणभृत् इष्टकांच्या ठिकाणी समृध्दी प्राप्त करून देण्याचे असलेले हे सामर्थ्य जो जाणतो तो देखील समृध्दीला प्राप्त होतोच होतो. प्राणभृतांच्या ठिकाणी असणारा

बंधुभाव म्हणजे समुदायाने एकत्र राहण्याचा स्वभाव जो जाणतो तो बंधुमान होतो म्हणजे भावांचे प्रेम संपादन करणारा होतो. प्राणभृत् इष्टका वक्र पध्दतीने मांडण्याची कल्पना जो जाणतो, त्याला कल्पनायोग्य अशी सुस्थिती प्राप्त होते. प्राणभृत् इष्टकांचे पूर्वादि दिशांच्या ठिकाणी असणारे स्थान जो बरोबर जाणतो तो आयतनवान् म्हणजे प्रशस्त असे स्थान संपादन करणारा होतो. व त्या त्या स्थानी त्या त्या प्राणभृत् इष्टकांचे स्थापन करण्याचे मर्म जो जाणतो तो सर्व समाजात प्रतिष्ठेला प्राप्त होतो.

'प्राणभृत्' इष्टकांचे उपधान झाल्यानंतर अध्वर्यूने त्यांच्या बाहेरच्या बाजूने 'संयत्' अशी विशिष्ट संज्ञा असलेल्या 'अपानभृत्' नांवाच्या इष्टका मांडाव्यात. असे केले असता अध्वर्यूने जणू काय चितिरूपी अग्नीच्या ठिकाणी पूर्वी प्राणभृत् इष्टकांच्या उपधानाने स्थापन केलेल्या प्राणांना दृढ केल्यासारखे होते. अपानभृत् इष्टकांच्या मांडणीने प्राणांच्या ठिकाणी दृढता निर्माण होणे हेच त्या 'संयत्' अशी विशिष्ट संज्ञा संपादन करणाऱ्या 'अपानभृत्' इष्टकांचे संयत्व म्हणजे स्वभावगुण होय. शिवाय बाहेर संचार करणाऱ्या प्राणाच्या सन्निध अंत:संचारी अशा अपान संज्ञक प्राणाची स्थापना केल्याचेही अध्वर्यूला श्रेय मिळते. प्राण व अपान हे दोन प्राणवायू एकमेकांशी मिळून संचार करतात हे आपण पाहतोच.

अपनभृत् इष्टकांची मांडणी प्राणभृत् इष्टकांच्या उलट क्रमाने करावी. कारण, प्राण व अपान हे परस्परविरुध्द गतीने संचार करीत असतात. अग्निचयनासंबंधी जे जे म्हणून करावयाचे, ते ते जर नीटनेटके व्यवस्थित केले नाही, तर ते अस्वर्ग्य म्हणजे अग्निचयनकर्त्या यजमानाला स्वर्गप्राप्ती करून देऊ शकत नाही. आणि 'अग्निचयन' करण्यामध्ये यजमानाचा हेतू तर स्वर्गप्राप्ती व्हावी हाच असतो. यास्तव, अग्निचयनाचे उपधानरूप अंग नीटनेटके व व्यवस्थित होऊन ते यजमानाला स्वर्गप्राप्ती करून देण्याला पात्र होण्यासाठी अध्वर्यूने 'संयत्' संज्ञक अपानभृत् इष्टकांचे उपधान करावे.

दीड वर्षाच्या कालाने गणले जाणारे वय, व कृत इत्यादि चार युगे या दोघांनाही 'अय' अशी संज्ञा आहे. 'प्राणभृत्' इष्टका मांडताना 'त्र्यविर्वय: कृतमयानां' इत्यादि मंत्रांश अध्वर्यूने पठण करावा. म्हणजे चितिरूपी अग्नीच्या ठिकाणी व यजमानाच्या ठिकाणी दीड वर्षाने गणले जाणारे वयोविशेष

व कृतादियुगे या दोन प्रकारच्या 'अय' संज्ञक काळविशेषांची अध्वर्यूने धारणा केल्यासारखी होते. 'अपानभृत्' संज्ञक सर्व इष्टका 'वायु' वाचक असलेल्या 'वात' शब्दाने युक्त असलेल्या मंत्रांनी मांडाव्यात. म्हणजे त्या सर्व इष्टका वायूने युक्त अशा होतात व त्यामुळे अंतरिक्षात संचार करणारा हा वायू सर्व दिशांच्या ठिकाणी संचार करतो. (अनुवाक १०).

राजाला उत्तम, मध्यम व कनिष्ठ अशा तीन स्त्रिया असतात. उत्तम म्हणजे जी मुख्य पट्टराणी असते तिला 'महिषी' अशी संज्ञा असून मध्यम स्त्रीला 'वावाता' आणि कनिष्ठ स्त्रीला 'परिवृक्ती' अशी संज्ञा आहे. अश्वमेध यज्ञात जो अश्व मारला जातो, त्याच्या शरीराचे विच्छेदन म्हणजे सुरीने चीरफाड करण्यासाठी, तिघी राजपत्न्यांनी त्याच्या शरीराच्या विशिष्ट भागांच्या ठिकाणी निरनिराळ्या धातूंच्या सुयानी रेषा ओढून खुणा करावयाच्या असतात.

'महिषी' संज्ञक राजपत्नीने सुवर्णाच्या सुयांनी पुढील दोन मंत्रांनी अश्वाच्या गळ्यापासून मुखापर्यंतच्या भागात ठिकठिकाणी रेषा ओढाव्यात.

१ गायत्री, त्रिष्टुप्, जगती, अनुष्टुप्, पंक्ति, बृहती, उष्णिहा व ककुत् ही नांवे धारण करणाऱ्या छंदोदेवता, हे अश्वा, तुझ्या शरीराच्या ठिकाणी सुवर्णाच्या सुयांनी रेषा करोत. २ हे अश्वा, द्विपदा, चतुष्पदा, त्रिपदा, षट्पदा, सछंदा व विच्छन्दा इत्यादि नांवाच्या मंत्राभिमानिनी देवता तुझ्या शरीराच्या ठिकाणी सुवर्णाच्या सुयांनी रेखा करोत.

'वावाता' संज्ञक राजपत्नीने रजताच्या सुयांनी पुढील दोन मंत्र म्हणून मृत अश्वाच्या गळ्यापासून नाभीपर्यंतच्या भागांवर रेषा ओढून खुणा कराव्यात.

३ अत्यंत प्रसिद्ध अशा महानाम्नी हे नांव धारण करणाऱ्या, अत्यंत धनसंपन्न अशा 'धनवती' नांवाच्या देवता, सर्वांना आपआपल्या कार्याची प्रेरणा करणाऱ्या सर्व दिग्देवता, मेघांच्या ठिकाणी प्रादुर्भूत होणाऱ्या विद्युदभिमानिनी देवता आणि मेघगर्जनेच्या अभिमानिनी देवता, हे अश्वा, तुझ्या शरीराच्या ठिकाणी रजतांच्या सुयांनी रेषा काढोत. ४ हे अश्वा, रजत, सुवर्ण व शिसे या तीन प्रकारच्या धातूंपासून बनविलेल्या, लेखनकर्मयोग्य, अन्नप्राप्तीला कारणभूत व नानाप्रकारच्या रेखाकर्मांच्या योगाने उपयुक्त होणाऱ्या सुयांनी रेषा काढण्यात कुशल असलेल्या देवता तुझ्या शरीराच्या ठिकाणी रेषा काढून

विच्छेदनास योग्य अशा खुणा करोत.

'परिवृक्ती' नामक राजपत्नीने पोलादाच्या किंवा शिश्याच्या सुयांनी पुढील दोन मंत्र म्हणून मृत अश्वाच्या नाभीखालील सर्व शरीराच्या ठिकाणी रेषा कराव्या.

५ हे अश्वा, महिषी आदिकरून तिन्ही प्रकारच्या राजपत्न्या आपआपल्या बुध्दीने तुझ्या शरीराची चीरफाड जेथे जेथे करावयाची, तेथे तेथे असणारे केस बाजूस करोत. देवांच्या पत्न्या व दशदिशांचे देवता लोहमय सुयांनी तुझ्या शरीराच्या ठिकाणी रेषा ओढून खुणा करोत. ६ आम्हाला अत्यंत प्रिय अशा हे अश्वमेध यज्ञातील हविर्भागांचे सेवन करणाऱ्या देवहो, जे यज्ञाचे यजन करणारे यजमान तुम्हाला नमस्कार करण्याचे कर्तव्य कधीही न अंतरता बिनचूक करतात, इतकेच नव्हे तर अत्यंत श्रध्देने यज्ञाचे अनुष्ठान करतात, त्या यज्ञकर्त्यांची हविर्द्रव्ये निरनिराळ्या यज्ञामध्ये तुम्ही सेवन करा पुष्कळशा प्रमाणात यव व त्याहून कमी प्रमाणात इतर गहू, राळे इत्यादि धान्यांची लागवड करणारे शेतकरी, त्या त्या धान्यांच्या पिकांच्या अनुक्रमाने त्यांचे पृथक्करण करतात व अमुक धान्य पूर्ण पिकले आहे आणि अमुक धान्य अद्याप अपरिपक्व आहे असे ठरवून त्याप्रमाणे त्या त्या पिकांची कापणी करतात त्याप्रमाणे हे देवहो, तुम्ही देखील तुम्हाला नमस्कार न करणारा नास्तिक कोण, व श्रध्देने तुमचे यजन करणारा यजमान कोण अशा प्रकारे निवड करा आणि श्रध्दाळू असेल त्याच यजमानाने अर्पण केलेल्या हविर्द्रव्याचे तुम्ही सेवन करा. (अनुवाक ११).

१ हे अश्वा, प्रजापती तुझ्या शरीराचे विच्छेदन करतो व त्यानंतर प्रजापतीच तुझ्या अवयवांची निवड करून ते व्यवस्थित ठेवतो. ते अवयव सुरक्षित राखण्याची काळजीही प्रजापतीच घेतो. इतर पशूंच्या प्रमाणे तुला मारण्याचे काम इतर कोणी करीत नसून तुझ्या शरीराचे विच्छेदन करण्यात कुशल असा प्रजापतीच तुला मारण्याचे काम करतो. २ तुला मारण्याचे कामी प्रजापतीला साहाय्य करणारे वसंतादि ऋतू योग्य त्या त्या वेळी तुझ्या शरीराचे विभाग निरनिराळ्या जागी स्थापन करोत. वसंतादि ऋतूंचे अभिमानी देवच संवत्सराचे धारण करून तुझ्या प्राणांचे शमन अनायासे होईल अशा कुशलतेच्या क्रियांनी तुझ्या प्राणांचे शमन करून तुला देवयोग्य

करोत. ३ देवांच्या यज्ञात असणारे अश्विनीकुमारादि सर्व अध्वर्यू शस्त्राने तुझ्या शरीराचे विच्छेदन करोत आणि तुझ्या शरीराचे निरनिराळे अवयव निरनिराळ्या जागी ठेवोत. तुझ्या प्राणघाताला कारणभूत होणारे ते देवांचे अध्वर्यू तुझ्या शरीराच्या निरनिराळ्या भागांत असणारे अवयव त्या त्या शरीरभागाच्या अनुक्रमाने सुरक्षित ठेवोत. व तसे करण्यासाठी जी जी सावधगिरी घ्यावी लागते, ती ती घेवोत. ४ अर्धमास व मास यांच्या अभिमानिनी देवता तुझ्या शरीराचे निरनिराळे भाग छिन्नविच्छिन्न न होता सुरक्षित राहतील अशा प्रकारे तुझ्या शरीराची चीरफाड करोत. अहोरात्राभिमानिनी देवता व सर्व मरुद्गण तुझ्या शरीरातील जे जे अंग छिन्न भिन्न होईल ते ते अंग देवांना रुचिकर होईल असे करोत. ५ हे अश्वा, अंतरिक्षासह पृथ्वी व वायू तुझ्या शरीरातील ज्या ज्या अंगाचे ठिकाणी न्यूनत्व उत्पन्न होईल, ते ते न्यूनत्व परिपूर्ण करोत. नक्षत्रांच्यासह ही द्युलोकदेवता तुझे स्वरूपभूत असे हविर्द्रव्य उत्कृष्ट होईल असे करो. ६ हे अश्वा, तुझे हनन होत असता तुझ्या शरीराच्या निरनिराळ्या भागापासून व त्या त्या भागातील उत्कृष्ट अशा अवयवांपासून तुला सुख होवो. त्याचप्रमाणे निकृष्ट अवयवांपासूनही तुला सुख होवो. इतकेच काय, पण तुझ्या सर्व शरीराला देखील सुख होवो. (अनुवाक १२).

प्रपाठक ३

इष्टकांची विशिष्ट रचना करून मांडण्यात येणारा अग्निचयन किंवा चितिरूप अग्नी हा 'उत्सन्न यज्ञ' आहे. ज्या यज्ञातील काही अंगे विस्मरणाने टाकली जातात, अर्थात् अनुष्ठित होत नाहीत तो 'उत्सन्न यज्ञ' होय. अग्निचयनरूपी यज्ञ हा विस्ताराने अतिशय मोठा आहे. कारण त्यामध्ये अनुष्ठेय अशी अंगे फार मोठ्या संख्येने समाविष्ट झालेली असतात. यामुळे अनुष्ठानकर्त्या याज्ञिकांनी कितीही काळजी घेतली, तरी काही तरी प्रमाद होऊन त्या अंगांपैकी एक अथवा अनेक अंगे उत्सन्न होण्याचा म्हणजे टाकली जाण्याचा संभव होतोच होतो. अर्थात् या अग्निचयनरूप यज्ञाचे कोणते अंग अनुष्ठित झाले, अथवा कोणते अंग अनुष्ठित व्हावयाचे राहिले, हे कोण जाणू शकणार ! जाणू शकणार नाही. आणि असे झाले म्हणजे केल्या जाणाऱ्या यज्ञाचे जे अंग करण्याचे अनुष्ठानकर्ते विसरतील ते अंग नष्टच होण्याचा प्रसंग

ओढवणार ! यास्तव, अशा प्रकारचा उत्सन्नत्वाचा म्हणजे अंगत्यागाचा दोष जो घडणार, त्याचा परिहार व्हावा, म्हणून 'अश्विनौ' देवांना व्यक्त करणाऱ्या मंत्रांनी 'आश्विनी' नांवाच्या इष्टकांचे उपधान करावे. अश्विनौ देव म्हणजे अश्विनीकुमार हे देवांचे वैद्य असल्यामुळे त्यांच्या नांवाने युक्त अशा मंत्रांनी केले जाणारे इष्टकोपधान त्या उभयता अश्विनीकुमारांच्याकडून अग्निचयनरूपी यज्ञाला औषधोपचार करविते. म्हणजे त्या यज्ञाच्या ठिकाणी उत्पन्न होणाऱ्या अंगत्यागरूपी दोषाचा परिहार करविते. यास्तव, 'ध्रुवक्षितिर्ध्रुवयोनिः' इत्यादि पांच मंत्रांनी अनुक्रमे 'आश्विनी' संज्ञक पांच इष्टका मांडाव्यात. यज्ञ हा 'पांक्त' म्हणजे धाना, करंभ, परिवाप, पुरोडाश व आमिक्षा या पांच हविर्द्रव्यांनी युक्त असतो. अर्थात् आश्विनीसंज्ञक पांच इष्टका मांडल्या असता जेवढा म्हणून यज्ञ आहे त्या सर्व यज्ञाला अध्वर्यूने जणू अश्विनीकुमारांच्याकडून औषधोपचार केल्यासारखे होते.

ऋतूंच्या ठिकाणी स्वस्वकार्यक्षमता उत्पन्न व्हावयासाठी आश्विनी इष्टकांच्या नंतर 'सजूर्ऋतुभिः' इत्यादि मंत्रांनी 'ऋतव्या' नामक इष्टकां मांडाव्यात. या इष्टकांची संख्या पांच असावी. कारण, हेमंत व शिशिर हे दोन मिळून एकच ऋतू मानला असता एकंदर ऋतू पांचच होतात. यास्तव पांच ऋतव्या इष्टका मांडल्या असता पांचही ऋतूही स्वस्वकार्यक्षम होतात. या इष्टकांचे पांच मंत्र आरंभी व शेवटी जसे सारख्याच स्वरूपाचे आहेत, त्याचप्रमाणे पांच ऋतूही स्वर कार्यक्षमतेच्या दृष्टीने समानस्वरूप आहेत. मात्र प्रत्येक मंत्राच्या आद्यंताच्या मध्यंतरी एक एक पद वेगळे येत असल्यामुळे ते अंत स्वरूपाच्या दृष्टीने जसे भिन्न भिन्न स्वरूपाचे आहेत त्याचप्रमाणे ऋतूही वसंतादिनाम भेदाने एकमेकांहून भिन्न भिन्न रूपाचे आहेत. 'ऋतव्या' इष्टका मांडल्यानंतर 'प्राणं मे पाहि' इत्यादि मंत्रांनी प्राणभृत् नांवाच्या पांच इष्टका मांडाव्यात असे केल्याने अध्वर्यूने जणू पांचही ऋतूंच्या ठिकाणी प्राणांची स्थापना केल्याप्रमाणे होते व त्यामुळे सर्व ऋतू स्वस्वकार्यक्षम झाले असल्याचे दिसले तरी जीर्ण होत नाहीत म्हणजे त्यांच्यात उणेपणा उत्पन्न होत नाही. इतकेच नव्हे तर अध्वर्यू त्यांच्या ठिकाणी प्राण स्थापन करून त्यांना पुन्हा पुन्हा नव्या जोमाने जणू उत्पन्न करतो. अंतराळात वाहत राहणारा वायू हाच प्राणरूप आहे. म्हणून ऋतव्या इष्टका मांडल्यावर 'प्राणभृत्' इष्टकांचे उपधान केले असता, सर्व ऋतूंच्या ठिकाणी प्राणस्वरूप वायू पुनःपुनः

प्रविष्ट होत राहतो. 'प्राणभृत्' इष्टका मांडल्यानंतर 'अपस्विन्व' इत्यादि मंत्रांनी अपस्या किंवा 'वृष्टिसनि' अशा संज्ञा असलेल्या पांच इष्टका मांडाव्यात. म्हणजे त्यांच्या अभिमानिनी देवता यथाकाली पर्जन्याची वृष्टी करतात. 'वृष्टिसनि' नांवाच्या इष्टका इतर इष्टकांप्रमाणे एकदम एकाच प्रयत्नाने मांडल्यावर एकाच ऋतूत पर्जन्याची वृष्टी होते. यास्तव, पूर्व दिशेस पहिली इष्टका मांडताना ती आपल्या मस्तकाभोवती प्रदक्षिणाकार फिरवावी आणि मग मांडावी. नंतर याच पद्धतीने दक्षिण बाजूची इष्टका मांडावी. अशाच रीतीने, पुढच्या तीन इष्टका मांडाव्यात. असे केल्याने सर्व ऋतूंमध्ये पर्जन्यवृष्टी होते. 'प्राणभृत्' इष्टका मांडल्यानंतर 'वृष्टिसनि' इष्टका मांडल्या असता द्युलोकापासून वायूने प्रेरित केलेली पर्जन्यवृष्टी पृथ्वीवर पडू लागते.

'अप्' शब्दाने युक्त अशा 'अपस्विन्व' इत्यादि मंत्रांनी मांडल्या जाणाऱ्या ज्या इष्टका त्या 'अपस्या' आणि 'वय' या शब्दाने युक्त अशा 'त्र्यविर्वय:' इत्यादि मंत्रांनी मांडल्या जाणाऱ्या ज्या इष्टका त्या 'वयस्या' होत. ज्या यजमानाला पशूंची प्राप्ती होऊ नये असे अध्वर्यूला वाटत असेल, त्याने त्या यजमानाच्या अग्निचयनात 'वयस्या' इष्टका अगोदर मांडून नंतर पूर्वोक्त 'अपस्या' इष्टका मांडाव्यात. म्हणजे त्या यजमानाने बाळगलेले पशू त्याची आज्ञा मानीनातसे होतात, त्याला सोडून जातात व तो पशुसंपत्तिरहित होतो. परंतु, आपला यजमान पशुसंपत्तीने समृध्द व्हावा, असे ज्या यजमानाबद्दल अध्वर्यूला वाटत असेल, त्याने त्या यजमानाच्या अग्निचयनात प्रथम अपस्येष्टकांचे उपधान करून नंतर 'त्र्यविर्वय:' इत्यादि मंत्रांनी 'वयस्या' नांवाच्या इष्टका मांडाव्यात. असे केले असता त्या यजमानाचे पशू त्याची आज्ञा पाळतात व त्याच्याजवळ टिकून राहतात. अर्थात् तो यजमान पशुसंपत्तीने युक्त असा होतो. 'विष्टंभो वय:' इत्यादि चार मंत्रांनी चार वयस्येष्टका पूर्वेस मांडाव्यात. कारण, नेत्रेंद्रियाची चार स्वरूपे असतात. दोन डोळ्यांत दोन शुक्लवर्ण मंडले असतात व दोन कृष्ण वर्णाची मंडळे म्हणजे बुबुळे असतात. दोन्ही नेत्र हे शिरोभागाच्या ठिकाणी असतात. आणि यासाठीच पूर्वोक्त चार मंत्रांपैकी शेवटचा मंत्र 'मूर्ध' शब्दाने युक्त असल्याने त्या इष्टका पक्ष्याकार असलेल्या अग्निचयनाच्या शिरोभागी अर्थात् पूर्व दिशेस मांडल्या जातात. अग्निचयनरूपी पक्ष्याच्या शिरस्थानी मांडल्या जाणाऱ्या त्या चारही इष्टकांना 'मूर्धन्वती' म्हणजे शिरोभागी राहणाऱ्या अशी संज्ञा आहे.

'त्र्यविर्वय:' इत्यादि पांच मंत्रांनी अग्निचयनाच्या दक्षिण श्रोणीच्या ठिकाणी पांच व 'पष्ठवाद्वय:' इत्यादि पांच मंत्रांनी उत्तर श्रोणीच्या ठिकाणी पांच इष्टका मांडाव्यात. ज्या अर्थी पशू कंबरेच्या बाजूस उंच असतो व पुढच्या भागी सखल असतो, त्या अर्थी अग्निचयनरूपी पक्ष्याच्या श्रोणीचा भाग अधिक इष्टकांनी उंच व पुढचा भाग कमी इष्टकांच्या योगाने सखल असा राखणेच युक्त होत असते. 'बस्तो वय:' इत्यादि मंत्रांनी अग्निचयनाच्या दक्षिणांसाच्या म्हणजे उजवीकडील खांद्याच्या ठिकाणी आणि 'वृष्णिर्वय:' इत्यादि मंत्रांनी उत्तरांसाच्या म्हणजे डाव्या खांद्यांच्या ठिकाणी इष्टका मांडाव्यात. असे केल्याने अग्निचयनरूपी पक्ष्याच्या दोन्ही असांचे संपादन केल्यासारखे होते. 'व्याघ्रो वय:' इत्यादि मंत्रांनी उजव्या पंखाच्या ठिकाणी व 'सिंहो वय:' इत्यादि मंत्रांनी डाव्या पंखाच्या ठिकाणी इष्टका मांडाव्यात. असे केल्याच्या योगाने अध्वर्यूने जणू काय अग्निचयनरूपी पक्ष्याच्या दोन्ही पंखांच्या ठिकाणी वीर्य स्थापन केल्यासारखे होते. 'पुरुषो वय:' या मंत्राने अग्निचयनाच्या मध्यभागी इष्टका मांडावी. असे केल्याच्या योगाने सर्व पशूंचा (यजमानरूपी) पुरुष अधिपती होतो. (अनुवाक १).

इंद्र व अग्नी या दोघा देवांनी अनुक्रमे अंतरिक्ष व पृथ्वी हे दोन लोक धारण केले आहेत. त्या अर्थी अग्निचयनाच्या खाली व वर असलेल्या स्थानांचे धारण व्हावयासाठी 'इंद्राग्नी अव्यथमानां' या मंत्राने स्वयमातृण्णेचे म्हणजे ज्याच्या ठिकाणी आपोआप निर्माण झालेली सात छिद्रे आहेत, अशा गुनखडीच्या खड्याचे उपधान करावे. कारण, अग्निचयनामध्ये मांडला जाणारा हा मधला थर अंतरिक्षाप्रमाणे अधांत्री असतो. त्याला जमिनीचा आधार नसतो. म्हणून 'इंद्राग्नी अव्यथमानां' हा मंत्र स्वयमातृण्णेचे उपधान करताना म्हणावा. कारण देवांमध्ये इंद्र व अग्नी हे दोन देव बलधारक आहेत. यास्तव, पूर्वोक्त मंत्राने स्वयमातृण्णेचे उपधान केल्याच्या योगाने इंद्र व अग्नी या दोन देवांच्या बलाच्या आधारावर अध्वर्यूने जणू अग्निचयनातील मधला थर मांडल्यासारखा होतो. 'स्वयमातृण्णा' ही अंतरिक्षसदृशच आहे. यास्तव, तिचे उपधान केले असता अंतरिक्षाच्या ठिकाणी अंतरिक्षाचेच जणू स्थापन केल्यासारखे होते. उपधान करण्यापूर्वी स्वयमातृण्णा अश्वाला हुंगावयास द्यावी. म्हणजे तो तिच्या ठिकाणी प्राण स्थापन करतो शिवाय अश्वाची उत्पत्ती प्रजापतीपासून

झाली असल्यामुळे तो जणू प्रजापतिरूपच आहे. यास्तव, अश्वाकडून स्वयमातृण्णा हुंगविल्यानंतर मांडली म्हणजे अध्वर्यूने जणू प्रजापतीकडून अग्निचयनाची मांडणी केल्यासारखे होते. स्वयमातृण्णा ही स्वभावतःच आतृण्ण म्हणजे छिद्रयुक्त असते. हिच्या उपधानाच्या योगाने अग्निचयनकर्त्या यजमानाचे प्राण त्याच्या अंतकाली अडखळून न राहता अनायासे निघून जातील. शिवाय, स्वयमातृण्णेच्या छिद्रांच्या द्वारा स्वर्गलोकही तो पाहू शकेल.

पूर्वी एकेकाळी देव पृथ्वीवरच राहत होते. नंतर केव्हातरी स्वर्गलोकी राहावयास गेले. देव स्वर्गात निघून गेल्यावर पृथ्वीवरच्या दिशा रक्षकाच्या अभावी व्यथित झाल्या. सर्व दिशांच्या ठिकाणी असलेल्या प्राण्यांना अस्वास्थ उत्पन्न झाले. दिशांची झालेली ही स्थिती स्वर्गस्थ देवांनी जाणली आणि दिशांची नीट रीतीने धारणा कशी होईल याविषयी त्यांनी विचार केला. तेव्हा दिश्या या नांवाच्या इष्टका दिशांचे धारण करण्यास योग्य आहेत, असे त्यांना आढळून आले व त्याप्रमाणे 'देवांनी' भूमीच्या ठिकाणी 'दिश्या' नामक उदकांचे उपधान केले आणि त्या इष्टकांच्या द्वारा त्यांनी भूमिगत दिशांची नीट रीतीने धारणा केली. यास्तव, दिश्येष्टकांचे उपधान अध्वर्यूने करावे. त्या योगाने यजमानाच्या अग्निचयनाभोवती असलेल्या दिशांचे धारण केले जाण्याला तो कारणभूत होतो.

अग्निचयनाचा मधला म्हणजे तिसरा थर मांडताना 'प्राणभृत्' नांवाच्या दहा इष्टका पूर्व बाजूस मांडाव्यात. पुरुषाच्या शरीराचे ठिकाणी शिरोभागी सात, अधोभागी दोन व नाभिस्थानी एक अशी दहा छिद्रे असून त्यांच्या ठिकाणी दहा प्राण राहत असतात. प्राङ्‌मुख उभा राहिलेल्या पुरुषाचे श्वासोच्छ्वासादि मुख्य प्राण पुढच्या बाजूसच प्रसरण पावत असतात. यास्तव, 'आयुर्मे पाहि' इत्यादि मंत्रांनी पूर्व दिशेस दहा प्राणभृत् इष्टका मांडल्या असता अग्निचयनरूपी पुरुषाचे प्राण पूर्व दिशेस संचरणारे होतात. 'ज्योति' शब्दाने युक्त अशा 'ज्योतिर्मे यच्छ' या मंत्राने शेवटची दहावी इष्टका मांडावी. कारण, सर्व इंद्रियगत प्राणांमध्ये शब्दार्थप्रकाशक अशी वाणी हीच उत्तम किंवा श्रेष्ठ असते. सर्व छंदांमध्ये दशाक्षरी चरणाने निष्पन्न होणारा 'विराट्' हा छंद ज्योतिरूप आहे. अर्थात् चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने विराट् छंदाशी स्वरूपसाम्य असलेल्या दहा प्राणभृत् इष्टका पूर्व बाजूस मांडून अध्वर्यू जणू काय अग्निचयनाच्या

पूर्व बाजूस ज्योतीचे स्थापन करतो. सृष्टिकर्त्या परमेश्वराने ज्योति:स्वरूप असे सूर्यमंडल प्रात:काली पूर्व दिशेस निर्माण होण्याची योजना केली आहे. म्हणूनच प्रात:काळी संध्योपासनेच्या वेळी आपण ज्योति:स्वरूप अशा सूर्यमंडळाची उपासना करीत असतो.

पशूंच्यावर आधिपत्य कोणी करावे, याविषयी गायत्र्यादि छंदांच्या अभिमानिनी देवता यांच्यामध्ये मत्सर उत्पन्न झाला. तेव्हा, अमुक एक मर्यादेपासून अमुक मर्यादेपर्यंत सर्वांच्या अगोदर जी धावत जाऊन पोचेल तिने सर्व पशू आपल्या स्वाधीन करून घ्यावेत, अशा प्रकारची 'पैज' त्यांनी एकमताने ठरविली. प्रत्येकीला असे वाटे की, मी सर्वांच्या अगोदर ठराविक मर्यादेपर्यंत धावेन व पैज जिंकून पशूंचे स्वामित्व मिळवीन. परंतु, त्या सर्व छंदोभिमानिनी देवतांपैकी 'बृहती' छंदाच्या अभिमानिनी देवतेने पैज जिंकली व पशूंचे आधिपत्य मिळविले. तेव्हापासून सर्व पशू हे 'बार्हत' अर्थात् बृहती छंदाच्या मालकीचे म्हणून प्रसिद्ध झाले. सारांश, छंदांमध्ये बृहती छंदाला जसे प्राशस्त्य आहे तसेच इष्टकांमध्ये 'बृहती' नामक इष्टकांना प्राशस्त्य आहे असे समजावे.

'मास' या अर्थाचे निदर्शक अशा 'मा' या पदाने प्रारंभ होणाऱ्या 'मा छंद:' इत्यादि बारा मंत्रांनी बारा इष्टका दक्षिण दिशेस मांडाव्यात. कारण, चैत्रादि मास हे सूर्यमंडलाच्या अनुरोधाने दक्षिण दिशेपासून प्रदक्षिणाकार फिरत असतात. पृथ्वी ही सर्व जगाची प्रतिष्ठा म्हणजे आधार आहे. यास्तव, अग्निचयनालाही प्रतिष्ठा किंवा स्थैर्य प्राप्त होण्यासाठी 'पृथिवी छंद:' इत्यादि मंत्रांनी पश्चिम बाजूस बारा इष्टका मांडाव्यांत. अग्नी हा बलरूपच आहे. यास्तव, 'अग्निर्देवता' इत्यादि मंत्रांनी उत्तर बाजूस बारा इष्टका मांडाव्यात असे केल्याने अध्वर्यूने जणू काय अग्निचयनाच्या उत्तर बाजूस बलरूप अशा अग्नीचेच स्थापन केल्यासारखे होते. शक्तिशाली अशी अग्निदेवता उत्तरेस निवास करीत असल्यामुळे तीर्थाटणास किंवा इतर कार्याराठी निघताना उत्तराभिमुख होऊन जो प्रयाण करतो तो अंतकाली परलोकावर जय मिळवितो. अर्थात् परलोकाला प्राप्त होतो. याप्रमाणे तीन दिशांना मांडलेल्या इष्टकांची संख्या छत्तीस होते. बृहती छंदाची अक्षरे छत्तीसच असतात व पशू हे 'बार्हत' म्हणजे बृहती छंदाधीन आहेत. बृहती छंदाने छंदांचे स्वाराज्य मिळविले आहे. यास्तव, ज्या यजमानाच्या अग्निचयनात बृहती छंदाशी स्वरूपसाम्य असल्यामुळे 'बृहती' संज्ञेला प्राप्त झालेल्या पूर्वोक्त

इष्टकांचे उपधान केले जाते, तो स्वाराज्याला प्राप्त होतो. 'वालखिल्या' संज्ञक सात इष्टका पूर्वेस मांडाव्यात व सात इष्टका पश्चिमेस मांडाव्यात पुरुषाच्या शिरोभागाचे ठिकाणी असणाऱ्या सात छिद्रांच्या ठिकाणी सात प्राण राहत असतात व शरीराच्या अधोभागी दोन असतात. सात वालखिल्येष्टकांचा समुदाय हा शिरस्थानीय सप्तप्राणांच्या समान होय. आणि वालखिल्येष्टकांची मांडली जाणारी दोन सप्तके ही पुरुषशरीराच्या अधोभागी असणाऱ्या दोन छिद्रात राहणाऱ्या दोन प्राणांच्या समान होत. यास्तव, अशा प्रकारे केलेले वालखिल्येष्टकांचे उपधान यजमानाच्या सर्व प्राणांच्या ठिकाणी वीर्य प्राप्त होण्याला कारणभूत होते. वालखिल्येष्टकांचे मंत्र प्रारंभी वालखिल्य मुनींनी दृष्ट केले असल्यामुळे त्या मंत्रांनी मांडल्या जाणाऱ्या इष्टकांनाही 'वालखिल्या' ही संज्ञा प्राप्त झाली आहे. अध्वर्यूने 'मूर्धाऽसि राट्' इत्यादि पूर्वेस व 'यंत्री राट्' इत्यादि मंत्रांनी पश्चिमेस सात सात इष्टका मांडल्या म्हणजे त्याने जणू काय आपल्या यजमानाच्या ठिकाणी सर्व प्राणांचे उत्कृष्ट रीतीने धारण केल्याप्रमाणे होते. (अनुवाक २).

देवांची बरोबरी करण्याच्या इच्छेने म्हणजे देव जे फल मिळवितील ते मिळविण्याच्या इच्छेने देव जसे यज्ञानुष्ठान करतील तसेच आपणही करावे असे असुरांनी ठरविले. देव अनुष्ठान कसे करतात हे पाहावयासाठी त्यांनी आपल्यापैकी एक जण गुप्त रूपाने देवांच्या सान्निध्यात ठेवला होता. देव यज्ञामध्ये जे जे अंग करीत ते पाहून, तो असुरांना कळवी व त्याप्रमाणे असुर त्या त्या यज्ञांगाचे अनुष्ठान करीत. लौकरच असुरांचा हा कावा देवांच्या लक्षात आला. तेव्हा देवांनी असुरांना फसविण्यासाठी काय युक्ती करावी याचा विचार केला. तेव्हा 'अक्ष्णयास्तोमीया' नांवाच्या इष्टका असुरांच्या फसवणुकीस उपयोगी पडतील असे त्यांना आढळून आले. मग त्यांनी त्या इष्टकांची अक्ष्ण गतीने म्हणजे वेड्यावाकड्या रीतीने व अननुक्रमाने मांडणी केली. मंत्रांचा मूळचा अनुक्रम सोडून निराळ्याच क्रमाने त्यांनी इष्टका मांडल्या 'भांतः पंचदशः' हा मंत्र मुळात दुसरा असता त्या मंत्राने देवांनी चौथी इष्टका मांडली.'व्योम सप्तदशः' ह्या क्रमाने तिसऱ्या असलेल्या मंत्राने त्यांनी दुसरी इष्टका मांडली. अशा प्रकारे क्रमात फरक करून त्यांनी वेडयावाकड्या क्रमाने इष्टकांची मांडणी केली. त्यामुळे असुरांनी अनुष्ठानावर नजर ठेवण्यासाठी ठेवलेला

गुप्त हेर फसला. देवांनी मांडलेली वक्र पद्धती त्याच्या नीट ध्यानात आली नाही. व त्याने बातमी दिली त्याप्रमाणे असुरांनी इष्टकांची मांडणी केली. परंतु त्यामुळे ते फळनिष्पत्तीच्या दृष्टीने देवांचे अनुगामी होऊ शकले नाहीत. त्यांचा पराभव झाला व देव विजयी झाले. यासाठी अग्निचयन करणाऱ्या यजमानाने देवांचे अनुकरण करून, मंत्र म्हणावा दुसरा व इष्टका मांडावी चौथी. अशा वक्र पध्दतीने इष्टकांची मांडणी केल्यास ती त्याच्या शत्रूंचा पराभव करण्यास कारणभूत होते. तो स्वत: विजयी होतो व त्याचा शत्रू पराभव पावतो. स्तोमवाचक शब्दाने युक्त अशा मंत्रांनी व वक्रत्वाने उपधान करण्यात येत असल्यामुळे या इष्टकांना 'अक्ष्णयास्तोमीया' अशी संज्ञा प्राप्त झाली आहे.

'आशुस्त्रिवृत्' या मंत्राने पूर्व दिशेस इष्टका मांडावी. कारण, त्रिवृत्छंद हा पहिलाच छंद असल्यामुळे तो जणू यज्ञाचे मुखच आहे. यास्तव, ह्या मंत्राने पूर्वेस इष्टका मांडली असता तो त्रिवृत्स्तोम पूर्व दिशेस यज्ञाच्या मुखाचा प्रसार करतो. 'व्योम सप्तदश:' या मंत्राने दक्षिण दिशेस इष्टका मांडावी. कारण, आकाशासारख्या विस्तीर्ण क्षेत्रात धान्य पेरले जात असल्यामुळे अन्नाला 'व्योम' असे नांव आहे. सप्तदश स्तोम हा अन्न संपादन करणाऱ्या वैश्यांच्यासह प्रजापतीच्या शरीरातील मध्यभागापासून उत्पन्न झाला असल्यामुळे तो अन्नरूप आहे. यास्तव, सप्तदशस्तोमयुक्त अशा मंत्राने दक्षिणदिशेस इष्टकोपधान केले असता, अध्वर्यूने जणू काय दक्षिणदिशेस अन्नाचेच उपधान केल्याप्रमाणे होते. भोजन करताना लोक दक्षिण म्हणजे उजव्या हातानेच अन्न भक्षण करीत असतात. म्हणून पूर्वोक्त मंत्राने दक्षिणदिशेस इष्टकेचे उपधान करणे युक्त आहे. 'धरुण एकविंश:' या मंत्राने पश्चिमेस इष्टका मांडावी. एकविंश स्तोम प्रतिष्ठारूप आहे. यास्तव, त्या स्तोमाचा व्यंजक असलेल्या मंत्राने केलेले इष्टकोपधान यजमानाला प्रतिष्ठा प्राप्त होण्याला कारणभूत होते. 'भान्त: पंचदश:' ह्या मंत्राने उत्तरदिशेस इष्टका मांडावी. 'भांत' म्हणजे भासमान होणे हे कार्य 'ओज' करीत असते. म्हणून 'भांत' हा शब्द ओजाचा वाचक आहे. ओज म्हणजे बल. पंचदशस्तोम हा बलोत्पादक असल्यामुळे ओजोरूप आहे. यास्तव, पूर्वोक्त मंत्राने उत्तर दिशेस इष्टकोपधान केले असता उत्तरदिशेस ओजाचेच जणू स्थापन केल्यासारखे होते. आणि म्हणूनच ग्रामांतर करताना जो कोणी उत्तराभिमुख होऊन प्रयाण करतो, तो आपल्या इच्छित कार्यात विजय संपादन करतो. 'प्रतूर्तिरष्टादश:' या मंत्राने पूर्वदिशेस इष्टका मांडावी.

अष्टादशस्तोमामध्ये नऊ या संख्येने निष्पन्न होणाऱ्या दोन 'त्रिवृत्' स्तोमांचा समावेश झालेला असतो. यास्तव, पूर्वोक्त प्रकाराने उपधान केले असता, अध्वर्यूने जणू काय यज्ञमुखाच्या ठिकाणी दोन त्रिवृत् स्तोमांचाच प्रसार केल्याप्रमाणे होते. 'अभिवर्तः सविंशः' या मंत्राने दक्षिणेस इष्टका मांडावी. अन्नप्राप्तीचे साधन असल्यामुळे 'अभिवर्त' हे साम अन्नस्वरूप आहे व हे साम गाताना 'विंश' या नांवाच्या स्तोमाचा उपयोग केला जात असल्यामुळे तो स्तोमही अन्नरूप आहे. अध्वूर्यने पूर्वोक्त मंत्राने उपधान केले असता, त्याने जणू उत्तरदिशेस अन्नाचीच स्थापना केल्यासारखे होते. भोजन करणारे लोक दक्षिण हस्तानेच अन्न भक्षण करीत असतात. हेही एक अन्नस्वरूप अशा मंत्राने दक्षिणेस इष्टकोपधान करण्याचे कारण आहे. 'वर्चो द्वाविंशः' या मंत्राने पश्चिमेस इष्टका मांडावी. दहाअक्षरीचरणात्मक दोन विराट् छंदांचा आणि स्थिरतेला कारणभूत अशा दोन पायांप्रमाणे आणखी दोन स्तोमांचा समावेश झालेला असतो. यास्तव, पूर्वोक्त मंत्राने इष्टकोपधान केले असता. विराट्छंदाशी संबध्द असलेल्या अन्नाद्यत्वाचे ठिकाणी यजमान क्रमाने प्रतिष्ठित होतो. म्हणजे त्याला भरपूर अन्न व ते सेवन करण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. 'तपो नवदशः' ह्या मंत्राने उत्तरेस इष्टका मांडावी. नवदशस्तोम हा तपोरूप आहे. ह्या मंत्राने उपधान केले जाते, म्हणूनच प्राङ्‌मुख उभा असलेल्या माणसाच्या दोन हातांपैकी उत्तरेस असलेला अन्नसेवनाचे कार्य न करणारा डावा हात अधिक तपस्वी असतो. 'योनिश्चतुर्विंशः' ह्या मंत्राने पूर्वदिशेस इष्टका मांडावी. गायत्री ही चोवीसअक्षरी आहे. अर्थात् स्तोम हा गायत्रीछंदरूप आहे. गायत्रीछंद हे यज्ञाचे मुख आहे. यास्तव चतुर्विंशस्तोमयुक्त मंत्राने इष्टका मांडली असता अध्वर्यूने यज्ञाचे मुखच जणू पूर्वदिशेस प्रसृत केल्यासारखे होते. 'गर्भाः पंचविंशः' ह्या मंत्राने दक्षिणदिशेस इष्टकेचे उपधान करावे. गर्भ हे अन्नाचे कार्य असल्याने गर्भ हे अन्नरूपच असतात. पंचविशस्तोम हा अन्नप्रद असल्यामुळे तोही अन्नरूप आहे. शिवाय, अन्नाचे सेवन, भोजन करणारा दक्षिण हस्तानेच करीत असतो. यास्तव पूर्वोक्त मंत्राने दक्षिण दिशेस इष्टका मांडावी हे योग्य आहे. 'ओजस्त्रिणवः' या मंत्राने पश्चिमेस इष्टका मांडावी. 'त्रिणव' स्तोम हा तीन या संख्येच्या विभागाने युक्त असल्यामुळे पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु हे तिन्ही लोक 'त्रिणव' रूपच आहेत. म्हणून त्रिणवसोमयुक्त मंत्राने इष्टका मांडली असता यजमान तिन्ही लोकांमध्ये प्रतिष्ठेला प्राप्त होतो.

'संभरणस्त्रयोविंश:' या मंत्राने उत्तरेस इष्टका मांडावी. संभरणीय म्हणजे उत्तम रीतीने भरले जाण्यास योग्य असणारे भिक्षापात्र हे भिक्षाटण करणारा उत्तरहस्ताने म्हणजे डाव्या हाताने उचलून धरीत असतो. 'त्रयोविंश स्तोम' हा संभरणीय अशा भिक्षापात्रासारखा आहे. आणि ज्या अर्थी भिक्षा मागणाऱ्या मनुष्याच्या दोन्ही हातांमध्ये डावा हात भिक्षापात्र धारण करण्यास अधिक समर्थ असतो, त्या अर्थी पूर्वोक्त मंत्राने उत्तरदिशेस इष्टकोपधान करणे योग्यच असते. 'क्रतुरेकत्रिंश:' या मंत्राने पूर्वदिशेस इष्टका मांडावी. मंत्राने निष्पाद्य होणारा क्रतू हा वाग्रूप असतो व वाणी ही यज्ञाचे मुख आहे. अर्थात् या मंत्राने इष्टका मांडली असता अध्वर्यूने जणू काय पूर्वदिशेस यज्ञाचे मुख वळविल्यासारखे होते. 'ब्रध्नस्य विष्टपं चतुस्त्रिंश:' ह्या मंत्राने दक्षिण दिशेस इष्टकेचे उपधान करावे. द्युलोकात तळपणाऱ्या आदित्याचे ब्रध्न हे नांव आहे. व त्याच्या निवासस्थानास विष्टप असे म्हणतात. तथापि, अभेदत्वाने आदित्यालाच त्याचे निवासस्थान असे श्रुतीने म्हटले आहे. चतुस्त्रिंश स्तोम हा 'ब्रध्नस्य विष्टपम्' म्हणजे आदित्यरूप आहे. ब्रह्मवर्चस् म्हणजे वेदोक्त असे होमपूजादि कर्म होय. ब्रह्मवर्चसाचे धारण म्हणजे आचरण दक्षिण म्हणजे उजव्या हातानेच केले जाते. एवं च, मनुष्याच्या शरीराचा दक्षिण, अर्थात् उजवीकडील भागच अधिकत्वाने ब्रह्मवर्चसयुक्त असतो. 'प्रतिष्ठा त्रयस्त्रिंश:' या मंत्राने पश्चिमेस इष्टका मांडावी. म्हणजे त्या योगाने यजमान प्रतिष्ठेला प्राप्त होतो. 'नाक: षट्‌त्रिंश:' या मंत्राने उत्तर बाजूस इष्टकेचे उपधान करावे. 'नाक' म्हणजे दु:खरहित असा स्वर्गलोक आहे. यास्तव स्वर्गलोकयुक्त अशा मंत्राने उत्तरेस उपधान करणारा अध्वर्यू यजमानाला स्वर्गलोकाची प्राप्ती करून देतो. (अनुवाक ३).

'अग्नेर्भागोऽसि' या मंत्राने पूर्वेस इष्टका मांडावी. अग्नीचे स्थापन प्रथम केल्यानंतरच यज्ञाचा आरंभ होत असल्यामुळे अग्नी हा यज्ञाचे मुख आहे. प्रथम 'दीक्षा' ग्रहण केल्यावर सोमयागाचा उपक्रम होत असल्यामुळे 'दीक्षा' ही यज्ञाचे मुख आहे. आर्त्विज्य करणे हे ब्राह्मणाचे कर्तव्य असल्यामुळे 'ब्राह्मण' हा यज्ञाचे मुख आहे. आणि सर्व स्तोत्रांमध्ये प्रथम गाइल्या जाणाऱ्या 'बहिष्पवमान' स्तोमात 'त्रिवृत्' स्तोमाचा उपयोग केला जात असल्याने 'त्रिवृत्' स्तोम हा देखील यज्ञाचे मुख आहे. यास्तव, 'अग्नेर्भागोऽसि' या मंत्राने पूर्वदिशेस इष्टकोपधान केले असता सर्व प्रकारच्या यज्ञमुखांचा पूर्व दिशेस प्रसार केल्यासारखे होते.

'नृचक्षसां भागोऽसि' या मंत्राने दक्षिणदिशेस इष्टका मांडावी. वेदवाक्यांचा अर्थ व्यक्त करून सांगणारे ते 'नृचक्षस' होत. अर्थात् वेदशास्त्रपारंगत अशा विद्वानांना 'श्रुश्रुवांस' अशी संज्ञा आहे. सृष्टिकर्ता धाता म्हणजे ब्रह्मदेव हा अन्नाचा उत्पादक असल्यामुळे तो अन्नरूप असून जन्मास आलेल्या यजमानासाठी अन्न संपादन करतो. आणि म्हणूनच तो जन्मास आल्यापासून अन्न सेवन करीत असतो. प्रस्तुत मंत्रात 'जनित्रं स्पृतं सप्तदश: स्तोम:' असा अंश उच्चारला जात असतो. या अंशातील जनित्र हा शब्द अन्नाचा वाचक असून 'स्पृत' हे त्या अन्नाचे विशेषण आहे. स्पृत म्हणजे प्रीतिकर. अर्थात् प्रीतीला कारणभूत होणारे अन्न असा त्या दोन्ही शब्दांचा फलितार्थ आहे. सारांश, जनित्र म्हणजे अन्न असून अन्नप्राप्तीला कारणभूत होणारा 'सप्तदश स्तोम' देखील अन्नरूपच आहे. यास्तव, पूर्वोक्त मंत्राने इष्टकोपधान केले असता दक्षिणदिशेस अन्नाचेच जणू अध्वर्यूने स्थापन केल्यासारखे होते. शिवाय भोजनास बसलेला माणूस दक्षिणहस्तानेच अन्न सेवन करतो, हेही कारण पूर्वोक्त मंत्राने दक्षिण दिशेस उपधान करण्यात आहे.

'मित्रस्य भागोऽसि' ह्या मंत्राने पश्चिमेस इष्टका मांडावी. 'मित्र' म्हणजे सूर्य हा प्राणरूप असून 'वरुण' हा अपानरूप आहे. अर्थात् या मंत्राने इष्टकेचे उपधान करून अध्वर्यू जणू काय यजमानाच्या ठिकाणी प्राण व अपान यांचे व्यवस्थितपणे धारण करतो. 'दिवो वृष्टिर्वाता: स्पृता एकविंश: स्तोम:' असा एक भाग या मंत्रात उच्चारला जात असतो. एकविंश स्तोम हा प्रतिष्ठा प्राप्त करून देणारा आहे. यास्तव, यजमानाला प्रतिष्ठा प्राप्त होण्यासाठी हा मंत्रांश पठित करून इष्टका मांडणे योग्यच आहे. 'इंद्रस्य भागोऽसि' ह्या मंत्राने उत्तरदिशेस इष्टका मांडावी इंद्र, विष्णु, क्षत्र म्हणजे अशक्तांचे संरक्षण करण्याची मनोवृत्ती व पंचदशस्तोम ही सर्व 'ओज' म्हणजे बलरूप आहेत. यास्तव, या मंत्राने उत्तरदिशेस इष्टका मांडून अध्वर्यू जणू काय अग्निचयनाच्या उत्तरदिशेस बलाचीच स्थापना करतो. आणि याचप्रमाणे उत्तरदिशेस मुख करून ग्रामांतरास जाणारा प्रवासी इच्छित कार्यात जय मिळवितो. 'वसूनां भागोऽसि' ह्या मंत्राने पूर्व दिशेस इष्टका मांडावी. आठ वसू, अकरा रुद्र व चतुर्विंशस्तोम हे यज्ञाचे मुख आहेत. यास्तव, या मंत्राने पूर्वेस इष्टकोपधान केले असता पूर्वदिशेस यज्ञाचे मुख प्रसारित केल्यासारखे होते. 'आदित्यानां भागोऽसि' या मंत्राने दक्षिण दिशेस इष्टकेचे उपधान करावे.

पर्जन्यवृष्टिद्वारा 'आदित्य' हे अन्न उत्पन्न करीत असल्यामुळे ते अन्नरूप आहेत. 'मरुत्' हे वैश्य असून अन्नाचे संपादन करीत असतात, म्हणून तेही अन्नरूप आहेत. 'गर्भ' हे अन्नाचेच कार्य असल्यामुळे 'गर्भ' हे अन्नरूप असून शास्त्रसिद्ध अशा अन्ननिष्पत्तीला कारण होणारा 'पंचदश' स्तोम हा देखील अन्नरूपच आहे. यास्तव, ह्या मंत्राने इष्टकोपधान केले असता दक्षिण दिशेस अन्न स्थापन केल्यासारखे होते व त्यामुळेच अन्न सेवन करणारा मनुष्य दक्षिण हस्ताने अन्नसेवन करण्यास प्रवृत्त होतो. 'अदित्यै भागोऽसि' ह्या मंत्राने पश्चिमेस इष्टका मांडावी. प्रतिष्ठा म्हणजे सुखाने राहता येणे. 'अदिती' देवता प्रतिष्ठेला कारणभूत असल्यामुळे ती प्रतिष्ठारूप आहे. पोषण करण्यास कारण होणारा 'पूषा' देव हाही 'प्रतिष्ठा'रूप असून शास्त्रसिध्द अशा प्रतिष्ठेची प्राप्ती करून देणारा 'त्रिणव' स्तोमही प्रतिष्ठारूप आहे. यास्तव यजमानाला प्रतिष्ठा प्राप्त होण्यासाठी या मंत्राने पश्चिमेस इष्टका मांडणे युक्त आहे. 'देवस्य सवितुर्भागोऽसि' हा मंत्र म्हणून इष्टका मांडावी. ब्राह्मणांचे 'उपास्य' दैवत असणारा सविता देव हा 'ब्रह्म' रूप आहे. ब्राह्मण जातीचा अभिमानी असल्यामुळे 'बृहस्पती' हा ब्रह्मरूप असून 'चतुष्टोम' नांवाचा स्तोमही शास्त्रदृष्ट्या ब्रह्मरूप आहे. सारांश, पूर्वोक्त मंत्राने उत्तरेस इष्टका मांडून अध्वर्यू जणू काय उत्तरदिशेस ब्रह्मवर्चसाचीच स्थापना करतो. आणि म्हणूनच अग्निचयनाचाही उत्तरार्ध ब्रम्हवर्चसतर म्हणजे अधिकतेने ब्रह्मवर्चससंपन्न होतो. 'सवितृ' शब्दाने युक्त अशा मंत्राने उत्तरदिशेस मांडली जाणारी ही इष्टका सावित्रवती म्हणजे सवितृदेवतात्मक होत असल्यामुळे ती अभीष्टसिध्दिरूपी फलाला प्रसवणारी होते. आणि म्हणूनच ब्राह्मणांना यज्ञभिक्षादि रूपाने प्राप्त होणाऱ्या धनाची खाणच जणू उत्तरदिशेस प्रसृत झाली आहे. यज्ञभिक्षा मागावयाची असल्यास उत्तरदिशेस मागावी अशी शास्त्राची आज्ञा आहे. व त्या दिशेस शुद्ध आचरणाचे ब्राह्मण राहत असल्याने प्रतिग्रह करण्यासही तीच दिशा प्रशस्त आहे. 'धर्त्रश्चतुष्टिमः' ह्या मंत्राने पूर्व दिशेस इष्टका मांडावी. 'धर्त्र' म्हणजे धारण करणारा 'अग्निष्टोम' यज्ञ होय. 'अग्निष्टोम' हा यज्ञाचे मुख आहे. अग्निष्टोमयज्ञ 'चतुष्टोम' नामक स्तोमाने अनुष्ठित केला जात असल्याने 'चतुष्टोम' स्तोम हा देखील यज्ञाचे मुखच आहे. यास्तव, पूर्वोक्त मंत्राने पूर्वेस इष्टकोपधान केले असता अध्वर्यूने जणू काय यज्ञाचे मुखच पूर्वेकडे वळविल्याप्रमाणे होते. 'यावानां भागोऽसि' या मंत्राने दक्षिणेस इष्टका मांडावी. 'याव' हा शब्द चैत्रादिमासांचा व 'अयाव'

हा शब्द अर्धमासांचा वाचक आहे. आदित्य हा दक्षिणदिशेपासून प्रारंभ करून पृथ्वीच्या गोलाभोवती फिरत असतो व त्याच्यामुळेच निष्पन्न होणारे चैत्रादिमासही दक्षिणदिशेपासून गोलाकार फिरत असतात. अन्ननिष्पादक असे धान्य कालरूपाने असणाऱ्या चैत्रादि मासांच्या अनुरोधाने पिकत असल्याने मास हे अन्नरूप असून अन्नसेवन करणाऱ्या प्रजाही अन्नरूपच होत. पूर्वोक्त मंत्राने दक्षिणदिशेस इष्टका मांडल्याच्या योगाने अध्वर्यू जणू काय दक्षिणदिशेस अन्नाचेच स्थापन करतो. आणि म्हणूनच अन्नसेवन करणारा मनुष्य दक्षिण हस्ताने अन्न सेवन करीत असतो. 'ऋभूणां भागोऽसि' या मंत्राने पश्चिमेस इष्टकेचे उपधान करावे. म्हणजे ते यजमानाच्या प्रतिष्ठेला कारणभूत होते. मनुष्यलोक व स्वर्गलोक हे दोन्ही सारखेच वीर्यवान् होण्यासाठी 'विवर्तोष्टाचत्वारिंश:' या मंत्राने उत्तरदिशेस इष्टका मांडावी. 'अष्टाचत्वारींशत्' हा सर्व स्तोमांमध्यें श्रेष्ठ आहे. मनुष्यलोकामध्ये विंध्य पर्वतापलीकडे असणारी उत्तरदिशा ही सर्व दिशांमध्ये श्रेष्ठ आहे. अष्टाचत्वारिंशत् स्तोम व उत्तरदिशा या दोघांच्याही श्रेष्ठत्वामुळे मनुष्यलोक वीर्यसंपन्न होत असतो. तसेच मनुष्यांनी केलेल्या पुण्यकर्माचे फल देणारा असल्यामुळे स्वर्गलोक वीर्यवान् असतो. पूर्वोक्त मंत्राने उत्तरदिशेस इष्टका मांडल्यामुळेच मनुष्य व स्वर्ग हे दोन्ही लोक समानत्वाने वीर्यशाली होत असतात. आतापर्यंत ज्या 'अक्ष्णयास्तोमीया' नामक इष्टकां मांडल्या, त्यांपैकी मुख्यत्वेकरून ज्यांची स्तुती केली आहे त्यांना 'मुख्यवती' असे नांव आहे. त्या इष्टकांचे उपधान ज्या यजमानाच्या अग्निचयनात पूर्वदिशेस केले जाते, तो समाजामध्ये प्रमुख होतो. इतकेच नव्हे तर त्याचा पुत्रही समाजात प्रमुख गणला जातो. अन्नत्वाने ज्यांचे स्तवन केले आहे अशा 'अन्नवती' या संज्ञेस पात्र असणाऱ्या इष्टकांचे ज्याच्या अग्निचयनात दक्षिणदिशेस उपधान केले जाते, तो यजमान व त्याचा पुत्र हे दोघेही भरपूर अन्न संपादन करणारे होतात. प्रतिष्ठा प्राप्त करून देणाऱ्या म्हणून ज्यांची स्तुती केली आहे त्या 'प्रतिष्ठावती' इष्टका होत. ह्या इष्टकांचे उपधान ज्याच्या अग्निचयनात पश्चिमेस केले जाते, तो यजमान समाजात प्रतिष्ठा मिळवितो. बलप्रद म्हणून ज्यांचे वर्णन केले आहे त्यांना 'ओजस्वती' असे नांव आहे. ज्याच्या अग्निचयनात ओजस्वती इष्टकांचे उत्तरदिशेस उपधान केले जाते, तो यजमान स्वत: व त्याचा पुत्र हे दोघेही ओजस्वी होतात. चयनरूपाने मांडला जाणारा अग्नी हा अर्क म्हणजे अर्चन करण्यायोग्य असा आहे. त्याच्या अर्चनाच्या अंगभूतत्वाने

स्तोत्रे व शस्त्रे यांची अपेक्षा असते. असे असल्यामुळे 'आशुस्त्रिवृत्' इत्यादि मंत्रांनी मांडल्या जाणाऱ्या इष्टकांचे वक्रत्वाने उपधान करण्याचा जो एक प्रकार प्रदर्शित केला आहे, तो प्रकार म्हणजेच चयनरूपी अग्निसंबंधी 'स्तोत्र' म्हणून समजावा. व 'अग्नेर्भागोऽसि' इत्यादि मंत्रांनी मांडल्या जाणाऱ्या इष्टकांचे वक्रत्वाने उपधान करण्याचा जो एक प्रकार, तो चयनरूपी अग्नीचे 'शस्त्र' म्हणून समजावा, अर्थात् अशा प्रकारे इष्टकोपधान केले असता अर्चनीय अशा चितिरूपी अग्नीसंबंधी योग्य अशा क्रमानेच अध्वर्यूने सर्व अनुष्ठान संपादन केल्यासारखे होते. 'एकयाऽस्तुवत' इत्यादि सृष्टिलिंगक मंत्रांनी मांडल्या जाणाऱ्या इष्टकांना 'सृष्टी' अशी संज्ञा आहे. या इष्टकांचे अध्वर्यूने यथाक्रम उपधान करावे. म्हणजे ज्या क्रमाने जी जी वस्तू सृष्टीमध्ये निर्माण झाली, त्या क्रमाने ती ती वस्तू यजमानाला मिळते म्हणजे त्या त्या वस्तूचे यजमानाला आनुकूल्य प्राप्त होते. सृष्टिपूर्वकाली उषःकालाच्या अभावी दिवस व रात्र ही दोन्हीही नव्हती म्हणजे दिवस कोणता व रात्र कोणती याविषयीचा निश्चय करताच येत नव्हता. दिवस व रात्र ही वेगवेगळी व्हावीत यासाठी उपाय करण्याचे देवांनी मनात आणले, तेव्हा 'व्युष्टी' या नांवाच्या इष्टका त्यांना दिवस व रात्र ही परस्परांहून भिन्नत्वाने समजता येण्यास साधनभूत होतील, असे आढळून आले. व त्या इष्टकांचे देवांनी उपधान केले. त्या योगाने दिवस व रात्र ही वेगवेगळ्या स्वरूपाने दिसू लागली. व्युष्टी म्हणजे विशेषत्वाने अंधकाराचा नाश करणाऱ्या अर्थात् उषःकालाची निर्मिती करणाऱ्या ज्या इष्टका त्या व्युष्टी होत. व्युष्टिसंज्ञक इष्टकांचे देवांनी उपधान केल्यामुळे दिवस व रात्र परस्परांहून भिन्न रूपाला प्राप्त झाली. यास्तव ज्या यजमानाच्या अग्निचयनात 'इयमेवसाया' इत्यादि मंत्रांनी 'व्युष्टि' संज्ञक इष्टकांचे उपधान केले जाते, त्या यजमानाच्या कल्याणासाठीच दिवस व रात्र ही परस्परभिन्न रूपाला प्राप्त होतात. 'व्युष्टी' संज्ञक इष्टकांचे अध्वर्यूने उपधान केले असता त्याच्या यजमानासाठी 'उषा' प्रकट होते व ती त्याला परलोक व अपरलोक यांचे यथार्थ प्रकाशन करते. शिवाय, त्याच्या बुध्दीच्या ठिकाणी असणाऱ्या भ्रांतिरूप अंधकाराचाही नाश करते. (अनुवाक ४).

'अग्ने जातान् प्रणुदा नः सपत्नान्' या मंत्राने 'असपत्ना' नांवाच्या इष्टकांपैकी पहिली इष्टका पूर्वदिशेस मांडावी. म्हणजे अग्निचयनकर्ता यजमान

त्याच्याशी आजपर्यंत द्वेष करणाऱ्या भाऊबंदांना किंवा शत्रूंना दूर करू शकतो. 'सहसा जातान् प्रणुदा नः' या मंत्राने पश्चिमेस इष्टका मांडावी. तसे केले असता, पुढे होणाऱ्या शत्रूंना किंवा भाऊबंदांनाही तो दूर करतो. 'चतुश्चत्वारिंशः स्तोमः' ह्या मंत्रांने दक्षिणदिशेस इष्टकेचे उपधान करावे. 'चतुश्चत्वारिंशस्तोम' ब्रह्मवर्चसरूप आहे. यामुळे या मंत्राने इष्टकोपधान करून अध्वर्यू जणू काय दक्षिणदिशेस ब्रह्मवर्चसाचीच स्थापना करतो. आणि म्हणूनच मनुष्याच्या शरीराचा दक्षिणभाग अधिकतेने ब्रह्मवर्चसरूप, अर्थात् वैदिककर्मतत्पर असतो. धार्मिक अशी सर्व कर्मे दक्षिण हस्तानेच केली जातात. 'षोडशः स्तोमः' हा मंत्र म्हणून उत्तरेस इष्टका मांडावी. षोडश स्तोम हा मनुष्याच्या ठिकाणचे ओज वाढविणारा असल्यामुळे तो ओजस्वरूप आहे. म्हणून या मंत्राने उत्तरेस इष्टका मांडून अध्वर्यू जणू काय उत्तरदिशेस ओजाचेच स्थापन करतो. आणि म्हणूनच उत्तराभिमुख होऊन ग्रामांतरी जाण्यासाठी जो निघतो तो आपल्या कार्यात विजयी होतो. चतुश्चत्वारिंशत् स्तोम व षोंडशस्तोम हे दोन्हीही वज्ररूप आहेत. यासाठी या दोन मंत्रांनी दोन इष्टका मांडल्या असता यजमान विद्यमान काली असणाऱ्या व पुढे होणाऱ्या द्वेष्ट्यांचा पराभव करण्यास समर्थ होतो. इतकेच नव्हे तर त्यांना मारण्यासाठी पूर्वोक्त मंत्ररूपी वज्राचा जणू तो त्यांच्यावर प्रहार करतो. खाली माती,शेण पसरून त्यावर मांडल्या जाणाऱ्या इष्टकेचे नांव 'पुरीषवती' असे आहे. 'पृथिव्याः पुरीषं' या मंत्राने अग्निचयनाच्या मध्यभागी 'पुरीषवती' इष्टका मांडावी. गाई इत्यादिकांच्या शरीरातील मध्यभागी पुरीषाचे अस्तित्व असते. यासाठी पुरीषवती इष्टका मांडल्याच्या योगाने अध्वर्यूने जणू काय शरीरासहित अशीच अग्निचयनाची मांडणी केल्यासारखे होते. पुरीषवती इष्टकेच्या उपधानाचे माहात्म्य जो जाणतो तो स्वर्गलोकी शरीर धारण करून राहतो.

आतापर्यंत ज्या इष्टका मांडल्या गेल्या त्यांना 'असपत्ना' अशी संज्ञा आहे. ज्या यजमानाच्या अग्निचयनात या 'असपत्ना' इष्टका मांडल्या जातात त्याला शत्रू उत्पन्न होत नाही. यापुढे 'एवच्छंदः'इत्यादि मंत्रांनी मांडल्या जाणाऱ्या इष्टकांच्या मंत्रांत प्रदर्शित सर्व छंदांचे स्वर्गलोकात अस्तित्व आहे. पशुप्राप्तीला हेतुभूत होत असल्यामुळे 'अग्निचयन' हा पशुरूप आहे. यास्तव, गाई इत्यादि पशूंच्या ठिकाणी विराज म्हणजे क्षीरदध्यादि रसरूपी अन्न निर्माण होणे अवश्य आहे. यास्तव, अग्निचयनाच्या शेवटच्या म्हणजे पांचव्या थराच्या

ठिकाणी 'एवच्छंदः' इत्यादि मंत्रांनी 'विराट्' नांवाच्या इष्टकांचे उपधान करावे. म्हणजे त्या योगाने अग्निचयन करणारा यजमान अध्वर्यूकडून पशुरूप असणाऱ्या चितिरूपी अग्नीच्या ठिकाणी क्षीरादिरसरूप अन्नाचीच जणू स्थापना करतो. त्यामुळे त्याच्या यजमानाला पुष्कळ पशूंचा लाभ होतो. आणि अशा प्रकारच्या पशुसंपत्तीने समृध्द झालेला यजमान आपल्या घरी येणाऱ्या पाहुण्यांना त्यांचे आतिथ्य करावयास पुरेसे गोरसादि पदार्थ त्याच्याजवळ असल्याने, 'या, फार दिवसांनी आलात, आनंदाने भोजन करा', अशा प्रकारचे गोड शब्द बोलून त्यांचे आतिथ्य करतो. एकेका दिशेस दहा दहा विराजेष्टका मांडाव्या. म्हणजे त्या अग्निचयनाच्या ठिकाणी दृढता उत्पन्न करण्याला कारणभूत होतात. स्वर्गात वास्तव्य करणारे जे 'एव, वरिव' इत्यादि छंद वेदांत पठित झालेले आहेत, ते स्वर्गीय होत. त्या मंत्रांच्या पठणप्रभावाने देव स्वर्गलोकाला प्राप्त झाले. परंतु, स्वर्गप्राप्तीचा उपाय शोधण्याचा प्रयत्न करणाऱ्या ऋषींना तसा उपाय न सापडल्यामुळे ते खिन्न झाले. आणि स्वर्गप्राप्तीकरता त्यांनी खडतर तप केले. तेव्हा स्वर्गप्राप्तीला साधनभूत असे स्वर्गीय छंद त्यांना दिसले. त्या छंदांच्यासाठी ऋषींनी ह्या 'विराट्' नांवाच्या इष्टका निर्माण केल्या आणि एवश्छंदः, वरिच्छंदः इत्यादि मंत्रांनी त्या विराजेष्टकांचे त्यांनी उपधान केले. आणि त्या इष्टकांच्या प्रभावाने ते ऋषी स्वर्गलोकाला प्राप्त झाले. यास्तव, स्वर्गीय अशा छंदोमंत्रांनी जो यजमान 'विराट्' नांवाच्या इष्टकांचे उपधान करतो, तो त्या छंदांच्या प्रभावाने स्वर्गलोकाला प्राप्त होतो.

यज्ञाच्या योगाने प्रजापतीने प्रजा उत्पन्न केल्या तेव्हा त्याने केलेल्या यज्ञात 'स्तोमभाग' या नांवाचे जे मंत्र प्रजापतीने उपयोगात आणले, ते मंत्रच प्रजांच्या उत्पत्तीला कारणीभूत झाले. बहिष्पवमानादि स्तोमांचे गान करण्याची आज्ञा देताना ब्रह्मा 'रश्मिरसि क्षयाय त्वा' इत्यादि जे मंत्र पठण करीत असतो त्या मंत्रांना 'स्तोमभाग' अशी संज्ञा आहे. या मंत्रांनी मांडल्या जाणाऱ्या इष्टकांना 'स्तोमभागा' असे नांव आहे. जो यजमान अध्वर्यूकडून 'स्तोमभागा' इष्टकांचे उपधान करवितो, तो, खात्रीने प्रजोत्पादन करतो. 'स्तोमभागा' संज्ञक इष्टका हे जणू यज्ञाच्या ठिकाणचे तेज आहे. ते तेज बृहस्पतीने संपादन केले. यास्तव, जो अध्वर्यू स्तोमभागांचे उपधान करतो, त्याने तेजासहवर्तमान अग्निचयनाची मांडणी केल्यासारखी होते. 'स्तोमभागा' इष्टका या यज्ञाची प्रतिष्ठा आहेत, असेही बृहस्पतीला आढळून आले. यासाठी 'स्तोमभागा'

इष्टकांचे जर अग्निचयनात उपधान केले, तर त्या यज्ञाच्या प्रतिष्ठेला कारणभूत होतात. एका एका दिशेस सात सात 'स्तोमभागा' मांडाव्यात. म्हणजे अग्निचयनाला प्रतिष्ठा म्हणजे स्थैर्य प्राप्त होतेच. शेवटी मध्यभागी तीन स्तोमभागा इष्टका मांडाव्यात. त्या योगाने अग्निचयनाला प्राप्त झालेली स्थिरता टिकून राहते. (अनुवाक ५).

'रश्मिरसि' या स्तोमभाग मंत्राच्या प्रभावाने प्रजापतीने आदित्य निर्माण केला. 'प्रेतिरसि' या मंत्राने द्युलोक उत्पन्न केला. 'संधिरसि' या मंत्राने अंतरिक्ष व 'प्रतिधिरसि' या मंत्राने पृथ्वी निर्माण केली. 'विष्टंभोऽसि' या मंत्राने पर्जन्यवृष्टीची निर्मिती केली 'प्रवाऽसि' या मंत्राने दिवस आणि 'अनुवासि' या मंत्राने रात्र निर्माण केली. 'उशिगसि' या मंत्राने अष्टवसू, प्रकेतोऽसि' ह्या मंत्राने अकरा रुद्र व 'सुदीतिरसि' या मंत्राने बारा आदित्य निर्माण केले. 'ओजोऽसि' मंत्राने पितर, 'तंतुरसि' या मंत्राने प्रजा, 'पृतनाषाडसि' या मंत्राने पशू व 'रेवदसि' ह्या मंत्राने प्रजापतीने औषधी निर्माण केल्या. व 'अभिजिदसि युक्तग्रावेंद्राय त्वेंद्रं जिन्वु' या मंत्राचा 'हे तू जयप्राप्तीचे कारणभूत असे साधन असून, एखाद्या ठिकाणी एखादा पाषाण जसा घट्ट बसविलेला असावा, त्याप्रमाणे तू अत्यंत दृढ असे आहेस, इंद्राप्रीत्यर्थ तुला मी फेकतो, यास्तव तू इंद्राला सुप्रसन्न कर', असा अर्थ आहे. या मंत्राचा प्रजापतीने उच्चार करून निर्माण केलेल्या जगाचे रक्षण करण्यासाठी वज्र दूर फेकले. त्या वज्राच्या योगाने सृष्टीच्या संरक्षणाला बाधक अशा सर्व गोष्टींचा नाश होऊन प्रजापती सृष्टिसंरक्षणाच्या कामी विजयी झाला. प्रजापतीने प्रथम प्राणरहित अशा प्रजा निर्माण केल्या आणि नंतर 'अधिपतिरसि' या मंत्राने त्या प्रजांच्या ठिकाणी त्याने प्राणांचे स्थापन केले. 'यन्ताऽस्यपानाय त्वा' या मंत्राने त्याने प्रजांच्या ठायी 'अपान' वायू, 'संसर्पोऽसि' या मंत्राने चक्षुरिंद्रिय व 'वयोधा असि' या मंत्राने प्रजापतीने प्रजांच्या ठिकाणी श्रोत्रेंद्रिय स्थापन केले. प्रजापतीने उत्पन्न केलेल्या त्या प्रजा, प्राण व अपान वायूंचे व्यवहार नीट करू लागल्या, नेत्रांनी पाहू लागल्या व कानांनी ऐकूही लागल्या. परंतु, त्यांच्या ठिकाणी मिथुनीभाव म्हणजे स्त्रीपुरुषभेद निर्माण झाला नव्हता. म्हणून प्रजापतीने 'त्रिवृदसि' या मंत्राने त्यांच्या ठिकाणी स्त्रीपुरुषात्मक मिथुनभाव निर्माण केला. त्या प्रजा स्त्रीपुरुषभेदयुक्त झाल्या. परंतु, त्या प्रजोत्पादनसमर्थ नव्हत्या. म्हणून

'संरोहोऽसि नीरोहोऽसि' या मंत्राने प्रजापतीने त्यांच्या ठिकाणी प्रजोत्पादनसामर्थ्य उत्पन्न केले. प्रजापतीने पृथ्वी, अंतरिक्ष व स्वर्गलोक या ठिकाणी निर्माण केलेल्या प्रजा प्रजोत्पादनसामर्थ झाल्यामुळे त्या अपत्योत्पादनही करू लागल्या. परंतु, त्या आपआपल्या लोकामध्ये स्थिरतेने राहीनाशा झाल्या. तेव्हा 'वसुकोऽसि', 'वेषश्रिरसि', 'वस्यष्टिरसि' या तीन मंत्रांच्या योगाने प्रजापतीने त्यांना अनुक्रमे पृथ्वी, अंतरिक्ष व स्वर्ग ह्या तिन्ही लोकांच्या ठिकाणी स्थिर केले. यास्तव, 'वसुकोरसि, वेषश्रिऽसि व वस्यष्टिरसि' या तीन मंत्रांनी जर तीन इष्टकांचे उपधान केले, तर तिन्ही लोकी वास्तव्य करणाऱ्या प्रजा आपआपल्या ठिकाणी अपत्यपरंपरा उत्पन्न करून स्थिरतेने राहतात. स्वर्गीय अशा पूर्वोक्त मंत्रांनी इष्टकांचे उपधान करण्याचे माहात्म्य जो जाणतो तो शरीरासह अंतरिक्षलोकी जाऊन यक्षगंधर्वादिकांच्या समुदायात नानाप्रकारचे भोग भोगतो. प्राणरूपी शरीर धारण करून तो स्वर्गलोकी प्रतिष्ठा पावतो. प्राण व अपान वायूंच्या पासून तो कधीही विमुक्त होत नाही. (अनुवाक ६).

नाक म्हणजे स्वर्गलोक. स्वर्गलोकाची प्राप्ती करून देणारे जे मंत्र ते 'नाकसद' होत. या मंत्रांनी मांडल्या जाणाऱ्या इष्टकांनाही 'नाकसदा' ही संज्ञा आहे. नाकसद मंत्रांनी देवांनी इष्टकांचे उपधान केले आणि त्या योगे ते स्वर्गलोकाला प्राप्त झाले. यास्तव पूर्वोक्त मंत्रांनी 'नाकसदा' नामक इष्टका मांडल्या असता अग्निचयनकर्ता यजमान 'नाकसद' संज्ञक मंत्रांच्या प्रभावाने स्वर्गलोकाला प्राप्त होतो.'अक' म्हणजे दु:ख. जेथे वास करणारांना दु:ख होत नाही तो 'नाक' अर्थात् दु:खरहित लोक होय. स्वर्गलोक हा दु:खरहित व सुखमापक असल्यामुळे त्यालाच 'नाक' ही संज्ञा आहे. ज्याच्या अग्निचयनात नाकसदा इष्टका मांडल्या जातात त्याला केव्हाही दु:ख प्राप्त होत नाही. 'नाकसद' मंत्र किंवा नाकसदा इष्टका या यजमानाला भविष्यकाली स्वर्गलोकी स्थान मिळवून देणाऱ्या असल्याने ते मंत्र किंवा त्या इष्टका याच जणू यजमानाचे भविष्यत्कालीन स्वर्गलोकाच्या ठिकाणचे स्थान आहे. अर्थात् पूर्वोक्त मंत्रांनी नाकसदा इष्टकांचे उपधान करून यजमान जणू आपले स्वर्गलोकातील स्थानच आपलेसे करतो. यज्ञामध्ये गाइल्या जाणाऱ्या 'पृष्ठ' संज्ञक स्तोत्रांच्या ठिकाणी जे तेज असते, ते जणू या नाकसदांच्या ठिकाणी साठून राहिलेले असते. यास्तव, नाकसदा इष्टकांचे जर यजमानाने उपधान केले, तर त्याच्या

यज्ञात गाईल्या जाणाऱ्या पृष्ठस्तोत्रांच्या ठिकाणी तेज प्राप्त होते.

नाकसदा इष्टकांची मांडणी केल्यानंतर त्यांच्या व इतर इष्टकांच्या मध्ये ज्या सूक्ष्म अशा फटी राहतात, त्या झांकण्यासाठी ज्या इष्टका मांडाव्या लागतात, त्यांना 'चोडा' म्हणजे 'छिद्रे झाकणाऱ्या' अशी संज्ञा आहे. नाकसदांच्या उपधानानंतर अध्वर्यूने 'चोडा' नांवाच्या पांच इष्टका मांडाव्यात. या इष्टका 'अप्सरा' होऊन यजमानाबरोबर स्वर्गलोकी जातात. इतकेच नव्हे तर, त्या अप्सरा त्या यजमानाच्या शरीराचे सर्वथैव पालन करणाऱ्या होतात. यजमान ज्या मनुष्याचा द्वेष करीत असेल त्या मनुष्याचे ध्यान इष्टकांचे उपधान करताना अध्वर्यूने आपल्या मनात करावे. म्हणजे त्या योगाने त्या इष्टकांच्या अभिमानिनी देवतांच्या कडूनच जणू काय आपल्या यजमानाच्या द्वेष्ट्याला सर्वतोपरी विच्छिन्न केल्यासारखे होते. अर्थातच तो यजमानाचा द्वेष्टा संकटाच्या फेऱ्यात पडतो व तात्काल मृत्यु पावतो. 'नाकसदा' इष्टका मांडल्यानंतर त्यांच्यावर 'चोडा' इष्टकांचे उपधान करावे. असे केले असता नाकसदइष्टकारूपी गृहांच्या ठिकाणी 'चोडा' इष्टकारूपी गृहिणींनाच जणू आणून ठेवल्यासारखे होते. शेवटची म्हणजे पांचवी 'चोडा' इष्टका अध्वर्यू पश्चिमदिशेस पूर्वाभिमुख अशी मांडतो. म्हणूनच यजमानाची पत्नी गार्हपत्याच्या पश्चिमेस प्राङ्.मुख बसत असते. सर्व इष्टकांचे उपधान झाल्यानंतर अगदी शेवटी 'स्वयमातृण्णा' व 'विकर्णी' या दोन इष्टका मांडाव्यात. स्वयमातृण्णेचे स्वरूप पूर्वीच वर्णिले आहे. अग्निचयनाच्या उत्तरांसाला चिकटून असलेल्या कानासारखी दिसणारी इष्टका मांडली जाते तिला 'विकर्णी' असे नांव आहे. 'स्वयमातृण्णा' ही प्राणस्वरूप असून 'विकर्णी' ही आयुष्यरूप आहे. यास्तव, सर्व इष्टकांच्या शेवटी या दोन इष्टकांची मांडणी करून अध्वर्यू जणू काय अग्निचयनाचे सर्व शरीर निर्माण झाल्यानंतर शेवटी त्याच्या ठिकाणी प्राण व आयुष्य यांचे स्थापन करतो. लोकव्यवहारामध्ये देखील वायुरूप असणाऱ्या अपानादि इतर चार प्राणांपेक्षा शेवटचा श्वासरूपाने असणारा प्राण व आयुष्य हीच सर्वश्रेष्ठ असल्याचे दिसून येते. या दोन इष्टकांची मांडणी केल्यानंतर इतर कोणतीही इष्टका मांडू नये. कारण, पूर्वोक्त दोन इष्टका मांडल्यावर जरी दुसरी एखादी इष्टका मांडली गेली, तर यजमान व त्याचे पशू यांच्या श्वासोच्छ्वासाचा मार्गच आच्छादित केल्यासारखे होईल आणि तसे झाले म्हणजे त्यांचे आयुष्यही तुटेल. यास्तव, स्वयमातृण्णा व विकर्णी या दोन इष्टका

मांडल्यानंतर दुसरी कोणतीही इष्टका मांडू नये. अग्निचयनाच्या पहिल्या थरात जी स्वयमातृण्णा मांडली तिचे भूमिरूपाने स्तवन करण्यात आले असून मधल्या म्हणजे तिसऱ्या थरात मांडल्या गेलेल्या स्वयमातृण्णेचे अंतरिक्षाच्या भावनेने स्तवन करण्यात आले आहे. आता शेवटच्या ह्या पांचव्या थरामध्ये जी स्वयमातृण्णा मांडावयाची, ती जणू द्युलोकच आहे, अशा भावनेने स्तवन करून मांडावी. 'स्वयमातृण्णा' मांडण्यापूर्वी ती अश्वाकडून हुंगवावी. म्हणजे तो अश्व तिच्या ठिकाणी प्राणाचे स्थापन करतो. प्रजापतीने निर्माण केलेला अश्व देखील प्रजापतिरूपच असतो. यास्तव त्याच्याकडून हुंगवून स्वमातृण्णा मांडली म्हणजे अध्वर्यूने जणू काय प्रजापतीकडूनच अग्निचयनाची मांडणी केल्यासारखे होते. 'स्वयमातृण्णा' ही स्वभावत:च छिद्रमुक्त असल्यामुळे यजमानाच्या श्वासोच्छ्वासाचा मार्गही मोकळा राहतो व तिला असलेल्या छिद्रांच्या द्वारा यजमानाला स्वर्गलोकाचेही चांगल्या रीतीने प्रकाशन होते. 'विकर्णी' इष्टका जणू देवांच्या पराक्रम स्वरूपाची आहे. म्हणून अध्वर्यूने तिचे उपधान केले असता, यजमान हा देवांच्या पराक्रमाप्रमाणे पराक्रम करणारा होतो. अग्निचयनाच्या उत्तरेकडील अंसाच्या ठिकाणी विकर्णी इष्टका मांडावी. अशा प्रकारे तिची मांडणी केली जात असल्यानेच ब्रह्मावरण, अन्वाधान इत्यादि कर्मे अग्नीच्या उत्तर बाजूलाच केली जात असतात. ही इष्टका मांडताना ज्या ऋचेमध्ये 'आदस्य वातो अनुवाति' हा अंश पठित झाला आहे, ती 'प्रोथदश्वो' ही ऋचा अध्वर्यूने पठण करावी. असे झाले म्हणजे वायूच्या आवरणात चितिरूपी अग्नी उत्तम प्रकारे प्रज्वलित होतो. (अनुवाक ७).

गायत्र्यादि छंदांनी युक्त असलेल्या मंत्रांनी मांडल्या जाणाऱ्या इष्टकांनाही 'छंदांसि' अशी संज्ञा आहे. छंद हे पशुरूप आहेत. यास्तव 'छंदांसि' संज्ञक इष्टका मांडल्या असता, यजमानाला पशू प्राप्त होतात. 'छंद' हे जणू देवांचे आवडते धनच आहेत. त्याचप्रमाणे 'पशू' हे देखील सांसारिक मनुष्याचे आवडते धनच होय. अर्थात् 'छंदांसि' इष्टकांचे उपधान केले असता, देवांना आवडणारे 'छंदोरूपी' धन व त्यांच्या योगाने प्राप्त होणारे पशुरूपी धनही यजमान संपादन करतो.

'चित्र' नांवाच्या कोणा पुरुषाच्या वंशात उत्पन्न झालेल्या 'यज्ञसेन' नामक पुरुषाने 'छंदांसि' नामक इष्टकांनी अग्निचयनाची रचना करण्याचा प्रकार

जाणला व त्याप्रमाणे छंदांसि इष्टकांचे उपधान करून पशू प्राप्त करून घेतले. यास्तव, त्या यज्ञसेनाचे अनुकरण करून जो पूर्वोक्त इष्टका मांडतो तो यजमानही पशूंची प्राप्ती करून घेतो. 'अग्निर्मूर्धा' इव्यादि गायत्रीछंदात्मक मंत्रांनी मांडल्या जाणाऱ्या 'गायत्री' नांवाच्या इष्टका पूर्वदिशेस मांडाव्यात. गायत्री ही तेजोरूप आहे. यास्तव, तेजोरूप अशा गायत्री इष्टका पूर्वेस मांडल्याच्या योगाने अध्वर्यू जणू काय अग्निचयनाच्या पूर्वेस तेजाचीच स्थापना करतो. 'अग्निर्मूर्धा' इत्यादि तिन्ही मंत्रांत मूर्धा हा शब्द असल्याने त्या मंत्रांनी मांडल्या जाणाऱ्या इष्टकांना 'मूर्धन्वती' असेही नांव आहे. यांच्या उपधानाच्या योगाने अग्निचयनकर्ता यजमान बरोबरीच्या लोकांमध्ये शिरोभागाप्रमाणे उच्च स्थानाला प्राप्त होतो. 'भुवो यज्ञस्य' इत्यादि त्रिष्टुप्छंदात्मक तीन मंत्रांनी 'त्रिष्टुभा' नांवाच्या तीन इष्टका दक्षिण दिशेस मांडाव्यात. त्रिष्टुप्छंद हा इंद्रियरूप आहे. यास्तव, 'त्रिष्टुभा' नांवाच्या इष्टकांचे उपधान केले असता, अध्वर्यू जणू काय, अग्निचयनाच्या दक्षिणेकडील मध्यभागात इंद्रियांचीच स्थापना करतो. 'जनस्य गोपा' इत्यादि जगतीछंदात्मक तीन मंत्रांनी मांडल्या जाणाऱ्या जगती नांवाच्या इष्टका पश्चिम दिशेस मांडाव्यात. पशू हे जगतीछंदसंबध्द आहेत. यास्तव, जगती नांवाच्या इष्टका मांडल्या असता. यजमान पशूंची प्राप्ती करून घेतो 'त्वां चित्रश्रवस्तम' इत्यादि अनुष्टुप् छंदात्मक मंत्रांनी मांडल्या जाणाऱ्या तीन अनुष्टभा नांवाच्या इष्टकांचे उपधान उत्तर दिशेस करावे. अनुष्टुभा इष्टका या प्राणरूप आहेत. यास्तव, त्यांची मांडणी केल्याने त्या यजमानाच्या प्राणांचे व्यवस्थिपणे उत्सर्जन होण्याला कारणीभूत होतात. त्यानंतर 'एना वो अग्निं' इत्यादि बृहतीछंदात्मक तीन मंत्रांनी तीन बृहती, 'अग्ने वाजस्य' इत्यादि तीन उष्णिक्छंदात्मक मंत्रांनी तीन उष्णिहा, 'आ ते अग्न इधीमहि' इत्यादि तीन पंक्तीछंदात्मक मंत्रांनी तीन पंक्ती व 'अग्ने तमद्य' इत्यादि तीन अक्षरपंक्ति छंदात्मक मंत्रांनी तीन अक्षरपंक्तीनामक तीन इष्टका मांडाव्यात. पूर्वी मांडलेल्या गायत्र्यादि अनुष्टुभ्संज्ञक इष्टकांच्या मंत्रांच्यापेक्षा आता सांगितलेल्या बृहत्यादि इष्टकांचे मंत्र निराळ्या स्वरूपाचे आहेत. गायत्र्यादिअनुष्टुप्पर्यंतच्या छंदोमंत्रांचे सर्व चरण सारख्या अक्षरांचे असून आता सांगितलेल्या 'बृहत्यादिअक्षरपंक्तिपर्यंतच्या छंदोमंत्रांच्या चरणांची अक्षरे विषमसंख्यायुक्त आहेत. सारांश, अक्षरसंख्येच्या दृष्टीने विषमरूप असलेल्या मंत्रांनी विषमरूप अशा 'छंदांसि' नामक इष्टकांचे उपधान अध्वर्यूने करावे.

गाई, म्हशी, घोडे हे पशू परस्परांहून भिन्नभिन्न रूपाचे असतात. 'छंद' हे पशुरूपच आहेत. यास्तव, पूर्वोक्त मंत्रांनी बृहत्यादि इष्टकांचे उपधान केले असता, यजमानाला परस्परभिन्न अशा स्वरूपाचे गोमहिष्यादि पशू प्राप्त होतात. ज्या यजमानाच्या अग्निचयनामध्ये आतापर्यंत सांगितलेल्या समरूप आणि विषमरूप मंत्रांनी मांडल्या जाणाऱ्या 'छंदांसि' नांवाच्या इष्टकांचे उपधान केले जाते, तो यजमान व या इष्टकांच्या उपधानाचे माहात्म्य जो जाणतो त्याच्या घरात भिन्नभिन्न प्रकारचे धन साठून राहिलेले दृष्टीस पडते. यानंतर 'अग्निं होतारं' या 'अतिच्छंदात्मक' मंत्राने 'अतिच्छंदा' नांवाच्या इष्टकेचे उपधान, मांडलेल्या इष्टकांमध्ये एखादे मोकळे स्थान असेल तेथे करावे. 'अतिच्छंद' हा सर्वछंदस्वरूप आहे. कारण, तदितर अशा गायत्र्यादि छंदांच्या ठिकाणी जितकी अक्षरसंख्या असते, त्यापेक्षाही अतिच्छंदामध्ये अधिक अक्षरे असतात. अर्थात् या छंदामध्ये बाकीचे सर्व छंद अंतर्भूत झाले आहेत हे उघड आहे. यास्तव अतिच्छंदात्मक मंत्राने इष्टका मांडली म्हणजे, इतर नांवे धारण करणाऱ्या सर्वच 'छंदांसि' इष्टकांचे या इष्टकेच्या रूपाने उपधान केल्याचे श्रेय उत्पन्न होते. 'अतिच्छंद' हा जणू सर्व छंदांचे एक भव्य शरीरच आहे. म्हणून अध्वर्यूने अतिच्छंदस्वरूप अशी ही इष्टका मांडली असता, तो आपल्या यजमानाला बरोबरीच्या सभाजात भव्य असे मानाचे स्थान प्राप्त करून देतो, अर्थात् समाजातील इतर सर्वजण आपआपल्या जीवनक्रमास योग्य मार्ग लागण्यासाठी त्याचे अनुकरण करतात. शेवटी, 'अग्ने त्वन्नो अंतमः' इत्यादि 'द्विपदा' छंदातील तीन ऋचांनी अग्निचयनाच्या मध्यभागी 'द्विपदा' नांवाच्याच तीन इष्टका मांडाव्यात. म्हणजे तो यज्ञकर्ता यजमान इतर समाजात स्वतःच्या ठिकाणच्या स्वावलंबनरूप दोन्ही पायावर स्थिरतेने उभा राहतो. त्याचे जीवन परावलंबी राहत नाही. (अनुवाक ८).

सर्व देवांच्यासाठी म्हणून अग्निचयन मांडला जात असतो. परंतु त्यामध्ये 'सयुज' नांवाच्या इष्टका जर मांडल्या गेल्या नाहीत तर आघारादि कर्मांच्या अधिष्ठात्री असणाऱ्या देवतांचा परित्याग केल्यासारखे होईल. आणि तसे झाल्यास त्या देवता यजमानाने मांडलेल्या चयनरूपी अग्नीचा परित्याग करतील. यास्तव, 'इंद्राग्निभ्यां त्वा' इत्यादि मंत्रांनी सयुज नांवाच्या इष्टकांची मांडणी करावी. या इष्टकांना 'सयुज' हे नांव प्राप्त होण्याचे कारण हे की, त्या ज्या मंत्रांनी

मांडल्या जातात, त्या मंत्रांचे नांव 'सयुज' असे आहे. देवतांच्याशी अग्नीला संयुक्त करणाऱ्या ज्या इष्टका त्या 'सयुज' इष्टका, असेही म्हटले तरी चालेल. यास्तव, या इष्टकांची मांडणी केली असता, यजमानाने इंद्राग्न्यादि देवतांना स्वत:शी संयुक्त करून घेऊन चितिरूपी अग्नीची मांडणी केल्यासारखे होते. आणि मग तो चितिरूपी अग्नीकडून वियुक्त होत नाही. एखाद्या पुरुषाचे शरीर जसे अनेक स्नायूंनी सर्वतोपरी व्यापलेले असते, त्याचप्रमाणे चितिरूपी अग्नीही त्या त्या इष्टकांनी व त्यांच्या त्यांच्या अधिष्ठात्री देवतांनी सर्वतोपरी व्यापला जातो.

'अंबा' इत्यादि मंत्रांनी सात इष्टकांची मांडणी करून निर्माण केलेल्या चितिरूपी अग्नीच्या प्रभावाने देव स्वर्गलोकाला प्राप्त झाले व स्वर्गाला गेले, तेव्हा त्यांनी मांडलेल्या सात इष्टकाही त्यांच्याबरोबर स्वर्गाला गेल्या आणि त्या अंबा, दुला इत्यादि सात नांव धारण करणाऱ्या कृत्तिकासंज्ञक नक्षत्ररूपाला प्राप्त झाल्या. ज्या यजमानाच्या अग्निचयनात या इष्टकांचे उपधान केले जाते, तो यजमान स्वर्गलोकाला प्राप्त होतो व तेथे नानाप्रकारच्या आभरणांनी प्रकाशून राहतो. ज्या इष्टकेवर मंडलासारखी आकृती खोदलेली असते, ती मंडलेष्टका होय. अग्निचयनाच्या पहिल्या थरामध्ये 'पृथिव्युदपुरमन्नेन' या मंत्राने एक मंडलेष्टका मांडावी. या मंत्राने मधल्या म्हणजे तिसऱ्या थरात व 'द्यौरपराजिता' या प्रेषाने शेवटच्या पांचव्या थरात अनुक्रमे एक एक इष्टका मांडावी. ''अधि द्यौ अंतरिक्षं'' याप्रमाणे तीन थरांत तीन इष्टका मांडाव्यात. या तीन मंडलेष्टका म्हणजे पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु हे तीन लोक असून ते जणू देवांची वस्ती असणारी तीन नगरे आहेत. अर्थात् या इष्टका मांडल्याच्या योगाने अग्निचयनकर्ता यजमान देवांच्या तीन नगरांच्या ठिकाणी प्रवेश करतो. शिवाय अशा प्रकारे अग्निचयनाची मांडणी करणारा यजमान कोणत्याही संकटात पडत नाही. (अनुवाक ९)

'विश्व' शब्दाने युक्त अशा मंत्रांनी ज्यांचे उपधान केले जाते, त्या इष्टकांना 'विश्वज्योतिष' असे नांव आहे. अग्निचयनाच्या पहिल्या, तिसऱ्या व पांचव्या अशा तीन थरांच्या ठिकाणी अनुक्रमे 'बृहस्पतिस्त्वा सादयतु' 'विश्वकर्मा त्वा सादयतु' आणि 'प्रजापतिस्त्वा सादयतु' या तीन मंत्रांनी तीन इष्टका मांडाव्यात. अध्वर्यू या विश्वज्योतिष'संज्ञक इष्टकांचे उपधान करून पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु या तीन लोकांना जणू प्रकाशवंत करतो. शिवाय, इष्टका आपल्या प्रभावाने यजमानाच्या प्राणांना दृढपणाने धारण करतात.

या इष्टकांची मांडणी करताना पठण केल्या जात असलेल्या मंत्रांच्या ठिकाणी प्रतीत होणाऱ्या बृहस्पती इत्यादि स्वर्गीय देवतांना अनुसरूनच यजमान स्वर्गलोकी जातो. 'वृष्टिसनि' म्हणजे 'पर्जन्यवृष्टिरूपी धनाचा साठा' अथवा, 'वृष्टि' व 'सनि' या शब्दांनी युक्त असलेल्या 'पुरोवातसनिरसि' इत्यादि पांच मंत्रानी 'वृष्टिसनी' नांवाच्या पांच इष्टका मांडाव्यात. त्यांच्या उपधानाच्या योगाने अपेक्षेप्रमाणे पर्जन्यवृष्टी प्राप्त होते. ह्या 'वृष्टिसनी' इष्टकांची, इष्टका हाती घेऊन ती मांडावयाच्या अशाप्रकारे एकच प्रयात्न करून जर मांडणी केली तर संवत्सरामध्ये एकाच ऋतूत पर्जन्यवृष्टी होईल. यास्तव, इष्टका उचलून घेतल्यावर ती तशीच हातात घेऊन अग्निचयनक्षेत्राभोवती प्रदक्षिणा घालावी आणि नंतर ती हाती घेतलेली इष्टका जेथे मांडावयाची असेल तेथे मांडावी. याच पध्दतीने पांचही इष्टका मांडल्या असता संवत्सरातील सर्व ऋतूंमध्ये पर्जन्याची वृष्टी होते. 'पुरोवातसनिरसि' हा मंत्र पहिली वृष्टिसनी इष्टका मांडताना म्हणावयाचा असतो. या मंत्रात व्यक्त झालेला पुरोवात म्हणजे पूर्व दिशेकडून वाहणारा वारा, हे पर्जन्यवृष्टीचे एक रूप किंवा चिन्हच आहे. याचप्रमाणे पुढच्या चार मंत्रांत अनुक्रमे व्यक्त झालेली अभ्र, विद्युत्, मेघगर्जना व वृष्टी ही देखील पर्जन्यवृष्टीची भिन्नभिन्न रूपेच होत. सारांश, पर्जन्यवृष्टीचे स्वरूप पंचविध आहे. यास्तव, या मंत्रांनी वृष्टिसनी इष्टका मांडल्या म्हणजे पांचही स्वरूपांनी पर्जन्याची वृष्टी होते. 'यानी' शब्दाने युक्त असलेल्या 'अग्नेर्यान्यसि' इत्यादि मंत्रांनी मांडल्या जाणाऱ्या ज्या इष्टका, त्या 'संयानी' होत. या 'संयानी' इष्टकांच्या प्रभावानेच पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु या तीन लोकांच्या ठिकाणी देव सुखरूपतेने प्राप्त झाले. 'उत्तमप्रकारे तिन्ही लोकी जाणाऱ्या', अशा अर्थाने या इष्टकांना 'संयानी' ही संज्ञा प्राप्त झाली आहे. यांचे उपधान केले असता, नावेच्या योगाने जसे नदी इत्यादि जलप्रवाहाच्या पार सुखाने जाता येते त्याप्रमाणे यज्ञकर्ता यजमान या संयानी इष्टकांच्या उपधानाने तिन्ही लोकांना सुखरूपपणे प्राप्त होतो. संयानी इष्टकांचा समूह हा जणू मांडल्या जाणाऱ्या अग्निचयनरूप समुद्रास तरून जाणारी होडीच होय. यासाठी अध्वर्यूने जर 'संयानी' इष्टकांचे उपधान केले, तर त्याने अग्निचयनरूप समुद्र तरण्यासाठी जणू काय होडीचीच तजवीज करून ठेवल्यासारखे होते. शिवाय, ज्या यजमानाच्या अग्निचयनात संयानी इष्टकांचे उपधान केल्यानंतर एखाद्या वेळी पर्जन्यवृष्टी अतिशय होऊन मांडलेला चयन जरी वाहून गेला, तरी त्या यजमानाचा अग्नी वाहून न

जाता परमार्थत: कायमच राहतो. आदित्यशब्दाने युक्त अशा मंत्रांनी मांडल्या जाणाऱ्या त्या आदित्येष्टका होत. 'सलिलाय त्वा' इत्यादि आठ मंत्रानी अनुक्रमे आठ आदित्येष्टका मांडाव्यात. जो राजा, अमात्य, पुत्रपौत्रा इत्यादि ऐश्वर्याने युक्त होण्याला पात्र असूनही त्याला अशा प्रकारचे ऐश्वर्य प्राप्त होत नाही, त्याचे कारण, आदित्य हे त्याला ऐश्वर्यापासून दूर खेचीत असतात. यासाठी आदित्येष्टकांचे उपधान केले असता, संतुष्ट झालेले ते आदित्यच त्या राजाला अमात्य, पुत्रपौत्रा इत्यादि सर्व प्रकारच्या ऐश्वर्याला प्राप्त करणारे होतात. यजमान जर एखादा अग्निचयन केल्यानंतर सुध्दा लोकप्रियतेला प्राप्त झाला नाही, हा अग्निचित असा श्रेष्ठ मनुष्य आहे, म्हणून जर लोकांकडून त्याचा बहुमान झाला नाही, तर त्याच्या ठिकाणची लोकप्रियता आदित्यांनी खेचून धरली आहे असे समजावे. ह्या यजमानाने जर पुन्हा अग्निचयन करून त्यामध्ये आदित्येष्टकांचे उपधान केले, तर त्यायोगाने संतुष्ट झालेले ते आदित्य त्याच्या ठिकाणी अवश्य ती लोकप्रियता स्थापन करतात. आणि मग तो आपल्या शास्त्रीय भाषणाने जसा देवांना प्रिय होतो, तसाच सर्व मनुष्यांनाही तो प्रिय होतो. 'ऋचे त्वा रुचे त्वा' इत्यादि पांच मंत्रांनी घट्ट केलेल्या घृताच्या पांच इष्टका मांडाव्यात. कारण घृत हे अग्नीचे आवडते गृहच आहे. यास्तव, घृतेष्टकांचे उपधान केल्याच्या योगाने अध्वर्यूने जणू काय अग्नीला प्रिय असलेल्या निवासगृहाच्या योगाने समृध्द आणि तेजोयुक्त केल्यासारखे होते. प्रत्येक घृतेष्टका मांडण्यापूर्वी ती हाती घेऊन अग्निचयन क्षेत्राभोवती प्रदक्षिणा घालावी. आणि नंतर ती जेथे मांडावयाची तेथे मांडावी. म्हणजे चयनरूपी तो अग्निदेव यजमानाच्या ठिकाणी सर्वतोपरी तेजाची स्थापना करतो. 'यशोदां त्वा यशसिं' इत्यादिं पांच मंत्रांनी यशोदा नांवाच्या पांच इष्टका मांडाव्यात. प्रजापतीने स्वत:च अग्निचयन केला. परंतु त्यामध्ये 'यशोदा' इष्टकांचे उपधान त्याने केले नाही. यामुळे तो यशस्वी झाला नाही. यशापासून तो दूर राहिला. त्यानंतर यशप्राप्तीला कारणभूत होणाऱ्या या यशोदा इष्टका आहेत असे त्याच्या विचारी दृष्टीला आढळले. तेव्हा त्याने पुन: अग्निचयन करून त्यात 'यशोदा' इष्टकांचे उपधान केले आणि त्याच्या प्रभावाने त्याने आपल्या ठिकाणी यश संपादन केले. यास्तव, जो यजमान आपल्या अग्निचयनात अध्वर्यूच्या हस्ते यशोदा इष्टकांचे उपधान करतो, तो त्या यशोदा इष्टकांच्या कडून आपल्या ठिकाणी यश संपादन करतो. 'यशोदा' इष्टका पांच मांडाव्यात.

कारण कोणताही पुरुष पांक्त म्हणजे दोन हात, दोन पाय व मस्तक अशा पांच अवयवांनी युक्त असतो. त्या अग्निचित् यजमानरूपी पुरुषाच्या ठिकाणी चितिरूपी अग्निदेव यशाचे स्थापन करतो. यास्तव, अध्वर्यूने पूर्वोक्त पांच इष्टकांचे उपधान केले असता, त्याने जणू काय हस्तपादादि पांच अवयवांनी युक्त अशा यजमानरूपी पुरुषाच्या ठिकाणी परिपूर्ण अशा यशाचे स्थापन केल्यासारखे होते. (अनुवाक १०).

देव व असुर हे परस्परांमध्ये युद्ध करण्याच्या उद्योगास लागले. परंतु, सैन्यबलाने व द्रव्यबलाने देव कमी असून असुर सैन्य व द्रव्य या दोन्ही बलांनी अधिक होते. तेव्हा देवांनी सैनिकांच्या व इतर साधनसंपत्तीच्या योगाने आपण असुरांची बरोबरी कशा प्रकारे करू शकू, अशाविषयी पुष्कळ विचार केला असता, 'भूयस्कृदसि' इत्यादि मंत्रांनी मांडल्या जाणाऱ्या 'भूयस्कृत्' इत्यादि इष्टका आपली सैन्याची व इतर साधनसंपत्तीची उणीव भरून काढू शकतील, असे त्यांना आढळून आले. आणि त्यांनी भूयस्कृदसि इत्यादि मंत्रांनी पांच इष्टकांचे उपधान केले. त्या उपधानाच्या प्रभावाने त्यांनी आपली असुरांपेक्षाही अधिक अशी सर्व प्रकारे भरभराट करून घेतली. 'भूयस्कृदसि' या मंत्राने इष्टका मांडून वनस्पती व ओषधी यांच्या योगाने ते समृध्द झाले. 'वरिवस्कृदसि' या मंत्राने इष्टकोपधान करून त्यानी ही पृथ्वी जिंकली. म्हणजे पृथ्वीवर सर्वत्र पूज्यता संपादन केली. 'प्राच्यसि' या मंत्राने इष्टका मांडून ते पूर्व दिशेस विजयी झाले. 'ऊर्ध्वासि' या मंत्राने केलेल्या इष्टकोपधानाने त्यांनी ऊर्ध्व दिशेवरही जय मिळविला. 'अंतरिक्षसदस्यंतरिक्षे सीद' या मंत्रांनी इष्टका मांडून अंतरिक्षलोक जिंकला. एवं च, देव हे विजयी झाले आणि असुरांचा पराभव झाला. ज्या यजमानाच्या अग्निचयनात या इष्टका मांडल्या जातात तो सर्वतोपरी मोठेपणाला प्राप्त होतो, तिन्ही लोकांत विजय मिळवितो, स्वतःच्या पराक्रमाने जयशाली होतो व त्याचा शत्रू पराभव पावतो.

'अप्सु षदसि' इत्यादि पांच मंत्रांनी अग्निस्वरूपात्मक अशा पांच इष्टका मांडाव्यात. कारण अग्नीचे स्वरूप पांच प्रकारचे असते. अर्थात् या पांच इष्टका मांडून अध्वर्यू जणू काय चितिरूपी अग्नीला पांचही प्रकारच्या स्वरूपाने जणू समृध्द करतो. 'पृथिव्यास्त्वा द्रविणे' इत्यादि पांच मंत्रांनी 'द्रविणोदा' नांवाच्या पांच इष्टका मांडाव्यात. द्रविण म्हणजे धन. आणि धन देणाऱ्या

ज्या इष्टका त्या 'द्रविणोदा' होत. एवं च, अध्वर्यूने द्रविणोदा इष्टकांचे उपधान केले असता त्याने जणू काय पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु या तिन्ही लोकांना धनसंपन्न केल्यासारखे होते. 'प्राणं मे पाहि' इत्यादि सहा मंत्रांनी 'आयुष्या' नांवाच्या सहा इष्टका मांडाव्यात. असे केले असता त्याने आपल्या यजमानाच्या ठिकाणी आयुष्याचे स्थापन केल्यासारखे होते. 'अग्ने यत् ते परं हृन्नाम' या मंत्राने 'अग्नेर्हृदय' म्हणजे अग्नीचे जणू हृदयच अशी एक इष्टका मांडावी. 'हृत्' शब्दाने उपलक्षक असलेले, 'पापहारि' असे जे स्वरूप ते जणू अग्नीचे अत्यंत प्रिय असे स्थानच होय. यास्तव, ही इष्टका मांडली असता यजमान अग्नीच्या अत्यंत प्रिय अशा स्थानाला प्राप्त होतो. 'तावेहि संरभावहे' अशा प्रकारचा मंत्रशेष पूर्वोक्त मंत्राला जोडून इष्टका मांडताना अध्वर्यूने म्हणावा. असे केल्याच्या योगाने यजमानाने स्वतःचे प्रावरण वस्त्र अग्नीकडून विशेषत्वाने निर्माण केल्यासारखे होते. पूर्वोक्त मंत्रशेषात 'पांचजन्येष्वप्येध्यग्ने' असा अंश पठण करावा. कारण इष्टकांचे एकावर एक असे पांच थर मांडून निर्माण केला जाणारा जो चितिरूप अग्नी तोच 'पांचजन्य' होय. यास्तव, हा अंश पठण करणे युक्तच आहे. यावां, अयावा, इत्यादि सात मंत्रांनी 'ऋतव्या' नांवाच्या सात इष्टका मांडाव्यात. 'ऋतव्या' इष्टका हे ऋतूंचे आवडते स्थान होय. या इष्टका मांडल्याने अध्वर्यूने जणू काय यजमानासाठी ऋतूंचे प्रिय असे स्थान संपादन केल्यासारखे होते. आता सांगितलेल्या मंत्रांतील पहिले सात मंत्र ऋतुवाचक असून शेवटचा 'सुमेक' असा जो शब्द आहे त्याचा अर्थ संवत्सर असा आहे. यास्तव, या मंत्राने इष्टका मांडली असता अग्निचयनकर्ता यजमान संवत्सराला प्रिय असलेल्या स्थानाला प्राप्त होतो. (अनुवाक ११).

चतुर्मुख अशा प्रजापतीच्या नेत्रांतील बुबुळ कोणत्या तरी व्याधीमुळे भूमीवर गळून पडले व ते अश्वाच्या रूपाने प्रकट झाले. म्हणजे त्या बुबुळापासून एक अश्व उत्पन्न झाला. अश्वयत् म्हणजे भूमीवर गळून पडलेल्या बुबुळापासून उत्पन्न झाल्यामुळे अश्वाला 'अश्व' हे नांव रूढ झाले. प्रजापतीच्या नेत्रामध्ये पुन्हा बुबुळाचे स्थापन कसे होईल याविषयी देवांनी पुष्कळ विचार केला. तेव्हा 'अश्वमेध' यज्ञ केल्यास प्रजापतीच्या नेत्रामध्ये पूर्वीप्रमाणे पुन्हा बुबुळ स्थापन करता येईल असे त्यांना आढळून आले. नंतर अश्वमेध यज्ञ करून देवांनी प्रजापतीच्या डोळ्यात पुन्हा बुबुळाची स्थापना केली. सारांश, अश्वमेध

यज्ञ हा प्रजापतीच्या ठिकाणचे देखील न्यूनत्व परिपूर्ण करण्याइतका प्रशस्त आहे. यास्तव, आपल्या ठिकाणचे सर्व न्यूनत्व पूर्ण होण्याची इच्छा असेल, त्याने अश्वमेध यज्ञ करावा. म्हणजे त्या यजमानाने अश्वमेध यज्ञ करून जणू काय प्रजापतीलाच त्याच्या ठिकाणचे न्यूनत्व दूर करून पूर्णपणा प्राप्त केल्यासारखे होते. आणि त्यामुळेच तो प्रजापतीचा अनुग्रह प्राप्त करून घेतो व स्वत: सर्वांगपरिपूर्ण होतो. अश्वमेध हा सर्वप्रकारच्या पातकांचे प्रायश्चित्त आहे. अश्वमेध यज्ञ हे सर्वप्रकारच्या व्याधी निवारण करणारे औषध आहे. विद्यमान काळात असणाऱ्या देवांनी मागच्या मनुष्यजन्मात केलेल्या उपपातकांचा परिहार तर अश्वमेध यज्ञाच्या अनुष्ठानाने करून घेतलाच पण ब्रह्महत्येसारख्या महापातकापासूनही अश्वमेध यज्ञामुळे ते देव तरून गेले ! अर्थात् आजही जो कोणी अश्वमेध यज्ञ करील तो देखील ब्रह्महत्येसारख्या महापातकापासून तरून जाईलच जाईल. इतकेच नव्हे तर वाक्यार्थ व उपासना या दोन्ही दृष्टींनी अश्वमेध यज्ञाचे स्वरूप किंवा माहात्म्य जो जाणतो, तो देखील ब्रह्महत्यादि पातकांपासून तरून जाईल.

प्रजापतीचा डाव्या बाजूचा डोळा भूमीवर गळून पडला होता. यास्तव, अश्वमेध यज्ञात मारलेल्या अश्वाच्या अंगांचे यजनासाठी अवदान घेतेवेळी डाव्या बाजूकडीलच घ्यावे. इतर पशूंच्या अंगांचे अवदान उजव्या बाजूकडील घ्यावे. यजनासाठी मृत अश्वाच्या शरीरातील अंगे वेताच्या चटईवर ठेवावीत. कारण, 'वडवा' म्हणजे सबर असलेली घोडी समुद्राच्या पाण्यात बसून राहते व त्या अवस्थेतच प्रसवते. अर्थात् उदक हे अश्वाचे जन्मस्थान आहे. त्याचप्रमाणे वेतही उदकातच उत्पन्न होत असतो. यास्तव, उदकोत्पन्न अशा वेताच्या चटईवर अश्वाची अंगे ठेवली म्हणजे जणू काय मृत अश्वाच्या जन्मस्थानीच त्यांची स्थापना केल्यासारखे होते. 'अश्वमेध' यज्ञात तीन दिवस सुत्येचे अनुष्ठान होत असते. म्हणजे तीन दिवस सोमरसाचे यजन केले जात असते. त्या तीन दिवसांपैकी पहिल्या दिवशी होणाऱ्या अग्निष्टोमात चतुष्टोम नांवाचा स्तोम उपयोगात आणावा. कारण, एकदा एक सरडा अश्वाच्या मांडीवर चढला आणि त्याने त्याच्या मांडीतील मांस ओरबडून खाल्ले. त्यामुळे अश्वाच्या मांडीस झालेली दुखापत चतुष्टोम स्तोमाच्या योगानेच भरून आणली. सारांश, सुत्येच्या तीन दिवसांपैकी पहिल्या दिवशी व्हावयाच्या अग्निष्टोमात उपयुक्त केला जाणारा चतुष्टोम स्तोम अश्वाच्या ठिकाणी असलेल्या अंगवैकल्याचे निवारण

करून त्याला सर्वांगपूर्ण करण्याला कारणभूत होतो. (अनुवाक १२).

प्रपाठक ४

देव आणि असुर यांच्यामध्ये युद्ध झाले. त्यात देव दुर्बल ठरले. त्यांना जय मिळाला नाही. तेव्हा इंद्राच्या विचारदृष्टीस 'तनू' नांवाच्या इष्टका आपल्या ठिकाणी बल उत्पन्न करू शकतील असे दिसून आले आणि त्याप्रमाणे त्याने 'अग्निना विश्वाषाट्' इत्यादि बावीस मंत्रांनी बावीस इष्टका मांडल्या व त्यांच्याकडून त्याने आपल्या ठिकाणी शरीरपुष्टी, इंद्रियपाटव, शौर्य व नैपुण्य संपादन केले.

यास्तव, यजमानाने जर 'इंद्रतनू' नांवाच्या बावीस इष्टका मांडल्या, तर तो देखील त्या इंद्रतनूंची कृपा संपादन करील व त्यांच्याकडून इंद्राप्रमाणेच स्वतःलाही शरीरपुष्टी, इंद्रियपाटव, शौर्य व नैपुण्य स्वतःला मिळवील. शिवाय, असे करण्याने इंद्रासहित अशा अग्नीच्या शरीराचीच जणू मांडणी केल्यासारखे होऊन तो यजमान सर्वप्रकारे बलिष्ठ होतो व त्याचा शत्रू पराभव पावतो.

काही निमित्ताने यज्ञ देवांच्यावर रुसला आणि त्यांना सोडून दुसरीकडे गेला. देव काही त्याला अडवून आणू शकले नाहीत. तेव्हा देवांनी पुष्कळ विचार केला आणि 'यज्ञतनू' नांवाच्या इष्टका आपल्याकडे यज्ञ परत आणावयास उपयोगी पडतील, असे त्यांना आढळून आले. त्याप्रमाणे त्यांनी 'प्रजापतिर्मनसाऽन्योऽच्छेत' इत्यादि तेहतीस मंत्रांनी 'यज्ञतनू' नांवाच्या तेहतीस इष्टका मांडल्या आणि त्यांच्याकडून त्यांनी यज्ञाला परत आपल्यामध्ये आणला.यास्तव, यज्ञ आपल्याजवळ यावा, असे वाटणाऱ्या यजमानाने जर पूर्वोक्त तेहतीस यज्ञतनूनामक इष्टकांची मांडणी केली, तर त्यांच्याकडून तोही यज्ञाला आपल्या सन्निध आणील. एवं च, तेहतीस इष्टका मांडाव्यात. हविर्द्रव्यांचे सेवन करणाऱ्या देवांची संख्याही तेहतीसच आहे. अर्थात् तेहतीस इष्टका मांडल्याने तेहतीस देवतांचेही संपादन केल्यासारखे होते. शिवाय, सशरीर अशा अग्नीचीच मांडणी केल्याचे श्रेय मिळते. 'यज्ञतनू' इष्टकांचे हे माहात्म्य जो जाणतो, तो स्वर्गलोकी शरीरधारी होतो, त्याला स्वर्गलोकाचा उपभोग घडतो.

'ज्योतिष्मतीं त्वा सादयामि' इत्यादि मंत्रांनी 'ज्योतिष्मती' नांवाच्या

बारा इष्टकांचे 'उपधान' म्हणजे मांडणी करावी. त्या योगाने जणू मूर्तिमंत प्रकाशाचेच 'स्थापन' केल्याप्रमाणे होते आणि त्या इष्टकारूपी देवता यजमानाच्या ठिकाणी प्रकाशाची धारणा करतात. शिवाय, ह्या इष्टकांच्या योगाने मांडला जाणारा चितिरूपी अग्नी प्रज्वलित होतो. अर्थात् यजमानानेही जर 'ज्योतिष्मती' नांवाच्या इष्टकांची मांडणी केली, तर स्वत:च्या चितिरूपी अग्नीला त्या इष्टकारूपी देवतांच्याकडून प्रदीप्त केल्यासारखे होते. आणि मग तो अग्नी त्या यजमानाला इहलोकी व परलोकी प्रकाशमान करतो.

'कृत्तिका नक्षत्रं' इत्यादि मंत्रांनी सत्तावीस इष्टका मांडाव्यात. 'नक्षत्र' शब्दाने युक्त अशा मंत्रांनी मांडल्या जात असल्यामुळे त्यांना 'नक्षत्रेष्टका' असे म्हणतात. कृत्तिकादि नक्षत्रे ही द्युलोकामध्ये प्रकाशित होत असतात. यास्तव, यांचे उपधान केल्याच्या योगाने कृत्तिकादि सत्तावीस नक्षत्रदेवतांचेच जणू संपादन केल्याप्रमाणे होते.

द्युलोकात दिसणारी नक्षत्रे म्हणजे शास्त्रविहित अशा पुण्यकर्मांचे आमरण आचरण करणाऱ्या थोर पुरुषांची प्रकाशलेली शरीरेच होत. यास्तव, नक्षत्रेष्टकांचे उपधान केले असता ती पुण्यपुरुषांची द्युलोकात नक्षत्ररूपाने प्रकाशित होणारी शरीरे यजमानाला स्वर्गीय अशा प्रकारचा लाभ करून देतात व तशा प्रकारे लाभलेला प्रकाश यजमानालाही स्वर्गलोकी प्रकाशरूपाने प्रकट होण्यास कारणभूत होतो. या नक्षत्रेष्टका जर एकीशी एक चिकटून मांडल्या तर पर्जन्यवृष्टीचे स्थानच झांकून टाकल्यासारखे होईल व पर्जन्य पडणार नाही. यास्तव या नक्षत्रेष्टका परस्परांना चिकटून न मांडता थोडे थोडे अंतर टाकून मांडाव्यात म्हणजे पर्जन्यवृष्टीला स्थान करून दिल्याप्रमाणे होते व पर्जन्य पडतो.

स्वयमातृण्णेच्या दक्षिण बाजूस पूर्वदिशेस प्रारंभ करून पश्चिमेकडे शेवट होईल अशा प्रकारे 'कृत्तिका' पासून 'विशाखा' नामक इष्टकेपर्यंतच्या इष्टका मांडाव्यात आणि 'स्वयमातृण्णे' च्या उत्तरबाजूस पश्चिमेकडून प्रारंभ करून पूर्वदिशेस शेवट होईल अशा रीतीने 'अनुराधा' नामक इष्टकेपासून 'अपभरणी' नामक इष्टकेपर्यंतच्या इष्टकांची मांडणी करावी. (अनुवाक १).

सर्व ऋतू कार्यक्षम व्हावेत, म्हणून 'मधुश्च माधवश्च' इत्यादि मंत्रांनी बारा इष्टका मांडाव्यात. मांडणी करताना दोन दोन इष्टका जोडीजोडीने मांडाव्यात.

कारण दोन दोन महिन्यांनी एक एक ऋतूची सिद्धता होत असते.

अग्निचयनाचे एकावर एक असे पांच थर मांडले जात असतात. ह्या पांच थरांपैकी तिसरा किंवा मधला थर आकाशाप्रमाणे निराधार असतो. तो भूमीलाही चिकटलेला नसतो व द्युलोकालाही स्पर्श करीत नाही. यास्तव, निराधार अशा या थराची धारणा व्हावी, तो स्थिर व्हावा म्हणून इतर थरांच्या ठिकाणी दोन दोन इष्टका मांडल्या जातात. तसे न करता या थरात चार 'ऋतव्ये'ष्टका मांडाव्यात. भिंतीच्या ठिकाणी दृढता उत्पन्न होण्यासाठी ज्याप्रमाणे ती बांधताना तिच्यामध्ये लहान लहान दगड बसवितात त्याचप्रमाणे अग्निचयनाला दृढता येण्यासाठी 'ऋतव्या' नामक इष्टकांची मांडणी करणे अवश्य असते. अर्थात् 'ऋतव्या' संज्ञक इष्टकांचे उपधान केले, तर त्या अग्निचयनाला दृढता आणण्यास कारणभूत होतात. ऋतव्या इष्टका मांडल्या म्हणजे त्यांच्यावर शेवाळ पसरावे. कारण, उदक हे अग्नीचे उत्पत्तिस्थान आहे व शेवाळ हे उदकापासूनच निर्माण झालेले असते. अर्थात् उदक व शेवाळ ही एकरूपच होत. यास्तव, ऋतव्येष्टकांच्यावर शेवाळ पसरले म्हणजे जन्मस्थानासह अग्नीची मांडणी केल्याप्रमाणे होते.

शेवाळाने युक्त अशा ऋतव्येष्टका ज्या यजमानाच्या अग्निचयनात मांडल्या जातात तो यजमान उत्कृष्ट ज्ञाता आणि ब्राह्मणोचित वृत्तीने वर्तन करणारा होऊन सर्वकाळ अन्नाचा यथेच्छ उपभोग घेतो, असे विश्वामित्र महर्षी म्हणतो. फार तर काय? शेवाळाने युक्त अशा ऋतव्या इष्टकांच्या उपधानाचे महत्त्व जो जाणतो, तो देखील, विद्वान् व स्ववर्णोचित आचरणाने भरपूर अन्न संपादन करतो.

इष्टकांचे एकावर एक पांच थर मांडून अग्निचयनाची पूर्तता केली, परंतु त्या यजमानाला पुढे करावयाच्या क्रतूस लागणारी द्रव्यानुकूलता लाभत नाही व त्याच्या हातून क्रतूचे म्हणजे सोमयज्ञाचे अनुष्ठान न घडल्यामुळे तो समाजात प्रतिष्ठित होत नाही. कारण, अग्निचयनामध्ये 'ऋतव्या' इष्टका मांडून ऋतूंचे आनुकूल्य संपादन केले असले तरी त्या ऋतूंच्या समवायाचा अधिपती असलेल्या संवत्सराभिमानी देवाची अनुकूलता करून घेण्याचे तो यजमान विसरलेला असतो. अर्थात् त्याच्यावर रुसलेला 'संवत्सर' त्या यजमानाच्या प्रतिष्ठेच्या आड येत असतो. यास्तव, अशा यजमानाने पूर्वीच्या पांच थरांवर

इष्टकांचा आणखी एक सहावा थर द्यावा. वसंतादि ऋतू सहाच आहेत. सहा ऋतूंच्या समवायानेच 'संवत्सर' सिद्ध होतो. एवं च, सहावा थर मांडल्याने सहा ऋतूंच्या द्वारा संवत्सरदेवतेला अनुकूल करून घेतल्यासारखे होते व तो यजमान कृतकार्य होऊन समाजात प्रतिष्ठा पावतो. सहाव्या थरामध्ये 'संयच्च प्रचेताश्च' इत्यादि मंत्रांनी पांच इष्टका मांडाव्यात. या इष्टकांना 'अधिपत्नी' असे नांव आहे. ज्या यजमानाच्या अग्निचयनाचे ठिकाणी या 'अधिपत्नी' इष्टकांचे पूर्वोक्त मंत्रांनी उपधान केले जाते, तो यजमान आपल्या बरोबरीच्या सर्व लोकांत आधिपत्य मिळवितो. या 'अधिपत्नी' विटांची मांडणी करतेवेळी यजमान ज्या मनुष्याचा द्वेष करीत असेल त्याचे मनात ध्यान करावे. म्हणजे यजमानाने आपला शत्रू असलेल्या त्या माणसाला 'अधिपत्नी' देवतांच्या पासून दूर केल्यासारखे होते व तो सत्वरच मरतो.

अग्निचयनसाध्य अशा यज्ञाचे अनुष्ठान पूर्ण करून अंगिरस महर्षी जेव्हा स्वर्गलोकी गेले, तेव्हा त्यांनी यज्ञ आपल्या स्वाधीन राहण्याचे साधनभूत असलेले सर्व द्रव्यही यज्ञास उपस्थित असलेल्या ऋषींना देऊन टाकले. ते द्रव्य सुवर्णरूप झाले. यास्तव, सुवर्णाची शकले हाती घेऊन त्या शकलांनीच 'सहस्रस्य प्रमा असि' इत्यादि पांच मंत्र म्हणून अग्निचयनाचे प्रोक्षण करावे. असे केल्याच्या योगाने सुवर्णरूपी यज्ञाचे मूल्य म्हणून ऋषींना दिल्यासारखे होऊन त्यांच्याकडून यजमानाने यज्ञ विकत घेतल्यासारखे होते. अशा प्रकारचे प्रोक्षण यज्ञात होणाऱ्या वैकल्याचा परिहार करणाऱ्या ओषधाप्रमाणे त्या यजमानाच्या उपयोगी पडते. शिवाय, चितिरूपी अग्नीला हिरण्याच्या संयोगाने यजमानाने रूपसमृध्द केल्यासारखे होऊन तो यजमान हिरण्यरूपी प्रकाशाच्या साहाय्याने स्वर्गाचा मार्ग पाहू शकतो व शेवटी स्वर्गलोकाला प्राप्त होतो.

हिरण्यशकलांनी अग्निचयनाचे प्रोक्षण करताना 'साहस्र' हा शब्द ज्या मंत्रसंघात आहे, अशा 'सहस्रस्य प्रमा असि' इत्यादि पांच मंत्राचे पठण करून प्रोक्षण करावे. हजारोंच्या संख्येने जगाची उत्पत्ती करीत असल्याने सृष्टिकर्ता प्रजापती हा 'साहस्र' आहे. यास्तव, 'साहस्र' **शब्दयुक्त** अशा संत्रसंघाचे पठण करून हिरण्यशकलांनी अग्निचयनाचे प्रोक्षण केले असता ते यजमानाला 'प्रजापती' देवाचीच प्राप्ती करून देण्याला कारणभूत होते.

यजमानाने 'इमा मे अग्न इष्टका धेनवः सन्तु' इत्यादि मंत्र म्हणावा.

म्हणजे त्या यजमानाने अग्निचयनात मांडलेल्या सर्व इष्टकांना जणू काय धेनूच केल्यासारखे होते आणि इच्छित कामनांच्या फलांची धार सतत देणाऱ्या त्या इष्टकारूपी कामधेनू इहलोकी व परलोकी त्या यजमानाच्या कामना पुरविण्यासाठी सदैव त्याच्या सन्निध उभ्या असतात. (अनुवाक २).

मांडण्यांत येत असलेला 'अग्निचयन' जेव्हा संपूर्णपणे मांडला जातो, तेव्हा त्याच्या ठिकाणी पूर्णत्वाने अग्नी उत्पन्न होतो. हा अग्नी म्हणजेच प्राण्यांना आलेल्या दु:खांना वितळविणारा 'रुद्र' देव होय. वासरू जसे जन्मताक्षणीच स्तनपानाची इच्छा करते, त्याचप्रमाणे हा अग्निरूपी रुद्रदेवही जन्मताक्षणीच आपल्याला काही तरी भाग मिळण्याची इच्छा करीत असतो. अर्थात् त्या अग्निरूपी रुद्रदेवाला जर आहुती देऊन संतुष्ट केला नाही तर तो अध्वर्यू व यजमान यांनाच भक्षण करण्यास प्रवृत्त होतो. यास्तव, तसे न व्हावे, आणि चित्यग्निरूपी रुद्रदेव संतुष्ट व्हावा, म्हणून ज्यामध्ये असंख्य अशा रुद्रांचे प्रतिपादन झालेले आहे, अशा 'शतरुद्रीय' संज्ञक अध्यायाचे पठण करून चयनाग्निरूपी रुद्राला हविर्द्रव्याची आहुती द्यावी. असे केल्याने रुद्रदेवाला प्रिय असलेल्या हविर्द्रव्याने त्याला तृप्त केल्यासारखे होते व त्याच्या अनुग्रहामुळे अध्वर्यू व यजमान हे दोघेही प्राणसंकटात पडत नाहीत. 'शतरुद्रीय' अध्यायाचे पठण करून गाय, म्हैस, शेळी इत्यादि ग्राम्य पशूंच्या दुधाने जर हवन केले, तर ग्राम्य पशूंना संतापप्रद अशा रोगाने ग्रस्त केल्याचा दोष यजमानास लागेल. अरण्यात राहणाऱ्या पशूंच्या दुधाने जर हवन केले, तर यजमानाने अरण्यात संचार करणाऱ्या पशूंच्यावर रोगाची आपत्ती आणल्यासारखे होईल. यास्तव, तसे न करता रानतिळांचा किंवा रानगव्हांचा लापशीसारखा अगदी पातळ असा चरू करावा व त्याची आहुती द्यावी. म्हणजे ग्राम्य व आरण्य या दोन्ही पशूंची हत्या यजमानाकडून घडत नाही.

यावर, कोणी असे म्हणतात की, आहुती जी द्यावयाची ती आपण जे अन्न खातो त्या अन्नाची द्यावी. रानतीळ किंवा रानगहू हे काही मनुष्यांनी अन्न म्हणून सेवन करण्याचे पदार्थ नाहीत. अर्थात् रुद्रदेवतेला आहुती देण्यास रानतीळ किंवा रानगहू अयोग्य होत. यास्तव, शेळीच्या दुधाने आहुती द्यावी. कारण शेळी व अग्नी ही दोघेही प्रजापतीच्या मुखापासून उत्पन्न झालेली आहेत. अर्थात् अशा प्रकारच्या सजातीयत्वामुळे 'शेळी' ही 'आग्नेयी' म्हणजे

अग्निसंबध्द आहे. यास्तव शेळीच्या दुधाने रुद्राचे हवन केले असता अग्निचयन रूपी रुद्र संतुष्ट होतो आणि यजमानाकडून ग्राम्य व आरण्य पशूंची हत्याही घडत नाही.

अंगिरस महर्षी जेव्हा स्वर्गाला गेले, तेव्हा प्रवर्ग्याचे वेळी 'महावीर' संज्ञक पात्रात अत्यंत कढत असे तूप व दूध यांचे जे मिश्रण होते ते त्यांनी स्वर्गलोकी जाण्याच्या गडबडीत चुकून शेळीच्या अंगावरच सर्व फेकून दिले. त्याबरोबर त्या कढत अशा तुपादुधाच्या मिश्रणाने त्या शेळीचे सर्व शरीर होरपळून गेले व त्या शेळीला फार दुःख झाले आणि अंगाने होरपळलेल्या शेळीच्या शरीरावरील सर्व केस भूमीवर गळून पडले ! ते शेळीचे केशच 'अर्क' म्हणजे 'रुई' नांवाच्या वृक्षाच्या रूपाने वाढीस लागले. प्रवर्ग्याच्या अनुष्ठानात उपयोगात आणलेल्या पूज्य अशा महावीर पात्रातील तुपादुधाच्या अत्युष्ण मिश्रणापासून आणि अग्निसंबध्द अशा शेळीच्या केशसंघातापासून उत्पन्न झाल्यामुळेच त्या वृक्षाला 'अर्क' असे नांव प्राप्त झाले. यास्तव, अर्कपर्णाच्या अर्थात् रुईच्या पानाच्या द्रोणाने शेळीच्या दुधाची आहुती द्यावी. म्हणजे ते पान व शेळीचे दूध या दोघांच्या ठिकाणी समानयोनित्व संपादन केल्यासारखे होते.

अग्निचयनाच्या उत्तर बाजूस उभे राहून शतरुद्रीय मंत्रांनी शेळीच्या दुधाचे हवन करावे. कारण, उत्तर दिशा ही रुद्राच्या आधिपत्याखाली असते. यास्तव, उत्तर दिशेस उभे राहून हवन केले असता रुद्राला स्वकीय वाटेल अशा त्याच्या स्वतःच्या दिशेस यजमानाने पोचविल्यासारखे होते. अग्निचयनामध्ये अगदी शेवटी जी इष्टका मांडली असेल, त्या इष्टकेवर हवन करावे. म्हणजे क्रूर अशा रुद्रदेवतेला अग्निचयनाच्या अंतिम मर्यादेपासून यजमानाने दूर केल्यासारखे होते.

'नमस्ते रुद्र मन्यव' येथून 'सभापतिभ्यश्च वो नमः' येथपर्यंत एक, 'नमो अश्वेभ्यः' येथून 'अवार्याय च' येथपर्यंत एक आणि 'नमः प्रतरणाय' येथून 'ये एतावन्तः' इत्यादि तीन ऋचांसह एक याप्रमाणे 'शतरुद्रीय' अध्यायाचे तीन विभाग करून हवन करावे. पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु हे तीन लोक आहेत. यास्तव, तीन विभागांनी हवन केल्याच्या योगाने यजमान जणू काय पृथिव्यादि तिन्ही लोकांना समानतेने सामर्थ्यसंपन्न करतो.

'शतरुद्रीय' संज्ञक अध्यायाच्या पहिल्या विभागाने आहुती देतांना स्रुची गुडघ्याइतक्या उंचीवर धरावी. दुसऱ्या विभागाने आहुती देताना नाभीइतक्या उंचीवर स्रुची धरावी आणि तिसऱ्या विभागाने आहुती देताना स्रुची मुखाइतक्या उंचीवर धरावी. पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु हे तीन लोक एकापेक्षा एक उंच आहेत. यास्तव, एकापेक्षा एक अशा उंच स्थानावरून आहुती दिल्याच्या योगाने यजमानाने जणू काय तिन्ही लोकांना शांत केल्यासारखे होते.

अग्निचयनाच्या सभोवती फेरी घालून जर शतरुद्रीय मंत्रांनी आहुती दिली, तर त्या रुद्राला अग्निक्षेत्रात प्रविष्ट करून संचार करण्यास अवकाश दिल्यासारखे होईल व अशा रीतीने अग्निचयनक्षेत्रात संचार करू लागलेला रुद्र स्वभावत: क्रूर असल्यामुळे तो यजमानाला उपद्रव करील. यास्तव, अग्नीचयनाभोवती फेरी घालून आहुती देऊ नये. परंतु, यावर अभिज्ञ लोक असे म्हणतात की, रुद्र हा सर्वदा सर्वत्र संचार करणारा असल्यामुळे तो कोणत्या दिशेस आहे व कोणत्या दिशेस नाही, हे समजण्यास कोण समर्थ आहे? यास्तव, रुद्राला शोधण्यासाठी अग्निचयनाभोवती फेरी घालूनच आहुती द्यावी. म्हणजे ज्या कोणत्या ठिकाणी रुद्र असेल, त्याला न वगळता यजमानाने त्यास शांत केल्यासारखे होईल. आणि अशा प्रकारे शांत झालेला रुद्र अग्निक्षेत्रात संचार करू लागला तरी तो यजमानाला उपद्रव करणार नाही.

'नमो रुद्रेभ्यो ये' इत्यादि तीन यजुर्मंत्रांच्या ठिकाणी ज्या देवतांचे प्रतिपादन केलेले आहे, त्या सर्व देवता स्वर्गप्राप्तीला कारणीभूत होणाऱ्या असल्यामुळे उत्कृष्ट अशा आहेत. शतरुद्रीयाच्या शेवटी असणाऱ्या मंत्रांत प्रतिपादन असणे, हेही त्या देवतांच्या उत्तमत्वाचे गमक आहे. यास्तव, 'नमो रुद्रेभ्यो ये' इत्यादि तीन यजुर्मंत्र अध्वर्यूने यजमानाकडून म्हणून घ्यावेत. असे केल्याच्या योगाने त्या यजुर्मंत्रांच्या ठिकाणी प्रतिपादित झालेल्या उत्कृष्ट देवतांच्याकडूनच अध्वर्यूने यजमानाला स्वर्गलोकाला प्राप्त केल्यासारखे होते.

यजमान ज्या मनुष्याचा द्वेष करीत असेल त्या मनुष्याचे पशू येण्याजाण्याच्या मार्गात ते रुईचे पान टाकावे. म्हणजे यजमानाचा द्वेष्य असलेल्या मनुष्याचा जो पशू प्रथम त्या रुईच्या पानावर पाय देऊन उभा राहील, तो मरेल. (अनुवाक ३).

उदकाने भरलेला कुंभ हाती घ्यावा आणि 'अश्मन्नूर्जं पर्वते.' हा मंत्र

म्हणत असताना त्या कुंभातील उदकाची अखंड धार पाडवीत अग्निचयनाभोवती प्रदक्षिणाकार फिरावे. असे केल्याने अध्वर्यूने अग्निचयनाला उदकसिंचनाने शुद्ध केल्यासारखे होते. इतकेच नव्हे, तर त्या चितिरूपी अग्नीला तृप्त केल्याप्रमाणे होते. आणि तो तृप्त झालेला अग्नी क्षुधेच्या पीडेने रहित असा होऊन आपली मांडणी करणाऱ्या यजमानाची सेवा करतो.

अग्निचयनाभोवती उदकसिंचनाचे हे महत्त्व ज़ो जाणतो तोही प्रजा व पशू यांच्या योगाने तृप्त होतो. अग्निचयनाभोवती उदकधारा पाडवितांना म्हणावयाच्या पूर्वोक्त मंत्राचा 'तान्न इषमूर्जं धत्त मरुत: संरराणा:' असा चौथा चरण म्हटला जातो. 'ऊर्क्' म्हणजे बलोत्पादक अन्न असून अन्नाचे संपादन करणारे 'मरुत्' हे अन्नरूपच आहेत. यास्तव, ह्या चौथ्या चरणाच्या पठणाने यजमानाला अन्न प्राप्त होते. उदकधारा पाडवीत अग्निचयनाभोवती तीन प्रदक्षिणा घालाव्यात. कारण अग्नी आहवनीयादि तीन रूपे धारण करणारा आहे. यास्तव, त्याच्याभोवती त्रिवार फिरून उदकसिंचन केल्याच्या योगाने तीन स्वरूपे धारण करणाऱ्या अग्नीच्या दु:खाचे शमन केल्यासारखे होते.

'अश्मंस्ते क्षुदमुं ते' या मंत्राने पूर्वीच्या उलट दिशेने अग्निचयनाभोवती उदकाची धार न पाडविता तीन वेळ फिरावे. 'अश्मंस्ते क्षुदमुं ते शुगृच्छतु' असा पूर्वीचा मंत्र आहे त्या मंत्राच्या पठणाने यजमान ज्याचा द्वेष करतो त्या माणसाला आपल्या यजमानाला लागणारी क्षुधा व तज्जन्य पीडा ही दोन्ही अर्पण केल्यासारखी होतात. म्हणजे त्या माणसाला क्षुधेची पीडा होते.

तीन सुलट व तीन उलट मिळून अग्निचयनाभोवती सहा प्रदक्षिणा होतात. ऋतू सहाच आहेत. यास्तव, सहा प्रदक्षिणांच्या योगाने सहा ऋतूंच्या कडून अध्वर्यूने चितिरूपी अग्नीच्या दु:खाचे शमन केल्याप्रमाणे होते. उदकात उत्पन्न होणारा वेतस् म्हणजे 'वेत' नांवाचा वेल हा जणू उदकांचे पुण्यच असून शेवाळ हे उदकांचे सार आहे. यास्तव, वेताची काठी आणि शेवाळ दोन वस्तू हाती घेऊन त्या अग्निचयनावर सर्व बाजूंनी फिरवाव्या. उदके ही स्वभावत:च शांत असतात. यास्तव, उदकांशी संबंध असलेल्या पूर्वोक्त वस्तू 'समुद्रस्य त्वा' इत्यादि ऋचा म्हणत असताना अग्निचयनावर फिरविल्या असता अध्वर्यूने जणू काय शांत अशा ऋङ्.मंत्रांनी चितिरूपी अग्नीच्या दु:खाचे

शमन केल्याप्रमाणे होते.

इष्टकांचे पांच थर एकावर एक मांडून तयार केलेल्या अग्नीवर जो पशू प्रथम चढेल त्या पशूला अग्नी आपल्या धगीने जाळून टाकण्यास समर्थ होईल. यासाठी वेताची काठी व शेवाळ या दोन वस्तूंच्या बरोबरच एक बेडूकही चितिरूपी अग्नीवरून फिरवांवा. पशुसमूहात बेडूक हा प्राणी निरुपयोगी, अर्थात् कोणाकडूनही त्याचे उपजीवन होण्यास पात्र नसतो. कारण, यज्ञोपयोगी अशा गाय, म्हैस इत्यादि ग्राम्य पशूंत किंवा अरण्यसंचारी पशूंत बेडकाची गणना होत नाही. अर्थात् अग्नीचयनावरून बेडकाला फिरवला असता अध्वर्यूने जणू काय त्या निरुपयोगी बेडकाला अग्नीच्या धगीत लोटल्यासारखे होते.

'समुद्रस्य त्वा.' इत्यादि आठ ऋचांनी वेताची काठी, शेवाळ व बेडूक एकदमच अग्निचयनावरून फिरवावीत. गायत्री छंद हा अष्टाक्षरी चरणांनीच बनलेला असतो. अग्नी हा गायत्री छंदाशी संबध्द म्हणजे गायत्रीछंदस्वरूपच आहे. यास्तव, चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने गायत्रीछंदस्वरूप अग्नी जेवढा आहे, तितकीच संख्या असलेल्या आठ ऋचांनी वेताची काठी इत्यादि तिन्ही वस्तू फिरविल्याने त्या अग्नीच्या दु:खाचेच शमन केल्याप्रमाणे होते.

आता सांगितलेल्या ऋचांमध्ये 'पावक' हा शब्द अनेकदा आला असल्यामुळे या आठही ऋचांना 'पावकवती' अशी संज्ञा आहे 'पावकवती' अशा पूर्वोक्त ऋचांनी पूर्वोक्त वस्तू अग्निचयनावरून फिरवाव्यात. पावक म्हणजे अपवित्रास पवित्र करणारा अग्नी हा अन्नरूपच आहे. यास्तव, अन्नस्वरूप अशा अग्नीचा वाचक असणारा 'पावक' शब्द ज्यात आहे अशा ऋचांनी पूर्वोक्त वस्तू अग्निचयनावरून फिरविल्या असता अन्नानेच चितिरूपी अग्नीच्या दु:खाचे शमन केल्याप्रमाणे होते. 'अपामिदं न्ययनं' व 'नमस्ते हरसे' या दोन मंत्रांनी अग्निचयनावर चढावे अग्नि हा दाहक असल्यामुळे, तो मृत्युरूपच आहे. व कृष्णाजिन म्हणजे हरणाचे कातडे हे वेदरूप आहे. यास्तव, पूर्वोक्त वस्तू अग्निचयनावर फिरविण्यासाठी त्याच्यावर चढताना कृष्णाजिनाच्या वाहणा पायात घालून चढावे. म्हणजे वेदाकडूनच अध्वर्यूने स्वत:ला मृत्यूपासून दूर राखल्यासारखे होते.

दोन्ही पायांत कृष्णाजिनाच्या वाहणा न घालता वर चढले तर अध्वर्यूला मृत्यूची बाधा होईल व दोन्ही पायांत कृष्णाजिनाच्या वाहणा घालून चढले

तर अध्वर्यू मृत्यूपासून दूर होईल, परंतु, त्याबरोबर अन्नसेवनशक्तीपासूनही तो दूर होईल, असे अभिज्ञ म्हणतात. परंतु, या अडचणीचा परिहार असा की, एकाच पायात अध्वर्यूने वाहाण घालावी व दुसरा पाय तसाच ठेवावा. असे केल्याने अध्वर्यूला मृत्यूपासून दूर राहता येईल व सेवनीय असे अन्न सेवन करण्याची शक्तीही तो संपादन करील. अग्निचयनावर चढताना म्हटल्या जाणाऱ्या पूर्वोक्त दोन मंत्रांतील दुसऱ्या मंत्राचा 'नमस्ते अस्त्वर्चिषे' असा दुसरा चरण आहे. त्याचे पठन केले असता चाकर ज्याप्रमाणे आपल्या धनसंपन्न यजमानाला प्रथम नमस्कार करून मग त्याची सेवा करतात त्याचप्रमाणे अग्निचयनावर चढताना त्याला प्रथम नमस्कार करून नंतर अध्वर्यूने त्याच्यावर चढावे, हे उचित होय. 'अन्यं ते अस्मत्तपन्तु हेतयः' असा ह्या मंत्राचा तिसरा चरण म्हटला जातो. असे केले असता अध्वर्यूने यजमान ज्याचा द्वेष करतो त्या माणसाला चयनरूपी अग्नीच्या धगीत लोटल्याप्रमाणे होते. 'पावको अस्मभ्यं शिवो भव' असा त्या मंत्राचा चौथा चरण आहे. ह्याच्या पठणाच्या योगाने अन्नरूप असलेला पावक नांवाचा अग्नी यजमानाला अन्नाची प्राप्ती करून देतो. दोन पायांच्या आधारावर मनुष्य प्रतिष्ठित झालेला असतो. चितिरूपी अग्नीच्या ठिकाणी चढणाऱ्या अध्वर्यूला प्रतिष्ठा प्राप्त व्हावयासाठी, त्याने पूर्वोक्त दोन ऋचा पठण करून अग्निचयनावर चढावे. ह्या दोन ऋचांपैकी पहिल्या ऋचेत 'अप्' हा शब्द आला असल्यामुळे या दोन ऋचांना 'अपस्वती' म्हणजे 'अप्' शब्दाने युक्त असणाऱ्या असे नांव आहे. या उदकवाचक असलेल्या 'अप्' शब्दयुक्त अशा दोन ऋचा म्हणून अग्निचयनावर चढले असता चितिरूपी अग्नीपासून लागणारी धग शांत होते. (अनुवाक ४).

'नृषदे वट्' इत्यादि पांच मंत्रांपैकी एका एका मंत्राने एक एक अशा पांच आहुती अग्निचयनावर द्याव्यात. पांच ही संख्या पंक्तिवाचक आहे. पंक्तिरूप अशी आहुती दिल्याच्या योगाने यज्ञाच्या मुख्य अंगाला प्रारंभ केल्यासारखे होते.

पांच आहुतींपैकी पहिल्या चार आहुती अग्निचयनाच्या एका एका कोनापासून मध्यापर्यंत धार पाडवून द्याव्यात. कारण पशू निजते वेळी आपले चारी पाय कोणाकृतीने आखडून घेत असतात. पंक्तिरूप अशा दिलेल्या पांच आहुती अग्निचयनाच्या प्रतिष्ठेला कारणभूत होतात.

मंत्राच्या शेवटी वषट्काराचा उच्चार करून म्हणजे 'वौषट्' असे म्हणून जर

आहुती दिल्या, तर होत्याने उच्चारावयाचा 'वषट्कार' शिळा होईल, आणि वषट्काराचा उच्चार न केला तर राक्षस यज्ञाचा नाश करतील. यासाठी 'नृषदे' इत्यादि मंत्राच्या शेवटी 'वट्' असे म्हणून आहुती द्याव्यात. म्हणजे अप्रत्यक्षपणे 'वषट्कार'च उच्चारल्याप्रमाणे होईल. आणि होत्याचा 'वषट्कार' शिळा होणार नाही व राक्षस ही यज्ञाचा नाश करणार नाहीत. इंद्र इत्यादि देव आहुतिरूपाने दिल्या जाणाऱ्या हविर्द्रव्याचे भक्षण करणारे असल्यामुळे त्यांना 'हुताद' अशी संज्ञा असून दुसरे 'प्राण' इत्यादि देव हविर्द्रव्याचे भक्षण करीत नसल्यामुळे त्यांना 'अहुताद' असे नांव आहे. या दोनही प्रकारच्या देवांना प्रसन्न करणे, हे 'अग्निचयन' करणाऱ्या यजमानाला उचित आहे. यास्तव, 'ये देवा देवानां' व 'ये देवा देवेषु' हे दोन मंत्र म्हणून दही आणि मध यांचे मिश्रण अग्निचयनावर सिंचन करावे. म्हणजे हुताद व अहुताद ह्या दोन्ही प्रकारच्या देवांना यजमानाने संतुष्ट केल्यासारखे होते व त्यामुळे ते देवही अग्निचयन करणाऱ्या यजमानाला संतुष्ट करतात. दह्याच्या योगाने 'हुताद' संज्ञक देवांना आणि मधाच्या योगाने 'अहुताद' नामक देवांना यजमान संतुष्ट करतो. शिवाय, दही हे ग्राम्य अन्न असून मध हे अरण्यात उत्पन्न होणारे अन्न आहे. म्हणून दोघांच्या मिश्रणाने अग्निचयनावर सिंचन केले असता ते दोन्ही प्रकारची अन्ने यजमानाला मिळवून देण्यास कारणभूत होते.

मोठ्या एका दर्भमुष्टीने ते दही व मध यांचे मिश्रण अग्निचयनावर शिंपडावे. प्रजापतीप्रमाणे दर्भमुष्टी प्रौढ असल्यामुळे ती प्रजारूपच आहे. अग्नी हा देखील प्रजापतीपासून उत्पन्न झाला असल्यामुळे तोही प्रजापतिसंबध्द आहे. म्हणून दर्भमुष्टीने केलेल्या सिंचनाने दर्भ व चितिरूप अग्नी यांच्या मध्ये 'समानयोनित्व' म्हणजे सहोदरत्व निर्माण केल्यासारखे होते. दोन मंत्रांनी केलेले सिंचन अग्निचयनाच्या प्रतिष्ठेला कारणभूत होते.

जो यजमान अग्निचयनावर चढतो तो प्राण, प्रजा व पशू यांच्यापासून वियुक्त होतो. यासाठी 'प्राणदा अपानदा' या मंत्राने अग्निचयनावरून खाली उतरावे. या मंत्रामध्ये प्राण, बलवाचक असा वर्च, आणि पशूंचा उपलक्षक वरिव हे तीन शब्द अनुक्रमे आलेले आहेत. 'प्राणदाः' हा मंत्रभाग उच्चारल्याने यजमानाच्या शरीराचे ठिकाणी प्राण सुस्थित होतात, 'वर्चोदाः' हा मंत्रभाग उच्चारल्याने यजमानाला पुत्रपौत्रादि प्रजांचा लाभ होतो आणि वरिवोदाः'

या मंत्रांशाच्या उच्चाराने गाई इत्यादि पशूंची यजमानाला प्राप्ती होऊन त्यांच्यापासून मिळणाऱ्या दूध इत्यादि पदार्थांच्या समृध्दीने तो समाजात पूज्यतेला प्राप्त होतो.

इंद्राने आपल्या हातातील वज्राने वृत्रासुरावर प्रहार केला. त्याबरोबर वृत्रासुराने आपल्या आसुरी मायेने मोठमोठ्या फणा असलेली सर्पांची सोळा स्वरूपे एकदम धारण केली आणि इंद्राच्या हस्तपादादि अवयवांच्या ठिकाणी त्या सोळाही शरीरांनी अनेकवार दंश केला. तेव्हा, प्रतिकार करण्यासाठी काय उपाय योजावा याविषयी इंद्राने विचार केला तेव्हा 'अनीकवान्' म्हणजे सैन्याने युक्त अशा अग्नीला प्रसन्न करून घेतल्यास वृत्रासुरापासून होणाऱ्या पीडेचा प्रतिकार करता येईल असे त्यास आढळून आले व त्याप्रमाणे त्याने 'अग्निस्तिग्मेन शोचिषा' व 'सैनानीकेन सुविदत्र:' या दोन मंत्रांनी 'अनीकवान्' संज्ञक अग्नीला आहुती दिली. त्या आहुतीने तृप्त झालेल्या अग्नीने वृत्रासुराने धारण केलेली सर्पांची सोळाही शरीरे जाळून टाकली. नंतर इंद्राने 'य इमा विश्वा भुवनानि' व 'चक्षुष: पिता मनसा' असा प्रारंभ होणाऱ्या दोन सूक्तांच्या योगाने दोन आहुती देऊन 'वैश्वकर्मण' होम केला आणि वृत्रासुराच्या वधामुळे आपणास लागलेल्या पातकापासून त्याने आपली मुक्तता करून घेतली. यास्तव, अग्निचयन करणाऱ्या यजमानाने जर पूर्वोक्त दोन मंत्रांनी 'अनीकवान्' अग्नीला आहुती दिली, तर त्या अग्नीला स्वकीय वाटेल असा आहुतिरूप भाग देऊन संतुष्ट केल्यासारखे होईल व अशा प्रकारे संतुष्ट झालेला तो अग्नी रोगादिरूपाने दृष्ट होणाऱ्या पातकापासून यजमानाला मुक्त करील आणि 'वैश्वकर्मण' होमाच्या योगाने स्वत:च्या ठिकाणी नरकप्राप्तीला कारणभूत होणाऱ्या पातकापासून यजमान मुक्त होईल.

ज्या यजमानाविषयी, तो सावकाशपणाने पातकापासून मुक्त व्हावा असे जर अध्वर्यूला वाटत असेल, तर त्याने पूर्वोक्त दोन सूक्तांतील प्रत्येक मंत्राने एक आहुती द्यावी. म्हणजे त्याचा यजमान सावकाशपणे पातकापासून मुक्त होईल. आणि आपला यजमान तात्काल पातकापासून मुक्त व्हावा, असे ज्या यजमानाविषयी अध्वर्यूला वाटत असेल त्याने सर्व सूक्तांचे पठण करून शेवटी आहुती द्यावी. अशा रीतीने पूर्वोक्त दोन सूक्तांनी दोन आहुती द्याव्या म्हणजे यजमान पातकापासून तत्काल मुक्त होतो. दोन सूक्तांनी दोन आहुती दिल्याने अध्वर्यूने जणू काय यजमानाच्या ठिकाणी द्विगुणित सामर्थ्य संपादन

केल्यासारखे होते व दोन सूक्तांनी केलेला 'वैश्वकर्मण' होम यजमानाच्या प्रतिष्ठेला कारणभूत होतो. (अनुवाक ५).

'उदेनमुत्तरां नय' इत्यादि मंत्रांनी समिधा अग्नीवर द्याव्या. प्रवासास जाणाऱ्या एखाद्या मनुष्याला वाटेने त्याच्या भुकेचे रक्षण व्हावे म्हणून काही तरी 'पाथेय' म्हणजे उपहाराच्या वस्तू देतात. त्याचप्रमाणे या समिधा देणे म्हणजे पुढे घेऊन जावयाच्या असलेल्या त्या अग्नीला दिलेले पाथेयच होय.

तीन मंत्रांनी तीन समिधा अग्नीवर द्याव्या. कारण, अग्नी तीन प्रकारंची रूपे धारण करणारा आहे. म्हणून अग्नी जितकी रूपे धारण करतो तितक्याच समिधा त्याला त्याचा भाग म्हणून अध्वर्यूने दिल्याप्रमाणे होते. समिधा उंबराच्या असाव्यात. उंबर हा अन्नरूप आहे. यास्तव, उंबराच्या समिधा देऊन तृप्त केलेला अग्नी यजमानाच्या ठिकाणी अन्न संपादन करून ठेवतो. अग्नीचे प्रणयन करताना म्हणजे त्याला पुढे घेऊन जाताना 'उदु त्वा विश्वे देवा' हा मंत्र म्हणून स्वस्थानापासून तो वर उचलावा. 'प्राण' हेच विश्वेदेव होत. यास्तव, पूर्वोक्त मंत्राने अग्नी वर उचलला असता अध्वर्यूने जणू काय विश्वेदेवांच्या कडून त्याला वर उचलल्यासारखे होते. 'अग्ने भरंतु चित्तिभिः' असा पूर्वोक्त मंत्राचा दुसरा चरण आहे. त्याच्या पठणाने चित्तात योजलेल्या ज्या कार्यासाठी अग्नीला उचलून धरावयाचा असतो, त्या नियोजित कार्यानेच जणू अग्नीला समृध्द केल्याप्रमाणे होते.

आहवनीयातून काढून घेतलेल्या व पूर्वोक्त मंत्राने वर उचललेल्या अग्नीचे प्रणयन करावे म्हणजे तो अग्नी आग्नीध्रीय मंडपापर्यंत पुढे घेऊन जावा. जाते वेळी 'पंच दिशो दैवीः' इत्यादि पांच ऋचा पठण कराव्या. म्हणजे पांचही दिशांना यज्ञाचे रक्षण करण्याविषयी यजमानाने प्रेरणा केल्याप्रमाणे होते. पांच मंत्रापैकी पूर्वोक्त पहिल्या मंत्राचा 'अपामतिं दुर्मतिं बाधमानाः' हा दुसरा चरण आहे. याच्या पठणाने राक्षसांनी संपादन केलेल्या अमती व दुर्मती या दोहींचा बाध केल्यासारखे होऊन राक्षसांनाही दूर केल्याप्रमाणे होते. 'रायस्पोषे यज्ञपतिमाभजंतीः' हा त्या मंत्राचा तिसरा चरण किंवा उत्तरार्ध होय. पशू हे धनाचाच परिपोष करण्याचे मुख्य साधन असल्यामुळे पूर्वोक्त उत्तरार्धाचे पठण केले असता अध्वर्यूने आपल्या यजमानासाठी पशूंचेच संपादन केल्यासारखे होते.

'उदु त्वा विश्वेदेवा' व त्यापुढच्या पांच, मिळून सहा ऋचांनी अध्वर्यूने उचलून घेतलेला अग्नी 'आग्नीध्रीय' मंडपाकडे घेऊन जावा. असे केले असता सहा ऋतूंच्याकडूनच अग्नी घेऊन गेल्यासारखे होते. 'पंच दिशो दैवी:' इत्यादि पांच ऋचांपैकी दुसरी व तिसरी या दोन ऋचा 'परिगृह्यवती' म्हणजे 'परिगृह्य' या शब्दाने युक्त आहेत. 'परिग्रह' म्हणजे स्वतंत्रतेने केला जाणारा स्वीकार होय. या ऋचांचे पठण यज्ञविघात करण्यास समर्थ असलेल्या राक्षसांचा नाश करण्याला कारणभूत होते. 'सूर्यरश्मिर्हरिकेश: पुरस्तात्' असा प्रारंभ असलेली चौथी ऋचा आहे. ती नंतर पठण केली जाते. हिचे पठण अध्वर्यूला यज्ञकर्माची यथार्थ प्रेरणा करण्यास समर्थ होते. पांचव्या ऋचेचा शेवट 'तत: पावका आशिषो नो जुषंतां' असा आहे. अग्निवाचक असा 'पावक' शब्द या अंतिम चरणात असल्यामुळे त्याचे पठण केले असता अध्वर्यूने शिजविल्या जाणाऱ्या अन्नाचेच जणू संपादन केल्यासारखे होते.

'विमान एष दिवो' व 'उक्षा समुद्रो अरुण:' ह्या दोन ऋचा म्हणून आग्नीध्रीय मंडपामध्ये एक पांढऱ्या रंगाचा घडीव पाषाण मांडून ठेवावा. नंतर 'इंद्रं विश्वा अवीवृधन्' इत्यादि चार ऋचा पठण करीत अग्निचयनाच्या पुच्छा पर्यंत पुढे जावे.

देव व असुर हे परस्परांशी युध्द करण्यास उद्युक्त झाले. त्यावेळी आपल्याला विजय प्राप्त करण्यास 'आशु: शिशानो वृषभो' असा प्रारंभ असलेले 'अप्रतिरथ' नांवाचे सूक्त उपयोगी पडेल, असे देवांना आढळून आले. आणि त्या सूक्ताच्या योगाने त्यांनी असुरांना प्रतिकूलतारहित म्हणजे प्रतिकूलता करण्यास असमर्थ असे करून त्यांना जिंकले आणि विजय संपादन केला. शत्रूंच्या रथाला प्रतिकूलतेने स्वकीय सैन्यावर चाल करण्यास असमर्थ करणे, हेच त्या 'अप्रतिरथ' सूक्ताचे अप्रतिरथत्व किंवा स्वभावगुण होय.

मुख्य होत्याचा साहाय्यक असा दुसरा एक होता नियुक्त करावा. व त्याने अध्वर्यू अग्निचयनाच्या पुच्छाकडे जात असता त्याच्या मागोमाग 'अप्रतिरथ' सूक्ताचे पठण करीत करीत जावे. असे केले तर यजमान सर्व शत्रूंना आपल्याशी प्रतिकूलतेने वागण्यास असमर्थ करून त्यांच्यावर जय मिळवितो. इतकेच नव्हे तर पूर्वी न जिंकलेले धन किंवा एखादा प्रांतही तो जिंकतो. 'अप्रतिरथसूक्त' दहा ऋचांचे आहे. 'विराट्' छंद हा त्याच्या चरणांतील अक्षरसंख्येच्या दृष्टीने

'दशाक्षरी' आहे. 'विराट्' छंदानेच आपल्या सामर्थ्याने पृथ्वी व अंतरिक्ष हे दोन लोक धारण केले आहेत. यास्तव, या सूक्ताचे पठण केले असता विराट् छंदाच्या द्वारा यजमानाने पृथ्वी व अंतरिक्ष या दोन लोकांचे धारण केल्यासारखे होते. शिवाय दशाक्षरी असलेला विराट् छंद हा अन्नप्राप्तीला कारणभूत असल्याने अन्नरूपच आहे. यास्तव, हे सूक्त पठण केले असता त्याच्या प्रभावाने अग्निचयन करणारा यजमान सेवनीय अशा भरपूर अन्नाच्या ठिकाणी सुशोभित रीतीने प्रतिष्ठित होतो.

आकाश हे जसे अमूर्त असल्याने शून्यवत् म्हणजे नसल्यासारखे भासते त्याचप्रमाणे आग्नीध्रीय मंडपही त्याच्या ठिकाणी हविर्धानसंज्ञक गाडा, किंवा सोमरस भरून ठेवावयाचे ग्रह म्हणजे पेल्याच्या आकाराची उंचट लाकडी पात्रे इत्यादि काहीच वस्तू साठविलेल्या नसल्यामुळे शून्यवत् म्हणजे रिकामा भासत असतो. यास्तव, आग्नीध्रीय मंडपाचा शून्यपणा नाहीसा होऊन त्याच्या ठिकाणी काही असल्याचे दिसावे, म्हणून त्या आग्नीध्रीय मंडपात एक पांढरा पाषाण दोन ऋचा पठण करून ठेवावा. दोन ऋचांचे पठण करून पाषाण ठेवला असता तो यजमानाच्या प्रतिष्ठेला कारणभूत होतो. दोहोंपैकी पहिल्या ऋचेचा 'विमान एष दिवोमध्य आस्ते' असा पहिला चरण आहे. या चरणात 'विमान' हा मापनवाचक शब्द आहे. याच्या पठणाने अध्वर्यूने शून्य अशा आग्नीध्रीय मंडपाला विशिष्ट अशा वस्तूंच्या मांडणीने युक्त करूनच त्याचे मापन केल्यासारखे होते. दुसऱ्या ऋचेत 'मध्ये दिवो निहितः पृश्निरश्मा' असा एक चरण असून त्यात पांढऱ्या रंगाचा पाषाण अशा अर्थाचा 'पृश्निश्मा' असा शब्द उच्चारला जातो. तांदुळांच्या शिजविलेल्या भाताच्या रूपाने दिसणारे अन्न पांढरे, स्वच्छ असते. यास्तव, पांढरा या अर्थाचा निदर्शक असा 'पृश्नि' शब्द ज्यात आहे त्या चरणाच्या पठणाने आग्नीध्रीय मंडपात ठेवल्या जाणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या पाषाणाच्या प्रभावाने पांढरे, स्वच्छ असे अन्न यजमानाला भरपूर मिळते.

चार ऋचांचे पठण करीत करीत आग्नीध्रीय मंडपापासून अग्निचयनाच्या पुच्छापर्यंत जावे. कारण, छंदांमध्ये गायत्र्यादि चार छंदच मुख्य आहेत. यास्तव, चार ऋचांच्या पठणाने चार मुख्य छंदांच्या सहवर्तमान अग्निचयनाच्या पुच्छापर्यंत गेल्याप्रमाणे होते. या चार ऋचांपैकी पहिल्या ऋचेत 'इंद्रं विश्वा

अवीवृधन्' असा पहिला चरण असून त्यात 'वृध्दि' वाचक 'अवीवृधन्' असे पद आले आहे. यास्तव, या चरणाचे पठण केले असता यजमान जणू सर्व प्रकारच्या वृध्दीजवळ जाऊन पोचतो. म्हणजे सर्व बाजूंनी वृध्दिंगत होतो. 'वाजानां सत्पतिं पतिम्' असा त्या ऋचेचा शेवटचा चरण असून त्यात 'वाज' हा शब्द आला आहे. 'वाज' म्हणजे अन्न. अर्थात् या चरणाच्या पठणाने यजमानाने अन्नाचेच संपादन केल्याप्रमाणे होते. दुसऱ्या ऋचेचा 'सुम्नहूर्यज्ञो देवां आ च वक्षत्' असा प्रथम भाग असून त्यांत 'सुम्न' हा शब्द आला आहे. 'सुम्न' शब्दाचा 'सुख' असा अर्थ आहे. प्रजा व पशू हे सुखाला कारणभूत असल्याने सुखरूपच होत यास्तव, या चरणाचे पठण केल्याच्या योगाने यजमान आपल्या ठिकाणी प्रजा व पशू यांच्या रूपाने सुखाचे धारण करतो. 'यक्षदग्निर्देवो देवां आ च वक्षत्' हा पूर्वोक्त ऋचेचा दुसरा किंवा उत्तर भाग होय. यामध्ये 'अग्नी देवांना बोलावून आणो' असा अर्थ व्यक्त झालेला आहे. यास्तव, याच्या पठणाने यजमानाने जणू काय यज्ञासाठी यजनीय अशा देवांना स्वाधीन करून घेतल्यासारखे होते. 'वाजस्य मा प्रसवेनोद्ग्राभेणोद्ग्रभीत्' ही पूर्वोक्त चार ऋचांतील तिसरी ऋचा आहे. या ऋचेत 'वर जाणे' या अर्थाचा 'उद्ग्राभ' व 'खाली जाणे' या अर्थाचा 'निग्राभ' हे दोन शब्द आले आहेत. आकाशात तळपत असलेला आदित्य हा उदयास येताना क्षितिजावर चढून येत असतो व अस्तास जाताना क्षितिजाखाली उतरतो एवं च, पूर्वोक्त दोन शब्दांनी युक्त असलेल्या ऋचेच्या पठणाने यजमान जणू स्वतःला वर नेतो म्हणजे उत्कर्षाला प्राप्त करतो आणि शत्रूला खाली रसातळाला घालवितो. (अनुवाक ६).

'प्राचीमनुप्रदिशं प्रेहि विद्वान्' इत्यादि पांच ऋचा म्हणून अग्निचयनावर चढावे. या पांच ऋचांतील 'प्राचीनमनुप्रदिशं' या पहिल्या ऋचेचे पठण केले असता देवलोकाला उद्देशून यजमान अग्निचयनावर चढावयास प्रवृत्त झाल्याप्रमाणे होते. 'क्रमध्वमग्निना नाकं हस्तेषु' ही दुसरी ऋचा होय. हिच्या पठणाच्या योगाने यजमानाने जणू काय, पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु या तिन्ही लोकांच्या ठिकाणी पाऊल टाकल्यासारखे होते. 'पृथिव्या अहमुदंतरिक्षं' ही तिसरी ऋचा म्हटली असता यजमानाने पृथिव्यादि तिन्ही लोकांच्या ठिकाणी उत्तम रीतीने आरोहण केल्यासारखे होते. 'सुवर्यन्तो नापेक्षन्त' ही चौथी ऋचा पठण

करावी. त्या ऋचेच्या प्रभावाने यजमान स्वर्गलोकाला प्राप्त होतो. 'अग्ने प्रेहि प्रथमो देवयताम्' ही पांचवी ऋचा होय. ह्या ऋचेच्या पठणप्रभावाने यजमानाने जणू काय देव व मानव यांच्या ठिकाणी अग्निरूपी चक्षुरिंद्रियाचे धारण केल्याप्रमाणे होते.

पुढे सांगण्यात येणाऱ्या ऋचेने स्वयमातृण्णेवर आहुती देण्यासाठी ऋचेची पूर्वभाविनी असलेल्या 'नक्तोषासा समनसा विरूपे' या ऋचेचे पठण करावे. नंतर उंबराच्या लाकडाच्या स्रुचीमध्ये दही भरून ती स्रुची हाती घेतलेल्या अध्वर्यूने 'अग्ने सहस्राक्ष शतमूर्धन्' या मंत्राने त्या स्रुचीतील दह्याची स्वयमातृण्णेवर आहुती द्यावी. या मंत्रामध्ये सहस्राक्ष, शतमूर्धन, ह्या शब्दांनी विश्वरूपधर अशा 'विराट्' संज्ञक देवतेचे वर्णन आले आहे. सृष्टिकर्ता प्रजापती हीच सहस्र म्हणजे अनंतावधी रूपे धारण करणारी देवता होय. अर्थात् या मंत्राने आहुती दिली असता ती यजमानाला प्रजापतीची प्राप्ती करून देण्यास समर्थ होते. 'तस्मै ते विधेम वाजाय स्वाहा' असा या मंत्राचा शेवट आहे. अन्न म्हणजेच वाज होय. यास्तव, आता योजिलेल्या मंत्राचा अंतिम भाग पठण केला असता यजमान अन्नाचे संपादन करतो.

दह्याने पूर्ण भरलेल्या, उंबराच्या लाकडाच्या स्रुचीने स्वयमातृण्णेवर आहुती द्यावी. याचे कारण हे की, दही हे अन्नरूप आहे. व उंबर हाही अन्नरूप आहे. आणि स्वयमातृण्णा ही स्वर्गरूप आहे. यास्तव, स्वर्गरूप अशा स्वयमातृण्णेवर अन्नरूप अशा उंबराच्या लाकडाच्या स्रुचीमध्ये भरलेल्या अन्नरूप दह्याची आहुती दिली म्हणजे अध्वर्यूने जणू स्वर्गलोकाच्या ठिकाणी अन्न स्थापन केल्यासारखे होते. आणि अशा प्रकारे स्वर्गलोकात असणारे अन्न द्युलोकातून पर्जन्यवृष्टीच्या रूपात भूमीवर येऊन पडते व त्या अन्नावर आपण सर्व उपजीविका करीत असतो.

'सुपर्णोऽसि गरुत्मान्' इत्यादि तीन ऋचांनी स्वयमातृण्णेवर त्या आणलेल्या अग्नीचे स्थापन करावे. अग्नी हा 'त्रिवृत्' म्हणजे आहवनीयादि तीन स्वरूपे धारण करणारा आहे. यास्तव, अग्नीच्या त्रिविध रूपांशी संख्यासाम्य होणाऱ्या पूर्वोक्त तीन ऋचांनी स्थापन केलेला अग्नी प्रतिष्ठेला प्राप्त होतो.

'प्रेध्दो अग्ने दीदिहि पुरो न' ह्या ऋचेने उंबराची एक समिध स्थापन केलेल्या अग्नीवर द्यावी. ही ऋचा जणू काय जिच्या ठिकाणी छिद्रे आहेत

अशी एक प्रज्वलित पोलादी खांबणीच होय. या ऋड्.मय खांबणीच्या एकाच प्रहाराने असुरसमुदायातील शेकडो शूर असुर देवांनी मारले आहेत. म्हणून 'प्रेध्दो अग्रे' या ऋचेने समिध अग्नीवर दिली असता यजमान जणू काय शेकडो शत्रूंचा संहार करणाऱ्या लोहमय खांबणी व प्रज्वलित अशा पोलादी खांबणीप्रमाणे प्रखर असलेल्या समिधेचेच वज्र तयार करून त्याच्या प्रहाराने आपल्या शत्रूवर प्रहार करतो व त्याच्याकडून स्वत:चा नाश होण्याचा संभवच उपस्थित होणार नाही अशा रीतीने त्याला ठार करतो.

'विधेम ते परमे जन्मन्नग्रे' या ऋचेने वेकुळीची समिध अग्नीवर द्यावी. म्हणजे यजमानाच्या शरीरावर कांती उत्पन्न होते.

'तां सवितुर्वरेण्यस्य चित्रां' ह्या ऋचेने शमीची समिध अग्नीवर द्यावी. शमी ही शांती उत्पन्न करणारी असल्यामुळे तिच्या वृक्षाची समिध दिली असता ती यजमानाच्या ठिकाणी शांती उत्पन्न करण्यास कारणभूत होते.

अग्री हा अग्निचयन करणाऱ्या यजमानाचे दोहन करतो. म्हणजे त्याच्यापासून हविर्द्रव्य संपादन करतो. तसेच यजमान हा अग्नीचे दोहन करतो म्हणजे अग्नीपासून अपेक्षित असे फल संपादन करतो. 'तां सवितुर्वरेण्यस्य चित्राम्' या ऋचेमध्ये असलेल्या 'सवितु' व 'सुमतिं' या दोन पदांच्या पठणाने सर्वप्रेरक अशा अग्नीकडून अनुग्रहकारिणी अशा बुद्धीचे यजमानाने संपादन केल्यासारखे होते. अग्नीकडून अनुग्रहकारिणी बुध्दी मिळविण्याचे ज्ञान प्रथम कण्व महर्षींनी मिळविले. कण्व महर्षी 'श्रयस्' नामक ऋषीचे पुत्र होत. यास्तव, पूर्वोक्त ऋचेचा 'यामस्य कण्वो' हा उत्तरार्ध पठण केल्याच्या योगाने कण्व महर्षीप्रमाणेच यजमानाने अग्नीकडून अनुग्रहकारिणी बुद्धीचे संपादन केल्याप्रमाणे होते. एवं च, पूर्वोक्त ऋचेने अग्नीवर समिध दिल्याने अग्निचयन करणारा यजमान अग्नीचे दोहन करतो म्हणजे अग्नीपासून अनुग्रहकारिणी बुद्धिरूपी फल संपादन करतो.

स्रुचीमध्ये स्रुव्याने बारा वेळ भरून घ्यावे आणि 'सप्त ते अग्ने समिध:' या 'सप्तवती' नामक ऋचेने त्या आज्याची अग्नीचे ठिकाणी पूर्णाहुती द्यावी. 'सप्त ते अग्ने समिध: सप्त जिव्हा:' या ऋचेने आहुती दिली असता मंत्रामध्ये वर्णिलेली अग्निसंबधी सातही सप्तके यजमानाने संतुष्ट केल्यासारखी होतात.

आज्याने परिपूर्ण अशा स्रुचीने पूर्णाहुती द्यावी. 'प्रजापती' हा सर्व

कामनांनी परिपूर्ण असा आहे. यास्तव, आज्याने पूर्ण असलेल्या स्रुचीने आहुती दिली असता, ती प्रजापतीची प्राप्ती करून देण्याला समर्थ होते. आज्याने परिपूर्ण अशा स्रुचीने आहुती देणे हा मुख्य पक्ष होय. अनुकल्पाने म्हणजे गौण पक्षाने अपूर्ण अशा स्रुचीनेही आहुती द्यावी. अल्प अशा बीजापासून प्रजापती प्रौढ अशा शरीराने युक्त प्रजा निर्माण करतो. यास्तव, अपूर्ण अशा स्रुचीने आहुती दिली, तर ती यजमानाच्या ठिकाणी पुत्रपौत्रादि प्रजा निर्माण करण्यास कारणभूत होते.

अग्नी एकदा देवांच्यापासून दूर पळून गेला व दिशांच्या ठिकाणी दडून राहिला. यास्तव, पूर्णाहुती देतेवेळी दिशांचे ध्यान करावे. म्हणजे दिशांच्यापासून अग्नीचे संपादन केल्याप्रमाणे होते.

अग्नीचे स्थापन करण्यापूर्वी स्वयमातृण्णेवर दिलेली दह्याची आहुती आणि अग्निस्थापन केल्यानंतर दिलेली आहुती या दोन आहुतींच्या प्रभावाने अध्वर्यूने जणू काय यजमानाच्या ठिकाणी इंद्रियसामर्थ्य व तेज या दोहोंचे धारण केल्याप्रमाणे होते.

'वैश्वानर' संज्ञक अग्नीला समर्पण करण्यासाठी बारा कपालांच्या समुदायावर पुरोडाश भाजून तयार करावा. आणि त्याची आहुती देऊन वैश्वानर अग्नीला संतुष्ट करावा.

ही आहुती देण्यापूर्वी प्रयाज व नंतर अनूयाज जर केला तर एक प्रकारे यज्ञाचा नाश केल्यासारखे होते. यास्तव, प्रयाज व अनूयाज न करता स्रुचीत घेतलेल्या पुरोडाशाची वैश्वानर अग्नीच्या उद्देशाने आहुती द्यावी. म्हणजे ती यज्ञाच्या प्रतिष्ठेला कारणभूत होते.

वैश्वानर अग्नी हा राष्ट्ररूप असून 'मरुत्' हे त्या राष्ट्रातील प्रजेप्रमाणे होत. यास्तव, 'वैश्वानर' अग्नीला आहुती दिल्यानंतर 'मरुत्' संज्ञक देवांच्यासाठी तयार केलेल्या पुरोडाशांची आहुती द्यावी म्हणजे राष्ट्राच्या ठिकाणी प्रजेचे नियोजन केल्यासारखे होते. 'वैश्वानर' देवतेला आहुती देण्याचे वेळी उच्च स्वरात 'आश्रावण' करावे आणि 'मरुत्' नामक देवांना पुरोडाशाची आहुती 'उपांशु' म्हणजे हलक्या आवाजात मंत्र म्हणून द्यावी. प्रजेपेक्षा राष्ट्र हे उच्च असते, असे म्हणतात. यास्तव, राष्ट्ररूप वैश्वानराची आहुती उच्च स्वराने

आणि प्रजारूप असलेल्या 'मरुत्' संज्ञक देवतांची आहुती 'उपांशु' स्वराने देणे उचित होय.

मरुतांच्या सात समुदायांच्या साठी आहुती देण्याकरता पुरोडाश तयार करावेत. मरुत् देवांचे प्रजाजन होत. यास्तव, मरुतांच्यासाठी पुरोडाश तयार केले असता अध्वर्यूने जणू काय देवांच्या प्रजाजनांकडून यजमानाला मानवी प्रजाजनांचे संपादन करून दिल्याप्रमाणे होते. मरुतांच्यासाठी सात पुरोडाश तयार करावेत. कारण, मरुतांचे सात गण म्हणजे समुदाय आहेत. यास्तव, संहितेत पठित असलेल्या पांच व आरण्यकात पठित असलेल्या दोन, मिळून सात मंत्रांनी सात पुरोडाशांची आहुती अनुक्रमाने दिली असता सप्तगणात्मक अशा मरुतांच्या अनुग्रहाने यजमानाला अनेक समुदायांनी युक्त असलेल्या प्रजाजनांची प्राप्ती होते. 'ईदृङ्. चान्यादृङ्. च' इत्यादि मंत्रांना 'गण' ही संज्ञा आहे. कारण प्रत्येक मंत्रात सात मरुतांच्या गणाचे प्रतिपादन झालेले आहे. पहिला गणसंज्ञक मंत्र म्हणून पहिली आहुती द्यावी. दुसरी आहुती देताना पहिला 'गण' संज्ञक मंत्र म्हणावा व दुसऱ्या गणमंत्राने दुसरी आहुती द्यावी. अशा प्रकारे प्रत्येक आहुती देताना तिच्या मागच्या गणमंत्राचे पठण करून नंतर क्रमप्राप्त गणमंत्राने आहुती द्यावी. असे केल्याच्या योगाने अध्वर्यूने यजमानाला समुदायरूपाने असणाऱ्या सर्व प्रजांचे आनुकूल्य संपादन करून दिल्याप्रमाणे होते. (अनुवाक ७).

ज्या आहुतीच्या योगाने, ती देणाराकडे धनाची अखंड धार वाहत येते, ती 'वसोर्धारा' संज्ञक आहुती होय. ही आहुती देणारा यजमान प्रथम आपल्याकडे धनाची एकसारखी धार येत राहावी अशी आपल्या मनात इच्छा करतो आणि मग 'वसोर्धारा' संज्ञक आहुती देतो. घृताची अखंड धारा पाडवून दिलेली ती आहुती यजमान स्वर्गलोकी गेल्यानंतर घृताच्या अखंड धारेने त्या यजमानाला संतुष्ट करते. यास्तव, अखंड धारेने आपणाकडे धन यावे अशी इच्छा असणाराने 'वसोर्धारा' संज्ञक आहुती द्यावी. वसोर्धारा संज्ञक आहुती आज्य द्रव्याने द्यावी. कारण, आज्य हे तेजोरूप असून आज्याने दिलेली वसोर्धाराहुतीही तेजोरूपच आहे. यास्तव, वसोर्धाराहुती आपल्या ठिकाणच्या तेजाने यजमानालाही तेजस्वी करते. वसोर्धारा ही सर्व प्रकारच्या मनोरथस्वरूपाची आहे. अर्थात् ती दिल्याने यजमानाचे सर्व मनोरथ ती

परिपूर्ण करते.

आपल्या ज्या यजमानाचे प्राण व त्याच्या जीवनार्थ अवश्य असे सेवनीय अन्न यांच्यामध्ये विच्छेद उत्पन्न व्हावा असे अध्वर्यूला वाटत असेल त्याने यजमानाची वसोर्धाराहुती देताना म्हणावयाच्या मंत्रांमध्ये विच्छेद करावा. म्हणजे मंत्र मध्येच तोडून म्हणावा. म्हणजे त्या यजमानाचे प्राण व त्यांच्या रक्षणासाठी अवश्य असणारे अन्न यांच्यामध्ये विच्छेद उत्पन्न होतो. अर्थात् त्याच्या प्राणांच्या जीवनाला लागणारे अन्न त्याला मिळत नाही.

आपल्या यजमानाचे प्राण व त्याच्या जीवनार्थ अवश्य ते अन्न यामध्ये खंड पडू नये व यजमानाच्या जीवनास अवश्य असे अन्न त्याला सदैव भरपूर मिळावे असे ज्या यजमानाबद्दल वाटत असेल, त्या यजमानासाठी वसोर्धाराहुती देताना अध्वर्यूने मंत्रामध्ये खंड करू नये सलग मंत्र म्हणावा. 'वाजश्च मे ' येथून 'अन्नं च मे' येथपर्यंत बारा बारा मंत्रांच्या बारा भागांनी अशी धाराहुती द्यावी. संवत्सराचे महिने बारा असतात. यास्तव, आता सांगितल्याप्रमाणे बारा बारांच्याबारा मंत्रविभागाने आहुती दिल्याच्या योगाने बारा महिन्यांच्या द्वारा परिपूर्ण होणाऱ्या संवत्सरामध्ये धान्यरूपाने उत्पन्न होणारे सर्व प्रकारचे अन्न यजमानाला प्राप्त होते. नंतर 'अन्नं च मेऽक्षुच्च मे' मंत्राचे सव्वीस विभाग पठण करावेत. पहिला अन्नशब्द स्पष्टच आहे. दुसरा 'अक्षुत्' असा शब्द आहे. अक्षुत् म्हणजे क्षुधेचे निवारण क्षुधेचे निवारण अन्नानेच होत असते. 'अन्नं च मे' येथून 'लोंह च मे' येथपर्यंतचे सर्व विभाग अन्नप्रद असल्यामुळे अन्नरूपच आहेत. एवं च, अन्नं च मे येथून लोहं च मे पर्यंतचा मंत्र अन्नरूप आहे. यास्तव, अन्नरूप अशा मंत्राने वसोर्धाराहुती दिली असता अध्वर्यूने जणू यजमानासाठी अन्नाचेच संपादन केल्यासारखे होते. 'अग्निश्च म अल्पश्च मे' येथून 'गतिश्च मे' पर्यंतचा मंत्र म्हणावा अग्नी हा अन्न शिजविणारा असल्यामुळे तो अन्नाची योनी म्हणजे उत्पत्तिस्थान असून उदक हे धान्याची उत्पत्ती करीत असल्यामुळे पर्यायाने ते देखील अग्नीचे उत्पत्तिस्थानच आहे. यास्तव 'अग्निश्च म' इत्यादि मंत्र म्हटला असता त्या त्या प्रकारचे अन्न त्याच्या त्याच्या उत्पत्तिस्थानीय पदार्थासह यजमानाला प्राप्त होते.

ज्या मंत्रवाक्यांच्या अर्धविभागात 'इंद्र' शब्दाचे पठण होते, त्या मंत्रवाक्यांना

'अर्धेंद्र' अशी संज्ञा आहे. 'अग्निश्च म इंद्रश्च मे' इत्यादि अर्धेंद्रसंज्ञक वाक्यांनी वसोर्धाराहुती दिली असता प्रत्येक वाक्याच्या प्रारंभी ज्या ज्या देवतेचा उच्चार केला जातो, त्या त्या देवतेला ती आहुती प्राप्त होते. शिवाय, प्रत्येक वाक्यार्धात 'इंद्र' शब्दाचा उच्चार केल्याच्या योगाने वसोर्धाराहुतीपैकी पुष्कळसा भाग इंद्र सेवन करतो. ज्या अर्थी मंत्रवाक्याच्या उत्तर भागात 'इंद्र' देवतेचा उच्चार केला जातो, त्या अर्थी इंद्र यजमानाच्या उत्तरभागाचे म्हणजे शिरोभागाचे ठिकाणी चक्षुरादि इंद्रियांचे स्थापन करतो. 'अंशुश्च मे रश्मिश्च मे' येथून 'पचताश्च मे' येथपर्यंतच्या मंत्राने वसोर्धारेचे हवन करावे. अंशु आणि त्यानंतर घेतला जाणारा अदाभ्यग्रह यांच्यापासून तो 'पचत' म्हणजे शामित्रापर्यंतच्या सर्व वस्तू जणू यज्ञाची आयुधे किंवा साधने यज्ञरूपच होत. म्हणून या यज्ञसाधनभूत अशा वस्तूंचा उच्चार करून वसोर्धारेची आहुती दिली म्हणजे ती यजमानाला यज्ञाची प्राप्ती करून देते. 'अग्निश्च मे घर्मश्च मे.... दिशश्च मे....यज्ञेन कल्पतां' येथपर्यंतचा मंत्र वसोर्धाराहुती हवन करतांना म्हणावा. यज्ञाच्या शेवटी केले जाणारे अवभृथ व यज्ञामध्ये होत्याकडून पठण केला जाणारा 'शंयुवाक' ही यज्ञाची प्रमुख अंगे होत. 'स्वगाकार' शब्दाचा उच्चार यज्ञ यजमानाच्या स्वाधीन होण्यास कारणभूत होतो. 'ऋक् च मे साम च मे' इत्यादि मंत्र म्हणावा. ऋचा काय, किंवा साम काय, ही वेदाचीच स्वरूपे होत. अर्थात् या स्वरूपांचे उच्चारण केले असता आपल्या स्वरूपासह सर्व प्रकारच्या छंदांना जणू जवळ केल्यासारखे होते.

यानंतर 'गर्भाश्च मे वत्साश्च मे' येथपासूनचा मंत्र म्हणावा, गर्भ, वत्स इत्यादि शब्दांनी परोपरीने पशूंचे स्वरूपच सूचित केले जाते. यास्तव, पशुस्वरूप व्यक्त करणारा पूर्वोक्त मंत्राचा उच्चार केल्याने यजमानासाठी अध्वर्यूने जणू काय पशूंनाच जवळ केल्याप्रमाणे होते.

'आयुर्यज्ञेन कल्पतां' इत्यादि मंत्राने कल्पादिकांचे हवन करावे. 'कल्प' या शब्दाने युक्त अशा या मंत्रांना कल्प अशी संज्ञा आहे. यांचे हवन केले म्हणजे यजमानाजवळची जी जी वस्तू स्वकार्यक्षम नसेल ती ती वस्तू स्वकार्यक्षम होईल.

'चतस्रश्च मे अष्टौ च मे' इत्यादि 'अष्टाचत्वारिंशच्च मे' पर्यंतचा मंत्र म्हणून हवन करावे. चार, आठ, अशा सर्व समसंख्या या मंत्रात होत

अनुष्ठान केल्यासारखे होते. अर्थात् संवत्सरपर्यंत धारण केला जाणारा गर्भ जसा पूर्णत्वाला प्राप्त होऊन सुखाने प्रसवतो त्याप्रमाणे उख्याग्नीही यजमानाने संवत्सरपर्यंत धारण केल्यासारखा होत असल्याने त्याने केलेला अग्निचयनही परिपक्व म्हणजे पूर्णतेला प्राप्त झाल्यामुळे पतन पावत नाही व यजमानही मरत नाही. 'वैश्वानर' हे अग्नीचे अत्यंत प्रिय असे शरीर आहे. यास्तव, 'वैश्वानर' देवतेसाठी पुरोडाशाचा याग केल्याने अग्नीला अत्यंत प्रिय असे शरीर यजमानाला प्राप्त होते.

सारांश, अग्निचयन करू इच्छिणाऱ्या यजमानाने दीक्षणीयेष्टीमध्ये अग्नाविष्णू देवतेसाठी पुरोडाश, अदितिदेवतेसाठी चरू व वैश्वानर देवतेसाठी पुरोडाश याप्रमाणे तीन हवी तयार करून त्यांचा याग करावा. पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु हे तीन लोक आहेत. यासाठी आता सांगितल्याप्रमाणे तीन हवींचा याग केला असता, तो यजमानाला पृथिव्यादि तिन्ही लोकांच्या ठिकाणी आरूढ होण्याला कारणभूत होतो. (अनुवाक १).

प्रजापतीने सर्व प्रजा निर्माण केल्या व त्यांच्याविषयी त्याला अत्यंत प्रेम उत्पन्न झाल्यामुळे तो त्या प्रजांच्या ठिकाणी स्वत: प्रविष्ट झाला. म्हणजे त्या प्रजांच्या स्वरूपाशी एकरूप झाला. त्यामुळे स्वत:च्या स्वतंत्र रूपाने राहण्यास तो असमर्थ झाला. तेव्हा तो आपल्या ठिकाणी असे म्हणाला की, जो कोणी पुरुष या प्रजांच्यापासून स्वतंत्र स्वरूपाने माझी निर्मिती करील, तो सर्वतोपरी समृध्द होईल. प्रजापतीचे हे म्हणणे देवांनी ऐकले आणि त्यांनी विशिष्ट रीतीने इष्टकांची मांडणी करून अग्निचयनरूपाने प्रजापतीची स्वातंत्र्याने निर्मिती केली. अग्निचयनाच्या रूपाने प्रजापतीला स्वतंत्र स्वरूपात निर्माण केल्यामुळे देव सर्वतोपरी समृध्द झाले. ज्या अर्थी इष्टकांची मांडणी उत्कृष्ट प्रकारे करून चितिरूप अग्नी देवांनी निर्माण केला. त्या अर्थी अग्नीला 'चित्य' असे नांव प्राप्त झाले. अग्निचयनाचे हे माहात्म्य जाणून जो कोणी अग्निचयन करतो, तो सर्वप्रकारे समृध्द होतो. काही ब्रह्मवादी ऋषींनी दुसऱ्या ब्रह्मवाद्यांना प्रश्न केला की, कोणत्या कामनेच्या पूर्तीसाठी चितिरूप अग्नीची मांडणी केली जाते? त्यावर दुसऱ्या ब्रह्मवाद्यांनी, शास्त्रीय अशा अग्नीने मी युक्त व्हावे, असे ज्याला वाटते, तो त्या प्रकारची आपली कामना पूर्ण होण्यासाठी अग्निचयन करतो. व एक अग्निचयन केल्याच्या योगाने तो शास्त्रीय अग्नीने युक्त होतो, असे उत्तर दिले. आणखी कोणत्या कामनेने अग्निचयन केला जातो? असा

आणखी प्रश्न ब्रह्मवाद्यांनी विचारला. तेव्हा स्वर्गलोकी राहणाऱ्या देवांनी या यजमानाने अग्निचयनाचे उत्कृष्ट प्रकारे अनुष्ठान केले आहे, अशाप्रकारे मला ओळखावे, असे ज्याला वाटते, तो अग्निचयनाची मांडणी करतो व देव त्याला 'उत्कृष्ट प्रकारे चयनाची मांडणी केलेला' म्हणून ओळखतात, असे उत्तर देण्यात आले. आणखी कोणत्या कामनेने अग्निचयन केला जातो? असा तिसरा प्रश्न विचारण्यात आला, तेव्हा शास्त्रीय अशा सर्व कर्मांचे अनुष्ठान करण्यास समर्थ असा गृहस्थ मी व्हावे, अशी ज्याला इच्छा होते, तो अग्निचयन करतो व त्या योगाने तो शास्त्रीय अशा सर्व कर्मांचे अनुष्ठान करण्यास समर्थ अशा गृहस्थत्वाला प्राप्त होतो, असे उत्तर देण्यास आले. आणखी कोणत्या कामनेने अग्निचयन मांडला जातो? असा चौथा प्रश्न ब्रह्मवाद्यांनी विचारला. तेव्हा, मी पशुसंपत्तीने समृध्द व्हावे अशी ज्याला कामना उत्पन्न होते, तो अग्निचयनाची मांडणी करतो व तिच्या प्रभावाने तो पशुसंपत्तीने समृध्द होतो, असे उत्तर देण्यात आले. आणखी कोणत्या कामनेने अग्निचयन केला जातो? असा पांचवा प्रश्न ब्रह्मवाद्यांनी इतर ब्रह्मवाद्यांना केला. तेव्हा, मी स्वतः, व माझ्या पूर्वीचे पितामह,पितृपितामह, प्रपितामह हे तीन पुरुष व माझ्या पुढचे पुत्र,पौत्र व प्रपौत्र हे तीन पुरुष अशा सात पुरुषांचा जीवनक्रम चालविणारा मी व्हावे, अशी ज्याला इच्छा होते, तो अग्निचयनाची मांडणी करतो व तिच्या प्रभावाने तो सात पुरुषांचा जीवनक्रम केवळ इहलोकीच चालविणारा होतो, इतकेच नव्हे, तर स्वर्गलोकीही तो सप्तपुरुषांचा जीवनक्रम चालविणारा होतो, असे उत्तर देण्यात आले.

पूर्वी एकदा प्रजापतीने अग्निचयन करण्याची इच्छा केली. तेव्हा, पृथ्वी त्याला म्हणाली की, हे प्रजापते, तू माझ्या पाठीवर अग्निचयन करू नको. माझ्या पाठीवर चितिरूपी अग्नी तू निर्माण केलास तर तो मला अतिशय तीव्रतेने दग्ध करील व अशा प्रकारे दग्ध स्थितीने मी कंपित होऊ लागल्याने माझ्या पृष्ठभागी राहणारा तूही कंपित होशील. मला संताप दिल्याच्या योगाने तू पापिष्ठ होशील, दरिद्री होशील. पृथ्वीचे हे भाषण ऐकून प्रजापती तिला म्हणाला, हे पृथिवी, तुझ्या पृष्ठभागी मी मांडलेला चितिरूपी अग्नी जेणे करून तुला दग्ध करणार नाही, अशा प्रकारेच मी त्याची मांडणी करीन नंतर प्रजापतीने ज्या भूमीच्या पृष्ठभागी अग्निचयन मांडावयाचा त्या भूमीला 'हे भूमे आद्यकारणभूत अशा तुला माझ्या पूर्वी होऊन गेलेला आद्य प्रजापती

येथे स्थापित करो, तुझे रक्षण करणाऱ्या त्या प्रजापतिरूप देवतेच्या अनुग्रहाने निश्चल अशी होऊन तू या ठिकाणी बैस, अंगिरा ऋषींनी स्थापित केलेली इष्टका जशी स्थिर होऊन राहिली, त्याप्रमाणे इष्टकारूपाने तूही या ठिकाणी स्थिर होऊन बैस', ह्या अर्थाचा 'प्रजापतिस्त्वा सादयतु' हा मंत्र म्हणून सर्व बाजूने स्पर्श केला. आणि अग्निचयनाच्या शरीराचा एक भाग म्हणून त्याने भूमिरूपी इष्टकेचे उपधान म्हणजे स्थापन केले. त्यामुळे प्रजापतीने मांडलेल्या चितिरूपी अग्नीने आपलेच शरीर असलेल्या त्या भूमिभागाला दग्ध केले नाही.

यास्तव, भूमीवरील ज्या स्थलाचे ठिकाणी 'अग्निचयन' मांडावयाचा असेल त्या स्थलाला आता सांगितल्याप्रमाणे 'प्रजापतिस्त्वा. ध्रुवा सीद ' या मंत्राने सर्व बाजूने स्पर्श करावा. असे केल्याच्या योगाने त्या सर्व भूभागाचे इष्टकारूपाने उपधान केल्यासारखे होते. आणि मग त्या स्थलावर मांडला जाणारा चितिरूपी अग्नी भूमीला अतिशयत्वाने अर्थात् असह्य होईल अशा प्रकारे दग्ध करीत नाही.

प्रजापतीला प्रजा उत्पन्न करण्याची इच्छा झाली तेव्हा प्रजा उत्पन्न करण्याचे साधन म्हणून 'उखाग्नी' उपयोगी पडेल, असे त्याला आढळून आले व त्याप्रमाणे त्याने 'उखाग्नी' सिद्ध करून त्या अग्नीचे एक संवत्सरपर्यंत धारण केले व त्या अग्निधारणाच्या प्रभावरूप साधनाने त्याने प्रजा उत्पन्न केल्या. यास्तव, अग्निचयन करू इच्छिणाऱ्या यजमानाने एक संवत्सरपर्यंत उखाग्नीचे धारण करावे. म्हणजे दररोज उपस्थानाचे वेळी आपल्या गळ्यात शिंके अडकवावे व त्या शिंक्यात उखाग्नीची शेगडी ठेवून त्या उखाग्नीचे धारण करीत जावे. असे केल्याच्या योगाने तो यजमान पुत्रपौत्रादि प्रजांचा उत्पादक होतो.

संवत्सरपर्यंत उखाग्नीचे धारण करून प्रजा उत्पन्न करणाऱ्या त्या प्रजापतीला वसू म्हणाले, हे प्रजापते, उखाग्नीचे संवत्सरपर्यंत धारण करून तू जशा प्रजा उत्पन्न केल्यास तशा आम्हीही आपल्या शक्तीनुसार उखाग्नीचे धारण करून प्रजा उत्पन्न करू. यास्तव, उखाग्निधारणाचे विधान तू आम्हास सांग तेव्हा प्रजापतीने त्या वसूंना उखाग्नी दिला म्हणजे 'उखाग्नी' धारण करण्याचा विधी सांगितला. नंतर वसूंनी तीन दिवस उखाग्नीचे धारण केले

आणि त्या दिनत्रयात्मक उख्याग्निधारणाच्या प्रभावाने त्या वसूंनी तीनशे तेहतीस प्रजा उत्पन्न केल्या. यास्तव, अग्निचयन करणाऱ्या यजमानाने तीन दिवस उख्याग्नीचे धारण करावे. म्हणजे, तोही वसूंच्याप्रमाणे प्रजांचा उत्पादक होतो. वसूंना रुद्र असे म्हणाले की, तुम्ही जशा उख्याग्नीचे धारण करून प्रजा निर्माण केल्या, तशा आम्हीही करू. आम्हाला उख्याग्नीचे विधान सांगा. वसूंनी या रुद्रांना 'उख्याग्नी' दिला म्हणजे उख्याग्नीचे विधान सांगितले. रुद्रांनी सहा दिवस उख्याग्नीचे धारण केले व त्यांनी त्या उख्याग्निधारण प्रभावाने तीनशे तेहतीस प्रजा उत्पन्न केल्या. यास्तव, अग्निचयन करणाऱ्या यजमानाने सहा दिवस उख्याग्नी धारण करावा. म्हणजे तो प्रजांचे उत्पादन करण्यास समर्थ होतो. रुद्रांना आदित्य म्हणाले, 'तुम्ही उख्याग्नीचे धारण करून प्रजा उत्पन्न केल्या, तशा आम्ही करू इच्छितो. यास्तव, आम्हाला उख्याग्नी द्या म्हणजे उख्याग्नी धारण करण्याचे विधान समजावून द्या'. रुद्रांनी आदित्यांना उख्याग्नी धारण करण्याचा विधी सांगितला. आदित्यांनी बारा दिवस उख्याग्नीचे धारण केले व त्या द्वादशदिनात्मक उख्याग्निधारणाच्या प्रभावाने त्या आदित्यांनीही तीनशे तेहतीस प्रजा उत्पन्न केल्या. यास्तव, अग्निचयन करणाऱ्या यजमानाने बारा दिवस उख्याग्नीचे धारण करावे. म्हणजे तोही आदित्यांच्याप्रमाणे प्रजा उत्पन्न करणारा होतो. सारांश, वसू, रुद्र व आदित्य यांनी उख्याग्नीचे धारण करून एक कमी हजार प्रजा उत्पन्न केल्या. तेव्हापासून ज्या उखेमध्ये म्हणजे शेगडीमध्ये अग्नी सिद्ध केला जातो, ती उखा 'सहस्रतमी' म्हणजे हजार प्रजा निर्माण करणारी म्हणून प्रसिद्ध झाली. अशा प्रकारे सहस्र प्रजा निर्माण करण्यास कारणभूत होणाऱ्या उख्याग्नीचे माहात्म्य जो जाणतो, तो हजार पशूंचे संपादन करणारा होतो. (अनुवाक २).

जिच्यामध्ये अग्नी सिद्ध केला जातो, ती उखा 'वसवस्त्वा कृण्वन्तु' इत्यादि यजुर्मंत्रांनी तयार करण्यात येते. 'धिषणास्त्वा' या यजुर्मंत्राने ती उखा भाजली जाते. आणि 'मातेव पुत्रं' ह्या मंत्राने ती उखा शिंक्यातून बाहेर काढली जाते. अशा प्रकारे अनेक यजुर्मंत्रानी ती उखा अनुष्ठित केली जात असल्यामुळे म्हणजे तिच्या ठिकाणी अनेक प्रयोग केले जात असल्यामुळे तिच्या ठिकाणचे सार कमी होऊन ती साररहित होत असते. अर्थात् तिच्या ठिकाणी आणखी प्रयोग करण्याचे कामी ती निरुपयोगी ठरते. यास्तव, तिच्या ठिकाणी पुन्हा सार उत्पन्न व्हावयासाठी 'अग्ने युक्ष्वा हि ये तव' व

'युक्ष्वा हि देवहूतमां' या दोन मंत्रांनी त्या उखेमध्ये दोन आज्याहुती द्याव्यात. म्हणजे तिच्या ठिकाणचे नि:सारत्व म्हणजे शिळेपणा नाहीसा होऊन ती पुन्हा सारसंपन्न, अर्थात् आणखी प्रयोग करण्याला योग्य अशी होते. जो यजमान अग्नीला आपल्याशी संयुक्त करण्याचा समय प्राप्त झाला असता, कसल्याही प्रकारचा बेसावधपणा न करता अग्नीला आपल्या ठिकाणी संयुक्त करतो तो अग्नीला आपल्या ठिकाणी संयुक्त करणाऱ्या इतर यजमानांच्यामध्ये 'अग्नियोगाचे अनुष्ठान करणारा' म्हणजे अग्नीला आपल्या ठिकाणी नियमितवेळी संयुक्त करणारा म्हणून गणला जाण्यास पात्र होतो. म्हणून उखेमध्ये आज्याहुती देतांना 'युक्ष्वा हि ये तव' व युक्ष्वा हि देवहूतमां' हे दोन मंत्र पठण करावेत. या दोन मंत्रांमध्ये 'युक्ष्व' असे जे पद उच्चारले जाते त्याचा अर्थ 'हे अग्ने तू 'युक्ष्व' म्हणजे माझ्या ठिकाणी युक्त हो', असा असल्यामुळे या दोन मंत्रांमध्ये 'युक्ष्व' या पदाचा उच्चार केला जाणे, हाच अग्नीचा योग म्हणजे यजमानाने आपल्या ठिकाणी अग्नीचे संयुक्तीकरण करणे होय. अशा प्रकारे अग्नीला आपल्या ठिकाणी यजमानाने युक्त केले म्हणजे तो अग्नीला आपल्या ठिकाणी युक्त करणाऱ्या इतर यजमानांमध्ये 'अग्नियोगाचे यथार्थ अनुष्ठान करणारा' म्हणून गणला जातो.

ब्रह्मवादी असा प्रश्न उत्पन्न करतात की चितिरूपी अग्नी हा पक्ष्याच्या आकाराने युक्त असा मांडला जात असतो. अर्थात् तो अधोमुख मांडावा, किंवा ऊर्ध्वमुख मांडावा? अधोमुख करून मांडला, तर त्या पक्षिरूप अग्नीच्या पाठीवर आहुती दिल्यासारखे होईल आणि ऊर्ध्वमुख म्हणजे उताणा मांडला तर तो आपल्या पंखांनी आकाशात उडू शकणार नाही. अर्थात् स्वर्गलोकी जाण्यास तो असमर्थ होईल. परंतु, या दोन्ही अडचणींचा परिहार होण्याचा उपाय असा की, अग्निचयनस्थलामध्ये मृत पुरुषाच्या मस्तकाच्या केसांचा भाग पूर्वेस, गळ्याचा भाग पश्चिमेस व मुख ऊर्ध्व दिशेस होईल, अशा प्रकारे उपधान करावे. म्हणजे पुढे दिल्या जाणाऱ्या सर्व आहुती पुरुषमुखात पडतील व त्या पुरुषमुखाच्या द्वारा अग्नीला प्राप्त होतील. शिवाय पक्ष्याकाररूप चित्यग्नीचे मुख ऊर्ध्व दिशेस न होता अधोमुखच राहून तो आपल्या पंखांनी आकाशी उडेल व स्वर्गलोकी जाऊन पोचेल. उपधान केलेल्या मृत पुरुषाच्या ठिकाणी असणाऱ्या दोन्ही डोळ्यांच्या ठिकाणी 'चित्रं देवानामुदगात्' या 'सूर्य' लिंगात्मक अर्ध्या अर्ध्या ऋचेने अनुक्रमे एक एक आज्याहुती द्यावी. त्यायोगाने

पुरुषशिराच्या ठिकाणी चक्षुरिंद्रियाचे संपादन केल्यासारखे होते. नेत्रगोलक दोन असतात. यास्तव, एका एका नेत्रगोलकात एक एक याप्रमाणे दोन आहुती द्याव्यात. दोन आहुतींनी मिळून एक ऋचा उपयोगात आणावी. कारण, डोळे दोन दिसत असले तरी त्यांच्या ठिकाणी अवलोकनशक्तिरूप अंतरिंद्रिय एकच असते. देव व असुर हे परस्परांच्याशी युध्द करण्यास प्रवृत्त झाले तेव्हा त्या दोघांनी आपआपणांस प्रिय असलेले सर्व धन एकत्र करून ते गुप्त अशा स्थळी ठेवून दिले. असुरांनी जे धन गुप्त करून ठेवले होते त्याचा देवांनी 'वामभृत्' नामक इष्टकेचे अग्निचयनात उपधान करून त्या इष्टकेच्यां प्रभावाने नाश केला. असुरांच्या अत्यंत प्रिय अशा गुप्त धनाचा नाश हेच त्या 'वामभृत्' इष्टकेचे 'वामभृतत्व' म्हणजे स्वभावगुण होय. यासाठी, जो यजमान आपल्या अग्निचयनात 'वामभृत्' संज्ञक इष्टकेचे उपधान करतो, तो आपल्या शत्रूच्या अत्यंत प्रिय अशा सर्व धनाचा नाश करतो. जिच्या मस्तकावर हिरण्य ठेवण्यात येते, ती 'हिरण्यमूर्ध्नी' होय. 'वामभृत्' नांवाची इष्टका हिरण्यमूर्ध्नी असावी. म्हणजे तिचे उपधान केल्यानंतर तिच्यावर दोन हिरण्यशकले ठेवावीत. कारण हिरण्य हे जणू प्रकाशणारी ज्योतच आहे. मणिमुक्तादि धन देखील प्रकाशणाऱ्या ज्योती प्रमाणेच चमकणारे असते. यास्तव, हिरण्ययुक्त अशा वामभृत् इष्टकेचे जो उपधान करतो, तो यजमान आपल्या शत्रूचे ज्योतीप्रमाणे प्रकाणारे मणिमुक्तादिरूप सर्व धन नाहीसे करतो. 'वामभृत्' इष्टका ही दोन मंत्रांनी मांडावी, म्हणजे ती यजमानाच्या प्रतिष्ठेला कारणभूत होते. (अनुवाक ३).

वरुणाच्या स्त्रिया असलेल्या उदकदेवता विषयासक्त झाल्या असताना अग्नीने त्यांच्याशी समागम करण्याचा आपल्या मनाने ध्यास केला. आपल्या मनामध्ये त्या उदकदेवतांच्याशी अग्नी संभोगसुख घेत असता, त्याचे जे 'रेत' खाली पडले, ते रेतच पृथ्वीरूपाने परिणत झाले. दुसऱ्या खेपेस जे अग्नीचे रेत स्खलित झाले, त्या रेतापासून द्युलोक निर्माण झाला. विविध अशा प्राण्यांचा आधार म्हणून शोभली जाणारी ही पृथ्वी 'विराट्' ह्या संज्ञेला प्राप्त झाली आणि स्वत:च्या स्वातंत्र्याने विराजमान होणारा द्युलोक 'स्वराट्' हे नांव पावला. यास्तव, पृथ्वी व द्युलोक यांच्या उपलक्षक असणाऱ्या 'विराजा' नामक दोन इष्टका मांडाव्यात. या दोन इष्टकांचे उपधान केले असता पृथ्वी व द्यु या दोन लोकांचेच जणू उपधान केल्यासारखे होते.

जेव्हा द्युलोक पर्जन्यवृष्टिरूपी रेताचे पृथ्वीच्या ठिकाणी सिंचन करतो, तेव्हा ते रेत पृथ्वीमध्ये स्थिर हाऊन निरनिराळ्या आकारांनी उत्पन्न होते. हे नानाविध आकार म्हणजे व्रीही,यव इत्यादि धान्ये म्हणजे ओषधी आणि अनेक प्रकारच्या वेली होत. मनुष्याच्या शरीरात असलेला जाठराग्नी त्या ओषधींचे, वेलींचे भक्षण करीत असतो. द्युलोक व पृथ्वी यांच्या उपलक्षक असलेल्या 'विराजा' नामक उदकांचे हे माहात्म्य जाणून जो त्याचे उपधान करतो तो सर्व प्रकारचे अन्न सेवन करणारा होतो.

रेतस्वी म्हणजे वीर्यशाली असा जो तरुण यजमान असेल त्याच्या अग्निचयनामध्ये अध्वर्यूने इष्टकाच्या पहिल्याच थरात 'विराजा' नांवाच्या दोन इष्टका मांडाव्यात. म्हणजे द्युलोक व भूमी हे दोन्हीही लोक त्या यजमानाला अनुकूल होऊन आपआपल्या रेताचे त्या यजमानासाठी सिंचन करतील. जो सिक्तरेता म्हणजे गलितवीर्य अर्थात् वयोवृध्द असा यजमान असेल त्याच्या अग्निचयनातील पहिल्या थरात अध्वर्यूने एकच विराजा इष्टका मांडावी व शेवटच्या पांचव्या थरात दुसरी विराजेष्टका मांडावी. म्हणजे त्या दोन्ही इष्टकांच्याकडून यजमानाच्या गलित झालेल्या वीर्याचा दोन्ही बाजूंनी परिग्रह केल्यासारखे होईल.

अग्निचयन करणाऱ्या यजमानाने अग्निचयनाचे अनुष्टान केल्यापासून एक संवत्सरपर्यंत आपणापेक्षा वयोवृध्द किंवा ज्ञानवृध्द असा जरी कोणी आपणाकडे आला, तरी त्याच्या सन्मानार्थ उभे राहू नये. कारण, द्युलोकरूप व भूलोकरूप असलेल्या 'विराजा' नामक दोन इष्टका कोणाही श्रेष्ठ पुरुषाला अभ्युत्थान देत नाहीत. कोणाही श्रेष्ठ पुरुषाला अभ्युत्थान न देणे हे या विराजासंज्ञक इष्टकांचे नेहमीचेच व्रत आहे. अर्थात् या विराजा इष्टकांचे उपधान करणाऱ्या यजमानाने एक संवत्सरपर्यंत कोणाही श्रेष्ठ पुरुषाला अभ्युत्थान न देणे हे युक्तच आहे.

जो यजमान शिरोभागरहित अशी अग्निचयनाची मांडणी करील, तो यजमान स्वर्गलोकी शिरोभागरहित होऊन राहील व जो यजमान शिरोभागसहित अग्निचयन मांडील, तो स्वर्गलोकी शिरोभागसहित होऊन राहील. 'इच्छा करण्यासारख्या हवींचे सेवन करणारे व यज्ञाला वाढविणारे असे देव ज्या योगाने या यज्ञामध्ये येतील त्या प्रकारे त्यांच्याविषयी माझ्या मनात असलेल्या

भक्तिभावाने मी त्यांना आज्यरूप हविर्द्रव्याने आहुती अर्पण करून त्यांच्या चित्ताला प्रसन्न करीन. आणि नंतर इच्छा करावयास योग्य, समुद्राप्रमाणे उत्कृष्ट व आहुती देण्यास योग्य अशा स्वयमातृण्णेच्या पृष्ठभागावर विश्वनिर्माणकर्त्या प्रजापतीला सर्व दिवसांमध्ये नाश न पावणारे हविर्द्रव्य आहुतिरूपाने समर्पण करीन', असा अर्थ असलेल्या 'चित्तिं जुहोमि मनसा' या मंत्राने स्वयमातृण्णेचे उपधान केल्यानंतर तिच्यावर आहुती द्यावी. ही आहुती म्हणजेच चितिरूपी अग्नीचा शिरोभाग होय. हे जाणून जो यजमान स्वयमातृण्णा मांडल्यावर तिच्या ठिकाणी पूर्वोक्त मंत्राने आहुती देतो त्याने शिरोभागसहित अशी अग्निचयनाची मांडणी केल्यासारखे होते व तसे केल्यामुळे तो यजमान स्वर्गलोकी शिरोभागयुक्त होऊन राहतो.

यजमानाला स्वर्गलोक प्राप्त व्हावयासाठी अग्निचयन मांडला जात असतो, त्या अर्थी अग्निचयनरूप कर्मातील जे अंग ज्या क्रमाने अनुष्ठित करावे लागते त्या क्रमाचे उल्लंघन करून जर ते अंग केले गेले, तर तो अग्निचयन यजमानाला स्वर्गलोक प्राप्त करून देण्याला योग्य असा होत नाही. आणि अग्निचयनाची मांडणी तर यजमानाला स्वर्गलोक प्राप्त व्हावा म्हणून करावयाची असते. यास्तव, अग्निचयनासंबंधी जे जे अंग ज्या ज्या क्रमाने व्हावयास पाहिजे, त्या त्या क्रमाने व्हावे म्हणून अग्निचयनाचा एक थर मांडल्यानंतर "पृष्ठ या शब्दाने उपलक्षित अर्थात् पृष्ठभागादि सर्व अवयवरूप अशा कर्मांगांपैकी कोणती कर्मे सुंदर झाली, व कोणती कर्मे स्खलित म्हणजे विस्मृत किंवा प्रमादयुक्त झाली, हे जाणणारा व आम्ही सामान्य मनुष्ये स्वभावत:च अनेक प्रमाद करणारी असतो, हे ओळखणारा हा चितिरूपी अग्नी माझ्या मनात असलेल्या भक्तीची व अभक्तीची नीट निवड करो, हे चितिरूपी अग्निदेवा, आम्हाला धन, उत्कृष्ट पुत्र इत्यादि जे जे अपेक्षित आहे, ते ते सर्व दे, व यापुढे आणखी द्यावयाचे नसेल तर देऊ नको पण, पूर्वी जे दिलेले आहेस त्याची वाढ होण्याची इच्छा कर", अशा अर्थाच्या 'चित्तिमचित्तिं चिनवत्' या मंत्राने त्या थराला स्पर्श करावा. असे केल्याच्या योगाने अग्निचयनासंबंधी सर्व कर्मांगे यथानुक्रम केल्यासारखी होतात व मांडलेला थर यजमानाच्या ठिकाणी भक्ती व अभक्ती, त्याचप्रमाणे त्याच्याकडून घडणारे अनुष्ठानवैकल्य यांचा विचार करणाऱ्या अग्नीकडून सर्व प्रकारच्या प्रमादाविषयी क्षमा केली गेल्यामुळे यथाक्रम व प्रमादरहित असा मांडला गेल्यासारखा होतो. शिवाय

चितिरूपी अग्नी प्राङ्.मुख मांडल्यासारखाही होतो. आणि तो यजमानाला स्वर्गलोकाची प्राप्ती करून देण्याला योग्य होतो. (अनुवाक ४).

१ विश्वकर्मा हा दिशांचा पालक आहे. तो आमच्या पशूंचे रक्षण करो आणि तो आमचेही रक्षण करो. त्या विश्वकर्म्याला नमस्कार असो. २ प्रजापती हा दिशांचा पालक आहे. तो आमच्या पशूंचे रक्षण करो व तो आमचेही रक्षण करो. त्या प्रजापतीला नमस्कार असो. ३ रुद्र हा दिशांचा पालक आहे. तो आमच्या पशूंचे रक्षण करो. आणि तो आमचेही रक्षण करो. त्या रुद्राला नमस्कार असो. ४ वरुण हा दिशांचा पालक आहे. तो आमच्या पशूंचे रक्षण करो. व तो आमचेही रक्षण करो. त्या वरुणाला नमस्कार असो. ५ अग्नी हा दिशांचा पालक आहे. तो आमच्या पशूंचे रक्षण करो. व तो आमचेही रक्षण करो. त्या अग्नीला नमस्कार असो.

विश्वकर्मा, प्रजापती, रुद्र, वरुण व अग्नी या पांच देवता अनुक्रमे पुरुष, अश्व, वृषभ, वृष्णि (मेंढा) व बस्त (बोकड) या पांच पशूंच्या स्वामिभूत देवता आहेत. यास्तव जो यजमान पुरुषादि पांच पशूंच्या शिरांचे उपधान करतो, तो विश्वकर्मादि पांच देवतांच्या पासून दुरावला जातो. म्हणजे या पांच देवतांचा द्रोही होतो. अशा प्रकारच्या द्रोहाचा परिहार होण्यासाठी पुरुषादि पांच पशूंच्या शिरांचे उपधान करणाऱ्या यजमानाने १ विश्वकर्मा दिशां पतिः, २ प्रजापतिर्दिशां पतिः ३ रुद्रो दिशां पतिः ४ वरुणो दिशां पतिः व ५ अग्निर्दिशां पतिः यांपैकी अनुक्रमे एकएका मंत्राने पूर्व इत्यादि चार दिशेस एके का व मध्यभागी एक अशा पांच हिरण्यशकलरूप इष्टका मांडाव्यात. या इष्टकांची मांडणी करताना जे मंत्र पठित केले जातात, त्यांच्या योगाने त्या विश्वकर्मादि पांचही देवतांना यजमानाने नमस्कार केल्यासारखे होते व त्या योगाने पुरुषादि पांच पशूंच्या शिरांचे उपधान करणारा तो यजमान विश्वकर्मादि देवतांच्या पासून दुरावला जात नाही. त्यांचा द्रोही ठरत नाही. कोणी ब्रह्मवादी असे म्हणतात की, पुरुष, अश्व इत्यादि ग्राम्य पशूंच्या शिरांच्या रूपाने यजमान अग्निचयनात उपधान करतो आणि अरण्यमयूर किंवा पुरुष आदि आरण्य पशूंना शोकाशी नियोजित करतो. मग, ग्राम्य व आरण्य या दोन प्रकारच्या पशूंच्यापासून वेगळे असे कोणते पशुस्वरूप उरते? अर्थात् ग्राम्य व आरण्य अशा दोन्ही प्रकारच्या पशूंचा यजमान

जणू संहारच करतो. परंतु ब्रह्मवाद्यांच्या म्हणण्याचे समाधान असे की, आता सांगितल्याप्रमाणे, विश्वकर्मादि पांच देवतांचा निर्देश असलेल्या मंत्रांनी पांच हिरण्येष्टका यजमानाने मांडल्या असता तो यजमान ग्राम्य व आरण्य पशूंचा संहार करण्याच्या दोषाला पात्र होत नाही. कारण, हिरण्य हे अमृतरूप, अर्थात् अमर आहे. यास्तव, अमृतरूप अशा हिरण्येष्टकांच्या उपधानाने ग्राम्य व आरण्य अशा दोन्ही प्रकारच्या पशूंना यजमानाने जणू औषधोपचार केल्यासारखे होते. अर्थात् त्या दोन्ही प्रकारच्या पशूंचा यजमान संहार करीत नाही.

अग्निचयनाच्या पहिल्या थरात जी स्वयमातृण्णा मांडली जाते ती प्राणरूप असते. मधल्या म्हणजे तिसऱ्या थरात जी स्वयमातृण्णा मांडली जाते, ती व्यानरूप असून शेवटच्या पांचव्या थरात मांडली जाणारी स्वयमातृण्णा अपानरूप असते. यास्तव, पहिल्या थरातील स्वयमातृण्णा मांडल्यावर अध्वर्यूने आपला श्वास आत ओढावा. असे केल्याने अध्वर्यूने जणू काय आपल्या प्राणाने चितिरूपी अग्नीला प्राणवायूने समृध्द केल्यासारखे होते. तिसऱ्या थरातील स्वयमातृण्णा मांडल्यानंतर अध्वर्यूने आपल्या श्वासाचे निरोधन करावे. म्हणजे तो शरीरातच स्थिर करावा. असे केले असता अध्वर्यूने आपल्या ठिकाणच्या व्यान वायूने, चितिरूपी अग्नीला व्यान वायूने समृध्द केल्याप्रमाणे होते. शेवटच्या थरातील स्वयमातृण्णा मांडल्यानंतर अध्वर्यूने आपला श्वास बाहेर सोडावा. म्हणजे त्याने आपल्या अपानवायूने चितिरूप अग्नीला अपानवायूने समृध्द केल्यासारखे होते. शिवाय, अध्वर्यूने आपल्या प्राणवायूंनी चितिरूपी अग्नीला प्रदीप्त केल्यासारखेही होते.

'भूः भुवः, सुवः' या व्याहृतिसंज्ञक तीन मंत्रांपैकी एकेका मंत्राने एकेका थरातील स्वयमातृण्णचे उपधान करावे. भूः, भुवः, सुवः या तीन व्याहृतिमंत्रांनी मांडल्या जाणाऱ्या तीन स्वयमातृण्णा म्हणजे जणू पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु हे तीन लोकच आहेत. भूः, भुवः व सुवः या तीन व्याहृतींच्या योगानेच प्रजापतीने प्रजा उत्पन्न केल्या. म्हणून या तीन व्याहृतिमंत्रांनी जर तीन थरात तीन स्वयमातृण्णा मांडल्या तर अध्वर्यूने जणू काय पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु या तीन लोकांचेच उपधान केल्याप्रमाणे होते. आणि असे केल्याच्या योगाने अग्निचयन करणारा यजमान तीनही लोकांच्या ठिकाणी प्रजा निर्माण करणारा होतो.

१ हे स्वयमातृण्णे, चितिरूपी अग्नीच्या ठिकाणी 'प्राण' वायूची प्रवृत्ती आणि चक्षुरिंद्रियाची सिध्दी होण्यासाठी मी तुला येथे मांडतो, २ हे स्वयमातृण्णे, चितिरूपी अग्नीच्या ठिकाणी व्यान वायूची प्रवृत्ती व चक्षुरिंद्रियाची निर्मिती होण्याकरिता मी तुला येथे ठेवतो, ३ हे स्वयमातृण्णे, चितिरूपी अग्नीच्या ठिकाणी अपान वायूची प्रवृत्ती व चक्षुरिंद्रियाची सिद्धी होण्यासाठी मी तुला येथे ठेवतो, ४ हे स्वयमातृण्णे, चितिरूपी अग्नीच्या ठिकाणी वाणी व दृष्टी यांची सिद्धी होण्याकरिता मी तुला येथे ठेवतो, असा अर्थ व्यक्त करणाऱ्या 'प्राणाय त्वा चक्षुषे त्वा, व्यानाय त्वा चक्षुषे त्वा, अपानाय त्वा चक्षुषे त्वा, वाचे त्वा चक्षुषे त्वा' या चार मंत्रांपैकी एकेका मंत्राने अनुक्रमे पूर्व इत्यादि चार दिशांच्या ठिकाणी एक एक स्वयमातृण्णा मांडावी. प्रत्येक स्वयमातृण्णा मांडताना म्हणाव्या लागणाऱ्या मंत्राशी, 'अंगिरसांनी मांडलेल्या अग्निचयनात तू जशी मांडल्या ठिकाणी स्थिर होऊन राहिलीस त्याचप्रमाणे तू आपल्या अधिष्ठात्री देवतेच्या अनुग्रहाने मी तुला मांडीत असलेल्या जागी स्थिर होऊन रहा', अशा अर्थाचा 'तया देवतयांगिरसस्वद् ध्रुवा सीद' हा मंत्र जोडून म्हणत जावा.

पूर्वी एकदा देवांनी अग्निचयनाच्या साधनाने स्वर्गलोकाला जाण्याची इच्छा केली. परंतु, ती त्यांची इच्छा सफल झाली नाही. अग्निचयनाच्या साधनाने देव स्वर्गलोकी जाऊ शकले नाहीत. कारण तो चितिरूप अग्नी असावा तितका शक्तिमान् नसल्याने तो स्वर्गलोकात उड्डाण करू शकला नाही. तेव्हा, चितिरूपी अग्नीच्या ठिकाणी स्वर्गलोकी उड्डाण करण्यास अवश्य ती शक्ती उत्पन्न करण्यास पूर्वोक्त चार स्वयमातृण्णा उपयोगी पडतील असे देवांच्या नजरेस आले व त्याप्रमाणे देवांनी अग्निचयनामध्ये चार दिशांच्या ठिकाणी चार स्वयमातृण्णांची मांडणी पूर्वी दर्शविलेल्या मंत्रांनी केली व त्या योगाने चितिरूपी अग्निच्या ठिकाणी प्राणादिकांची प्रवृत्ती व चारही दिशांना चक्षुरिंद्रियाची सिद्धी झाल्यामुळे तो चितिरूपी अग्नी अवश्य तितका शक्तिसंपन्न झाला व त्या चितिरूप अग्नीच्या साधनाने म्हणजे त्या पक्ष्याकार अशा चितिरूपी अग्नीवर आरोहण करून देव स्वर्गलोकाला प्राप्त झाले. यास्तव, जो यजमान आपल्या अग्निचयनात पूर्वोक्त प्रकाराने चार स्वयमातृण्णांचे उपधान करील त्याचा चितिरूपी अग्नी सर्वदिशांनी चक्षुरिंद्रिययुक्त व प्राणादि सर्वशक्तींनी युक्त होऊन स्वर्गलोकी उड्डाण करण्यास समर्थ होईल आणि त्या अग्नीच्या साधनाने

तो यजमान स्वर्गलोकी प्राप्त होईल. (अनुवाक ५).

१ 'अग्न आयाहि वितये' या मंत्राचे पठण केले असता अग्नीला आव्हान केल्यासारखे होते. २ 'अग्निं दूतं वृणीमहे' या मंत्राचे पठण करण्याने अग्नीचे वरण केल्यासारखे म्हणजे अग्नीला त्याच्या कार्याच्या ठिकाणी नियुक्त केल्याप्रमाणे होते. ३ 'अग्निनाग्निः समिध्यते' हा मंत्र पठण केला असता, अग्नीला प्रज्वलित केल्यासारखे होते. ४ 'अग्निर्वृत्राणि जंघनत्' या मंत्राचे पठण केले असता, प्रज्वलित झालेल्या अग्नीच्या ठिकाणी शत्रुवधाला योग्य असे इंद्रियसामर्थ्य स्थापन केल्यासारखे होते. ५ 'अग्नेःस्तोमं मनामहे' या मंत्राचे पठण केले असता त्या अग्नीच्या स्वरूपाचे आपल्या ठिकाणी मनन केल्यासारखे होते. अग्निचयनामध्ये अनुक्रमे पांच दिवसांत एका एका थरात मांडल्या जाणाऱ्या पांच इष्टकांचे उपधान करताना पठण करावयाच्या पूर्वोक्त पांच मंत्रांना 'अह्नां रूपाणि' म्हणजे 'दिवसांची स्वरूपे' अशी संज्ञा असून या पांच मंत्रांनी मांडल्या जाणाऱ्या पांच इष्टकांनाही तीच संज्ञा रुढ झाली आहे. सारांश, पूर्वोक्त पांच मंत्रांनी 'अह्नां रूपाणि' या नांवाच्या पांच इष्टका मांडाव्यात. असे केल्याच्या योगाने सर्वदा अग्निचयन मांडल्यासारखे होते आणि त्या त्या कालविशेषांचे व दिवसांचे स्वरूपही चितिरूपी अग्नीला प्राप्त होते.

'लोकं पृण छिद्रं पृण' या मंत्राने मांडल्या जाणाऱ्या इष्टकांना 'लोकंपृणा' असे नांव आहे. या मंत्राखेरीज इतर मंत्रांनी मांडल्या जाणाऱ्या इतर इष्टका एकेका थरात एकेकदाच मांडल्या जातात व तेवढ्यानेच त्यांच्या ठिकाणचे सार संपून जात असते. 'लोकंपृणा' नांवाच्या इष्टकांच्या ठिकाणचे सार मात्र वारंवार त्यांची मांडणी केली तरी कायम राहात असते. यास्तव, काही ब्रह्मवादी असे म्हणतात की, लोकंपृणाव्यतिरिक्त इष्टका कोणत्या कारणाने गतसार होतात व 'लोकंपृणा' हे नांव धारण करणारी प्रत्येक इष्टका सर्वदा सारसंपन्न अशी कोणत्या कारणाने राहते? परंतु त्या ब्रह्मवादी पंडितांना असे उत्तर द्यावे की, 'लोकंपृणा' इष्टका ज्या मंत्राने मांडली जाते त्या मंत्रात इंद्राग्नी व बृहस्पती या देवतांचे पठण होत असल्याने त्या मंत्राने मांडली जाणारी लोकंपृणा इष्टका सदैव सारसंपन्न राहात असते. कारण, इंद्राग्नी व बृहस्पती हे देव अत्यंत सामर्थ्यसंपन्न असल्यामुळे त्यांच्या ठिकाणचे सामर्थ्यरूप सार कधीही कमी होत नाही. अर्थात् त्यांच्या नामनिर्देशाने युक्त

असलेल्या मंत्राने मांडली जाणारी इष्टकाही त्यांच्याप्रमाणे अखंड सारसंपन्न अशी राहात असते.

'लोकंपृणा' इष्टकेची मांडणी करताना पूर्वोक्त 'लोकं पृण छिद्रं पृण' हा मंत्र पठण केल्यानंतर त्याच्यामागून आणखी एक मंत्र पठण करावा. पहिल्या मंत्राच्या पठणामागून पठण केल्या जाणाऱ्या दुसऱ्या मंत्राला 'अनुचर' अशी संज्ञा आहे. म्हणून 'अनुचर' मंत्रासह पूर्वोक्त मंत्राने मांडल्या जाणाऱ्या लोकंपृणा इष्टकेलाही 'अनुचरवती' असे नांव प्राप्त होत असते. 'अनुचर' संज्ञक मंत्र हा अनुष्टुप्छंदात्मक आहे. 'लोकं पृण छिंद्र पृण' हा मंत्र शरीररूप असून 'अनुष्टुप्' छंदात्मक असलेला 'अनुचर' संज्ञक मंत्र हा प्राणरूप आहे. सारांश, 'लोकं पृण' ह्या मंत्राने लोकंपृणानामक इष्टका शरीरयुक्त होत असून 'अनुचर' मंत्राच्या पठणाने तिच्या शरीराचे ठिकाणी प्राण निर्माण होतो. लोकव्यवहारामध्येही प्राणवायू हा शरीराच्या सर्व अवयवांच्या ठिकाणी संचार करीत असल्याचे दिसून येते. 'ता अस्य सूददोहस:' हा 'अनुचर' संज्ञक मंत्र होय. या मंत्राचा पहिला चरण जो पठण केला जातो त्याचे तात्पर्य, 'अग्निचयनाच्या थरात ज्या लोकंपृणा इष्टका मांडल्या जातात, त्या क्षीरादि रसाचे दोहन करणाऱ्या असतात', असे आहे. आणि म्हणूनच सोमवल्लीच्या कांड्याकांड्याचे ठिकाणी रस साठून राहिलेला असतो.'सोमं श्रीणन्ति पृश्नय:' असा पूर्वोक्त दुसरा चरण म्हणण्यात येत असून 'लोकंपृणारूपी श्वेतवर्ण गाई सोमवल्लीच्या रसाला परिपक्व करतात'असे त्या चरणाचे तात्पर्य आहे. अन्न हे श्वेतवर्णी असते. यास्तव, पूर्वोक्त चरणाचे पठण करून लोकंपृणा इष्टका मांडल्याच्या योगाने श्वेतवर्ण अशा अन्नाचेच जणू संपादन केल्याप्रमाणे होते. इष्टकांची रचना करून मांडला जाणारा अग्नी अर्चनीय असून अन्न हेही अर्चनीय आहे. म्हणून पूर्वोक्त चरण पठण करून लोकंपृणा इष्टका मांडली असता चितिरूपी अग्नीपासूनही यजमानाला अन्नाची प्राप्ती होते. 'जन्मन् देवानां विशस्त्रिष्वा रोचने दिव:' असा पूर्वोक्त मंत्राचा उत्तरार्ध असून तिन्ही लोकांमध्ये यजमान जन्मला असता, देवांच्या जणू प्रज्ञाच असणाऱ्या लोकंपृणा इष्टका त्या यजमानाला दिवसा असा प्रकाश देतात, असा त्या उत्तरार्धाचा भावार्थ आहे. यास्तव, त्या उत्तरार्धाचे पठण करून लोकंपृणा इष्टका मांडल्याच्या योगाने अध्वर्यू जणू काय आपल्या यजमानासाठी लोकंपृणा इष्टकांच्या द्वारा तिन्ही लोकांना प्रकाशित करतो. जो कोणी अग्निचयनात मांडल्या जाणाऱ्या

सर्व इष्टकांची प्रतिष्ठा जाणतो, तो प्रतिष्ठेला प्राप्त होतो. 'तुझ्या अधिष्ठात्री देवतेच्या अनुग्रहाने अंगिरसांच्या अग्निचयनात जशी तू मांडल्या ठिकाणी स्थिर होऊन बसलीस, तशीच येथे बैस', असा भावार्थ व्यक्त करणारा 'तया देवतयांगिरस्वद् ध्रुवा सीद' हा मंत्र म्हणजेच सर्व इष्टकांची प्रतिष्ठा होय, हे जाणून या मंत्राने जो सर्व इष्टकांचे उपधान करतो तो निश्चयाने प्रतिष्ठेला प्राप्त होतो. (अनुवाक ६).

यज्ञकर्त्या यजमानाला स्वर्गलोक प्राप्त व्हावयासाठी अग्निचयन मांडला जात असतो. आणि तो मांडला, म्हणजे अकरा पशूंचे आलभन करून त्यांच्या अंगांचे यजन करावे लागते. अर्थात् अकरा पशूंना बांधण्याकरता अकरा 'यूप' पुरावे लागतात. यूपांची ही एकादशिनी म्हणजे अकरा यूपांचा हा समूह हा वज्ररूप आहे. म्हणून अग्निचयनानंतर करावयाच्या अकरा पशूंच्या यागाच्या निमित्ताने अकरा यूपांचा एक समूहच जमिनीत पुरला गेला तर चितिरूपी अग्नी व स्वर्गलोक यांच्यामध्ये यूपरूपी वज्रच आड केल्यासारखे होऊन त्या चितिरूपी अग्नीला स्वर्गलोकापासून दूर केल्यासारखे होईल. अकरा यूपांची गर्दी आड आल्यामुळे चितिरूपी अग्नीला स्वर्ग दिसणार नाही. बरे, अकरा यूप जर पुरले नाहीत, तर स्वरूंच्या द्वारा होणाऱ्या अंजनरूप संस्कारापासून उपाकृत पशूंना वियुक्त केल्यासारखे होईल. 'यूप' तासताना ज्या ढलप्या निघतात त्यांना 'स्वरू' असे नांव आहे. ज्या पशूचे आलभन करावयाचे असते त्या पशूच्या अंगाला त्या स्वरूने अंजन करावयाचे असते, म्हणजे तूप लावावयाचे असते, अर्थात् अकरा यूप पुरावयाचे नाहीत असे ठरविले, म्हणजे स्वरूच निर्माण होणार नाहीत व त्यांच्या द्वारा उपाकृत अशा अकरा पशूंना अंजनसंस्कार व्हावयाचा तोही घडणार नाही. यास्तव, हा दोष घडू नये म्हणून अकरा पशूंचे आलभन करावयाचे असले तरी, यूप एकच पुरावा व त्यालाच अकराही पशू बांधावेत आणि तो यूप तासताना निघालेल्या स्वरूने सर्व पशूंना अंजनसंस्कार करावा. म्हणजे वज्ररूप अशा यूपांच्या गर्दीने चितिरूपी अग्नी व स्वर्गलोक यांच्यामध्ये अंतर पडणार नाही व स्वरूंच्या द्वारा करण्याच्या अंजनसंस्कारापासून पशूंनाही वियुक्त केल्याचा दोष टळेल.

अग्निचयनामध्ये इष्टका मांडण्यासाठी जो अध्वर्यू इष्टकांच्या थरावर चढतो, तो इंद्रियसामर्थ्यापासून वियुक्त होतो यासाठी पक्ष्याकार अशा चितिरूपी अग्नीच्या

पुच्छ व पंख यांच्या संधीजवळ, चयनावर चढताना जेथे पाऊल ठेवावयाचे त्या जागी, 'इंद्र विश्वा अवीवृधन्' या इंद्रलिंगात्मक ऋचेने एक इष्टका मांडावी व तिच्यावर पाय देऊन अग्निचयनाच्या थरावर चढावे म्हणजे अध्वर्यू इंद्रियसामर्थ्यापासून वियुक्त होत नाही.

चितिरूपी अग्नी हा क्रूर असा रुद्रसंज्ञक देव आहे. क्रूरस्वभावी अशा या रुद्रदेवाच्या अत्यंत हिंसक अशा प्रतीची, तिरश्वी व अनूची नांवाच्या तीन बाणरूपी शक्ती आहेत. समोरून मारा करणाऱ्या बाणरूप शक्तीचे प्रतीची, उजव्या व डाव्या बाजूने मारा करणाऱ्या शक्तीचे तिरश्वी आणि पाठीमागून मारा करणाऱ्या शक्तीचे अनूची असे नांव आहे. चितिरूपी अग्नीची जो मांडणी करतो, तो या चित्यग्निरूप रुद्र देवाच्या तीन्ही शक्तींच्याकडून सर्व बाजूंनी छिन्नविच्छिन्न केला जात असतो. यास्तव, तसे होऊ नये म्हणून अग्नीचयनाची मांडणी केल्यानंतर अध्वर्यूने तीन बाणांसह एक धनुष्य, त्याची याचना ज्याने केली नाही, अशा एका ब्राह्मणाला द्यावे. तीन बाणांसह दिलेल्या त्या धनुष्याच्या दानाने बाधा करणाऱ्या त्या बाणरूपी तीन शक्तींना नमस्कार केल्यासारखा होतो व त्या नमस्काराचा मोबदला देऊन अध्वर्यूने जणू काय त्या बाणांच्याकडून आपले शरीर विकत घेतल्या प्रमाणे होते.

१ हे रुद्र, पूर्व दिशेस जे तुझे धनुष्य असते, त्याला अनुसरून तुला साहाय्य करण्यासाठी वारा वाहो. तू धनुष्याला बाण जोडल्यावर जेव्हा वायू अनुकूलतेने वाहतो तेव्हाच तो बाण अत्यंत त्वरेने दूर जातो. हे रुद्रदेवा, तुझ्या त्या धनुष्याला एक संवत्सर पर्यंत दररोज माझा नमस्कार असो. २ हे रुद्रदेवा, दक्षिण दिशेस जे तुझे धनुष्य असेल त्याला अनुसरून तुला साहाय्य करण्यासाठी वारा वाहो. तू धनुष्याला बाण जोडल्यावर वारा जेव्हा अनुकूलतेने वाहतो, तेव्हाच तो बाण धनुष्यापासून त्वरित गतीने दूर जातो. हे रुद्रदेवा, तुझ्या त्या धनुष्याला एक 'परिवत्सर' पर्यंत दररोज माझा नमस्कार असो. ३ हे रुद्रदेवा, पश्चिम दिशेस जे तुझे धनुष्य असते, त्याला अनुसरून तुझ्या साहाय्यासाठी वारा वाहो. तू धनुष्याला बाण जोडल्यावर वारा जेव्हा अनुकूलतेने वाहतो, तेव्हाच तो बाण धनुष्यापासून शीघ्र गतीने दूर निघून जातो. हे रुद्रदेवा तुझ्या त्या धनुष्याला एक 'इदावत्सर' पर्यंत माझा दररोज नमस्कार असो. ४ हे रुद्रदेवा, उत्तर दिशेस जे तुझे धनुष्य असेल, त्याला अनुसरून तुला साहाय्य करण्यासाठी वारा वाहो. तू धनुष्याला

बाण जोडल्यानंतर वारा जेव्हा अनुकूलतेने वाहतो, तेव्हाच धनुष्याला जोडलेला तो बाण त्वरित गतीने धनुष्यापासून दूर निघून जातो. हे रुद्रदेवा, तुझ्या त्या धनुष्याला एक 'इदुवत्सर' पर्यंत दररोज माझा नमस्कार असो. ५ हे रुद्रदेवा, ऊर्ध्व दिशेस जे तुझे धनुष्य असते, त्याला अनुसरून तुझ्या साहाय्यार्थ वारा वाहो. तू धनुष्याला बाण जोडल्यावर वारा जेव्हा अनुकूलतेने वाहतो, तेव्हा तो बाण धनुष्यापासून त्वरित गतीने दूर निघून जातो. हे रुद्रदेवा, तुझ्या त्या धनुष्याला एक'वत्सर' पर्यंत दररोज माझा नमस्कार असो.

चितिरूपाने मांडला जाणारा जो अग्नी असतो, तो रुद्ररूप होय. एखादा वाघ जसा क्रोधाने गर्जना करून एखाद्या जनावराला खाण्यासाठी त्याच्यावर झडप घालण्याकरिता टपून राहिलेला असतो, त्याचप्रमाणे चितिरूपाने उत्कृष्ट मांडलेला अग्नी उग्ररूप धारण करून राहत असतो. यास्तव, चितिरूपी अग्नीची मांडणी केल्यानंतर अध्वर्यूने त्या अग्नीचे पूर्वोक्त पांच मंत्रांनी उपस्थान करून त्याला पांच नमस्कार करावेत. तसे केले असता अध्वर्यूने नमस्कारांच्या योगाने त्या उग्ररूप अग्नीला शांत केल्यासारखे होते.

हे अग्निदेवा, मातीच्या इष्टका तयार करून त्या इष्टकांच्या विशिष्ट रचनेने आजपर्यंत मी मांडलेले व इतरांनी मांडलेले जे चितिरूपी अग्नी या पृथ्वीच्या ठिकाणी प्रविष्ट होऊन राहिले आहेत, त्या सर्वांत तू उत्कृष्ट आहेस. उत्कृष्ट असा तू आम्ही चिरकाळ जिवंत राहावे, अशा प्रकारच्या औषधोपचाराविषयी आम्हाला प्रेरणा कर. हे अग्ने, मी तुझ्या सन्निध प्राप्त झालो आहे. हे अग्निदेवा, यज्ञ करण्याविषयी मनाने संकल्प करून व वाचेने उच्चार करून मी तुझ्याजवळ आलो आहे. हे अग्ने, अनशन व दान अशा दोन्ही प्रकारच्या तपाचरणाने मी तुझ्याजवळ आलो आहे. हे अग्निदेवा, मौनधारणादिनियमरूप दीक्षेचे ग्रहण करून मी तुझ्याजवळ आलो आहे. हे अग्निदेवा, तीन दिवस 'उपसत्' इष्टीचे अनुष्ठान करून मी तुझ्या सन्निध आलो आहे. हे अग्निदेवा, सोमग्रहांच्या यजनाने सुत्येचे अनुष्ठान करून मी तुझ्याजवळ आलो आहे. हे अग्निदेवा, एकशेबारा गाई इत्यादि अनेक प्रकारच्या दक्षिणा देऊन मी तुझ्याजवळ आलो आहे. हे अग्निदेवा, उदकाच्या ठिकाणी 'अवभृथ' संज्ञक होम करून मी तुझ्याजवळ आलो आहे. अनूबंध्यानामक पशुयागाचे अनुष्ठान करून मी तुझ्याजवळ आलो आहे. हे अग्निदेवा, यज्ञविषयक

सर्व कर्मावयवांची पूर्णता करणारे स्वगाकारसंज्ञक कर्म करून मी तुझ्याजवळ आलो आहे.

अग्निचयनकर्त्या यजमानाला जेव्हा प्रयाण करावयाचे असेल, तेव्हा त्याने प्रयाणास निघताना पूर्वोक्त 'येऽग्रय: पुरीष्या:' इत्यादि 'आप्ती' संज्ञक मंत्रांनी चितिरूपी अग्नीचे उपस्थान करावे. अशा प्रकारचे उपस्थान करणे, हीच अग्नीच्या जवळ प्राप्त होण्याची क्रिया होय. यास्तव, यजमानाने प्रयाणास निघताना मंत्रोपस्थानरूप क्रिया केल्याच्या योगाने तो अग्नीच्या सान्निध्याला प्राप्त होतो. (अनुवाक ७).

'तत्सवितुर्वरेण्यं' या गायत्रीछंदात्मक ऋचेच्या आधारे गाइल्या जाणाऱ्या 'गायत्र' नामक सामाचे गान करून चितिरूपी अग्नीचे पूर्व दिशेस उभे राहून उपस्थान करावे. त्या योगाने त्या चित्यग्नीचे ठिकाणी प्राणाची स्थापना केल्यासारखी होते. 'त्वामिध्दि हवामहे' या ऋचेच्या आधारे गाइले जाणारे 'बृहत्' आणि 'अभि त्वा शूर नो नुम:' या ऋचेच्या आधारे गाइले जाणारे 'रथंतर' या दोन सामांचे गान करून पक्ष्याकार अशा चितिरूपी अग्नीच्या दक्षिणोत्तर अशा दोन पंखांचे अनुक्रमे उपस्थान करावे. असे केले असता, त्या चितिरूपी अग्नीच्या ठिकाणी 'ओज' स्थापन केल्यासारखे होते. वसंत इत्यादि ऋतूंचे उच्चारण केल्या जाणाऱ्या ऋचेच्या आधाराने गाइल्या जाणाऱ्या 'ऋतुस्थायज्ञायज्ञिय' नांवाच्या सामाने चित्यग्नीच्या पुच्छाचे उपस्थान करावे. त्या योगाने चितिरूपी अग्नी वसंतादि ऋतूंच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतो. 'पृष्ठ' या नांवाने प्रसिद्ध असलेल्या सर्व सामांचे गान करून संपूर्ण चितिरूपी अग्नीचे उपस्थान करावे. पृष्ठसंज्ञक सामे ही तेजोरूप आहेत. यास्तव, त्या सामांनी उपस्थान केले असता चितिरूपी अग्नीच्या ठिकाणी अधिकतेने तेजाचे स्थापन केल्याप्रमाणे होते.

प्रजापतीने चितिरूपी अग्नी निर्माण केला. पण तो प्रजापतीकडे पाठ फिरवून दूर जाऊ लागला. तेव्हा प्रजापतीने 'वारवंतीय' नांवाच्या सामाने त्याला परत आणले आणि दूर जाण्यापासून त्याला निवृत्त केले. त्याला माघारी वळविले. अग्नीच्या दूरगमनाचे निवारण करण्यास साधनभूत होणे, हेच त्या 'वारवंतीय' सामाचे 'वारवंतीयत्व' होय. 'कया नश्चित्र आ भुवत्' या ऋचेच्या आश्रयाने 'वारवंतीय' साम गाइले जात असते. प्रजापतीने अग्नीला

वारंवतीय सामाने दूर जाण्यापासून जसे निवृत्त केले त्याचप्रमाणे 'अभि व: सुराधसम्' या ऋचेच्या आश्रयाने गाइल्या जाणाऱ्या 'श्यैत' नांवाच्या सामाने त्या अग्नीला प्रजापतीने वश करून घेतले. अग्नीला श्येत म्हणजे वश करणे हेच त्या श्यैत सामाचे श्यैतत्व म्हणजे स्वभाववैशिष्ट होय. यासाठी चितिरूपी अग्नीच्या दक्षिण श्रोणीसन्निध उभे राहून 'वारवंतीय' सामाने जर त्याचे उपस्थान केले, तर यजमानानापासून पराङ्मुख होऊन दूर जाणाऱ्या अग्नीला दूरगमनापासून परावृत्त केल्यासारखे होते, व उत्तर श्रोणीजवळ उभे राहून 'श्यैत' सामाच्या गानाने त्याचे उपस्थान केले तर त्या चितिरूपी अग्नीला यजमानाने वश केल्यासारखे होते श्येनपक्ष्याकार अशा चितिरूपी अग्नीच्या दोन्ही बाजूकडील पक्षस्कंधांजवळ उभे राहून 'प्रजापतेर्हृदय' म्हणजे 'प्रजापतीचे हृदय' या नांवाचे साम गाऊन त्याचे उपस्थान करावे. म्हणजे अग्निचयन करणारा यजमान त्या अग्नीच्या प्रेमाला पात्र होतो.

१ हे इष्टके ही पूर्व दिशा, गायत्रीछंद, अग्निदेवता आणि चित्यग्नीचे शिर यांच्यासह तुला मी चितिरूपी अग्नीच्या शिरोभागी मांडतो, २ हे इष्टके ही दक्षिणदिशा, त्रिष्टुप्छंद, इंद्रदेवता व श्येनाकार चित्यग्नीचा उजवीकडील पक्ष यांच्यासह मी तुला या चित्यग्नीच्या पक्षाच्या ठिकाणी ठेवतो, ३ हे इष्टके, पश्चिमदिशा, जगतीछंद, सवितादेवता व चित्यग्नीचे पुच्छ यांच्यासह मी तुला या चित्यग्नीच्या पुच्छाच्या ठिकाणी ठेवतो, ४ हे इष्टके, उत्तरदिशा, अनुष्टुप् छंद, मित्रावरुण देवता व चितिरूपी अग्नीच्या डावीकडील पक्ष यांच्या सह मी तुला या चित्यग्नीच्या डावीकडील पक्षाच्या ठिकाणी मांडतो, ५ हे इष्टके, ऊर्ध्वदिशा, पंक्तिछंद, बृहस्पती देवता व चित्यग्नीचा पृष्ठभाग यांच्यासह मी तुला या चित्यग्नीच्या पृष्ठभागी ठेवतो, असा अर्थ व्यक्त करणाऱ्या 'प्राच्या त्वा दिशा सादयामि' इत्यादि पांच मंत्रांपैकी एक एका मंत्राने चार दिशेस चार व एक पृष्ठभागी अशा पांच इष्टका मांडाव्यात.

जो यजमान शरीररहित अशा चित्यग्नीचे उपधान करतो, तो स्वर्गलोकी शरीररहित होतो. आणि जो यजमान शरीरासह चित्यग्नीची मांडणी करतो तो स्वर्गलोकी शरीरसंपन्न होतो. यास्तव, शिर:प्रभृति सर्व शरीराच्या अवयवरूपाने असणाऱ्या 'आत्मेष्टका' पूर्वोक्त पांच मंत्रांनी चित्यग्नीच्या पांच शरीरावयवांच्या ठिकाणी मांडाव्यात. या पांच आत्मेष्टका हाच चित्यग्नीचा आत्मा किंवा शरीर

होय. यास्तव या पांच इष्टका मांडल्या असता अध्वर्यूने शरीरासह चित्यग्रीची मांडणी केल्यासारखे होते. आत्मेष्टकांचे हे माहात्म्य जो जाणतो व त्यांचे उपधान करवितो, तो यजमान स्वर्गलोकी शरीरसंपन्न होतो. (अनुवाक ८).

१ हे उदधिनामक अग्निदेवा, दुसऱ्याच्या शरीरात ताबडतोब शिरणारा जो तुझा 'युवा' नांवाचा बाण आहे, त्या बाणाकडून तू आम्हाला उपद्रव न होता सुख होईल असे कर. त्या तुझ्या बाणाला नमस्कार असो. तुझ्या त्या बाणाच्या प्रसादानेच आम्ही आपला जीवनक्रम सुखाने चालवू. २ हे दुध्रनामका अग्निदेवा..... ३ हे गह्यनामका अग्निदेवा.... ४ हे किंशिलनामका अग्निदेवा..... ५ हे वन्यनामका अग्निदेवा, दुसऱ्याच्या शरीरात ताबडतोब शिरणारा जो तुझा युवा नांवाचा बाण आहे, त्या बाणाकडून तू आम्हाल उपद्रव न होता सुख होईल असे कर. त्या तुझ्या बाणाला नमस्कार असो. तुझ्या त्या बाणाच्या प्रसादानेच आम्ही आपला जीवनक्रम सुखाने चालवू.

चितिरूपी अग्नीसंबंधी एकावर एक रचलेले पांच थर म्हणजे जणू निरनिराळी नांवे धारण करणारे पांच अग्नीच आहेत. पहिला थर 'उदधि' नामक अग्नी असून दुसरा थर 'दुध्र' हे नांव धारण करणारा अग्नी आहे. तिसरा थर गह्य नांवाचा अग्नी असून चौथा थर 'किंशिल' हे नांव धारण करणारा अग्नी होय. पांचवा थर 'वन्य'. हा 'वन्य' संज्ञक अग्नी होय. या पांच अग्नींना जर आहुती दिल्या नाहीत, तर ते अध्वर्यू व यजमान या दोघांनाही दग्ध करतात. यास्तव, या पांच अग्नींना अध्वर्यूने जर पांच आहुती दिल्या, तर त्याने जणू काय त्या पांच अग्नींचा आहुतिरूप भाग त्यांना देऊन शांत केल्यासारखे होते. आणि मग ते अग्नी अध्वर्यू व यजमान यांना दग्ध करून मारीत नाहीत.

माझी वाणी माझ्या मुखामध्ये सुस्थित होवो. माझ्या दोन्ही नाकपुड्यांच्या ठिकाणी प्राण सुस्थित होवो. माझ्या दोन्ही नेत्रांत चक्षुरिंद्रिय म्हणजे अवलोकनशक्ती सुस्थिर होवो. माझ्या दोन्ही कानांच्या ठिकाणी श्रवणेंद्रिय, अर्थात् श्रवणशक्ती सुस्थिर होवो. माझ्या दोन्ही बाहूंमध्ये नानाविध कार्ये करण्याचे बल सुस्थिर होवो. माझ्या दोन्ही मांड्यांच्या ठिकाणी ओज म्हणजे गमनसामर्थ्य सुस्थिर होवो. माझ्या शरीरातील सर्व अवयव हिंसारहित होवोत. सर्वावयवयुक्त असे माझे शरीरही हिंसारहित होवो. माझ्या शरीरासह माझा तुला साष्टांग प्रणाम

असो. तू माझी हिंसा करू नकोस.

जो यजमान किंवा अध्वर्यू अग्निचयनाची मांडणी करताना त्याच्या थरावर पाय देऊन चढतो त्याचे प्राण त्याच्यापासून निघून जातात. यास्तव, प्राणांचे धारण व्हावयासाठी पूर्वोक्त अर्थ व्यक्त करणारा 'वाड्.म आसन्नसो: प्राण:' हा मंत्र अग्निचयनावर चढताना व उतरताना म्हणावा. असे केल्याने अध्वर्यू किंवा यजमान याने प्राणांना आपल्या ठिकाणी धारण केल्यासारखे होते. जो रुद्र अग्नी, उदक व ओषधी यांच्या ठिकाणी गुप्त रूपाने राहत असतो, इतकेच नव्हे तर अखिल विश्वाच्या ठिकाणी जो गुप्त रूपाने वास करीत असतो, त्या रुद्रदेवाला नमस्कार असो.

रुद्र हजारो आहेत. त्यांपैकी काही आज्याहुतिरूप भाग सेवन करणारे असून दुसरे काही हविर्द्रव्यरूप भाग सेवन करणारे आहेत. यास्तव, 'शतरुद्रीय' संज्ञक होम करून आज्याहुतींनी संतुष्ट होणाऱ्या रुद्रांना प्रसन्न करावे आणि 'गवीधुक' नामक धान्याचा म्हणजे गवताच्या बियांचा चरू शिजवून पूर्वोक्त अर्थ व्यक्त करणाऱ्या 'यो रुद्रो अग्नौ' ह्या मंत्राने अग्निचयनामध्ये शेवटी मांडलेल्या इष्टकेवर ठेवावा, व हविर्भाग सेवन करणाऱ्या रुद्रांना सुप्रसन्न करावे. सारांश, शतरुद्रीय होम करून शेवटच्या इष्टकेवर पूर्वोक्त चरू ठेवल्याच्या योगाने उभयविध रुद्रांचे रूप धारण करणाऱ्या चितिरूपी अग्नीला, त्याला अपेक्षित असा भाग देऊन संतुष्ट केल्यासारखे होते. ज्या यजमानाच्या अग्निचयनानुष्ठानामध्ये आता सांगितल्याप्रमाणे शेवटच्या इष्टकेवर गवीधुक चरूचे उपधान केले जाते, त्याचाच 'शतरुद्रीय' होम सफल होतो. एरवी होत नाही, असे विद्वान लोक बोलत असतात.

'हे चितिरूपी अग्निदेवा, आठ वसू हे अकरा रुद्रांच्यासह पूर्वदिशेस तुझे रक्षण करोत, यम हा ज्यांचा राजा आहे असे पितर इतर पितरांच्या सह दक्षिणदिशेस तुझे संरक्षण करोत, बारा आदित्य विश्वेदेवांच्या सह पश्चिमदिशेस तुझे रक्षण करोत, 'द्युतान' नांवाचा प्रमुख मरुत् इतर मरुतांच्यासह उत्तरदिशेकडून तुझे रक्षण करो, इंद्रप्रमुख देव, व वरुण ज्यांचा राजा आहे, असे देव ऊर्ध्वदिशेकडून व अधोदिशेकडून तुझे संरक्षण करोत, असा अर्थ व्यक्त करणाऱ्या 'वसवस्त्वा रुद्रै:' इत्यादि पांच मंत्र म्हणून व चितिरूपी अग्नीच्या ठिकाणी पांचही दिशांनी आज्याने प्रोक्षण करावे. आज्याने प्रोक्षण करावयाच्या

पूर्वी जरी 'सहस्रस्य प्रमा असि' इत्यादि मंत्राने चित्यग्नीचे हिरण्यशकलांनी प्रोक्षण केलेले असले, तरी तेवढ्या प्रोक्षणाने तो चितिरूपी अग्नी शुध्द होत नाही व यज्ञयोग्यही होत नाही. किंबहुना, पूर्वी हिरण्यशकलांनी केलेल्या प्रोक्षणाने तो प्रोक्षित केल्यासारखा देखील होत नाही. यास्तव, त्या इष्टकांच्या रचनेने मांडलेल्या चितिरूपी अग्नीचे आज्यरूपी द्रव्याने पूर्वोक्त पांच मंत्र म्हणून जर अध्वर्यूने पांच दिशांनी प्रोक्षण केले, तर तो शुद्ध आणि यज्ञयोग्य होतो. इतकेच नव्हे, तर तो उत्कृष्ट प्रकारे प्रोक्षित केल्यासारखा होतो. (अनुवाक ९).

१ हे पूर्वदिशे, तू 'समीची' हे नांव धारण करणारी आहेस. समीची हे नांव धारण करणाऱ्या, त्या तुज पूर्वदिशेचा अग्नी हा अधिपती असून कृष्ण वर्णाचा सर्प तुझा रक्षक आहे. जो तुझा अधिपती व जो तुझा संरक्षक आहे, तो अग्नी व तो सर्प या दोघांनाही नमस्कार असो. ते दोघे आम्हाला सुख देवोत. आमची हिंसा करण्यास प्रवृत्त होणाऱ्या ज्या पुरुषाचा आम्ही द्वेष करतो त्याला आणि ज्याच्याविषयी आम्ही उदासीन असतानाही जो आमचा निष्कारण द्वेष करतो, त्याही पुरुषाला, हे अग्नी व कृष्णसर्प हो, मी तुम्हा दोघांच्या विक्राळ अशा मुखाच्या जबड्यात ढकलून देतो. २ हे दक्षिणदिशे तू बलशाली असल्यामुळे 'ओजस्विनी' हे नांव धारण करणारी आहेस. ओजस्विनी नांव धारण करणाऱ्या तुज दक्षिणदिशेचा इंद्र हा अधिपती असून अजगर जातीचा सर्प हा तुझा रक्षक आहे. तुझा अधिपती असलेला इंद्र व तुझे संरक्षण करणारा अजगर जातीचा सर्प या दोघांनाही माझा नमस्कार असो. ते दोघेही आम्हाला सुख देवोत. सुखाने राहणाऱ्या आमची हिंसा करण्यास टपलेल्या ज्या पुरुषाचा आम्ही द्वेष करतो त्या पुरुषाला व ज्याच्याशी आम्ही उदासीनतेने वागत असूनही जो आमच्याशी द्वेष करतो त्याही पुरुषाला, हे इंद्रा, आणि हे 'अजगर' सर्पा, मी तुम्हा दोघांनी पसरलेल्या विक्राळ मुखामध्ये ढकलून देतो. ३ हे पश्चिमदिशे, तू 'प्राची' हे नांव धारण करणारी आहेस. प्राची हे नांव धारण करणाऱ्या तुज पश्चिमदिशेचा सोम हा अधिपती असून सर्वप्रकारचे बल आपल्या स्वाधीन ठेवणारा 'स्वज' संज्ञक सर्प हा तुझा रक्षक आहे. तुझा अधिपती सोम व तुझा संरक्षक 'स्वज' संज्ञक सर्प ह्या दोघांनाही नमस्कार असो. ते दोघेही आम्हास सुख देवोत. हे सोमा, आणि हे 'स्वज' सर्पा, ज्याचा

आम्ही द्वेष करतो व जो आमचा द्वेष करतो, त्या दोघांनाही मी तुमच्या विक्राळ मुखाच्या जबड्यात ढकलून देतो. ४ हे उत्तरदिशे, मनुष्यांना आपल्या ठिकाणी वसती करू देणारी असल्यामुळे तू 'अवस्थावा' हे नांव धारण करणारी आहेस. 'अवस्थावा' हे नांव धारण करणाऱ्या तुज उत्तरदिशेचा वरुण हा अधिपती असून ज्याच्या अंगावर आडवे तिडवे खवले असतात असा 'तिरश्चराजि' संज्ञक सर्प हा तुझा संरक्षक आहे. तुझा अधिपती वरुण व तुझा संरक्षक 'तिरश्चराजि' नामक सर्प या दोघांनाही नमस्कार असो. हे वरुणा, आणि हे 'तिरश्चराजि' सर्पा, आम्ही ज्याचा द्वेष करतो व जो आमचा द्वेष करतो, या दोघांनाही मी तुमच्या पसरलेल्या मुखाच्या खाचीच ढकलून देतो. ५ हे ऊर्ध्वदिशे, तू 'अधिपत्नी' हे नांव धारण करणारी आहेस. 'अधिपत्नी' हे नांव धारण करणाऱ्या तुज ऊर्ध्वदिशेचा बृहस्पती हा अधिपती असून श्वासनिरोधाने आपले शरीर फुगविणारा 'श्वित्र' जातीचा सर्प हा तुझा संरक्षक आहे. तुझा अधिपती वरुण व तुझा रक्षक 'श्वित्र' जातीचा सर्प या दोघांनाही माझा नमस्कार असो. हे बृहस्पते, आणि 'श्वित्र' जातीय सर्पा, ज्याचा आम्ही द्वेष करतो व जो आमचा द्वेष करतो, त्या दोघांनाही मी तुम्ही दोघांनी पसरलेल्या भयानक मुखात ढकलून देतो. ६ हे अधोदिशे, जिच्या ठिकाणी वसती करणाऱ्यांना स्वाधीनता प्राप्त होते अशी तू 'वशिनी' हे नांव धारण करणारी आहेस. 'वशिनी' हे नांव धारण करणाऱ्या तुज अधोदिशेचा 'यम' हा अधिपती असून ज्याच्या मानेवर काळ्या रंगाचे ठिपके असतात, असा 'कल्माषग्रीव' संज्ञक सर्प तुझा रक्षक आहे. तुझा अधिपती यम व तुझा रक्षक 'कल्माषग्रीव' सर्प या दोघांनाही नमस्कार असो. हे यमा, आणि हे 'कल्माषग्रीव' सर्पा ज्याचा आम्ही द्वेष करतो व जो आमचा द्वेष करतो, अशा दोघाही पुरुषांना मी तुमच्या पसरलेल्या मुखाच्या खड्डयात टाकून देतो.

अग्नी, इंद्र इत्यादि अधिपतिरूप देवता व असित इत्यादि संरक्षक अशा सर्पदेवता या चितिरूपाने मांडलेल्या अग्नीचे संरक्षण करीत असतात. यास्तव, त्यांना आहुती देऊन संतुष्ट न केल्यास त्या देवता अध्वर्यू व यजमान यांच्यावर क्रोधचित्त होऊन त्यांचा नाश करतात. म्हणून दही व मध यांच्या मिश्रणाने 'समीची नामासि' इत्यादि सहा मंत्रांनी सहा आहुती चितिरूपी अग्नीवर जर दिल्या, तर त्या देवतांना अपेक्षित असा भाग देऊन

शांत केल्यासारखे होते आणि मग त्या देवतांच्या क्रोधवृत्तीला बळी पडण्याचा प्रसंग अध्वर्यू व यजमान यांच्यावर येत नाही व ते दोघेही नाश पावत नाहीत.

१ शत्रूंच्यावर झडप घालून त्यांचा नाश करणाऱ्या हे गंधर्व हो, तुम्ही 'हेती' हे नांव धारण करणारे आहात 'हेती' हे नांव धारण करणाऱ्या त्या तुम्हा गंधर्वांची घरे पूर्वदिशेस असतात. अग्नी हाच तुमचे बाण असतो. म्हणजे तुमचे बाण अग्नीप्रमाणे प्रखर असतात. पूर्वदिशेस वाहणाऱ्या वाऱ्याचे 'सलिल' हे नांव आहे. 'हेती' हे नांव धारण करणारे जे तुम्ही गंधर्व त्या गंधर्वांना नमस्कार असो.'हेती' हे नांव धारण करणारे ते तुम्ही गंधर्व आम्हाला सुख द्या. हेती नांव धारण करणारे जे तुम्ही, त्या हे गंधर्वांनो, ज्याचा आम्ही द्वेष करतो व जो आमचा द्वेष करतो, अशा दोघांनाही मी तुमच्या विस्तीर्ण मुखाच्या दाढांच्या खाचीत ढकलतो. २ निरंतर शरीराला चंदनाची उटी लावणाऱ्या हे गंधर्वांनो, तुम्ही 'निलिम्प' हे नांव धारण करणारे आहा. 'निलिंप' हे नांव धारण करणारे जे तुम्ही, त्या तुमची घरे दक्षिणदिशेस आहेत. पितर हेच जणू तुमचे शत्रुसंहारक बाण होत. दक्षिण दिशेस 'सगर' नांवाचा वायू वाहत असतो. ३ वज्र धारण करणाऱ्या गंधर्वांनो, तुम्ही 'वज्री' हे नांव धारण करणारे आहात. 'वज्री' हे नांव धारण करणारे जे तुम्ही, त्या तुमची घरे पश्चिमदिशेस असून, स्वप्नाप्रमाणे सर्व गोष्टी साध्य करणारे 'स्वप्न' नांवाचे तुमचे बाण आहेत. पश्चिमदिशेस 'गह्वर'नांवाचा वारा वाहत असतो. ४ इच्छेनुरूप स्थितीत राहणाऱ्या हे गंधर्वांनो, तुम्ही 'अवस्थावान' हे नांव धारण करणारे आहात. 'अवस्थावान' हे नांव धारण करणारे जे तुम्ही, त्या तुमची घरे उत्तरदिशेस असून उदकाप्रमाणे प्रवाही असे 'आप' नांवाचे बाण तुम्ही धारण करीत असता. उत्तरदिशेस 'समुद्र' नांवाचा वारा वाहत असतो. ५ अधिकतेने आत्मीयांचे पालन करणाऱ्या गंधर्वांनो, तुम्ही 'अधिपती' हे नांव धारण करणारे आहात. 'अधिपती' हे नांव धारण करणारे जे तुम्ही, त्या तुमची घरे ऊर्ध्व दिशेस आहेत. पर्जन्यवृष्टीप्रमाणे शत्रूंवर जाऊन पडणारे 'वर्ष' या नांवाचे तुमचे बाण आहेत. ऊर्ध्व दिशेस 'अवस्वान्' नांवाचा वारा वाहत असतो. ६ मांसप्रिय असणाऱ्या हे गंधर्वांनो, तुम्ही 'क्रव्य' हे यथार्थ नांव धारण करणारे आहात. 'क्रव्य' हे नांव धारण करणारे जे तुम्ही, त्या तुमची घरे या भूपृष्ठावरच असतात. 'अन्न' या

नांवाचे तुम्चे बाण असून या भूमीच्या पृष्ठभागी 'निमिष' नांवाचा वारा वाहत असतो. ती ती नांवे धारण करणारे व त्या त्या दिशेस निवास करणारे जे तुम्ही, त्या तुम्हा सर्व गंधर्वांना नमस्कार असो. निरनिराळी नांवे धारण करणारे जे तुम्ही, ते सर्व गंधर्व आम्हाला सुखप्रद व्हा. निरनिराळी नांवे धारण करणारे जे तुम्ही, त्या हे सर्व गंधर्वांनो, ज्याचा आम्ही द्वेष करतो व जो आमचा द्वेष करतो, त्या दोघांनाही आम्ही तुमच्या विस्तीर्ण व कराल दाढांनी युक्त अशा मुखात ढकलून देतो.

आहुतिरूपाने अग्नीच्या ठिकाणी हुत केलेल्या हविर्द्रव्याचे सेवन करणारे देव वेगळे, आणि अग्नीच्या ठिकाणी हुत न केलेल्या द्रव्याचे सेवन करणारे देव वेगळे. अग्निचयन करणारा यजमान या दोन्ही प्रकारच्या देवांना संतुष्ट करीत असतो. पूर्वी 'ये देवा देवांना' व 'ये देवा देवेष्वधि' या दोन मंत्रांनी अग्निचयनावर दही व मध यांच्या मिश्रणाने सिंचन करण्याचा विधी केल्यामुळे 'अहुताद' म्हणजे अग्नीच्या ठिकाणी हुत न केलेल्या द्रव्याच्या सेवनाने तृप्त होणाऱ्या देवांना यजमानाने संतुष्ट केलेले असते. आणि आता, 'समीची नामासि' इत्यादि सहा आणि 'हेतयो नाम स्थ' इत्यादि मंत्रांनी दही व मध यांच्या मिश्रणाने चितिरूपी अग्नीच्या ठिकाणी आहुती दिल्याच्या योगाने यजमान हुताद देवांना संतुष्ट करीत असतो. अशा प्रकारे 'हुताद' व 'अहुताद' या दोन्ही प्रकारच्या देवांना त्यांना अपेक्षित असलेले भाग देऊन संतुष्ट केल्यासारखे होत असते.

कोणी अभिज्ञ याज्ञिक असेही म्हणतात की, अग्निचयनात मांडल्या जाणाऱ्या इष्टका, हेच खरोखर अहुताद' संज्ञक देव होत. यासाठी पूर्वोक्त आहुती देताना अग्निचयनामध्ये मांडलेल्या इष्टकांच्या भोवती प्रदक्षिणा घालावी आणि नंतर चित्यग्नीच्या ठिकाणी पूर्वोक्त आहुती द्याव्यात. असे केले असता प्रदक्षिणारूप उपचाराने इष्टकारूपी 'अहुताद' देवांना प्रसन्न केल्यासारखे होऊन पूर्वोक्त आहुतींच्या योगाने 'हुताद' संज्ञक देवांनाही यजमानाने अनुक्रमे प्रसन्न केल्यासारखे होते.

'हे अग्ने' या स्रुचीमध्ये असलेल्या या घृतरूप हविर्द्रव्याचे तू पान कर. कारण, हे घृतरूप हविर्द्रव्य पर्यायाने उदकरूपी मातांच्या स्तनांतील जणू दुग्धच आहे. हे घृत सारभूत अशा रसाने संपन्न असून उदकामध्ये

जशी प्रवाहशक्ती साठलेली असते, तशी या घृताच्या ठिकाणी भरपूर प्रवाहशक्ती साठलेली आहे. शिवाय, हे घृत माधुर्ययुक्त आहे. यास्तव, या घृताचे सेवन कर. विस्तारवान् अशा हे अग्निदेवा, या घृताचे जन्मस्थानच अशा समुद्रोदकाच्या ठिकाणी तू प्रविष्ट होऊन राहा.'

जो यजमान 'अग्निं युनज्मि' इत्यादि मंत्रांनी चितिरूपी अग्नीला यज्ञकर्माच्या ठिकाणी नियोजित करतो, परंतु त्यापासून त्याला मुक्त करीत नाही त्या यजमानाचा चितिरूपी अग्नी पराभूत होत असतो. रथाला जोडलेल्या अश्वाला प्रदीर्घ काळपर्यंत तसाच जोडून ठेवला, त्याला मोकळा केला नाही तर तो जसा क्षुधाक्रांत होऊन पराभूत म्हणजे पीडित होतो, त्याचप्रमाणे यज्ञकर्माशी नियुक्त केलेल्या चितिरूपी अग्नीची मुक्तता यजमानाने न केल्यामुळे तो पीडित झाला असता यजमानही पराभूत अर्थात् अनेक प्रकारे पीडित होतो. यज्ञकर्माशी जखडून ठेवलेला तो चितिरूपी अग्नी रूक्षतेला प्राप्त होतो. म्हणजे अतिशय दाहकतेला प्राप्त होतो. यास्तव, अग्निचयन मांडल्यानंतर अध्वर्यूने उंबराच्या लाकडाच्या स्रुचीमध्ये भरपूर आज्य घालून पूर्वोक्त अर्थ व्यक्त करणाऱ्या 'इमं स्तनमूर्जस्वंतं' या मंत्राने चितिरूपी अग्नीच्या ठिकाणीच त्या आज्याची आहुती द्यावी. अशा प्रकारे आहुती देणे, हाच त्या चित्यग्नीचा विमोक, म्हणजे यज्ञकर्मापासून केली जाणारी मुक्तता होय. अर्थात् असे केले असता यज्ञकर्मापासून अग्नीला मोकळा करून त्याला आहुतिरूप अन्नही समर्पण केल्यासारखे होते. आणि म्हणूनच पूर्वोक्त आहुतिरूपी अन्न चित्यग्नीला यज्ञकर्मापासून मोकळा केल्यावर समर्पण करण्याचा विधी जाणणारे व न जाणणारे लोकव्यवहारातच असे बोलताना आढळतात की, खायला देऊन तृप्त केलेला अश्व आपल्यावर स्वार होणाऱ्या मालकाला पुन्हा पुन्हा आपल्यावर बसू देतो व त्याच्या इच्छित स्थली सुखाने नेऊन पोचवितो. या लौकिक गोष्टीच्या रूपकाने बोलावयाचे तर चितिरूपी अग्नी हाच जणू अश्व असून यजमान पूर्वोक्त 'विमोक' संज्ञक होमाने त्या अश्वाला आज्यरूपी खाद्य देऊन संतुष्ट करतो आणि अशा प्रकारे संतुष्ट झालेला तो चितिरूपी अग्नी यजमानाला संतुष्ट करतो व तो यजमान चित्यग्नीच्या अनुग्रहाने धनवान होतो. (अनुवाक १०).

देवांचा राजा असलेल्या इंद्रासाठी डुक्कर, उदकांचा राजा असणाऱ्या वरुणाकरिता काळ्या रंगाचा हरिण, धर्मांचा राजा असलेल्या यमासाठी 'ऋश्य'

जातीचा हरिण, गाईंचा राजा असलेल्या 'ऋषभ' देवाकरिता गळ्याखाली पोवळा नसलेला 'गवय' म्हणजे गाईसारखा एक पशू, अरण्यपशूंचा राजा असलेल्या शार्दूल देवासाठी गौरवर्णाचा हरिण, पुरुषांचा राजा असलेल्या देवाकरिता माकड, अत्यंत शीघ्रगामी अशा एका जातीच्या ससाण्यांच्या अभिमानी देवासाठी एका जातीची चिमणी, निळसर वर्ण असणाऱ्या एका जातीच्या सर्पराजाला शेणातला किडा, ओषधींचा राजा असलेल्या सोमदेवासाठी कटु स्वर काढणारा व कुलुंग म्हणजे ढेंगळा असणारा चित्रक किंवा चितळ नांवाचा पशू, समुद्रदेवासाठी मगर आणि पर्वतांचा राजा असणाऱ्या हिमालयासाठी हत्ती याप्रमाणे अकरा पशूंचे उपाकरण करून त्यांच्या अंगांचा याग करावा (अनुवाक ११).

प्रजापतिदेवतेकरिता 'किंपुरुष' या नांवाचा प्राणी किंवा रानमोर, धातादेवतेसाठी कावळा किंवा घुबड, तृणहिंसक असा एक प्राणी किंवा पिवळ्या अथवा हिरव्या रंगाचा चिमणा, व मांजर हे तीन पशू, सरस्वती देवतेसाठी आरक्तवर्णी व हुबेहुब माणसाप्रमाणे वाक्ये उच्चारणारी मैना, सरस्वान देवतेकरता पांढऱ्या रंगाचा व मनुष्यासारखे बोलणारा राघू, पूषादेवतेसाठी अरण्यसंचारी असणारा 'शरभ' नांवाचा पशू, मुंगूस, माशी किंवा लांब कानाची हरिणी आणि वाग्देवतेसाठी भयानक शब्द करणारा क्रौंच नांवाचा एक पक्षी, याप्रमाणे दहा प्राण्यांचे उपाकरण करून त्यांच्या अंगांचा याग करावा. (अनुवाक १२).

अपांनप्त देवतेसाठी माशासारखे तोंड असलेला मगर, समुद्रदेवतेसाठी लांबट तोंडाचा मगर, किंवा लांब शेपटाचा मासा, सुंदर मुखाचा मगर व पुष्कळ पाय असणारा एका जातीचा मासा, हे तीन पशू, वाग्देवतेसाठी लाल डोळे असलेला भारद्वाज पक्षी, भगदेवतेसाठी समुद्रसंचारी कावळा, वायुदेवतेसाठी हरिणी किंवा चाषपक्षी, जो आपल्या पाठीवर एक लहानसा शंख वाहत असतो असा एक प्राणी आणि पाण्यावर राहणारा एका जातीचा पक्षी किंवा झाडावर घरटे करून राहणारा कोंबडा, दिग्देवतेसाठी चक्रवाक, याप्रमाणे दहा प्राण्यांचे उपाकरण करून त्यांच्या अंगांचा याग करावा. (अनुवाक १३).

'बल' देवतेसाठी अजगर, 'मित्र' देवतेसाठी उंदीर, निळ्या रंगाची माशी, किंवा पांढरा सर्प, व सरडा, हे तीन पशू, मृत्युदेवतेकरता कृष्णसर्प,

मन्युदेवतेसाठी बिळामध्ये यदृच्छेने निर्माण होणारा 'स्वज' संज्ञक एका जातीचा सर्प, त्वष्टृदेवतेसाठी झोपाळू असा एका जातीचा सर्प, पुष्करसंज्ञक सर्प किंवा भुंगा, आणि श्वेतमिश्र तांबड्या रंगाचा सर्प आणि प्रतिश्रुत्कानामक देवतेकरिता आखुड असणारा सर्प, याप्रमाणे दहा प्राण्यांचे उपाकरण करून त्यांच्या अंगांचा याग करावा. (अनुवाक १४).

चंद्रमा देवतेसाठी माणसाच्या मुखासारख्या मुखाचा मृग, वनस्पतिदेवतांच्यासाठी गोम, सरड स्त्री, वृक्षावर राहणारा कोंबडा, हे तीन पशू, दिवसदेवासाठी हरिणी, रात्रिदेवतेसाठी काळवीट, अर्यमा देवतेकरिता कोकीळ, लाल तोंडाची वांदरीण, काळ्या रंगाच्या मस्तकाची वांदरीण, हे तीन पशू, आणि धातादेवतेसाठी बिळात राहणारा खेकडा याप्रमाणे दहा प्राण्यांचे उपाकरण करून त्यांच्या अंगांचा याग करावा. (अनुवाक १५).

सूर्यदेवतेसाठी बगळी, गंधर्वांच्याकरिता अस्वल, मोर व श्येन पक्षी, अष्टवसूंच्यासाठी 'कपिंजल' नामक पक्षी, रुद्रांच्यासाठी पुरुषासारखा स्वर असलेला तित्तिर पक्षी, अप्सरांच्यासाठी अस्वली, घरातील गोम, व खंजरीट नांवाचा पक्षी, अरण्यसंज्ञक देवासाठी चमर नांवाचा पशु, याप्रमाणे दहा प्राण्यांचे उपाकरण करून त्यांच्या अंगांचा याग करावा. (अनुवाक १६).

विश्वेदेवसंज्ञक देवतेसाठी चित्रविचित्र रंगाचा व अंगावर पांढरे ठिपके असलेला हरिण, अनुमती देवतेकरता वाघ, हरिण व अस्वल हे तीन, अर्धमासदेवतांच्यासाठी अन्यवाप नांवाचा एक पशू, मासदेवतांच्या करिता कश्यप नांवाचा एक पशू, सिनीवाली देवतेकरता 'क्रयि' नांवाचा एक पशू, कुटरू नांवाचा एक पशू व चातक पक्षी हे तीन, आणि बृहस्पतिदेवतेसाठी मांजरासारखा दिसणारा एका जातीचा पशू याप्रमाणे दहा प्राण्यांचे उपाकरण करून त्यांच्या अंगांचा याग करावा. (अनुवाक १७).

भूमिदेवतेसाठी माशी, पितृदेवतांच्या करिता पांत्र व कश नांवाचे दोन पक्षी व पाणकोंबडा, ऋतुदेवतांच्यासाठी बिळात राहणारा कोल्हा, संवत्सरदेवतेसाठी स्मशानात राहणारा शकुनी पक्षी, निर्ऋतिदेवतेकरिता पारवा, घुबड व ससा, आणि सवितादेवतेसाठी रानकोंबडा याप्रमाणे दहा प्राण्यांचे उपाकरण करून त्यांच्या अंगांचा याग करावा. (अनुवाक १८).

रुद्र देवतेसाठी 'रुद्र' नांवाचा एका जातीचा हरिण, शरव्या म्हणजे

बाण धारण करणाऱ्या देवतेकरता नानाप्रकारची रूपे धारण करणारा सरडा, कावळा व पिप्पका नांवाचा पक्षी, मरुत्‌देवतेसाठी हरिण, ब्रह्मदेवतेसाठी रानचिमणी, इतरजननामक देवतांच्या करता गाढवासारख्या आकाराचा एका जातीचा वाघ, चार डोळे असलेला, म्हणजे दोन्ही डोळ्यांच्या वर डोळ्यासारखेच दिसणारे दोन वण असलेला काळा कुत्रा व गाढव आणि अग्निदेवतेसाठी पांढरी कावळी, याप्रमाणे दहा प्राण्यांचे उपाकरण करून त्यांच्या अंगांचा याग करावा. (अनुवाक १९).

अंतरिक्षदेवतेसाठी अलजसंज्ञक एका विशिष्ट जातीचा ससाणा, उदकदेवतेकरिता पाणमांजर, पाणकावळा, व पाणकावळ्यापैकी 'प्लव' नांवाच्या जातीचा कावळा, हे तीन, अदितिदेवतेसाठी पांढऱ्या अंगाचा हंस, इंद्राणीदेवतेकरिता 'कुलाल' नामक विशिष्ट जातीची कावळी, द्युलोकदेवतेसाठी गिधाड, पोटाखाली पांढरा रंग असणारा गिधाड, व खड्गमृग या नांवाचा पशू, आणि द्यावापृथिवी या देवतेसाठी कांटेरी शेपटी असणारी सायाळ याप्रमाणे दहा प्राण्यांचे उपाकरण करून त्यांच्या अंगांचा याग करावा. (अनुवाक २०).

पर्जन्यदेवतेसाठी गरुडपक्षी, इंद्रदेवतेसाठी हंस, लांडगा व मांजरासारखे दिसणारे एक श्वापद, उदकदेवतांच्यासाठी पाणमांजर, अर्यमादेवतेकरिता कोल्हा, महेंद्रदेवतेसाठी सिंह, मुंगूस व वाघ आणि कामदेवासाठी रेडा, याप्रमाणे दहा प्राण्यांचे उपाकरण करून त्यांच्या अंगांचा याग करावा. (अनुवाक २१).

अग्निदेवतेसाठी काळ्या रंगाची मान असलेला बोकड, सरस्वती देवतेकरिता मेंढी, सोमदेवतेसाठी पिवळट रंगाचा बोकड, पूषादेवतेसाठी काळ्या रंगाचा बोकड, बृहस्पतिदेवतेकरिता पांढऱ्या रंगाची पाठ असलेला बोकड, विश्वेदेव देवांच्याकरिता अनेकरंगी बोकड, इंद्रदेवतेसाठी तांबूस रंगाचा बोकड, मरुत्‌देवतेसाठी काळे ठिपके अंगावर असलेला बोकड, इंद्राग्नीदेवतेसाठी काळापांढरा बोकड, सवितादेवासाठी पोटाखाली पांढऱ्या व काळ्या रंगाचे मिश्रण असलेला बोकड, आणि वरुणदेवतेसाठी गलितवीर्य असा मेंढा, याप्रमाणे अकरा प्राण्यांचे उपाकरण करून त्यांच्या अंगांचा याग करावा. (अनुवाक २२).

प्रजापतिदेवतेसाठी घोडा, शिंगे नसलेला बोकड व बैलापासून हरिणीच्या ठिकाणी उत्पन्न झालेला हरिण हे तीन, काळ्या रंगाची मान असलेले दोन बोकड अग्निदेवतेकरिता, त्वष्टृ देवतेसाठी केसाळ पोटऱ्या असलेले दोन बोकड,

बृहस्पतिदेवतेकरिता ज्याच्या पाठीचा रंग पांढरा आहे, असे दोन बोकड, धातादेवतेसाठी पांढरे ठिपके पोटावर असलेला बोकड आणि सूर्यदेवतेसाठी पांढऱ्या रंगाचा गलितवीर्य मेंढा, याप्रमाणे अकरा प्राण्यांचे उपाकरण करून त्यांच्या अंगांचा याग करावा. (अनुवाक २३).

अनीकवान् अग्नीसाठी लाल रंगाचे लिंग असलेला व गाडी ओढणारा बैल, सवितादेवतेसाठी ज्यांच्या पोटाखाली पांढऱ्या व काळ्या रंगाचे मिश्रण आहे असे दोन बोकड, पूषादेवतेसाठी नाभीच्या ठिकाणी रुप्यासारखा पांढरा वर्ण असलेले बोकड, विश्वेदेव देवतांच्याकरिता गोरोचनासारखा रंग असलेले व शृंगरहित असे दोन बोकड, मरुत्‌देवतेकरिता काळ्या रंगाचे ठिपके अंगावर असलेला बोकड, अग्निदेवतेसाठी काळ्या रंगाचा बोकड, सरस्वतीदेवतेसाठी मेंढी, आणि वरुणदेवतेसाठी एकच पाय पांढऱ्या रंगाचा असलेला व गलितवीर्य असा काळ्या रंगाचा मेंढा याप्रमाणे अकरा प्राण्यांचे उपाकरण करून त्यांच्या अंगांचा याग करावा. (अनुवाक २४).

प्रपाठक ६

१ ज्या उदकांच्या ठिकाणी ‘कश्यप’ नांवाचा प्रजापती उत्पन्न झाला, ज्या उदकांच्या ठिकाणी इंद्र जन्मला, आणि ज्या उदकांनी आपल्या ठिकाणी गर्भरूपाने अग्नीला धारण केले, ती सुवर्णाप्रमाणे चमकणारी, स्वभावत: शुद्ध, स्नानादिकांनी मनुष्यांना पवित्र करणारी आणि सुखकारी उदके आम्हाला सुखदायक होवोत. २ लोकांच्या चित्तवृत्तीचे ठिकाणी असणाऱ्या सत्यासत्यतेचे निरीक्षण करण्याकरिता ज्यांच्या ठिकाणी त्यांचा वरुण राजा गुप्तरूपाने संचार करीत असतो, जी मधुर असा रस स्रवत असतात आणि जी स्वभावत:च पवित्र व इतरांना पवित्र करणारी आहेत, ती सौख्यकारी उदके आम्हाला सुखदायक होवोत. ३ द्युलोकामध्ये राहणारे देव ज्यांच्या ठिकाणच्या सारभूत अशा अमृतरसाचे भक्षण करीत असतात, जी अंतरिक्षामध्ये वृष्टिधारारूपाने अनेक प्रकारे वृध्दिंगत होतात, जी आपल्या ठिकाणच्या ओलाव्याने सर्व पृथ्वीला भिजवून चिंब करतात, ती स्वभावत:च निर्मळ असणारी व सौख्यदायक उदके आम्हाला सुखप्रद होवोत. ४ हे उदकांनो, तुम्ही आपल्या शांत दृष्टीने मला अवलोकन करा. शांत अशा तुमच्या शरीराने तुम्ही त्वचेला स्पर्श करा. मीदेखील तुम्हा उदकांच्या ठिकाणी वास करीत असलेल्या सर्व

अग्नींना होमाने तृप्त करीन. हे उदकांनो, तुमच्या ठिकाणी असलेली कांती, बल व ओज ही सर्व माझ्या ठिकाणी स्थापन करा. ५ हे उदकांनो, जेव्हा तुम्ही द्युलोकातून अप्रतिहत गतीने धावत येऊन मेघावर आदळता, तेव्हा तुम्ही फार मोठा नाद करीत असता. पर्जन्यरूपाने पृथ्वीवर येऊन पोचल्यानंतर जेव्हा निरनिराळ्या स्थानांमधून प्रवाहरूपाने वाहू लागता, तेव्हा तुम्ही 'नदी' या नांवाला प्राप्त होत असता. स्वभावतःच प्रवाही असणाऱ्या हे उदकांनो, तुमच्या निरनिराळ्या अवस्थेत तुम्हाला प्राप्त होणारी ती ती नांवे निर्वचनसाध्य अशी होऊन राहिली आहेत. ६ हे उदकांनो, वरुणाने प्रेरणा केल्यानंतर जेव्हा तुम्ही हर्षाने शुभकारक असा शब्द करीत नाचू लागता व प्रवाहरूपाने पसरत असता, तेव्हा तुम्हाला पाहण्यासाठी इंद्र मोठ्या उत्सुकतेने येत असतो. आपल्या ठिकाणच्या सद्गुणांनी तुम्ही इंद्रालाही आपल्याकडे आणू शकता. म्हणूनच 'आप' या नांवाला प्राप्त झालेली तुम्ही सर्वांना अनुकूल अशी झाली आहात. ७ हे उदकदेवींनो, कोणत्याही कारणाची अपेक्षा न करता स्वाभाविकपणानेच प्रवाहरूपाने वाहणाऱ्या तुम्हाला इंद्राने संतुष्ट होऊन आपलीशी केली आहेत. इतर साधनांची अपेक्षा न करता स्वतःच्या शक्तीनेच तुम्ही प्रवाहित होत असता हे सर्वप्रसिध्द आहे. इंद्राने तुम्हाला आपलेसे केले, तुम्हाला वरले म्हणूनच तुम्हाला 'वारि' हे नांव लोकांमध्ये रूढ झाले आहे. ८ स्वेच्छेने वाहत राहणाऱ्या उदकांनी देवांचा एकमेव प्रमुख असलेल्या इंद्राला आपल्या स्वाधीन करून घेतले. इंद्राने अधिष्ठित केलेली ती उदके प्रचुरतेला प्राप्त होऊन उत्कर्षाने संचार करू लागल्यामुळे त्यांना 'उदक' या नांवाने उल्लेखिले जात असते. ९ कल्याणरूप अशी ही उदकेच गाईच्या शरीरांच्या ठिकाणी घृतरूपाने परिणत होत असतात. घृतरूपाने परिणत होणारी ती उदकेच अग्नी व सोम या दोन देवांना धारण करीत असतात. माधुर्ययुक्त अशा उदकांच्या ठिकाणी असणारा अत्यंत स्वादिष्ट असा सारभूत रस संपूर्णपणे लोकांना प्राप्त होत असतो. उदकांच्या ठिकाणचा तो स्वादिष्ट रस श्वासवायू व बल यांच्या सह माझ्या ठिकाणी येऊन राहो. तो उदकांचा रस जोपर्यंत अन्नादिकांच्या रूपाने माझ्या शरीराच्या ठिकाणी राहील, तोपर्यंत माझा प्राण व बल यांचा नाश होणार नाही. १० उदकांचा रस जेव्हा माझ्या शरीरात प्रविष्ट होतो, तेव्हाच मी आपल्या नेत्रांनी पाहू शकतो व कानांनी शब्द ऐकू शकतो. या उदकांचा सूक्ष्म नाद माझ्या सर्व शरीरात सदैव राहिलेला

असतो. आमच्या मुखातून निघणारी वाणी म्हणजेच तो उदकांचा नाद होय. सुवर्णाप्रमाणे तेजस्वी असणाऱ्या हे उदकांनो, जेव्हा मी तुमचे सेवन करून तृप्त होतो, तेव्हा मी जणू काय अमृतच प्यालो आहे, असे माझ्या मनाला वाटत असते. ११ हे उदकांनो, तुम्ही सुखोत्पादक आहात. सुखजनक अशी तुम्ही आपल्या ठिकाणचा सारभूत रस मला अनुभविता येईल अशाप्रकारे माझ्या ठिकाणी स्थापन करा. आणि त्या तुमच्या रसाच्या प्रभावाने महान रमणीय अशा परमात्मतत्त्वाचे मला दर्शन होईल असे करा. १२ तुमच्या ठिकाणचा रस अत्यंत शांत व सुख उत्पन्न होण्याला कारणभूत असा असतो. या यज्ञकर्मप्रसंगी तो तुमचा सुखोत्पादक रस आम्हाला प्राप्त करा. आपल्या वासरांविषयी प्रेमभाव असणाऱ्या गाई जशा आपल्या स्तनांतील दुग्धरसाचे आपल्या वासरांना पान करवितात, त्याचप्रमाणे तुम्ही आपल्या मधुररसाचे आम्हाला पान करवा. १३ हे उदकांनो, ज्या रसाच्या अस्तित्वामुळे तुम्ही प्रसन्न होत असता, त्या रसाचे आस्वादन करण्यासाठीच आम्ही तुमच्या सान्निध्यास आलो आहोत. हे उदकांनो, तुम्ही आम्हाला प्रजांचे उत्पादक करा. १४ हे नैवार चरो, तू द्युलोकाच्या आश्रय कर. अंतरिक्षलोकी जाण्याचा प्रयत्न कर. पृथ्वीच्याशीही संयुक्त हो. तू ब्रह्मवर्चसरूप आहेस. यजमानाला ब्रह्मवर्चस् प्राप्त व्हावे, म्हणूनच मी येथे तुला स्थापन करीत आहे. (अनुवाक १).

मृत्तिकेच्या ज्या कुंभात किंवा कुंभीत जलधारांचे ग्रहण करतात, त्या कुंभांना किंवा कुंभींना 'ग्रह' अशी संज्ञा आहे. कुंभस्वरूप किंवा कुंभीरूप असे ते ग्रह उदकांनी भरून घेतले जात असल्यामुळे त्यांना 'अपांग्रह' म्हणजे 'उदकांचे ग्रह' असे नांव याज्ञिक परिभाषेत रूढ झाले आहे. अग्निचयनाच्या अनुष्ठानात अध्वर्यूकडून या अपांग्रहांचे ग्रहण केले जात असते. राजसूय यज्ञामध्ये अशाच प्रकारचे 'अपांग्रह' घेतले जात असल्यामुळे अग्निचयनाच्या प्रसंगी अध्वर्यूकडून घेतले जाणारे जे हे 'अपांग्रह,' ते जणू काय राजसूय यज्ञाचेच प्रतीक होत. ज्या यज्ञामध्ये यज्ञकर्त्या यजमानाला अभिषेक केला जात असतो; त्या यज्ञास 'सव' असे म्हणतात. अग्निचयनाच्या अनुष्ठानातही यजमानाला अभिषेक केला जात असल्यामुळे चितिरूपाने मांडला जाणारा अग्नी हा देखील जणू 'सव'स्वरूप अर्थात् 'सव' यज्ञाचे प्रतीकच म्हणता येईल. राजसूय यज्ञात यजमानाला अभिषेक होत असल्याने राजसूय यज्ञाचे अनुष्ठान म्हणजे 'वरुणसव' असून चित्य म्हणजे चितिरूपाने मांडला जाणारा

अग्नी, अर्थात् तत्संबंधी होणारे अनुष्ठान हा 'अग्निसव' होय. यास्तव, उदकपूर्ण अशा कुंभ व कुंभी या दोनी प्रकारच्या अपांग्रहांचे, ह्या जणू इष्टकाच आहेत अशा भावनेने अग्निचयनस्थलात त्यांचे उपधान केले असता, चयनकर्ता यजमान वरुणसव व अग्निसव या दोन्ही यज्ञांच्या योगाने जणू अभिषिक्त झाल्यासारखा होतो. अर्थात् त्याने वरुणसव व अग्निसव ह्या दोन्हीही यज्ञांचे अनुष्ठानच केल्यासारखे होते. इतकेच नव्हे तर राजसूय यज्ञाने देवांचे यजन करणाऱ्या यजमानाला जो लोक प्राप्त होत असतो आणि अग्निचयनाचे अनुष्ठान करणाऱ्या यजमानाला जो लोक प्राप्त व्हावयाचा असतो ते दोन्ही लोकही उदकपूर्ण कुंभकुभींचे इष्टकारूपाने उपधान करणाऱ्या यजमानाला प्राप्त होतात.

उपधान केल्या जाणाऱ्या कुंभकुंभींच्या ठिकाणी उदके भरलेली असतात, उदके ही अग्नीची शत्रू आहेत. उदकांच्या संसर्गाने अग्नी विझत असतो, हे आपण पाहतोच. यास्तव, कुंभकुभींत भरलेल्या उदकांचे जर चितिरूपी अग्नीच्या खाली उपधान केले, तर उदकरूपी शत्रूकडून चितिरूपी अग्नीला पीडा उत्पन्न होईल व तदनुरोधाने अग्निचयनकर्ता यजमानही शत्रुपीडित होईल. यास्तव, अग्निचयनाच्या खाली उदकपूर्ण कुंभकुंभींचे उपधान न करता, इष्टकोपधान करण्यापूर्वी अग्निचयन क्षेत्राच्या ठिकाणी उभी आडवी नांगरट केलेली असते. नांगरट करताना नांगराचा फाळ जमिनीत घुसत असल्याने जमिनीच्या ठिकाणी ज्या खोलगट अशा उभ्या, आडव्या रेषा निर्माण होत असतात, त्यांना 'सिता' अशी संज्ञा आहे. एकीला एक लागून अशा दोन दोन रेषा चारी दिशांना पडलेल्या असतात. अशा प्रकारच्या दोन दोन रेषांच्या अंतिम सीमेच्या जागी उदकपूर्ण अशा कुंभ व कुंभी यांचे उपधान करावे. म्हणजे ते उपधान चितिरूपी अग्नीच्या अधोभागी केल्यासारखे होत नाही व त्यामुळे चितिरूपी अग्नीही उदकरूपी शत्रूकडून पीडित होत नाही. उलट, मूर्च्छित मनुष्याला आलेली ग्लानी दूर होऊन तो सावध होण्यासाठी त्याच्या अंगावर थंड पाणी शिंपडतात, व त्यायोगे तो सावध होतो, त्याप्रमाणे नांगरटीच्या रेषांच्या सीमेवर मांडलेल्या कुंभकुभींतील उदके चितिरूपी अग्नीला पीडादायक न होता उपकारकच होतात. अमृताला जन्म देणारी उदकेही अमृतरूप आहेत. यामुळे उपधान केलेल्या कुंभकुंभींतील अमृतरूपी उदकांनी चितिरूपी अग्नीला जणू सिंचित केल्यासारखे होते व त्यायोगे तो अधिकच तेजस्वी होतो. तदनुसार अग्निचयनकर्ता यजमानही ऐश्वर्यवान होतो व त्याचा शत्रू पराभव पावतो.

एवं च, ज्या यजमानाच्या अग्निचयनाच्या अनुष्ठानात पूर्वोक्त उदकपूर्ण अशा कुंभकुंभीरूपी इष्टकांचे उपधान केले जाते, तो यजमान व या कुंभेष्टकांच्या उपधानाचे जो माहात्म्य जाणतो, तोदेखील कसल्याही संकटात पडत नाही, आणि संपूर्ण आयुष्याचे संपादन करणारा होतो.

उदकांच्या पासूनच परंपरेने अन्न उत्पन्न होत असल्याने उदके ही अन्नरूप असून दुग्धादिरसरूपी अन्न निर्माण करणारे गाई, म्हशी इत्यादि पशूही अन्नरूपच आहेत. यास्तव, ज्या यजमानाच्या अग्नीचयनरूप कर्मात अन्नरूप अशा उदकांना पूरित केलेल्या कुंभकुंभींचे उपधान केले जाते, तो यजमान व कुंभकुंभींच्या उपधानाचे माहात्म्य जाणणारा अध्वर्यू भरपूर अन्नाचा उपभोग घेणारा व पशुसंपत्तीने समृध्द असा होतो.

सहा कुंभ व सहा कुंभी मिळून उदकाने भरलेली बारा पात्रे असतात. संवत्सर हा बारा महिन्यांचाच असतो. यास्तव, बारा उदकपात्रांचे उपधान केल्याच्या योगाने प्रत्येक संवत्सरामध्ये पुरेसे होईल इतके अन्न अग्निचयनकर्त्या यजमानाला प्राप्त होते. उदकपूर्ण अशी कुंभकुंभी म्हणजे जणू काय, उदकरूप अन्नाने भरलेली पात्रेच होत. व्यवहारात देखील भोजन करणारे लोक कांसे इत्यादि धातूंच्या पात्रांमध्येच अन्न वाढून घेऊन त्याचे भक्षण करीत असतात. अर्थात् पात्रे ही जणू काय अन्नाचे जन्मस्थानच होत. सारांश, उदकरूपी अन्नाने भरलेल्या कुंभकुंभीरूपी बारा पात्रांचे ज्याच्या अग्निचयनात उपधान केले जाते तो यजमान व त्या उपधानाचे माहात्म्य जाणणारा अध्वर्यू पात्रांसह अन्नाचे संपादन करतो, शिवाय, बारा पिढ्यांपर्यंत तो भरपूर अन्न सेवन करणारा होतो आणि पात्रांच्यापासूनही तो कधी विमुक्त होत नाही. म्हणजे त्याला कधीही अन्नाची किंवा पात्रांची वाण पडत नाही.

पुरुष मोठा असतो व स्त्री त्याच्याहून लहान असते त्याप्रमाणे कुंभ मोठा असावा व कुंभी त्याहून लहान असावी. एकमेकाशेजारी मांडलेल्या कुंभकुंभींच्या जोड्या म्हणजे जणू स्त्रीपुरुषांची जोडपीच होत. अग्निचयनक्षेत्राच्या ठिकाणी कुंभकुंभींच्या जोडप्यांचे उपधान केले असता, ते स्त्रीपुरुषांच्या दांपत्याच्या द्वारा प्रजोत्पादन करण्याला कारणभूत होत असते. यास्तव, ज्याच्या अग्निचयनात कुंभकुंभीच्या जोड्यांचे उपधान केले जाते, तो यजमान आणि त्या उपधानाचे माहात्म्य जाणून तशा प्रकारचे उपधान करणारा अध्वर्यू स्त्रीपुरुषांच्या जोडप्यांच्या

द्वारा उत्पन्न होणाऱ्या पुत्रपौत्रादि प्रजेने व पशूंच्याही मिथुनरूप संपत्तीने समृध्द होतो.

चितिरूप अग्नी संतापकारक असतो आणि म्हणूनच तो अध्वर्यू व यजमान या दोघांनाही संताप उत्पन्न करतो. त्यांच्या प्रजांनाही संतापाने ग्रासतो. यास्तव, कुंभकुंभींत भरलेल्या उदकांचे जर अग्निक्षेत्राच्या ठिकाणी उपधान केले, तर त्या चितिरूपी अग्नीचा संताप शमन केल्यासारखे होते. एवं च, ज्या अग्निचयनाच्या अनुष्ठानात उदकपूर्ण अशा कुंभकुंभीरूप इष्टका मांडल्या जातात ते अनुष्ठान करणारा यजमान व त्याचा अध्वर्यू यांना चित्यग्नीच्या संतापाची पीडा होत नाही व ते मरत नाहीत आणि त्या दोघांच्या प्रजांनाही चित्यग्नीपासून उत्पन्न होणाऱ्या संतापाची पीडा न होता त्या सुखी होतात.

कुंभकुंभीरूपी पात्रांमध्ये भरलेली उदके, ही जणू उदकदेवतांची हृदयस्थानेच होत. यास्तव, उदकदेवतांच्या हृदयस्थानरूप अशा उदकांचे जर उपधान केले, तर त्या उदकांना द्युलोकातील उदकांच्याशी संयुक्त केल्यासारखे होते. व त्यायोगाने पर्जन्य वर्षणशील होतो. कुभंकुंभींत भरलेल्या उदकांचे उपधान जेथे करावयाचे ते स्थान व त्या उदकांचे सामर्थ्य जो जाणतो, तो आयतनवान् होतो म्हणजे त्याला राहण्यास उपयुक्त असे स्थान, घर वगैरे सोई प्राप्त होतात व इतरही सर्व भोग त्याला प्राप्त होतात. यास्तव, अग्निक्षेत्राच्या एका दिशेला असणाऱ्या नांगरटीच्या रेषांच्या अंतिम सीमेजवळ उदकपूर्ण अशा कुंभकुंभींचे उपधान करावे. आता दर्शविलेले तेच त्या कुंभकुंभींतील उदकांच्या उपघानाला योग्य असे स्थान होय. व त्या स्थानात राहणे हेच त्या उदकांचे सामर्थ्य होय. सारांश, कुंभकुंभीपूरित उदकांचे आता सांगितलेले स्थान व माहात्म्य जो जाणतो, त्याला राहण्यासाठी निवासस्थान मिळते व त्याला इतर सर्व भोगही प्राप्त होतात.

अग्निक्षेत्राच्या पूर्व दिशेस नांगरटीच्या तीन रेषा उमटलेल्या असतात. त्यांच्या अंतिम सीमेजवळ निर्मित झालेल्या दोन संधींमध्ये कुंभ व कुंभीची एक जोडी मांडावी. याचप्रमाणे इतर तीन दिशांनाही एक एक जोडी मांडावी आणि अग्निक्षेत्राच्या मध्यभागी दोन जोड्या, अर्थात् चार उदकपात्रे मांडावीत. अशा प्रकारे केलेले कुंभकुंभींचे उपधान चितिरूपी अग्नीच्या ठिकाणी दृढता उत्पन्न करण्यास कारणभूत होते.

अग्निचयनाच्या ठिकाणी मांडल्या जाणाऱ्या इष्टका अन्नप्राप्तीला कारणभूत होत असल्याने त्या खरोखर अन्नरूप असून अग्निचयनावर उपधान करण्यात येणारा देवभाताचा चरू हा तर साक्षात् अन्नच असतो. अर्थात् अन्नरूप अशा इष्टकांच्या ठिकाणी चरुरूपी प्रत्यक्ष अन्नाचे उपधान केले असता कोणत्याही प्रकारचे व्यवधान आड न येता यजमानाला अन्न प्राप्त होते. इष्टकांच्या मध्यभागी चरूचे उपधान करावे. म्हणजे अध्वर्यूने जणू काय यजमानाच्या उदरातच अन्नाची स्थापना केल्यासारखे होते. आणि म्हणूनच यजमान आपल्या मध्यम वयात पुष्कळ अन्न खात असतो. उपधान करण्यात येणाऱ्या चरूची बृहस्पती ही अधिष्ठात्री देवता आहे. कारण, देवांच्या मध्ये बृहस्पती हा ब्राह्मण आहे. यास्तव, बृहस्पतिदेवतात्मक अशा चरूचे उपधान केल्याच्या योगाने चयनकर्ता यजमान ब्राह्मणाला उचित अशा याजनादि कर्मांच्या साधनाने अन्नाच संपादन करतो. चरूचे उपधान करताना 'हे चरो, तू मूर्तिमंत ब्रह्मवर्चस् आहेस, मला ब्रह्मवर्चसाची प्राप्ती व्हावी म्हणून मी तुझे उपधान करीत आहे', अशा अर्थाचा 'ब्रह्मवर्चसमसि ब्रह्मवर्चसाय त्वा' हा मंत्र म्हणावा. ज्याच्या अग्निचयनात अशा प्रकारे चरूचे उपधान केले जाते, तो यजमान व या चरूच्या उपधानाचे महत्त्व जो जाणतो, तोदेखील शरीरकांतीने युक्त व अध्ययनादि संपत्तीने समृध्द होतो. (अनुवाक २).

निरनिराळ्या कारणांनी मनुष्याला मृत्यू येत असतो. ती कारणे घडू नयेत व मृत्यू टळावा म्हणून 'प्रसवाय त्वा' इत्यादि शाखांतरीय मंत्रांनी बारा भूतेष्टकांचे उपधान करावे. सर्पव्याघ्रादि हिंस्र पशू व चोर यांनी व्याप्त असलेल्या प्रदेशात चुकून गेल्याने मृत्यू येण्याचा संभव असतो. संध्याकाळी किंवा मध्यरात्री हिंडत असताना यक्षराक्षसादिकांनी झपाटले असता मृत्यु येतो. दुष्ट अशा अन्नादिकांचा आहार केल्यानेही मृत्यू येण्याचा प्रसंग उद्भवतो. यास्तव, भूतेष्टकांचे उपधान केले असता, ज्या ज्या कारणांनी मृत्यू येतो, त्या त्या कारणांपासून अध्वर्यूने जणू काय यजमानाला दूर केल्यासारखे होते. व त्यामुळे अग्निचयनकर्त्या यजमानाला संपूर्ण आयुष्य प्राप्त होते. त्या यजमानावर झडप घालणारे सर्व अपमृत्यू भूतेष्टकांच्या उपधानप्रभावाने नष्ट केलेले असतात. अग्निचयन केल्यानंतर त्या यजमानाने कोणावरही अभिचाराचा प्रयोग करू नये. असे असूनही जो एखादा मूर्ख यजमान दुसऱ्याचा घात करण्यासाठी त्याच्यावर अभिचाराचा प्रयोग करील, तर तो अभिचार त्याच्यावरच

उलटेल व त्याचा घात करील.

जो यजमान अग्निचयनाने अनुष्ठान करतो, त्याला देवांनीच तसे करण्याविषयी प्रेरणा केलेली असते. यासाठी अग्निचयनाविषयी प्रेरणा करणाऱ्या त्या देवांच्या संतोषासाठी 'देवसु' संज्ञक हवींचे निर्वपण करून त्या हवींचा याग करावा. 'अग्निर्गृहपति' इत्यादि देव हेच देवसमुदायातील अग्निचयनाची प्रेरणा करणारे देव होत. हे देवच यजमानाला अग्निचयन करण्याची आज्ञा देतात व त्या आज्ञेनुसार त्याला अग्निचयनाच्या अनुष्ठानास प्रवृत्त करतात.

अभिषेकयुक्त अशा सोमयागास 'सव' असे म्हणतात. सवामध्ये वरुणसव व ब्रह्मसव असे दोन प्रकार आहेत. राजालाच करता येतो अशा 'राजसूय' संज्ञक सोमयागास वरुणसव ही संज्ञा आहे. वरुण हा राजांचा अभिमानी देव असल्यामुळे राजाकडून होणाऱ्या राजसूय यागाला 'वरुणसव' ही संज्ञा युक्तच होय. ब्राह्मणादि त्रैवर्णिकांनी करावयाच्या अग्निचयनपूर्वक सोमयागास ब्रह्मसव असे नांव आहे. सारांश, राजसूय व अग्निचयनपूर्वक केला जाणारा सोमयाग यांच्यामध्ये यजमानाला अभिषेक केला जात असल्यामुळे हे दोन्ही याग 'सव' ह्या संज्ञेस पात्र आहेत.

यजमानाला अभिषेक करताना 'देवस्य त्वा सवितुः प्रसवे' असा मंत्र म्हणावा 'सर्वप्रेरक अशा सविता देवाच्या प्रेरणेने' हा त्या मंत्राचा भावार्थ आहे. सवितादेवाने प्रेरणा केल्यामुळेच अध्वर्यू वेदमंत्राने प्रतिपादित अशा देवतांच्याकडून यजमानाला अभिषेक करीत असतो.

अन्न शब्दाने उपलक्षित अशा अनेक औषधींच्या रसाने यजमानाला अध्वर्यूने अभिषेक करावा. अशाप्रकारे केलेला अभिषेक यजमानाला अनेक प्रकारच्या अन्नाची प्राप्ती होण्याला कारणभूत होतो.

पूर्वदिशेस यजमानाला पश्चिमाभिमुख बसवावा आणि पश्चिमेस प्राङ्.मुख उभे राहणाऱ्या अध्वर्यूने आपल्या संमुख असलेल्या त्या यजमानाला अभिषेक करावा. लोकव्यवहारात असे आपणास दिसते की, आपल्यापुढे असलेल्या पात्रात वाढलेले अन्न आपणाकडे मुख करूनच बसले आहे, अशा भावनेनेच भोजनेच्छू मनुष्य त्या अन्नाचे सेवन करीत असतो. अभिषेक करण्यास यजमानाच्या मस्तकापासून प्रारंभ करावा. कारण मस्तकाच्या ठिकाणी असणाऱ्या मुखामध्येच

अन्नाचे भक्षण केले जात असते. ज्या ओषधिरसाने अभिषेक केला जातो, त्या रसाचा यजमानाच्या मस्तकापासून मुखापर्यंतच स्राव होईल, त्याखाली होणार नाही, अशा सावधपणानेच अभिषेक करावा. असे केले असता अध्वर्यूने जणू, यजमानाच्या मुखामध्येच सेवनीय अशा अन्नाचे स्थापन केल्यासारखे होते.

'अग्नीच्या साम्राज्याने मी तुला अभिषेक करतो' अशा अर्थाच्या 'अग्नेस्त्वा साम्राज्येनाभिषिंचामि' हा मंत्र अभिषेक करताना म्हणावा. ज्या रसाने अभिषेक करण्यात येत असतो, तो रस अग्नीच्या प्रेरणेनेच निर्माण झालेला असतो. अर्थात् पूर्वोक्त मंत्राने अभिषेक केला असता अग्निप्रेरित अशा रसानेच अध्वर्यूने यजमानाला अभिषेक केल्याप्रमाणे होते. 'बृहस्पतीच्या साम्राज्याने मी तुला अभिषेक करतो,' अशा अर्थाचा 'बृहस्पतेस्त्वा साम्राज्येनाभिषिंचामि' हा मंत्र अभिषेक करताना म्हणावा. देवांच्यामध्ये बृहस्पती हा ब्राह्मण आहे. यास्तव, पूर्वोक्त मंत्राने अभिषेक केला असता देवसमुदायातील ब्राह्मणाकडूनच यजमानाला अभिषेक केल्यासारखे होते. 'इंद्राच्या साम्राज्याने मी तुला अभिषेक करतो', या अर्थाचा 'इंद्रस्य त्वा साम्राज्येनाभिषिंचामि' या मंत्राने अभिषेक करावा. म्हणजे अध्वर्यूने जणू काय यजमानाच्या शरीराच्या ठिकाणी इंद्रियशक्ती स्थापन केल्यासारखे होते. ज्या रसाने अभिषेक केला जातो तो रस बृहस्पती व इंद्र यांच्या प्रेरणेनेही निर्माण झालेला असतो. अर्थात् 'बृहस्पतेस्त्वा' व 'इंद्रस्य त्वा' या मंत्रांनी अभिषेक केला असता बृहस्पती व इंद्र यांनी प्रेरित अशा रसानेच अध्वर्यूने यजमानाला अभिषेक केल्यासारखे होते.

अग्निचयनानंतर यजमानाला अभिषेक केला जाणे. हेच त्या अग्निचयनपूर्वक सोमयागाला प्राप्त होणारे 'राजसूय' यज्ञाचे स्वरूप होय. हे जाणून जो यजमान सोमयागाच्या अंगभूतत्वाने अग्निचयन करतो, तो राजसूय केल्याने जो लोक प्राप्त व्हावयाचा तो आणि अग्निचयन केल्याने जो लोक मिळावयाचा तो, हे दोन्हीही लोक जिंकतो, म्हणजे हे दोन्ही लोक त्या यजमानाला प्राप्त होतात.

सोमराजाचा अभिषव करणाऱ्या इंद्राच्या इंद्रियाचे, सोमराजाला उपद्रव दिल्याच्या पापाने दहा तुकडे होऊन जमिनीवर पडले. तेव्हा देवांनी इन्द्राच्या त्या इंद्रियाचे तुकडे 'सौत्रामणि' नामक यागाच्या प्रभावाने पुन्हा एकत्र केले.

असे असल्यामुळे जो यजमान अग्निचयन करतो, तो सोमाचा अभिषेव करण्याला, म्हणजे सोमराजाला कुटून त्याला उपद्रव देण्याला प्रवृत्त होत असतो. अर्थात् त्या यजमानाच्या इंद्रियाचे सामर्थ्य गलित होणे, हे क्रमप्राप्तच होत असते. यास्तव, अग्निचयनपूर्वक सोमयाग केल्यानंतर त्या यजमानाने 'सौत्रामणि' याग करावा. म्हणजे त्या सौत्रामणियागाच्या प्रभावाने यजमानाने इंद्रिय व त्याच्या ठिकाणचे गलित होणारे सामर्थ्य पुन्हा पूर्ववत् संपादन करण्यास तो समर्थ होतो. अर्थात् तो अग्निचयनपूर्वक सोमयाग करणारा यजमान सौत्रामणि यागाच्या प्रभावाने सामर्थ्यसंपन्न अशा इंद्रियाचे आपल्या ठिकाणी धारण करतो. (अनुवाक ३).

'सजूरब्दोऽयावभिः...' म्हणजे संवत्सर हा चैत्रादि मासांच्याशी समानतेने प्रीती करणारा आहे. चैत्रादि मासांसह त्या संवत्सराला मी घृताने आहुती देतो. उषा नांवाची कालदेवता लाल रंगाच्या आपल्या प्रभांच्याशी समानतेने प्रेम करणारी आहे. रुक्‍वर्ण अशा प्रभांच्यासह त्या उषादेवतेला मी घृताने आहुती समर्पण करतो. सूर्य हा एतश नांवाच्या आपल्या अश्वाशी समानत्वाने प्रीती करीत असतो. एतशनामक अश्वासह सूर्यदेवाला मी घृतरूप हविर्द्रव्याने आहुती अर्पण करतो. व्याधींचे निराकरण करणाऱ्या औषधप्रक्रियांच्याशी अश्विनीकुमार हे समानतेने प्रेम करीत असतात. व्याधिनिवारक अशा औषधप्रक्रियांच्यासह अश्विनीकुमारांना संतोष होण्याकरिता मी घृताने आहुती देतो. अखिल विश्वातील मनुष्यांना प्रिय असणारा वैश्वानर अग्नी पशूंच्याशी समानतेने प्रेम करीत असतो. पशूंच्यासह त्या वैश्वानर अग्नीच्या तृप्तीसाठी मी घृताने आहुती देतो.

पूर्वोक्त मंत्रांतील अब्द शब्दाचा संवत्सर हा अर्थ असून 'अयाव' शब्दाचा मास हा अर्थ आहे. उषा, व अरुणी म्हणजे तिच्या प्रभा, सूर्य व 'एतश' म्हणजे त्याचा अश्व हे प्रसिद्धच आहेत. 'अश्वि' शब्दाने द्युलोक व पृथ्वी हे दोन लोक विवक्षित असून 'अग्निर्वैश्वानर' शब्दाने 'संवत्सर' असा अर्थ विवक्षित आहे. 'इडा' शब्दाचा अर्थ पशू असा समजावयाचा असून पशूंच्यापासूनच घृत निष्पन्न होत असल्याने, पूर्वोक्त मंत्रातील 'घृत' हा शब्द पशूंचाच वाचक समजावा. गर्भावस्थेत असणारे पशू संवत्सराने जन्मास येत असतात. म्हणून पूर्वोक्त अर्थ व्यक्त करणाऱ्या 'सजूरब्दोऽयावभिः' इत्यादि पांच मंत्रांनी पांच आहुती दिल्या असता, चितिरूपी अग्नी यजमानासाठी एका संवत्सराने पशूंना

उत्पन्न करतो.

पूर्वोक्त पांच आहुती अध्वर्यूने दर्भस्तंबावर द्याव्यात. कारण या पृथ्वीचे ठिकाणी अविनाशी व स्वादिष्ट असे जे द्रव्य व तत्संबंधी सामर्थ्य असते, तेच दर्भांच्या रूपाने परिणत झालेले असते. यास्तव, दर्भस्तंबावर आहुती दिल्या असता, त्या पृथ्वीच्या ठिकाणच्या अविनाशी, स्वादिष्ट व सामर्थ्ययुक्त अशा द्रव्याच्याच ठिकाणी दिल्याप्रमाणे होतात. म्हणून ज्याच्या अग्निचयनात अशा प्रकारे आहुती दिल्या जातात तो यजमान त्या आहुतींच्या प्रभावाने प्रजोत्पादनसमर्थ व भरपूर अन्नाचा उपभोक्ता होतो.

पूर्वोक्त आहुतिमंत्रांमध्ये प्रतिपादित असलेल्या संवत्सर, मास इत्यादि सर्व देवता या चितिरूपी अग्नीच्याही पूर्वी आहुतिरूप भाग घेणाऱ्या असल्याने पूर्वोक्त आहुती देऊन यजमानाने त्यांना संतुष्ट केल्यासारखे होते. शिवाय, अशा प्रकारच्या पूर्वकालीन होमाने चितिरूपी अग्नीच्या चक्षुरींद्रियाचेही धारण केल्याप्रमाणे होते. या होमाचे माहात्म्य जो जाणतो, तो केव्हाही अंध होत नाही.

आज जे जग दृष्टीस पडते, ते उत्पन्न होण्यापूर्वी केवळ निर्भेळ असे उदकरूप होते. त्यामुळे सृष्टिकर्त्या प्रजापतीला स्वत:चे शरीर ठेवावयास कसलाच आधार त्या उदकांच्या ठिकाणी नव्हता. तेव्हा तो प्रजापती वायूचे रूप धारण करून त्या उदकांमध्ये असलेल्या एका कमलपत्रावर अधिष्ठित होऊन बसला. ते कमळाचे पान स्वभावत:च हलणारे व त्यावर बसलेला प्रजापती हाही वायुरूप असल्याने तो एकसारखा डुलतच राहिला, अर्थात् प्रजापतीला स्थैर्यच प्राप्त होईना. तेव्हा आता आपल्याला स्थैर्य प्राप्त होण्याकरता आपण कशाचा आश्रय करावा? याविषयी त्याने आपल्याशी विचार केला तेव्हा त्या उदकांमध्ये त्याला शेवाळ आढळले. त्या शेवाळावर त्याने इष्टकांच्या मांडणीने चितिरूपी अग्नी निर्माण केला. तो चितिरूपी अग्नीच आज दिसत असलेल्या भूमीच्या स्वरूपाला प्राप्त झाला. आणि मग त्या पृथ्वीवर प्रजापती प्रतिष्ठेला प्राप्त झाला.

प्रजापतीने आपल्या पूर्व भागी जी इष्टका मांडली, तेच चितिरूपी अग्नीचे शिरस्थान झाले व तो भाग पूर्वदिशा हे नांव पावला. उजव्या बाजूला जी इष्टका मांडली. तोच श्येनपक्ष्याकार चित्यग्नीचा उजव्या बाजूचा पंख झाला.

आणि ती बाजू दक्षिण दिशा या नांवाने प्रसिद्ध झाली. प्रजापतीने आपल्या मागच्या बाजूस जी इष्टका मांडली तीच चितिरूप अग्नीच्या पुच्छरूपाने परिणत होऊन त्या बाजूस पश्चिम दिशा हे नांव प्राप्त झाले. आपल्या डाव्या बाजूस जी इष्टका प्रजापतीने मांडली तीच चितिरूपी अग्नीचा डावीकडील पंख झाला व ती बाजू उत्तर दिशा या संज्ञेला पात्र झाली. प्रजापतीने ऊर्ध्व बाजूस जी इष्टका मांडली तीच श्येनाकार चितिरूपी अग्नीचा पृष्ठभाग झाली व ती बाजू ऊर्ध्व दिशा हे नांव पावली.

आज दिसत असलेली भूमी म्हणजे प्रजापतीने पांच इष्टकांची मांडणी करून निर्माण केलेला चितिरूपी अग्नी होय. अर्थात् ही भूमी म्हणजे प्रजापतिनिर्मित चित्यग्नी आहे. अशा प्रकारचे ज्ञान नसलेल्या माणसांनी जर तिच्या ठिकाणी कोठे खणले, तर त्या मूर्ख माणसांनी चित्यग्नीची इष्टकाच फोडून तिचा चूर केल्यासारखे होते. त्याचप्रमाणे प्रजापतीने मांडलेल्या शर्करेचे म्हणजे चुनखडीचेही चूर्ण केल्याचा दोष त्या मूर्ख माणसांना लागत असतो. या भूमीकडे रात्रीच्या वेळी जेव्हा पक्षी पाहतात तेव्हा त्यांच्या दृष्टीला ती अग्नीप्रमाणे प्रदीप्त झालेली दिसत असते आणि म्हणूनच कोणतेही पक्षी रात्री भूमीचा आश्रय करीत नाहीत.

भूमीचे ठिकाणी असणाऱ्या ह्या तात्त्विक व व्यावहारिक स्वरूपाचे माहात्म्य जाणून जो यजमान अग्निचयन करतो, तो ह्या भूमीच्या ठिकाणी प्रतिष्ठित व सर्व दिशांच्या ठिकाणी विजयी होतो.

प्रजापतीच्या मुखापासून अग्नी व ब्राह्मण यांची उत्पती झाली असल्यामुळे ब्राह्मण हा आग्नेय, म्हणजे अग्निसंबध्द आहे. आणि म्हणूनच प्रजापतिनिर्मित चित्यग्निरूप अशा ह्या भूमीच्या ठिकाणी सर्व दिशांना ब्राह्मणाचे जीवन समृद्धिशील होत असते. स्वदेशाप्रमाणे परदेशातही ब्राह्मण शास्त्राभिज्ञ म्हणून पूज्य मानला जातो. आणि म्हणूनच तो स्वकीयरूप अशा भूमीचे ठिकाणी सर्व दिशांना संचार करीत असतो.

भूमिरूप असा हा चित्यग्नी नद्या, विहिरी इत्यादिकांच्या ठिकाणी असणाऱ्या उदकांचे निवासस्थान आहे. आणि म्हणूनच अग्नी एखादे घर जाळू लागला म्हणजे तो विझविण्यासाठी मनुष्यांनी त्यावर सिंचित केलेली उदके त्या अग्नीला नष्ट करतात आणि आपण स्वतःही शुष्क होऊन अग्निरूप अशा

आपल्या भूमिरूपी जन्मस्थानाच्या ठिकाणी प्रवेश करतात. (अनुवाक ४).

एक संवत्सरपर्यंत उख्याग्नीचे धारण केल्यानंतर दुसऱ्या संवत्सरामध्ये दररोज उपसदिष्टीच्या पूर्वी अग्निदेवतेसाठी अष्टाकपालात्मक, इंद्रदेवतेसाठी एकादशकपालात्मक, विश्वेदेवदेवतांच्यासाठी द्वादशकपालात्मक पुरोडाशाचे आणि बृहस्पतिदेवतेकरिता चरू व विष्णुदेवतेसाठी त्रिकपालात्मक पुरोडाश तयार करून त्यांचा याग करावा. आणि तिसऱ्या संवत्सरामध्ये 'अभिजित्' नांवाच्या सोमयागाचे यजन करावे. गायत्री छंद हा चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने आठअक्षरी असून सोमयागातील प्रातःसवनाचे अनुष्ठान गायत्रीछंदप्रधाननेत होत असल्याने ते प्रातःसवनीय अनुष्ठानही गायत्री म्हणजे गायत्रीछंदरूप आहे असे समजावे. प्रजापतीपासून गायत्री छंदाबरोबरच अग्नीची उत्पती झाली असल्यामुळे गायत्रीछंदप्रधान असे ते प्रातःसवनरूप कर्म आग्नेय, अर्थात् अग्निदेवतात्मकच होय. यास्तव, अग्निदेवतेसाठी अष्टाकपालात्मक पुरोडाशाचे यजन केले असता, प्रातःसवनाच्या अनुष्ठानाचे फल व गायत्री छंदाची अभिमानिनी देवता ह्या दोन्हीचीही यजमानाला प्राप्ती होते. त्रिष्टुप् छंद हा चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने अकराअक्षरी आहे. प्रजापतीपासून त्रिष्टुप् छंदाबरोबर इंद्राची उत्पत्ती झाली असल्यामुळे 'त्रिष्टुप्'छंदप्रधान असे माध्यंदिन सवनाचे अनुष्ठानही ऐंद्र म्हणजे इंद्रदेवतात्मक असते. यास्तव इंद्र देवतेसाठी एकादशकपालात्मक पुरोडाशाचे यजन केले असता माध्यंदिन सवनाच्या अनुष्ठानाने प्राप्त होणारे फळ व त्रिष्टुप्छंदाभिमानिनी इंद्रदेवतेची प्रसन्नता ही दोन्हीही यजमानाला प्राप्त होतात.

जगती छंद हा चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने द्वादशाक्षरी आहे. प्रजापतीपासून जगतीछंदाबरोबरच विश्वेदेव उत्पन्न झाले असल्यामुळे जगतीछंदप्रधान असे तृतीय सवनाचे अनुष्ठानही विश्वेदेवदेवतात्मकच असते. यास्तव, विश्वेदेव देवतांच्यासाठी द्वादशकपालात्मक पुरोडाशाचे यजन केले असता तृतीय सवनाच्या अनुष्ठानाचे श्रेय व विश्वेदेवदेवतांचा संतोष ह्या दोन्ही गोष्टी प्राप्त होतात.

देवांमध्ये बृहस्पती हा ब्राह्मण आहे. यास्तव, बृहस्पतिदेवतेसाठी चरूचा याग केल्याच्या योगाने देवांमधील ब्राह्मण असलेल्या बृहस्पतीच्या अनुग्रहाची यजमानास प्राप्ती होते. विष्णू हा प्रत्यक्ष यज्ञरूप आहे. यास्तव त्रिकपालात्मक अशा पुरोडाशाने विष्णूचे यजन केले असता यजमानाला यज्ञाचीच प्राप्ती

होते. तिसऱ्या संवत्सरामध्ये 'अभिजित्' यज्ञाचे अनुष्ठान केल्याच्या योगाने यजमान सर्वत्र विजय संपादन करतो.

अग्निचयन करणारा यजमान एकसंवत्सरपर्यंत जर उख्याग्नीचे धारण करील, तर त्या ऊख्याग्निधारणाच्या प्रभावाने तो यजमान जणू काय, ह्या भूलोकाला स्पर्श करतो. नंतर दुसऱ्या संवत्सरामध्ये जर त्या यजमानाने अग्निचयन मांडला, तर तो यजमान त्या अग्निचयनाच्या प्रभावाने अंतरिक्ष लोकाला स्पर्श करतो. तिसऱ्या वर्षी जर त्या यजमानाने 'अभिजित्' नांवाचा सोमयाग केला, तर त्या सोमयागाच्या प्रभावाने तो स्वर्गलोकाला स्पर्श करणारा होतो. अट्णारनामक ऋषीचा पुत्र असलेला 'पर' नामक ऋषी, 'उशिज्' ऋषीचा पुत्र असलेला 'कक्षीवान्' नामक ऋषी, 'श्रयस' ऋषीचा पुत्र' 'वीतहव्य' ऋषी, आणि पुरुकुत्य ऋषीचा पुत्र 'त्रसदस्यु' ऋषी ह्या चौघांनी प्रजा प्राप्त होण्याची इच्छा धारण करून संवत्सरपर्यंत उख्याग्नीचे धारण करून दुसऱ्या वर्षी पूर्वोक्त पांच देवतांचे त्यांच्या त्यांच्या हविर्द्रव्याने यजन करून अग्निचयनाची मांडणी केली आणि त्या अग्निचयनाच्या प्रभावाने त्या चौघांनाही हजार हजार पुत्र प्राप्त झाले. एवं च, पूर्वोक्त प्रकाराने पांच देवतांच्या यजनपूर्वक अग्निचयनाचे महत्त्व जाणून जो त्याचे अनुष्ठान करतो, तो प्रजा व पशू यांच्या योगाने समृध्द होतो. इतकेच नव्हे तर आता सांगितलेल्या पर इत्यादि ऋषींना ज्या प्रमाणात ऐश्वर्य प्राप्त झाले त्या प्रमाणात त्यालाही ऐश्वर्य प्राप्त होते. (अनुवाक ५).

प्रजापतीने जेव्हा चितिरूपी अग्नीची मांडणी केली, तेव्हा त्या अग्नीने वस्तऱ्याप्रमाणे तीक्ष्ण धार असलेल्या वज्रासारखे उग्ररूप धारण केले. त्या उग्रस्वरूप अग्नीला पाहून देव भ्याले आणि ते त्या अग्नीजवळ येण्यास धजेनात. मग, देवांनी आपल्याला वाटणाऱ्या भीतीचा प्रतिकार करण्यासाठी, छंदोयुक्त अशा मंत्रांनी आपले शरीर झांकून घेऊन ते सुरक्षित राहील असे केले आणि ते चितिरूप अग्नीजवळ गेले. ज्या मंत्रांच्या पठणाने देवांनी आपले शरीर आच्छादित केले त्या मंत्रांना छंद हे नांव प्राप्त झाले. शरीराचे आच्छादन करणे हेच त्या छंदांचे छंदत्व किंवा स्वभावधर्म होय. छंदोमंत्रांचा अंतर्भाव वेदांत होत असल्याने ते वेदरूप आहेत. ऋक् व सामरूप मंत्रांनी देवांच्या यज्ञासाठी कृष्णाजिनाचे रूप धारण केल्याचे वर्णन वेदांत आले असल्यामुळे

कृष्णाजिन हे देखील वेदरूपच आहे. यासाठी अग्निचयनाचे उपधान करताना अध्वर्यूने आपल्या दोन्ही पायांत कृष्णाजिनाच्या वहाणा करून घालाव्यात. म्हणजे त्याने छंदांच्या योगाने आपले शरीर आच्छादित केल्यासारखे होते आणि त्या योगाने उग्र अशा चितिरूपी अग्नीपासून त्याच्या शरीराचा नाश होत नाही.

इष्टकांची मांडणी करून निर्माण केला जाणारा अग्नी हा देवांचा निधी आहे. जो निधी गुप्तपणे न ठेवता उघडा ठेवलेला असतो, तो दुसऱ्या कोणा लोकांच्या किंवा विरोध करणाऱ्या शत्रूंच्या हाती पडण्याचा संभव उत्पन्न होतो. अथवा तो निधी जेथे ठेवला जातो ते स्थानच ठेवणारा विसरतो. आणि त्यामुळे त्या निधीचे ज्ञानच त्या ठेवणाराला होत नाही. यास्तव ह्या दोन्ही दोषांचा परिहार होण्यासाठी पूर्वी उपधान केलेल्या उखेचे यजमानाने आपल्या पायाने आक्रमण करावे. असे केले असता यजमान स्वतःचे व चित्यग्निरूप देवनिधीचे अधिकत्वाने पालन करतो व तसे करण्याने तो चित्यग्निरूपी देवनिधीच्या रक्षणालाही पात्र होतो. आक्रमणाच्या योगाने स्वतःच्या बुद्धीमध्ये चित्यग्नीरूप देवनिधीला पूर्णपणे दृढ केल्यामुळे, त्याला केव्हाही विसरत नाही. आणि त्या देवनिधीचे स्वतःच संरक्षण केल्यामुळे विरोधक असणाऱ्यांनाही त्या देवनिधीचा लाभ होत नाही.

कोणी विद्वान् असे म्हणतात की, यजमानाने 'पायाने उखेचे आक्रमण करू नये, कारण, उखा ही राक्षसांची देवता जी निर्ऋती तिच्याशी संबंध करणारी आहे. यास्तव उखेचे जर आक्रमण केले, तर निर्ऋतीलाच स्वतःचे शरीर अर्पण केल्यासारखे होईल. यास्तव, उखेचे आक्रमण करू नये. चित्यग्निरूपी देवनिधीचे रक्षण व्हावे अशी अपेक्षा असेल तर त्या उखेवर पुरुषाचे मस्तक ठेवावे. म्हणजे ठेवलेल्या निधीच्या जवळ त्याची राखण करण्याकरता जसा एखादा माणूस बसवावा व त्याला तू य. द्रव्याचे रक्षण कर असे ज्याप्रमाणे त्या निधीचा स्वामी सांगतो तशा प्रकारे चित्यग्निरूप निधीचे रक्षण करण्याकरता पुरुषमस्तकरूपी राखणदार यजमानाने त्या निधीजवळ ठेवल्यासारखे होईल.

चितिरूपी अग्नीची मांडणी करणारा प्रजापती हाच 'अथर्वा' नांवाचा ऋषी असून त्याने मांडलेला चितिरूपी अग्नी हाच त्या अथर्व्याचा 'दध्यङ्.' नांवाचा पुत्र होय. इष्टका ह्या त्या चित्यग्निरूप दध्यङ्.ऋषीच्या अस्थी

होत. हाच अर्थ मनामध्ये अभिप्रेत करून कोणा एका ऋषीने 'इंद्राने दधीची ऋषींच्या अस्थींनी' अशा अर्थाचा प्रारंभ असलेल्या 'इंद्रो दधीचो अस्थभि:' ह्या मंत्राचा अनुवाद केला आहे. यास्तव, इष्टकांनी जर अग्नीची मांडणी केली, तर सशरीर अशा अग्नीचीच अध्वर्यूने मांडणी केल्याप्रमाणे होते. इष्टकांनी अग्नीची मांडणी करण्याचे माहात्म्य जो जाणतो तो अध्वर्यू व त्याचा यजमान स्वर्गलोकी सशरीर असा होऊन राहतो.

चितिरूपाने मांडला जाणारा अग्नी हे अग्निदेवतेचे शरीर आहे. ह्या शरीरामध्ये 'वैश्वानर' नांवाचा जीवात्मा वास्तव्य करीत असतो. यास्तव, चित्यग्नीचे ठिकाणी वैश्वानरदेवतेसाठी पुरोडाशाचा याग केला असता अग्निदेवतेच्या शरीराचाच संस्कार करून यजमानाने त्याच्या ठिकाणी आरोहण केल्यासारखे होते.

यजमान चितिरूपी अग्नी मांडतो म्हणजे जणू काय तो आपल्या शरीराचाच संस्कार करतो व त्या शरीराच्या ठिकाणी वैश्वानरसंज्ञक जीवात्मरूपाने आरूढ होतो. यास्तव, जीवात्मस्थानीय अशा वैश्वानरदेवतात्मक पुरोडाशाचे अवदान करू नये. तसे केल्यास तो जिवंत असताना देवांच्या जवळ जाईल.

'पृष्टो दिवि पृष्टो' ह्या वैश्वानरदेवतात्मक ऋचेने पुरीषाचे म्हणजे चिखलाचे उपधान करावे. पूर्वोक्त मंत्रात प्रतिपाद्य असलेला जो वैश्वानर अग्नी तोच ही भूमी होय. पुरीष किंवा चिखल हा चितिस्वरूप होय. यास्तव पुरीषाचे उपधान केल्याच्या योगाने अध्वर्यूने जणू काय भूमिरूप अशा वैश्वानर अग्निचीच मांडणी केल्यासारखे होते. शिवाय वैश्वानर शब्दाने उपलक्षक असे जे सर्वपुरुषहितकारी मूर्त स्वरूप आहे ते अग्नीचे अत्यंत प्रिय शरीरच आहे. अर्थात् पूर्वोक्त वैश्वानरदेवतात्मक मंत्राने पुरीषोपधान केले असता, अग्निचयनकर्ता यजमान अग्नीला प्रिय असलेल्या शरीराला प्राप्त होतो. (अनुवाक ६).

अग्निचयनाची मांडणी करण्यापूर्वी त्याची अंगभूत म्हणून अग्निचयन मांडणाऱ्या यजमानाला दीक्षा ग्रहण करावी लागत असते. केशश्मश्रूचे वपन करून, मौन धारण करणे, खाण्यापिण्यासंबंधाने विशिष्ट अशा नियमांचे पालन करणे इत्यादि प्रकारचे आचरण काही दिवस करणे, याला दीक्षा अशी संज्ञा आहे. अग्निचयन करणाऱ्या देवांनी दीक्षेच्या योगाने विराट् छंदाची व विशिष्ट रीतीने शोभणाऱ्या विराट्संज्ञक राज्याची प्राप्ती करून घेतली. यास्तव, अग्निचयन मांडू इच्छिणाऱ्या यजमानाने प्रथमत: काही दिवस दीक्षा ग्रहण करून राहावे. दीक्षाग्रहण किती काळपर्यंत

काळापर्यंत याविषयी अनेक पक्ष सांगितले आहेत.

तीन रात्री दीक्षा ग्रहण करावी. या ठिकाणचा 'रात्री' हा शब्द दिवसाचा वाचक आहे. विराट् छंदाचे तीन चरण असतात. यास्तव, तीन दिवस दीक्षा करण्याने तिला 'विराट्'छंदाचे स्वरूप प्राप्त होते व त्यायोगे यजमान 'विराट्' संज्ञक राज्य संपादन करतो. सहा रात्री म्हणजे सहा दिवस दीक्षा धारण करावी. कारण सहा ऋतूंच्या योगाने संवत्सर पूर्ण होत असतो. संवत्सर हा विराट्छंदस्वरूप आहे. यास्तव, सहा दिवस दीक्षा धारण केल्याने त्या दीक्षेला संवत्सराचे स्वरूपसाम्य प्राप्त होते व तद्वारा यजमान 'विराट्' संज्ञक राज्याला प्राप्त होतो. दहा दिवस दीक्षाग्रहण करावी. विराट् छंद हा चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने दशाक्षरी आहे. अर्थात् दहा दिवस ग्रहण केलेल्या त्या दीक्षेला विराट् छंदाचे स्वरूप प्राप्त होते आणि तद्वारा यजमान 'विराट्' संज्ञक राज्य संपादन करतो. बारा दिवस दीक्षा धारण करावी. कारण संवत्सराचे महिने बारा असतात व संवत्सर हा विराट्छंदरूप आहे. अर्थात् बारा दिवस धारण केलेल्या दीक्षेला विराट्छंदरूप अशा संवत्सराचे स्वरूप प्राप्त होऊन त्या संवत्सराच्या द्वारा यजमान 'विराट्' संज्ञक राज्याला प्राप्त होतो. तेरा दिवस दीक्षा ग्रहण करावी. अधिक महिन्यासह तेरा महिन्यांनी संवत्सर पूर्ण होत असून संवत्सर हा विराट्छंदस्वरूप आहे. यास्तव, तेरा दिवस धारण केलेल्या त्या दीक्षेला विराट्छंदस्वरूप अशा संवत्सराचे साम्य प्राप्त होऊन तद्वारा यजमान 'विराट्' संज्ञक राज्य संपादन करतो. पंधरा दिवस दीक्षेचे ग्रहण करावे. कारण अर्धा महिन्याचे पंधरा दिवस असतात व अर्धमासांच्या आवृत्तीने संवत्सर पूर्ण होते असतो. संवत्सर हा विराट्छंदस्वरूप आहे. पंधरा दिवस धारण केलेल्या त्या दीक्षेला अर्धमासांच्या आवृत्तीने पूर्ण होणाऱ्या विराट्छंदरूप संवत्सराचे स्वरूप प्राप्त होते व तद्वारा यजमान विराट्संज्ञक राज्य मिळवितो. सतरा रात्री म्हणजे सतरा दिवस दीक्षा धारण करावी. कारण, बारा महिने व पांच ऋतू ह्या सतरा अवयवांनी संवत्सर परिपूर्ण होत असून तो विराट्छंदस्वरूप आहे. यास्तव, सतरा दिवसधारण केलेल्या त्या दीक्षेला सतरा अवयवांनी पूर्ण होणाऱ्या विराट्छंदरूप संवत्सराची साम्यता प्राप्त होते व तद्वारा यजमान विराट्संज्ञक राज्याला प्राप्त होते. चोवीस दिवस दीक्षा धारण करावी. कारण, चोवीस अर्धमासांनी संवत्सर पूर्ण होत असतो. संवत्सर हा विराट्छंदस्वरूप आहे. यास्तव, चोवीस दिवस धारण केलेल्या दीक्षेला चोवीस अर्धमासांनी

पूर्ण होणाऱ्या विराट्छंदस्वरूप संवत्सराचे साम्य प्राप्त होऊन तद्वारा यजमान 'विराट्' संज्ञक राज्याला प्राप्त होतो. तीस दिवस दीक्षा ग्रहण करावी. विराट्छंद हा तीस अक्षरांचा आहे. यास्तव, तीस दिवस धारण केलेल्या दीक्षेला विराट्छंदाचे स्वरूप प्राप्त होते व त्या छंदाच्या द्वारा यजमान विराट्संज्ञक राज्याचे संपादन करतो. महिनाभर दीक्षा धारण करावी. कारण, महिना हा संवत्सराचाच एक अंश असल्याने तो संवत्सररूपच असून संवत्सर हा विराट्छंदस्वरूप आहे. म्हणून महिनाभर धारण केलेल्या त्या दीक्षेला विराट्छंदरूप संवत्सराचे साम्य प्राप्त होऊन त्या संवत्सराच्या द्वारा यजमान विराट्संज्ञक राज्य मिळवितो. चार महिने दीक्षा धारण करावी. चार महिन्यांच्या कालमर्यादेपर्यंत वसूंनी दीक्षा धारण केली व त्या दीक्षेच्या प्रभावाने त्यांनी पृथ्वी, गायत्री छंद व त्या छंदाची अभिमानिनी देवता यांना वश करून घेतले. रुद्रांनी आठ महिने दीक्षा धारण करून अंतरिक्ष लोक, त्रिष्टुप् छंद व त्या छंदाची अभिमानिनी देवता यांना वश करून घेतले. आदित्यांनी बारा महिने दीक्षा धारण करून त्या दीक्षेच्या प्रभावाने द्युलोक, जगती छंद व तदभिमानिनी देवता यांना वश करून घेतले व त्यामुळे ते आदित्य इतर देवांच्याहून वेगळे गणले जाऊ लागले आणि देवांच्यामध्ये श्रेष्ठतेला प्राप्त झाले. सारांश, अग्निचयन करणाऱ्या यजमानाने बारा महिने दररोज उपस्थानाचे वेळी उख्याग्नीचे धारण करीत जावे. आणि बारा महिन्यांनंतर चितिरूपी अग्नी मांडावा. संवत्सराचे बारा महिने असतात. यास्तव, संवत्सरपर्यंत उख्याग्नीचे धारण करून मांडला जाणारा चितिरूपी अग्नी संवत्सराच्या स्वरूपाला प्राप्त होतो. संवत्सरस्वरूप अशा चित्यग्नीच्या ठिकाणी मांडल्या जाणाऱ्या इष्टका याच त्या संवत्सररूप चित्यग्नीची अहोरात्रे होत. यामुळे संवत्सरपर्यंत उख्याग्नीचे धारण केल्याने सपूर्णत्वाला प्राप्त झालेल्या चितिरूपी अग्नीची मांडणी यजमानाने केल्यासारखे होते. आणि त्यायोगे तो यजमान अग्निचयन करणाऱ्या इतर यजमानांहून वेगळा गणला जाऊ लागून तो बरोबरीच्या सर्व यजमानांत श्रेष्ठतेला प्राप्त होतो. (अनुवाक ७).

श्येनपक्ष्याकृती असा जो चितिरूपी अग्नी मांडला जातो, तो यजमानाला स्वर्गलोकाला जाता यावे, त्याला स्वर्गलोक प्राप्त व्हावा, म्हणून मांडला जात असतो. यास्तव, त्या अग्निचयनावर यजमानाने आरोहण केले नाही तर तो स्वर्गलोकापासून दूर राहतो. त्याला स्वर्गलोक प्राप्त होत नाही. म्हणून

'मी अग्निचयनकर्ता यजमान आपल्या पायाने पृथ्वीचे आक्रमण करीत आहे, यास्तव, माझा प्राण मला सोडून न जावो', 'अंतरिक्ष लोकाचे मी आक्रमण करीत आहे, तरी माझ्या प्रजा माझा त्याग न करोत', 'द्युलोकाचे मी आक्रमण करीत आहे, माझ्या या आक्रमणाने मी स्वर्गलोकाला जाईन' असा अर्थ व्यक्त करणाऱ्या 'पृथिवीमाऽक्रमिषं', अंतरिक्षमाऽक्रमिषं' व 'दिवमाऽक्रमिषं' ह्या तीन मंत्रांनी यजमानाने चितिरूपी अग्नीचे ठिकाणी आरोहण करावे. आता सांगितलेल्या तीन मंत्रांचे पठण हेच यजमानाच्या स्वर्गारोहणाला कारणभूत होत असते. यास्तव, या तीन मंत्रांनी यजमान चितिरूपी अग्नीवर आरोहण करील तर तो स्वर्गलोकप्राप्तीला पात्र होईल.

अग्निचयनाच्या अंगभूत पश्वैकादशिनी करावयाची असते. म्हणजे अकरा पशूंचे आलभन करून त्यांच्या अंगांचा याग करावयाचा असतो. अर्थात् तत्संबंधी अकरा पशू बांधून ठेवण्यासाठी अकरा यूपस्तंभांची पंक्ती पुरावयाची असते. अर्थात् अकरा यूपस्तंभ ओळीने जमिनीत पुरावयाचे असतात. पक्ष्याकार चितिरूपी अग्नीच्या दोन्ही पंखांच्या अंतिम मर्यादेइतक्या लांबीच्या जागेतच जर यूपांची रांग पुरली, तर यजमानाला अग्निचयनरूपी यज्ञक्रतूचे अत्यंत अल्प फल मिळेल. आणि त्या यजमानाची प्रजा पातकी निपजेल. यास्तव महावेदीच्या दक्षिणोत्तर मर्यादेइतक्या प्रशस्त अशा जागेत अकरा यूपांची रांग उभी करावी. असे केले म्हणजे यजमानाला अग्निचयनरूपी यज्ञक्रतूचे भरपूर फल मिळेल व त्याची प्रजा पातकी निपजणार नाही.

प्रथमच अग्निचयन करावयाचा असल्यास त्या चयनामध्ये एक हजार इष्टका मांडाव्यात. कारण, हा भूलोक सहस्रसंख्यातुल्य आहे. अर्थात् पहिल्या खेपेस हजार इष्टका मांडून अग्निचयन करणारा यजमान ह्या भूलोकाच्या ठिकाणी विजयी होतो. दुसऱ्या खेपेस अग्निचयन मांडताना दोन हजार इष्टकांची मांडणी करावी. कारण अंतरिक्षलोक हा दोन हजार संख्येच्या समान आहे. ह्यास्तव, दुसऱ्या खेपेस दोन हजार इष्टकांची मांडणी करून चितिरूपी अग्नी निर्माण करणारा यजमान अंतरिक्षलोकाच्या ठिकाणी विजय मिळवितो. तिसऱ्या खेपेस तीन हजार इष्टकांच्या मांडणीने चित्यग्नीची निर्मिती करावी. कारण, स्वर्गलोक हा तीन हजार संख्येशी तुल्य आहे. यास्तव, तिसऱ्या खेपेस तीन हजार इष्टका मांडून चितिरूपी अग्नी निर्माण करणारा यजमान स्वर्गलोकाच्या

ठिकाणी जयशाली होतो.

पहिल्या खेपेस अग्निचयन करणाऱ्या यजमानाने अग्निचयनाची उंची गुडघ्याइतकी होईल, अशा प्रकारे इष्टकांची मांडणी करावी. त्या योगाने गायत्री छंदाच्या द्वारा तो अग्निचयनकर्ता यजमान ह्या भूलोकावर आरोहण करतो. दुसऱ्या खेपेस अग्निचयनाची मांडणी करताना त्याची उंची नाभीइतकी होईल अशा रीतीने करावी. म्हणजे तो यजमान त्रिष्टुप् छंदाच्या अनुग्रहाने अंतरिक्षलोकावर आरूढ होतो. तिसऱ्या खेपेस अग्निचयन करते वेळी त्याची उंची मानेइतकी होईल अशा रीतीने इष्टकांची रचना करावी. त्या योगाने तो यजमान जगतीछंदाच्या अनुग्रहाने स्वर्गलोकाच्या ठिकाणी आरोहण करतो.

ज्या यजमानाने प्रथमच अग्निचयन केला असेल, त्याने आपल्या स्त्रियांच्या पैकी कोणाही स्त्रीशी 'ही रमणीय आहे' असे समजून केवळ कामुक वृत्तीने समागम करू नये. पुत्रोत्पादनासाठी समागम करणे अवश्य असेल तर गोष्ट वेगळी. परंतु, 'अपत्योत्पादनाला उपयुक्त नसलेल्या योनीचे ठिकाणी रेतसेक करणे व्यर्थ होय', ही सात्त्विक भावना मनात ठेवावी आणि केवळ विषयवासनेला बळी पडून स्त्रीसमागम करू नये. दुसऱ्या खेपेस अग्निचयन केल्यानंतर यजमानाने असवर्ण असलेल्या आपल्या स्त्रीशी समागम करू नये. आणि तिसऱ्या वेळी अग्निचयन मांडल्यानंतर तर त्या यजमानाने आपल्या कोणत्याच स्त्रीशी समागम करू नये. कारण, अग्निचयन म्हणजे जणू काय यजमानाने आपले रेत सुरक्षित ठेवणे होय. अर्थात् स्त्रीसमागम केल्याने यजमानाचे रेत त्याच्यापासून वियुक्त होऊन तो गलितवीर्य होतो.

दुसरे कोणी विद्वान् असे म्हणतात की, अग्निचयन केलेल्या यजमानाने पूर्वोक्त स्त्रीगमनाच्या प्रतिबंधाचे बंधन पाळणे म्हणजे स्त्रीसमागम वर्ज्य करणे हे अप्रजस्य अर्थात् प्रजोत्पादनाला बाधक होय. यासाठी, अग्निचयन करणाऱ्या यजमानाने जर 'विराट् ज्योतिरधारयत्' इत्यादि दोन मंत्रांनी 'रेत:सिक्' नांवाच्या दोन इष्टकांचे अग्निचयनामध्ये उपधान केले, तर त्या इष्टका यजमानाच्या रेताचे संरक्षण करतात. अशा प्रकारे रेत:सिक् इष्टकांचे उपधान केलेल्या यजमानाने अग्निचयन केल्यानंतर खुशाल स्त्रीसमागम करावा. तशा प्रकारे केलेला स्त्रीसमागम त्याच्या रेताचा व्यय होऊ देत नाही. अग्निचयन करणारा यजमान हा आपला पिता, पितामह व प्रपितामह या तिघांचे रेतच असतो.

म्हणजे त्या तीन पूर्वजांच्या रेतपरंपरेने त्याची उत्पत्ती झालेली असते. यास्तव, त्याने पूर्वी सांगितल्याप्रमाणे अग्निचयनामध्ये दोनच 'रेत:सिक्' इष्टका मांडल्या, तर त्यांच्या तीन पूर्वजांच्या पैकी एकाच्या रेताचा विच्छेद होत असतो. यास्तव, 'रेत:सिक्' नांवाच्या तीन इष्टका मांडाव्यात. त्या योगाने त्या यजमानाच्या तिन्ही पूर्वजांची रेतपरंपरा सुरक्षित राहते.

पहिली 'रेत:सिक्' इष्टका ही भूलोकरूप असून भूमी ही वाग्रूप आहे. आणि म्हणूनच भरपूर पीक आलेल्या भूमीकडे लोक मातृरूपाने पाहत असतात व विद्वत्सभेतही एखाद्या पंडिताच्या मुखातून निघणाऱ्या अस्खलित वाणीकडे आदराने पाहत असतात. दुसरी 'रेत:सिक्' इष्टका ही अंतरिक्षलोकरूप असून अंतरिक्ष हे प्राणरूप आहे. आणि म्हणूनच अमूर्त अशा अंतरिक्ष व प्राण ह्या दोहोंनाही लोक आपल्या नेत्रांनी पाहू शकत नाहीत. तिसरी 'रेत:सिक्' इष्टका द्युलोकरूप असून द्युलोक हा चक्षु:स्वरूप आहे. आणि म्हणूनच लोक सूर्यचंद्रादिकांनी अंकित अशा द्युलोकाला आपल्या नेत्रांनी पाहतात व काळ्या बुबळांनी युक्त असलेले इतर लोकांचे डोळेही लोक आपल्या डोळ्यांनी पाहतात. 'विराट् ज्योतिरधारयत्' या मंत्राचा नेहमीप्रमाणे मोठ्याने उच्चार करून पृथ्वीलोकरूप असलेली पहिली 'रेत:सिक्' इष्टका मांडावी व त्याचप्रमाणे 'सम्राट् ज्योतिरधारयत्' ह्या मंत्राने द्युलोकरूप असलेली तिसरी रेत:सिक् इष्टका मांडावी. आणि 'स्वराट् ज्योतिरधारयत्' हा मंत्र मनात म्हणून अंतरिक्षलोक असणारी मधली म्हणजे दुसरी रेत:सिक् इष्टका मांडावी. याप्रमाणे तीन रेत:सिक् इष्टकांचे उपधान केले असता, ते पृथिव्यादि तिन्ही लोकांच्या ठिकाणी स्वस्वकार्यक्षम असे सामर्थ्य निर्माण करण्याला कारणभूत होते. शिवाय, वाणी, प्राण व चक्षू यांनाही स्वस्वकार्यसमर्थ करण्याला कारणभूत होते.

'भृगुमहर्षीप्रमाणे अधिकारसंपन्न अशा ऋत्विजांनी अनुष्ठित केलेला आणि सुखाने वसती होण्यास कारणभूत असा देवांनी मान्य केलेला हा यज्ञ यजमानाला फलप्रद होवो', या अर्थाचा 'इष्टो यज्ञो' हा , आणि 'हे यज्ञ, भृगुतुल्य अशा ऋत्विजांनी अनुष्ठित अशा तुझ्यापासून प्राप्त होणाऱ्या फलरूपी धनांच्या उपभोगाला आम्ही इहलोकी प्राप्त होऊ', असा अर्थ असलेला 'तस्य त इष्टस्य' हा असे दोन मंत्र पठण करून दोन आहुती द्याव्या असे केल्याच्या योगाने यज्ञामध्ये उद्गात्यांनी गाइलेली स्तोत्रे व हौत्रकांनी पठण केलेली शस्त्रे

या दोहोंच्या पासून अध्वर्यूने जणू काय फलरूपी दुधाचे दोहन केल्यासारखे होते.

'सर्वांचे पालन करणारा वायुदेव यजमानासाठी विनाशरहित अशी स्थाने संपादन करो, अभिलषणीय अशा उदार मनोवृत्तीचे महर्षी स्वतः विनाशरहित असे होऊन यजमानासाठी तशाच प्रकारची उत्कृष्ट स्थाने संपादन करोत, सर्वज्ञ व जगाचा प्रवर्तक असलेला सोमदेव तशा प्रकारची अखंड टिकणारी अशी स्थाने यजमानाला प्राप्त करून देवो, देवगुरू बृहस्पती हा हर्षजनक अशा प्रकारची शस्त्रे पठण करो', अशा अर्थाचा 'पिता मातरिश्वा' हा मंत्र होत्याने किंवा त्याची इच्छा नसल्यास अध्वर्यूने चितिरूपी अग्नीला अनुलक्षून म्हणावा, ह्या मंत्राचे पठण हे चितिरूपी अग्नीचे शस्त्र म्हणजे अग्नीचे स्तवन करणारा मंत्रसमूह होय. अर्थात् ह्या मंत्राचे पठण केले असता चितिरूपी अग्नीचे स्तवन करण्यास योग्य अशा शस्त्राचेच त्याने शंसन म्हणजे स्तवन केल्यासारखे होते. (अनुवाक ८).

उखेमध्ये स्थापन करून ज्या अग्नीचे यजमानाकडून धारण केले जाते, तो अग्नी इतर अग्नींच्याहून श्रेष्ठतेला प्राप्त झालेला असतो. अभिषिक्त अशा राजाला इतर राजांच्या मध्ये आधिपत्य प्राप्त होत असते. तसेच ह्या अग्नीला इतर अग्नींच्यामध्ये अधिपतित्व प्राप्त होते. यास्तव, अशा प्रकारच्या अग्नीला जर भूमीवर स्थापन केला, तर सर्व प्राण्यांचे गर्भ आपआपल्या मातांच्या उदरांतून खाली भूमीवर गळून पडतील. शिवाय एखाद्या थोर पुरुषाला त्याच्या उच्च पदावरून खाली ओढावा, तसा त्या अग्नीला त्याच्या उच्च पदावरून खाली ओढल्यासारखे होईल. म्हणून त्या उख्याग्नीला एका घडवंचीवर ठेवावे. तसे केल्याने प्राण्यांचा गर्भपात होण्याचा प्रसंग येत नाही व उख्याग्नीला त्याच्या श्रेष्ठतेला योग्य अशा उच्च स्थानी स्थापन केल्यासारखे होते.

उख्याग्नी हा जणू गर्भ असून शिंके ही त्याची योनी म्हणजे जन्मस्थान आहे. जिच्या ठिकाणी अग्नी स्थापन केला आहे, ती उखा शिंक्यातून जर बाहेर पडली, तर त्या अग्निरूपी गर्भाचा अधःपात होण्याचा प्रसंग उद्भवेल. यासाठी उख्याग्नी ज्यामध्ये ठेवावयाचा, ते शिंके उंच असे दोऱ्यांचे सहा बंद असणारे करावे. म्हणजे ते प्रशस्त होते व त्यातून उखा बाहेर पडण्याची भीती राहत नाही. कोणताही माणूस शरीराचा मधला भाग, मस्तक, दोन

हात व दोन पाय ह्या सहा अवयवांनी युक्त असतो. ह्यास्तव सहा पदर किंवा बंद असलेल्या शिक्यात उख्याग्नीचे स्थापन केल्याने यजमानाने जणू काय सहा अवयवांनी युक्त अशा उख्याग्नीचे धारण केल्यासारखे होते.

चितिरूपी अग्नी हा प्रजापतीनेच प्रथम मांडला असल्याने, तो प्रजापतिरूपच असून उखा व उखळ हे जणू त्या प्रजापतीचे फलप्रद असे दोन स्तनच आहेत. कारण, ह्या उखा व उखळाच्या रूपाने असणाऱ्या दोन स्तनांच्या उपधानापासून उत्पन्न होणाऱ्या फलावरच यजमानाच्या प्रजा उपजीवन करीत असतात. यास्तव, जो यजमान अग्निचयनाच्या ठिकाणी उखेचे व उखळाचे उपधान करतो, तो यजमान त्या दोहोंच्याही प्रसादाने प्राप्त होणाऱ्या फलाचा स्वर्गलोकी उपयोग करतो.

मांडण्यात येणारा चितिरूपी अग्नी हा संवत्सररूप असून त्या अग्नीच्या ठिकाणी मांडल्या जाणाऱ्या इष्टका तीन प्रकारच्या असतात. प्राजापत्या, वैष्णवी व वैश्वकर्मणी हे ते तीन प्रकार होत. ह्या तीन प्रकारच्या इष्टका म्हणजेच त्या संवत्सरस्वरूपी चित्यग्नीचे अहोरात्र होत. संवत्सररूप अग्नीला प्रजापतीने निर्माण केले असल्यामुळे त्याच्या ठिकाणी मांडल्या जाणाऱ्या इष्टका देखील प्राजापत्या म्हणजे प्रजापतिरूपच होत. उख्याग्नीचे संवत्सरपर्यंत यजमानाने धारण केल्याने प्राजापत्यरूप इष्टका मांडल्यासारख्या होतात. उख्याग्नीच्या ठिकाणी समिधा दिल्या असता, 'वैष्णवी' इष्टका मांडल्यासारख्या होतात. समिधा ह्या वनस्पतिजन्य होत व वनस्पती विष्णुदेवतेच्या आधिपत्याखाली असतात. अर्थात् उख्याग्नीच्या ठिकाणी वनस्पतिजन्य समिधा दिल्या असता वैष्णवी नामक इष्टका मांडल्यासारखे होणे युक्तच आहे. इष्टकांनी चितिरूपी अग्नी मांडला जात असल्याने 'वैश्वकर्मणी' संज्ञक इष्टकांनी तो मांडल्यासारखा होतो. कारण ही भूमी म्हणजेच विश्वकर्मा होय. अर्थात् ह्या भूमीच्या ठिकाणी इष्टकांच्या रचनेने चितिरूपी अग्नीची मांडणी केली असता, 'वैश्वकर्मणी' नांवाच्या इष्टकांचे उपधान केल्याप्रमाणे होते. सारांश, पूर्वोक्त तीन प्रकारच्या इष्टकानी चित्यग्नीची मांडणी केली जात असल्याने चित्यग्नीला अभिज्ञ लोक 'त्रिवृत्' म्हणजे तीन प्रकारच्या इष्टकांनी मांडला जाणारा असे म्हणतात.

वास्तविक अग्निचयनाची मांडणी स्वतः यजमानानेच करावी. अध्वर्यूकडून करवू नये. अध्वर्यूकडून जर इष्टकांची मांडणी यजमानाने करविली व त्याबद्दल

त्या अध्वर्यूस स्वतंत्र अशी त्याने दक्षिणा न दिली, तर दक्षिणेच्या अभावी असंतुष्ट झालेला तो अध्वर्यू चितिरूपी अग्नीचाच जणू नाश करतो. यास्तव, स्वतःच्या असमर्थतेमुळे जो कोणी यजमान अध्वर्यूकडून चितिरूपी अग्नीची मांडणी करतो, त्याने आपल्या अध्वर्यूला इष्टकोपधानाची म्हणून स्वतंत्र दक्षिणा द्यावी व त्याला संतुष्ट करावे. अशा प्रकारे अध्वर्यूला संतुष्ट केल्याने यजमानाने चितिरूपी अग्नीलाच संतुष्ट केल्यासारखे होते. (अनुवाक ९).

ऋतूंच्या योगाने जसा 'संवत्सर' निष्पन्न होतो, त्याचप्रमाणे प्रजापतीने ऋतूंच्या योगानेच चितिरूपी अग्नीचे निष्पादन केले. अग्निचयनरूपी यज्ञ हा ऋतुमय आहे, असा प्रजापतीने आपल्या मनाशी केलेला दृढ संकल्प हीच त्याने केलेल्या चितिरूपी अग्नीची निष्पत्ती होय. प्रजापतीने चितिरूपी अग्नीचा पूर्वार्ध म्हणजे शिरोभाग वसंत ऋतूच्या योगाने निर्माण केला. ग्रीष्म ऋतूने दक्षिण बाजूचा पंख व वर्षा ऋतूच्या योगाने श्येनाकार अशा चित्यग्नीचे पुच्छ प्रजापतीने निर्माण केले. शरद् ऋतूने उत्तर बाजूचा म्हणजे डावीकडील पंख आणि हेमंत ऋतूने चित्यग्नीच्या शरीराचा मध्यभाग प्रजापतीने निर्माण केला. प्रजापतीने मन:संकल्परूपाने चित्यग्नीची जी निर्मिती केली, तीमध्ये ब्राह्मण वर्णाच्या योगाने चित्यग्नीचा शिरोभाग व क्षत्रिय वर्णाने त्याचा उजवीकडील पंख निर्माण केला. पशूंच्या योगाने पक्ष्याकार चित्यग्नीचे पुच्छ निर्माण केले व वैश्यवर्णाच्या योगाने त्याच्या उत्तर बाजूचा पंख निर्माण केला. तृष्णादिरूपाने असणाऱ्या मानवी आशेच्या योगाने चित्यग्नीच्या शरीराचा मध्यभाग प्रजापतीने निर्माण केला. जो यजमान प्रजापतीने निर्माण केलेल्या चित्यग्नीचे वसंतादिऋत्वात्मक व ब्राह्मणादिवर्णात्मक स्वरूप जाणून चितिरूपी अग्नीची मांडणी करतो, त्याने प्रजापतीप्रमाणेच ऋतूंच्या योगाने व ब्राह्मणादिवर्णांच्या योगाने चित्यग्नीची मांडणी केल्यासारखे होते. आणि शिवाय ऋतूंचे व ब्राह्मणादिवर्णांचे सर्वरूप त्याने स्वाधीन केल्यासारखे होते. इतकेच नव्हे तर अशा प्रकारे अग्निचयनकर्त्या यजमानाला सर्व लोक ऐकतात. म्हणजे त्या यजमानाची कीर्ती सर्व लोकांच्या कानावर जाते व तो सर्वप्रसिद्ध होतो. तो सर्वदा भरपूर व स्वादिष्ट असे अन्न सेवन करतो. तो सर्व लोकांच्या प्रीतीला पात्र होतो.

अग्निचयनामध्ये मांडलेला इष्टकांचा पहिला थर ही जणू भूमी असून त्यावर पसरला जाणारा बारीक मातीचा थर हा त्या भूमीवर उत्पन्न होणाऱ्या

ओषधी व वनस्पती होत. नंतर त्यावर रचलेला इष्टकांचा दुसरा थर हा जणू अंतरिक्ष असून त्यावर पसरलेला बारीक मातीचा थर हा जणू त्या अंतरिक्षात संचार करणारे पक्षीच होत. त्यावर रचलेला विटांचा तिसरा थर म्हणजे जणू द्युलोक असून त्यावर पसरलेल्या मातीचा थर ही त्या द्युलोकात चमकणारी जणू नक्षत्रेच होत. इष्टकांचा चौथा थर हा जणू यज्ञ असून त्यावरचा मातीचा थर ही त्या यज्ञाची जणू दक्षिणाच होय. शेवटचा पांचवा थर म्हणजे यजमानरूप असून त्यावर पसरलेला मातीचा थर हा त्या यजमानाच्या प्रजा होत.

अन्य शाखेच्या मतास अनुसरून एखाद्या यजमानाने आपला चित्यग्नी त्रिचितीक केला, म्हणजे इष्टकांचे तीनच थर मांडून अग्निचयनाची पूर्णता केली, तर तो चौथ्या थरापासून व त्यावर पसरलेल्या मातीच्या थरापासून निष्पन्न होणाऱ्या यज्ञ व दक्षिणा ह्यांच्या स्वरूपापासून दुरावेल. त्याचप्रमाणे पांचव्या थरापासून व त्यावरच्या मातीच्या थरापासून निष्पन्न होणाऱ्या स्वत:च्या व स्वकीय प्रजांच्या स्वरूपापासूनही दुरावेल. यासाठी तीन थरांनी चित्यग्नीची पूर्णता न करता पांच थरांची मांडणी करून अग्निचयनाची यजमानाने पूर्णता करावी. असे केल्याच्या योगाने पूर्वी सांगितलेल्या भूमी आदिकरून प्रजेपर्यंतच्या सर्वांनाच त्याने संतुष्ट केल्यासारखे होते.

अग्निचयनामध्ये जे पांच थर मांडले जातात, त्यांपैकी पहिल्या तीन थरांच्या योगाने चितिरूपी अग्नीच्या ठिकाणी पूर्वी कथन केल्याप्रमाणे त्रैगुण्य संपादित केल्याप्रमाणे होत असून पुढच्या दोन थरांच्या योगाने दोन पायांनी युक्त असलेला यजमान प्रतिष्ठेला प्राप्त होतो. सारांश, अग्निचयनामध्ये इष्टकांचे पांच थर मांडले जातात पुरुष हा मस्तक, दोन पाय व दोन हात ह्या पांच अवयवांनीच युक्त असतो. यास्तव पांच थरांची मांडणी केल्याच्या योगाने यजमानाने पंचावयवात्मक अशा आपल्या आत्म्यालाच संतुष्ट केल्यासारखे होते. अग्निचयनामध्ये इष्टकांचे पांच थर मांडले जातात व त्यांवर पसरलेल्या मातीच्या पांच थरांनी ते आच्छादित केले जातात. इष्टकांचे पांच थर व त्यांवर पसरलेले बारीक मातीचे पांच थर मिळून चितिरूपी अग्नीचे दहा अवयव निष्पन्न होत असतात. मुख, दोन नेत्र, दोन कान व दोन नाकपुड्या, हे मस्तकाच्या ठिकाणचे सात, जननेंद्रिय, गुदद्वार हे दोन व नाभी मिळून

दहा अवयवरूपी अक्षरांनीच पुरुष निर्माण झालेला असतो. एवं च, दहा अवयवांनी निर्माण होणारा चित्यग्नी व दहा अवयवांनी निर्माण होणारा पुरुष यांच्यामध्ये समानरूपता निर्माण होत असते. यास्तव, पांच इष्टकांचे व पांच मातीचे मिळून दहा थर मांडून अग्निचयनाची पूर्णता जर यजमान करील, तर त्याने जणू काय दशावयवयुक्त अशा आत्मरूप पुरुषालाच संतुष्ट केल्यासारखे होते. शिवाय, दशाक्षरी विराट् छंदाशी स्वरूपसाम्य पावणाऱ्या दहा अवयवयुक्त चित्यग्नीची मांडणी केली असता त्या अग्नीला विराट् छंदाचे स्वरूप प्राप्त होते. विराट् छंद हा अन्नप्रद असल्यामुळे अन्नरूप आहे. अर्थात् अन्नरूप असलेल्या विराट् छंदाशी स्वरूपसाम्य असणाऱ्या चितिरूपी अग्नीची मांडणी करणारा यजमान विराट् छंदाच्या द्वारा सेवनीय अशा अन्नाच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतो.

संवत्सर हाच चित्यग्नीचा सहावा थर असून ऋतू म्हणजेच त्या थरावरील पसरलेला मातीचा थर होय. तात्पर्य, चितिरूपी अग्नीच्या ठिकाणी इष्टकांचे सहा व त्यावर पसरलेल्या मातीचे सहा थर मांडले जातात. एकंदर थरांची संख्या बारा होते. संवत्सराचे महिने बाराच असतात. अर्थात् अग्निचयन करणारा यजमान हा संवत्सराच्याच ठिकाणी प्रतिष्ठित होतो. (अनुवाक १०).

प्रजापतिदेवतेसाठी लाल रंगाचा, फिकट लाल रंगाचा व बोरासारख्या लाल रंगाचा असे तीन बोकड, रुद्रदेवतेकरिता श्वेतवर्णमिश्र अशा पिंगट वर्णाचा, लाल रंगाची झांक असलेल्या पिंगट वर्णाचा आणि हिरवटपणाची झांक असलेल्या पिंगट वर्णाचा हे तीन बोकड, पितृदेवतांच्यासाठी, पांढऱ्या रंगाचा, डोळ्यांच्यापाशीच फक्त पांढरा रंग असलेला व पांढऱ्या रंगाची मान असलेला, असे तीन बोकड, वरुणदेवतेकरिता काळ्या रंगाच्या तीन वांझ गाई, सूर्यदेवतेसाठी पांढऱ्या रंगाच्या तीन वांझ गाई, मैत्राबार्हस्पत्य देवतेसाठी त्यांच्या कपाळावर धुरकट रंगाचा टिळा असलेल्या व शिंगे नसलेल्या तीन वांझ गाई या पशूंचे आलभन करावे. (अनुवाक ११).

मरुत्देवतेसाठी पांढरे ठिपके अंगावर असलेला, पांढऱ्या ठिपक्यांचे आडवे पट्टे अंगावर असलेला व पांढऱ्या रंगाचे उभे पट्टे असलेला असे तीन बोकड, सरस्वतीदेवतेसाठी मिठासारख्या रंगाची, लाल रंगाचे केस असलेली आणि पांढऱ्या रंगाचे काही अवयव असलेली, अशा तीन गाई, विश्वेदेवदेवतांच्यासाठी

अंगावर पांढरे बिंदू असलेली, अंगावर पांढऱ्या रंगाचे मोठाले बिंदू असलेली आणि पांढऱ्या रंगाचे लहान लहान बिंदू अंगावर असलेली, अशा तीन गाई, पूषादेवतेसाठी सावळ्या रंगाच्या तीन वांझ गाई, मित्रदेवतेसाठी लाल रंगाच्या तीन वांझ गाई, ऐंद्राबार्हस्पत्यदेवतेसाठी अरुणासारख्या रंगाचा कपाळावर टिळा असलेल्या आणि शिंगे नसलेल्या (म्हणजे भुंड्या) अशा तीन वांझ गाई या पशूंचे आलभन करावे (अनुवाक १२).

इंद्रवायू देवतेसाठी ज्याच्या पुढच्या दोन पायांचा काही भाग पांढऱ्या रंगाचा आहे असा, ज्याच्या पुढच्या दोन पायांपैकी एक पाय पूर्ण पांढऱ्या रंगाचा व दुसऱ्या पायाचा काही भाग पांढऱ्या रंगाचा असलेला असा बोकड आणि ज्याचे पुढचे दोन्ही पाय पांढऱ्या रंगाचे आहेत असे एकूण तीन बोकड, मित्रावरुणदेवतेसाठी ज्याच्या पुढच्या दोन पायांपैकी एका पायाच्या काही भागावर छिद्रासारखे सूक्ष्म असे पांढरे बिंदू आहेत असा, ज्याच्या पुढच्या दोन पायांपैकी एका पायावर छिद्रासारखे सूक्ष्म असे व पांढरे बिंदू असून दुसऱ्या पायाच्या काही भागावर तसे बिंदू असलेला आणि ज्याच्या पुढच्या दोन्ही पायांवर छिद्रासारखे पांढऱ्या रंगाचे बिंदू आहेत, असा असे एकूण तीन बोकड, आश्विनदेवतेसाठी शेपटाचा काही भाग पांढरा असलेला, सर्वच शेपूट पांढरे असलेला आणि पांढऱ्या व काळ्या रंगाचे मिश्रण असलेल्या शेपटाचा, असे तीन बोकड, विश्वेदेवदेवतेसाठी ज्यांचे शरीर अनेकरंगी आहे अशा तीन वांझ गाई, परमेष्ठीदेवतेसाठी पांढऱ्या रंगाच्या तीन वांझ गाई, सोमापौष्णदेवतेसाठी श्याम म्हणजे काळसर रंगाचा टिळा ज्यांच्या कपाळावर आहे आणि ज्या शृंगरहित आहेत अशा तीन वांझ गाई या पशूंचे आलभन करावे. (अनुवाक १३).

इंद्रावरुणदेवतेसाठी उंच पाठीचा, तरुण व ठेंगणा असे तीन बोकड, इंद्राबृहस्पतीदेवतेसाठी श्वेतवर्ण वशिंड असलेला, श्वेतवर्णाचा पृष्ठभाग असलेला व ज्याचा जघनभाग श्वेतवर्ण आहे असा हे तीन बोकड, इंद्राविष्णूदेवतेसाठी पांढऱ्या पायांचा, ओठाचा भाग शुभ्रवर्ण असलेला, आणि भुवया श्वेतवर्ण असलेला असे तीन बोकड, विश्वकर्मादेवतेसाठी ज्यांच्या अंगावर शिबे उठलेले आहे, अशा तीन वांझ गाई, धातादेवतेसाठी ज्यांच्या पोटावर भिन्न रंगाचे ठिपके आहेत अशा तीन वांझ गाई, आणि ऐंद्रापौष्णदेवतेसाठी कपाळावर

पांढरा टिळा असलेल्या व शृंगरहित अशा तीन गाई या पशूंचे आलभन करावे. (अनुवाक १४).

यमदेवतेसाठी कान कापलेल्या तीन गाई, सोमदेवतेसाठी पांढरे पाय असणाऱ्या तीन गाई, यविष्ठ अशा अग्निदेवतेसाठी मुंगुसासारखा वर्ण असलेल्या तीन गाई, वसूंच्या साठी तांबड्या रंगाच्या व दीड वर्ष वयाच्या तीन गाई, रुद्रांच्या साठी अरुणवर्णाच्या व दोन वर्षे वयाच्या तीन गाई आणि सोमैंद्र देवतेसाठी कपाळावर पिंगट रंगाचा टिळा असलेल्या व शिंगे नसलेल्या तीन गाई या पशूंचे आलभन करावे. (अनुवाक १५).

विष्णुदेवतेसाठी आखूड अवयवांच्या तीन गाई, उरुक्रम म्हणजे लांब अंतरावर पावले टाकणाऱ्या विष्णूसाठी कानावर कान असलेल्या तीन गाई, पुष्कळ ऋषींनी गुणगान करावयास योग्य अशा विष्णूसाठी लांब शेपटाच्या तीन गाई, आदित्यांच्या साठी साडेतीन वर्षे वयाच्या तीन गाई, अंगिरसांच्या करिता तीन वर्षे वयाच्या तीन गाई आणि इंद्राविष्णूदेवतेसाठी कपाळावर गौरवर्ण टिळा असलेल्या व शृंगरहित अशा तीन गाई या पशूंचे आलभन करावे. (अनुवाक १६).

इंद्र राजासाठी ज्यांच्या पाठीचा रंग पांढरा आहे असे तीन बोकड, अधिराज इंद्रासाठी ज्यांची वशिंडे पांढऱ्या रंगाची आहेत असे तीन बोकड, स्वराट् इंद्रासाठी ज्यांच्या जघनाचा भाग पांढऱ्या रंगाचा आहे असे तीन बोकड, साध्य देवांच्या साठी साडे चार वर्षे वयाच्या तीन गाई, विश्वेदेवदेवतांच्या साठी चार वर्षे वयाच्या तीन गाई आणि आग्रेंद्रदेवतेसाठी कपाळावर काळ्या रंगाचा टिळा असलेल्या व शृंगरहित अशा तीन गाई या पशूंचे आलभन करावे. (अनुवाक १७).

अदितिदेवतेसाठी लाल भडक रंगाच्या तीन गाई, इंद्राणी देवतेकरिता काळ्या रंगाच्या तीन गाई, कुहू देवतेसाठी अरुणाप्रमाणे तांबूस रंग असलेल्या तीन गाई, राका देवतेसाठी तीन दुधाळ धेनू, सिनीवाली देवतेसाठी गाडी ओढणारे तीन बैल, आणि अग्राविष्णूदेवतेसाठी कपाळावर तांबडा टिळा असलेल्या व शृंगरहित अशा तीन गाई या पशूंचे आलभन करावे. (अनुवाक १८).

सोमदेवतेसाठी गोरोचनासारख्या रंगाचे तीन बोकड, सोमराजाकरिता सारंग

वर्णाचे तीन बोकड, पर्जन्यदेवतेसाठी आकाशासारख्या काळ्या रंगाचे तीन बोकड, इंद्राणी देवतेसाठी ज्यांच्या गळ्याखाली स्तन आहेत अशा तीन शेळ्या, अदिती देवतेसाठी तीन मेंढ्या, आणि द्यावापृथिवीदेवतेकरिता जाडजूड अंगाच्या व शृंगरहित अशा तीन गाई यांचे आलभन करावे. (अनुवाक १९).

वरुणदेवतेसाठी कपाळावर काळ्या रंगाचा टिळा असलेले तीन बोकड, वरुणराजाकरिता कपाळावर लाल रंगाचा टिळा असलेले तीन बोकड, शत्रूंचा नाश करणाऱ्या वरुणदेवतेसाठी कपाळावर अरुणाप्रमाणे तांबूस वर्णाचा टिळा असलेले तीन बोकड, विश्वेदेवदेवतेसाठी चित्रविचित्र वर्णाचे तीन बोकड, सर्वदेवतांच्यासाठी अंगावर भिन्न रंगाचे ठिपके असलेले तीन बोकड आणि ऐंद्रासुरदेवतेसाठी कपाळावर पांढरा टिळा असलेले व शृंगरहित असे तीन बोकड इतक्या पशूंचे आलभन करावे (अनुवाक २०).

स्वराट् अशा सोमदेवतेसाठी गाडा ओढणारे दोन बैल, ओजःप्रद अशा इंद्राग्नीदेवतेसाठी अनेक बैलांनी ओढल्या जाणाऱ्या गाड्याच्या धुरीला जोडले जाणारे दोन बैल, बलप्रद अशा इंद्राग्नीदेवतेसाठी नांगराला जोडले जाणारे दोन ठेंगणे बैल, भूमिदेवतेसाठी दोन धेनू, दिग्देवतांच्यासाठी दोन घोड्या, भूमिदेवतेसाठी दोन धेनू, विराट्देवतेसाठी दोन मानव स्त्रिया, भूमिदेवतेसाठी दोन धेनू, वायुदेवतेसाठी माणसे बसावयाच्या गाड्याला जोडले जाणारे दोन बैल, वरुणदेवतेसाठी कृष्णमृगसंज्ञक हरिण जातीच्या दोन वांझ स्त्रिया, द्युदेवतेसाठी उंच शिंगाचे दोन अंडिल आणि ज्यांच्या पूर्वी जन्मलेला व मागून जन्मलेला भाऊ मृत असेल असे दोन बैल, इतक्या पशूंचे आलभन करावे. (अनुवाक २१).

अश्वमेध यज्ञातील शेवटच्या तिसऱ्या दिवशी होणाऱ्या अतिरात्र यज्ञामध्ये प्रातःकाली प्रजापतिदेवतेसाठी अकरा गोजातीय पशूंचे आलभन करावे. त्वष्टा देवतेसाठी काळ्यापांढऱ्या रंगाचे व लहान वयाचे असे एक शेळीचे करडू, तित्तिर पक्षी व एका जातीचा कोंबडा हे तीन पशू, सूर्यदेवतेसाठी शेवटी होणाऱ्या अनूबंध्यसंज्ञक यागाच्या वेळी पांढऱ्या रंगाच्या व वांझ अशा नऊ गाईंचे आलभन करावे. आणि त्यानंतर अग्नी, ऐंद्राग्र व आश्विन ह्या तीन देवतांच्यासाठी अनुक्रमे तीन पशू सर्वात उंच अशा मधल्या यूपस्तंभाला बांधून त्यांचे आलभन करावे. (अनुवाक २२).

वसंतऋतूसाठी गोरोचनासारख्या रंगाचे तीन बोकड, ग्रीष्मऋतूसाठी सारंग वर्णाचे तीन बोकड, वर्षाऋतूसाठी शरीरावर अन्य रंगाचे ठिपके असलेले तीन बोकड, शरद्ऋतूसाठी पांढऱ्या वर्णाचे तीन बोकड, हेमंतऋतूसाठी कंबरेचा भाग श्वेतवर्ण असलेले तीन बोकड, शिशिरऋतूसाठी मिश्रवर्णाचे तीन बोकड आणि संवत्सरदेवतेसाठी ज्यांच्या उराचा भाग खोलगट आहे असे तीन बोकड इतक्या पशूंचे आलमन करावे. (अनुवाक २३).

प्रपाठक ७

अग्निचयनामध्ये इष्टकांचे पांच थर मांडले जात असतात. त्यांपैकी प्रत्येक चितीची म्हणजे इष्टकांच्या थराची निरनिराळी अधिष्ठात्री देवता असते. ज्या थराची जी अधिष्ठात्री देवता असेल, त्या देदतेचे आनुकूल्य यजमानाने करून घेणे आवश्यक असते. जो यजमान त्या त्या थराच्या अधिष्ठात्री देवतेचे अतिक्रमण करून, अर्थात् त्या देवतेस विसरून ते ते थर मांडतो, तो यजमान त्या त्या देवतांपासून दुरावला जातो. अर्थात् त्या देवतांच्या कोपाला पात्र होऊन त्या देवतांचा द्रोह केल्याचे पातक त्याला लागते आणि तो दरिद्री होतो. पण, जो यजमान त्या त्या थरांच्या अधिष्ठात्री देवतांचे अतिक्रमण न करता, त्या त्या थरांची मांडणी करतो, तो यजमान त्या देवतांच्यापासून दुरावला जात नाही व त्यांच्या अनुग्रहाने तो धनसंपन्न होतो. यास्तव, अग्निचयनकर्त्या यजमानाने इष्टकांचा पहिला थर मांडला म्हणजे त्या थराला अग्निदेवतात्मक अशा 'अग्ने देवां इहाऽऽवह' ह्या गायत्री छंदातील ऋचेने स्पर्श करावा. दुसऱ्या थराला 'अगन्म महा नमसा' ह्या त्रिष्टुप्छंदात्मक ऋचेने, तिसऱ्या थराला 'मेधाकारं विदथस्य' ह्या जगतीछंदात्मक ऋचेने, चौथ्या थराला 'मनुष्वत्त्वा निधीमहि' ह्या अनुष्टुप्छंदात्मक ऋचेने व पांचव्या थराला अग्निर्हि वजिनं' ह्या पंक्तिछंदातील ऋचेने अभिमर्श म्हणजे स्पर्श करावा. याप्रमाणे पांचही थरांना पांच छंदांतील ऋचांनी यजमानाने स्पर्श केला असता, त्या त्या देवतेला अनुसरून तो तो थर मांडल्यासारखे होते व त्या देवतांच्यापासून तो दुरावत नाही आणि तो धनसंपन्न होतो.

एका एका चितीच्या म्हणजे थराच्या स्पर्शासाठी गायत्र्यादिछंदात्मक जो मंत्रविभाग योजिला जातो, त्याचा हेतू यजमानाला इडेची प्राप्ती व्हावी

हाच असतो. 'पशवो वा इडा' ह्या श्रुतिवचनाप्रमाणे पशू हेच इडारूप असून पशवो वै छंदांसि' ह्या वेदवचनावरून गायत्र्यादि छंद हेही पशुरूप आहेत. यास्तव, गायत्र्यादिछंदात्मक मंत्रांनी पांचही थरांना स्पर्श केला म्हणजे पशूंच्याकडूनच जणू काय त्या चितिरूपी अग्नीची मांडणी केल्यासारखे होते.

प्रथमत: प्रजापतीनेच अग्निचयनाची मांडणी केली असल्याने प्रजापती हाच चितिरूपी अग्नीचा स्वामी आहे. यास्तव, प्रजापतीला अग्निचयन मांडीत असल्याबद्दल आज्ञा विचारून ती संपादन केल्यानंतर अग्निचयन यजमानाने मांडला म्हणजे कोणत्याही संकटामुळे तो नाश पावत नाही. यासाठी प्रजापतीची आज्ञा संपादन करण्याकरिता असा उपाय करावा की, चितिरूपी अग्नीच्या दक्षिणोत्तर बाजूस दोन अश्व उभे करावेत. आणि त्या दोन्ही अश्वांना प्रथम स्पर्श करून नंतर इष्टका मांडण्यास प्रारंभ करावा. कारण प्रजापतीच्या नेत्रापासून उत्पन्न झालेल्या अश्वाचे शरीर हे प्रजापतीचेच स्वरूप होय. अश्वाच्या शरीरास स्पर्श करणे हेच प्रजापतीला अग्निचयनाविषयीची आज्ञा विचारणे होय. अर्थात् जो अध्वर्यू अश्वांना स्पर्श करून इष्टकांची मांडणी करतो त्याचा यजमान कसल्याही संकटात सापडून नाश पावत नाही.

अग्निचयनाच्या दोन बाजूंस जे दोन अश्व उभे करावयाचे, त्यांपैकी दक्षिण दिशेचा अश्व श्वेतवर्ण असावा व उत्तर दिशेचा अश्व कृष्णवर्ण असावा. कारण, श्वेतवर्ण अश्व हा दिवसरूप असून कृष्णवर्ण अश्व हा रात्रिरूप असतो. त्याप्रमाणे इष्टका ह्या दिवसरूप असून त्यावर पसरली जाणारी माती ही रात्रिरूप असते. ह्यास्तव, जेव्हा इष्टका मांडावयास आरंभ करावयाचा तेव्हा श्वेतवर्ण अश्वाला स्पर्श करावा आणि त्याच्यावर मातीचा थर पसरताना कृष्णवर्ण अश्वाला स्पर्श करावा. असे केल्याच्या योगाने अहोरात्रांच्याकडूनच जणू चितिरूपी अग्नीची मांडणी केल्यासारखे होते.

स्वर्गलोकी गेल्यानंतर मधुर अशा उपभोग्य वस्तूंचा मी उपयोग करणारा होईन, अशी यजमानाने आपल्या मनात भावना धरून ऋत्विजांना दक्षिणा देण्याचे वेळी मधाने भरलेले एक पात्र ब्रह्म्याला द्यावे. मात्र, ते पात्र देण्याच्या अगोदर'चित्रं देवानामुदगादनीकं' ह्या सूर्यदेवतात्मक ऋचेने त्या पात्राकडे अवलोकन करावे. म्हणजे तो यजमान मध्यान्हकाळी आश्चर्यजनक अशा ऐश्वर्याला प्राप्त होतो. पूर्वोक्त मंत्राने त्या मधुपूर्ण अशा पात्राचे अवलोकन केल्यानंतर ते

पात्र अश्वाकडून हुंगवावे. पूर्वोक्त ऋचेची प्रतिपाद्य देवता आदित्य आहे. आदित्य हा ऐश्वर्यसंपन्न असल्यामुळे इंद्र या संज्ञेला पात्र असून प्रजांचे पालन करणारा असल्यामुळे तो प्रजापतीच समजावा. मधुपूर्ण पात्र हुंगणारा अश्व प्रजापतिरूप असल्याचे वर्णिलेच आहे. यास्तव, अश्वाकडून मधुपात्र हुंगविल्याच्या योगाने यजमानाने जणू काय इंद्ररूप व प्रजापतिरूप अशा आदित्यालाच समृध्द केल्यासारखे होते. (अनुवाक १).

१ हे अग्निदेवा, आपल्या भक्तासाठी अभिमत फलांचा वर्षाव करणारा, सर्वज्ञ व नित्यतरुण अशा तुज अग्निदेवाला प्रजांचा उत्पादक करून मी वारंवार तुझ्याजवळ येत असतो. तुझ्या अनुग्रहाशिवाय होणारी आमची सर्व गृहकृत्ये साररहित होवोत. उज्वल अशा ब्रह्मवर्चसाने तू आम्हाला उत्कृष्ट प्रकारे शिकवण दे.

अग्निचयनामध्ये मांडल्या जाणाऱ्या सर्व इष्टका ह्या गोरूप आहेत म्हणजे सर्व गाईच आहेत. यास्तव, त्यांच्यामध्ये स्त्रीपुरुषरूप दांपत्यभाव निष्पन्न होण्यासाठी आता सांगितलेल्या 'त्वामग्ने वृषभं' ह्या मंत्राने ऋषभा नांवाची इष्टका मांडावी. अशा प्रकारे गोरूप अशा इष्टकांच्या एका एका थरात एक एक ऋषभेष्टका मांडली असता इष्टकारूपी गाईंच्या समुदायात एक वृषभाची स्थापना केल्यासारखे होऊन अध्वर्यूने जणू काय आपल्या यजमानाच्या चितिरूप अग्नीचे ठिकाणी दांपत्यभाव निर्माण केल्यासारखे होते. लोकव्यवहारात देखील आपण पाहतो की, अनेक गाईंच्या समुदायात एकच बैल समाविष्ट होऊन राहिलेला असतो.

२ हे एका इष्टकारूपी रात्रि, ज्या तुला संवत्सराची प्रतिमाच समजून सर्व यजमान तुझी उपासना करतात, त्या तुज एका इष्टकेचे चितिरूपी अग्नीच्या ठिकाणी मी इष्टकारूपाने उपधान करतो. तुझ्या प्रसादाने अग्निचयन करणारा यजमान सद्गुणी अशा सेवकांनी युक्त असणारी प्रजा व संपूर्ण आयुष्य यांच्या उपभोगाला प्राप्त होतो.

माघ शुध्द अष्टमीस 'एकाष्टका' अशी संज्ञा आहे. ही एकाष्टका म्हणजे संवत्सररूप प्रजापतीची पत्नी होय. अर्थात् तद्रूप अशी इष्टका 'प्राजापत्या' म्हणजे प्रजापतिसंबध्द, अर्थात् संवत्सररूप प्रजापतीची पत्नीच समजून पूर्वोक्त 'संवत्सरस्य प्रतिमां' ह्या मंत्राने 'प्राजापत्या' नामक इष्टकेचे उपधान करावे.

एकाष्टका ही भूमिरूप आहे. अर्थात् 'प्राजापत्या' नामक इष्टकेचे उपधान केले असता, एकाष्टकारूपी भूमीच्या ठिकाणी जे काही अन्न संपादन होत असते, ते सर्व यजमानाला प्राप्त होते. शिवाय, 'एकाष्टका' ही संवत्सररूप प्रजापतीची जणू कामधेनूच आहे. आणि म्हणून एकाष्टकेचे प्रतीकच अशा प्राजापत्येष्टकेचे उपधान केले असता, तिच्या प्रभावाने अग्निचयन करणारा यजमान स्वर्गलोकाच्या ठिकाणी चितिरूपी अग्नीचे दोहन करतो म्हणजे प्राजापत्येष्टकेच्या उपधानाने निर्माण केलेल्या अग्नीपासून प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या इच्छित फलांचा उपभोग करतो.

३ प्रकाशमान अशा ज्या अग्निदेवाच्या योगाने सर्व देव अत्युच्च अशा स्वर्गलोकाला प्राप्त झाले, त्याचप्रमाणे आठ वसू, अकरा रुद्र व बारा आदित्य ज्या अग्नीच्या योगाने उत्कर्षाला पोचले, आणि ज्या उज्वल अशा अग्निदेवाच्या योगाने अंगिरस महर्षी स्वतःसामर्थ्यबलाने महत्पदाला प्राप्त झाले, त्याच अग्निदेवाच्या अनुग्रहाने हा अग्निचयन करणारा यजमान कल्याणाला प्राप्त होवो.

स्वर्गलोकप्राप्तीसाठीच हा अग्निचयन मांडण्यात येत असतो, हे उघड आहे. यास्तव, आताच सांगितलेल्या 'येन देवा ज्योतिषा' ह्या स्वर्गस्थदेवप्रतिपादक मंत्राने उख्याग्नीवर समिधा द्याव्यात व त्या समिधांनी उख्याग्नी प्रज्वलित करावा. अशा प्रकारे उख्याग्नीवर समिधा दिल्या म्हणजे त्या अग्नीच्या ठिकाणी वनस्पतिजन्य अशा इष्टकांचे उपधान केल्यासारखे होते. अर्थात् उख्याग्नीच्या ठिकाणी करण्यात येणारे हे वनस्पतिजन्य इष्टकांचे उपधान अग्निचयनकर्त्या यजमानाच्या स्वर्गलोकप्राप्तीला कारणभूत होते.

४ जो इंद्रदेव, आमच्या हातून घडणाऱ्या सर्व पातकांचा नाश करून, आणि चोरादिकांच्याकडून आम्हाला कसलाही त्रास होऊ न देता, अथवा कोणत्याही व्याधींनी आम्हास पीडा न होऊ देता शंभर शरद्ऋतू उलटून जातील इतक्या दीर्घकाळपर्यंत जगविण्यास समर्थ आहे, त्या वज्रधनुष्यादि शेकडो आयुधे धारण करणाऱ्या, शत्रूंच्याशी होणाऱ्या युद्धात शेकडो वेळा विजय मिळविणाऱ्या, आपल्या भक्तांच्या संरक्षणासाठी शेकडो साधने जवळ बाळगणाऱ्या आणि आम्हा उपासकांच्या ठिकाणी असणाऱ्या पातकी मनोवृत्तींचा नाश करणाऱ्या इंद्रदेवाला नमस्कार असो. ५ द्युलोक व पृथ्वी यांच्या मध्यंतरी देवलोक, पितृलोक, ब्रह्मलोक व मनुष्यलोक ह्या चार लोकांच्या ठिकाणी,

जाण्या येण्याचे जे देवांचे चार मार्ग विस्तारलेले आहेत, त्या मार्गांच्या ठिकाणी संचार करण्यास प्रवृत्त होणाऱ्या आम्हा उपासकांना जो इंद्रदेव राक्षसादिकांचा उपद्रव होऊ न देता व इतरही कसल्या प्रकारची हानी होऊ न देता सुरक्षितपणे संचार करू देतो, त्या इंद्राला, हे देव हो, 'हा यजमान सर्व मार्गांच्या ठिकाणी संरक्षणीय आहे', असे सांगा आणि आम्हालाही त्या इंद्रदेवाच्या संरक्षणाखाली ठेवा. ६ ग्रीष्म, हेमन्त, वसंत, शरद् त्याचप्रमाणे वर्षा ह्या ऋतूंच्या पैकी प्रत्येक ऋतू आम्हाला स्वकालोचित अशा सर्व उपभोग्य वस्तू देणारा असो. शंभर शरद् ऋतू उलटून जातील अशा आमच्या प्रदीर्घ आयुष्यामध्ये त्या ऋतूंच्या अनुग्रहापासूनच आम्ही निर्वाण व निर्भय अशा ठिकाणी सुखाने राहू. ७ हे ऋत्विग्यजमानहो, इदुवत्सर, परिवत्सर व संवत्सर इत्यादि नावांनी गणल्या जाणाऱ्या संवत्सरात्मक व अनंत कालाला अत्यंत शुद्ध अंतःकरणाने नमस्कार करा. यज्ञनिष्पादक अशा त्या संवत्सरविशेषांच्या अनुग्रहबुद्धिरूपी छत्राखाली आम्ही सर्वजण कोणाकडूनही वश न केले जाता आणि मारले न जाता सुखात राहणारे होऊ. ८ हे देवहो, आमच्या ह्या यज्ञरूप साधनापासून उत्पन्न होणाऱ्या कल्याणापेक्षाही अधिक प्रशस्त असे श्रेयरूप फल आम्हाला प्राप्त होईल असे करा. त्याचप्रमाणे ह्या चितिरूपी अग्नीच्या ठिकाणी आहुतिरूपाने समर्पित केल्या जाणाऱ्या हे सोमा, तुझ्याकडून होणाऱ्या संरक्षणानेच आम्ही तुला उत्तम प्रकारे व्यापून राहू. हे अन्नस्वरूप सोमा, तू आम्हाला सुख देणारा होऊन आमच्या शरीरात प्रवेश कर. आमच्या पुत्रपौत्रादि अपत्यांना सुख दे. आमच्या शरीरालाही तू सुखप्रद हो.

पूर्वोक्त 'शतायुधाय शतवीर्याय' इत्यादि पांच मंत्रांपैकी एका मंत्रात 'अज्यानि' असा शब्द आला असल्यामुळे एकसमूहाने असणाऱ्या पांचही मंत्राना 'अज्यानि' असे नांव प्राप्त झाले आहे. 'अज्यानी' संज्ञक मंत्रांनी ज्या इष्टका मांडल्या जातात त्या अज्यानी नांवाच्या इष्टका होत. सारांश, पूर्वोक्त पांच मंत्रांनी पांच अज्यानीसंज्ञक इष्टका मांडाव्या. ह्या इष्टका मांडताना म्हणावयाच्या पूर्वोक्त मंत्राच्या ठिकाणी ज्या इंद्रादिदेवतांचे प्रतिपादन झाले आहे त्या सर्व देवता कोठेही पराभव न पावणाऱ्या आहेत. यास्तव, अज्यानी इष्टकांचे उपधान केले असता अग्निचयन करणारा यजमान त्या अपराजित अशा इंद्रादि देवतांच्या सान्निध्यात प्रवेश करतो व कोणाही शत्रूकडून जिंकला जात नाही.

काही ब्रह्मवादी परस्परांमध्ये असा संवाद करतात की, अर्धमास, मास,

ऋतू व संवत्सर यांच्या अधिष्ठात्री देवता ओषधींना म्हणजे धान्यांना पिकवितात. असे असताना त्या देवतांची उपेक्षा करून आग्रयणेष्टीमध्ये इंद्राग्री इत्यादि अन्य देवतांच्यासाठी काय म्हणून हविर्द्रव्यांचा निर्वाप करतात? या प्रश्नाचे उत्तर इतर ब्रह्मवादी असे देतात की, ज्या अर्थी इंद्र, अग्री इत्यादि देवता इतर देवतांच्याशी संकेत करून धान्याच्या विषयामध्ये विजयाला प्राप्त झाल्या, त्या अर्थी आग्रयणेष्टीमध्ये त्या देवतांच्यासाठीच हविर्द्रव्यांचा निर्वाप करणे योग्य होय. आणि असे असल्यामुळे धान्यांच्या विषयात विजयी झालेल्या इंद्राग्न्यादि देवतांची उपेक्षा करून ऋतुमासादिकांच्या अधिष्ठात्री देवतांच्यासाठी जर आग्रयणेष्टीत हविर्द्रव्याचा निर्वाप केला, तर इंद्राग्न्यादि देवता व ऋतूमासांच्या अधिष्ठात्री देवता यांच्यामध्ये कलह उत्पन्न होईल. म्हणून इंद्राग्न्यादि देवतांसाठीच आग्रयणेष्टीत हविर्द्रव्यांचा निर्वाप करणे भागच आहे. तथापि, हे गृहीत केल्यावरही असा एक प्रश्न उरतो की, इंद्राग्न्यादि देवतांच्यासाठी हविर्द्रव्यांचे निर्वपण केल्याने धान्यांचा परिपाक करणाऱ्या ऋतुमासादि देवतांचा संतोष कसा होणार? परंतु या प्रश्नाचे समाधान असे की, आग्रयणेष्टीमध्ये इंद्राग्न्यादि देवतांच्यासाठी हविर्द्रव्यांचा निर्वाप करून त्याचे यजन करावे आणि नंतर अर्धमास, मास, ऋतू इत्यादिकांच्या अधिष्ठात्री देवतांच्या तृप्तीसाठी पूर्वोक्त 'अज्यानी' संज्ञक मंत्रांनी पांच आज्याहुती द्याव्या. असे केल्याच्या योगाने अर्धमास, मास, ऋतू व संवत्सर यांच्या अधिष्ठात्री देवतांनाही संतुष्ट केल्यासारखे होते. आणि इंद्राग्न्यादि देवता व ऋतुमासादि देवता यांच्यामध्ये कलह उत्पन्न होत नाही. आग्रयणेष्टी करणाऱ्या यजमानाने 'भद्रान्नः श्रेयः समनैष्ट देवाः' ह्या मंत्राने हुतशेषरूप अशा आपल्या यजमानभागाचे भक्षण करावे. हुतशेष अशा हविर्द्रव्याचा भाग भक्षण करण्यास हा मंत्र योग्य आहे. यास्तव, त्या मंत्राने हविःशेषाचे केलेले भक्षण त्या यजमानाचा केव्हाही पराभव न होण्याला कारणभूत होते. (अनुवाक २).

१ हे अश्मन् तू जणू इंद्राचे वज्रच असून शत्रूंचा घात करणारा, आमच्या शरीरांचा पालक आणि रोगादि अनिष्टांचा नाश करणारा आहेस. जो शत्रू आम्हास उपद्रव देण्याची इच्छा धरून पूर्वदिशेच्या ठिकाणी आम्हावर घाला घालतो, तो शत्रू या पाषाणाखाली ठेचला जावो. जो शत्रू दक्षिणदिशेस आमच्यावर घाला घालण्यास प्रवृत्त होतो, तो शत्रू या पाषाणाखाली ठेचला जावो. जो शत्रू पश्चिमदिशेस आमच्यावर धाड घालण्यास प्रवृत्त

होत असेल तो शत्रू या पाषाणाखाली दडपला जावो जो शत्रू उत्तरबाजूस आमच्यावर घाला घालण्यास प्रवृत्त होत असतो, तो शत्रू ह्या पाषाणाखाली ठेचला जावो.

देव आणि असुर हे परस्परांच्याशी युद्ध करण्यास प्रवृत्त झाले. तेव्हा असुरांनी चारही दिशेने देवांच्यावर चाल केली व त्यांना अत्यंत उपद्रव दिला. तेव्हा देवांनी त्यांच्यावर बाणांनी व वज्रासारख्या कठिण पाषाणांनी मारा करून त्यांना पिटाळून लावले. यास्तव, वज्रिणी नांवाच्या इष्टकांचे जर उपधान केले, तर यजमानाने बाणानें व वज्रासारख्या कठिण पाषाणाने आपल्या शत्रूंना दूर केल्यासारखे होते. ह्या वज्रिणी इष्टका म्हणजे जणू इंद्रादि देवतांची नगरेच होत. ह्यास्तव, वज्रिणी इष्टकांची चारही दिशांना मांडणी केली असता, आपल्या शरीराचे पालन करणाऱ्या देवनगरांचीच जणू आपल्या भोवती स्थापना केल्याप्रमाणे होते.

२ हे अग्राविष्णू हो, आम्ही उच्चारलेली स्तुतिरूपी वाक्ये परस्परांवर समानतेने प्रीती करणाऱ्या तुह्मा दोघांनाही संतुष्ट करोत. तुम्ही उभयता अनेक प्रकारची धने व अन्ने आम्हास देण्यासाठी आपल्याबरोबर घेऊन येथे या.

ब्रह्मवादी असा विचार करतात की, 'वसोर्धारा' या नांवाने जी अखंडधार अग्निचयनात मांडलेल्या शेवटच्या इष्टकेवर आहुती रूपाने ज्या वेळी पाडविली जाते, त्यावेळी पठण करण्यात येणाऱ्या मंत्रामध्ये कोणात्याही देवतेचा उल्लेख होत नसल्यामुळे, ही वसोर्धारारूप आहुती कोणत्याच देवतेच्या उद्देशाने दिली जात असल्याचे दिसून येत नाही. असे असताना, ह्या वसोर्धारारूप आहुतीची देवता तरी कोणती समजावी?. परंतु, ह्यां शंकेचे समाधान असे की, 'वासयति' म्हणजे प्राण्यांची सुखाने वसती करवितो तो वसु, ह्या व्युत्पत्तीप्रमाणे 'वसु' शब्दाचा अर्थ अग्नी असा आहे. अर्थात् वसूसाठी म्हणजे अग्नीसाठी आहुतिरूपाने पाडविली जाणारी जी अखंड आज्यधारा ती वसोर्धारा होय. आता सांगितलेल्या व्युत्पत्तीप्रमाणे वसुशब्दाचा विष्णू असाही अर्थ होतो. म्हणून वसुशब्दोपलक्षित विष्णूसाठी पाडविली जाणारी जी आज्यधारा ती 'वसोर्धारा' होय. 'वाजश्च प्रसवश्च' इत्यादि मंत्रांमध्ये जरी अग्नी किंवा विष्णू ही देवता प्रतीत होत नसली, तरी पूर्वोक्त 'अग्राविष्णू सजोषसा' ह्या ऋचेमध्ये 'अग्नी व विष्णू' यांची स्पष्ट प्रतीती व्यक्त होत आहे. यास्तव, ह्या आग्नावैष्णवी म्हणजे

अग्निविष्णुदेवतात्मक ऋचेने वसोर्धारारूप आहुती द्यावी. म्हणजे अग्नी व विष्णू ह्या दोन देवतांना त्यांना प्रिय असलेल्या आज्यरूप हविर्द्रव्याचा भाग समर्पण करून त्यांचा संतोष केल्यासारखे होते. शिवाय, ह्या वसोर्धारारूपी आज्याहुतीला देवतारूपाचा आधारही दिल्याप्रमाणे होते. आणि जी कामना यजमानाने मनात धरून ही वसोर्धारारूप आहुती दिलेली असते, त्या कामनेचे फलही यजमानाला प्राप्त होते.

चितिरूपी अग्नी हा रुद्र होय. या रुद्राच्या एक 'घोरा' म्हणजे भयानक आणि एक 'शिवा' म्हणजे शांत अशा दोन तनू म्हणजे शरीरे असतात. त्यासाठी 'शतरुद्रीय' नामक मंत्रसंघाने वसोर्धारारूपी आहुती द्यावी. असे केल्याने चित्यग्निरूपी रुद्राच्या 'घोरा' तनूस शतरुद्रीय मंत्रसंघाने संतुष्ट केल्यासारखे होते. आणि अशा प्रकारे 'वसोर्धारा' संज्ञक अखंड आज्यधारेची जर आहुती दिली तर तिच्या योगाने चित्याग्निरूपी रुद्राच्या शांत तनूलाही संतुष्ट केल्यासारखे होते.

जो यजमान वसोर्धारेची प्रतिष्ठा जाणतो, तो सर्वत्र प्रतिष्ठित होतो. वसोर्धारेची प्रतिष्ठा म्हणजे ही की, वसोर्धारेची आहुती दिल्यानंतर जे आज्य उरेल, त्या आज्यामध्ये 'ब्रह्मौदन' संज्ञक चरू शिजवावा. व त्या चरूचे चार ब्राह्मणांनी भक्षण करावे. ब्रह्मौदन चरूचे चार ब्राह्मणांनी भक्षण करणे हीच वसोर्धारेची प्रतिष्ठा होय. ब्राह्मण हा सर्वांना प्रिय असल्यामुळे तो जणू काय वैश्वानरसंज्ञक अग्नीच असून वैश्वानर हे अग्नीचे अत्यंत प्रिय असे शरीर आहे. अर्थात् ब्राह्मणांना ब्रह्मौदन चरूचे भक्षण करविल्याच्या योगाने यजमानाने जणू काय चितिरूपी अग्नीला त्याला प्रिय असलेल्या वैश्वानरसंज्ञक शरीराच्या ठिकाणी प्रतिष्ठित केल्यासारखे होते.

ब्रह्मौदन चरूचे प्राशन करणाऱ्या चार ब्राह्मणांना यजमानाने दक्षिणा म्हणून चार दुधाळ गायी द्याव्यात. म्हणजे तो यजमान स्वर्गलोकी गेल्यानंतर त्या गाईंच्याकडून अपेक्षितफलरूपी दुग्ध संपादन करतो. (अनुवाक ३).

'चित्तिं जुहोमि मनसा घृतेन' हा मंत्र म्हणून एक आहुती द्यावी. या आहुतीला 'अदाभ्या' म्हणजे 'कोणाकडूनही हिंसित न होणारी' असे नांव असून ती 'विश्वकर्मा' देवतेला दिली जात असते. ही आहुती दिली असता अग्निचयन करणाऱ्या यजमानाला त्याचा शत्रू मारू शकत नाही. शिवाय,

तो यजमान देवतांना प्राप्त होतो. म्हणजे त्यांच्या अनुग्रहाला प्राप्त होतो. यानंतर 'अग्न तमद्याश्वं' ह्या पंक्तिछंदात्मक मंत्राने दुसरी आहुती द्यावी. पंक्तिच्छन्दात्मक मंत्राने दिलेल्या ह्या आहुतीच्या योगाने यजमान यज्ञाच्या प्रारंभाला प्राप्त होतो. मग, 'सप्त ते अग्ने समिधः सप्त जिह्वाः' हा मंत्र म्हणून आहुती द्यावी. म्हणजे यजमानाने मैत्रावरुण इत्यादि हौत्रकांना आपल्या आधीन केल्यासारखे होते.

देवांच्याकडून आपणास काहीतरी भाग मिळावा अशा इच्छेने अग्नी देवांच्या पासून दूर निघून गेला. तेव्हा देवांनी 'सप्त ते अग्ने' ह्या मंत्राने त्याला आज्याहुतिरूप भाग देऊन संतुष्ट केले. 'सप्त ते अग्ने' ह्या मंत्राने आज्याहुती देणे, हाच मांडण्यात येणाऱ्या चितिरूपी अग्नीचा 'अग्निहोत्र' होम होय. चितिरूपी अग्नी जेव्हा संपूर्णत्वाने मांडला जातो, तेव्हाच तो खरा उत्पन्न होत असतो व तसा तो उत्पन्न होताच पूर्वोक्त आहुती दिल्याने त्याला अपेक्षित असलेले आहुतिरूप अन्न त्याला दिल्यासारखे होते. आणि त्यामुळे तो संतुष्ट होतो व तो यजमानालाही संतुष्ट करतो. अर्थात् यजमान धनवान् होतो. कोणी ब्रह्मवादी असे म्हणतात की, चितिरूपाने मांडण्यात येणारा अग्नी हा जर गार्हपत्य म्हणून ठरला जात असतो, तर अग्निचयनकर्त्या यजमानाचा आहवनीय कोठे आहे असे समजावे? यावर 'भगवान् आदित्य हा त्या यजमानाचा आहवनीय अग्नी आहे', असे त्या ब्रह्मवाद्यांना उत्तर द्यावे. कारण, आदित्याच्याच ठिकाणी सर्व देवतांच्या उद्देशाने आहुती दिल्या जात असतात. सारांश, मांडला जाणारा चितिरूप अग्नी हाच आदित्यरूपी आहवनीय होय असे जाणून जो त्याची मांडणी करतो, तो सर्व देवतांना प्रत्यक्षतेने संतुष्ट करतो.

१ अत्यंत यशस्वी अशा हे अग्निदेवा, ह्या यजमानाला यशयुक्त कर. इंद्राची पूजा करण्यास योग्य अशी पूजासामग्री या कर्मप्रसंगी तू आम्हास संपादन करून दे. तुझ्या प्रसादाने हा यजमान बरोबरीच्या समाजात शिरोभागामध्ये उच्चत्वाला प्राप्त होवो. त्याचप्रमाणे तो उत्कृष्ट स्थानात राहणारा, सुंदर कांतियुक्त व सत्कीर्तिमान् असा होवो. २ प्राचीन काली स्वर्गप्राप्तीची इच्छा करणाऱ्या व शास्त्रदृष्टीने कल्याणकारक अशा कर्मफलाचा विचार करणाऱ्या महर्षींनी कर्मांगभूत असे अनशनादि तप आणि केशमुंडणपूर्वक निरनिराळ्या नियमांचे

पालनरूप दीक्षारूप व्रत यांचे अनुष्ठान केले. त्या अनुष्ठानाच्या प्रभावापासून त्यांच्या ठिकाणी अनिष्टापासून रक्षण करणारे बल व शरीरसामर्थ्य उत्पन्न झाले. त्या महर्षींनी जे फल संपादन केले तेच फल ह्या यजमानाला देव संपादन करून देवोत. ३ जगाचा पोषक, निर्माता आणि उत्कृष्ट ज्ञाता, सत्यलोकी राहणारा व ब्रह्मांडस्वरूपाने स्वतःच नटणारा असा प्रजापती देव, त्रिवृत् इत्यादि स्तोम, गायत्र्यादि छंद व निविद्संज्ञक मंत्र हे सर्व मला उद्देशून ''ह्या यजमानासाठी सर्व देशाच्या आधिपत्यरूपाने असणारे राष्ट्र आम्ही संपादन करू'', असे बोलू लागोत. ४ हे सर्वमानवहो, निरनिराळ्या सर्व प्रदेशांतून तुम्ही एकत्र होऊन माझ्या ह्या यजमानाच्या जवळ या. हा यजमान तुम्हा सर्वांना शिस्त लावणारा व तुम्हा सर्वांचा अधिपती होवो. ह्या यजमानाच्या मनोवृत्तीला अनुकूल होईल, असे तुम्ही वर्तन करा. ह्या यजमानाच्या आश्रयाखाली राहून तुम्ही सर्व आपले जीवन सुखी करून घ्या.

'अग्ने यशस्विन्' येथून आता सांगितलेल्या उपरिनिर्दिष्ट चार मंत्रांपैकी तिसऱ्या मंत्रात 'राष्ट्र' असा शब्द असल्याने ह्या चार मंत्रांना राष्ट्रभृत् अशी संज्ञा आहे. ह्या चार मंत्रांनी 'राष्ट्रभृत्' नांवाच्या चार इष्टका मांडाव्यात. ह्या चार इष्टका ज्या थरात मांडल्या जातात तो चितिरूपी अग्नीचा थर 'राष्ट्रभृत्' म्हणजे राष्ट्राचे धारण करणारा होय. ह्या थराच्या मांडणीने अध्वर्यू जणू काय यजमानाच्या ठिकाणी राष्ट्राचेच स्थापन करतो. अर्थात् सर्व राष्ट्र यजमानाच्या स्वाधीन होते आणि त्या राष्ट्रापासून यजमान केव्हाही भ्रष्ट होत नाही. (अनुवाक ४).

ज्या यजमानाचा उख्याग्नी विझतो त्या यजमानाला जन्मताच पुत्र मेल्याप्रमाणे अग्निनाशनिमित्त दुःख प्राप्त होते. अशा वेळी अरणींचे मंथन करून जर अग्नी उत्पन्न केला, तर पूर्वीच्या अग्नीचा विच्छेद केल्यासारखा होतो व तो विच्छेद यजमानाला शत्रू उत्पन्न करतो. यास्तव, मंथन करून अग्नी उत्पन्न न करता गार्हपत्यातील थोडासा अग्नी उखेमध्ये घालावा आणि त्यावर काष्टे घालून तो प्रज्वलित करावा. असे केले असता स्वकीय जन्मस्थानातूनच उख्याग्नी निर्माण झाल्यासारखा होतो व तो यजमानाला शत्रू उत्पन्न करीत नाही.

ज्या यजमानाचा उख्याग्नी विझतो, त्या यजमानाला अंधकार ग्रासीत

असतो. हा अंधकार म्हणजे मृत्यूच होय. यास्तव, मृत्युरूपी अंधकाराचे निवारण होण्यासाठी यजमानाने काळ्या रंगाचे वस्त्र व काळ्या रंगाची गाय ब्राह्मणाला दक्षिणा म्हणून द्यावी. म्हणजे तमोरूप अशा त्या दक्षिणादानाने यजमानाने आपल्यास ग्रासणाऱ्या मृत्युरूपी तमाचा (अंधकाराचा) नाश केल्यासारखे होते. आता सांगितलेल्या दक्षिणेखेरीज यजमानाने ब्राह्मणाला सुवर्ण द्यावे. सुवर्ण हे प्रकाशरूप आहे. यास्तव, प्रकाशरूप असे सुवर्ण दिले असता यजमानाने त्या सुवर्णरूप प्रकाशाने मृत्युरूप अंधकाराचे निवारण केल्यासारखे होते. शिवाय, सुवर्ण हे तेजोरूप असल्यामुळे त्याचे दान करून यजमानाने आपल्या ठिकाणी तेज संपादन केल्यासारखे होते.

स्वर्गलोकी राहणारे देव जसे प्रकाशमान असतात, त्याप्रमाणे अग्नी प्रकाशमान आहे. प्रकाशमान अशा ह्या अग्नीला ही आहुती समर्पण असो. स्वर्गलोकस्थ देवांप्रमाणे हा अग्नी अर्चनीय आहे. अर्चनीय अशा ह्या अग्नीला ही आहुती समर्पण असो. स्वर्गलोकी राहणाऱ्या देवांप्रमाणे हा अग्नी अत्यंत निर्मळ आहे. अत्यंत निर्मळ अशा ह्या अग्नीला ही आहुती समर्पण असो. स्वर्गलोकस्थ देवांच्याप्रमाणे हा अग्नी अत्यंत प्रकाशरूप आहे. प्रकाशरूप अशा ह्या अग्नीला ही आहुती समर्पण असो. स्वर्गलोकी तळपणाऱ्या सूर्याप्रमाणे हा अग्नी सूर्यरूप आहे. सूर्यरूप अशा ह्या अग्नीला ही आहुती समर्पण असो.

मांडण्यात येणारा चितिरूपी अग्नी ऋतुसाधनभूत असल्यामुळे अर्चनीय आहे आणि म्हणूनच त्याला 'अर्क' असे म्हणतात. द्युलोकी तळपत असलेला हा आदित्य ऋतुफलरूप असल्यामुळे त्याला 'अश्वमेध' असे म्हटले जाते. यास्तव, आताच सांगितलेल्या 'सुवर्न धर्म: स्वाहा' इत्यादि मंत्रांनी आहुती दिल्या असता अर्कसंज्ञक अग्नीचा आणि अश्वमेध संज्ञक आदित्याचा प्रकाशच यजमानाने संपादन केल्यासारखे होते. ज्या यजमानाच्या अग्निचयनाचे ठिकाणी पूर्वोक्त पांच आहुती देऊन होम केला जातो तो यजमान 'अर्काश्वमेधी' म्हणजे क्रतूचे साधन व क्रतूचे फल ह्या दोहोंनी युक्त असा होतो.

आज - दृष्टीस पडत असलेले हे जगत् सृष्टी उत्पन्न होण्यापूर्वी मुळीच नव्हते. त्याकाळी केवळ उदकच अथांग पसरून राहिलेले होते. तेव्हा प्रजापतीने आपल्यास राहण्यासाठी आश्रयस्थान कोठे निर्माण करता येईल ? असा विचार केला. तेव्हा चितिरूपी अग्नीचा पहिला थर आपल्याला आश्रस्थान

म्हणून उपयोगी पडेल असे त्यास आढळून आले व त्याप्रमाणे त्याने अग्निचयनाचा पहिला थर मांडला. तेव्हा तो थरच भूमिरूपाने आविर्भूत झाला व त्या ठिकाणी प्रजापती आश्रय करून राहिला. तेव्हा विश्वकर्मा प्रजापतीला म्हणाला, मी तुझ्याजवळ येऊन बसतो. प्रजापती त्याला म्हणाला, तुला ह्या भूमीच्या ठिकाणी राहावयास अवकाश मिळणार नाही. तेव्हा आपणास रहाव्यास कोठे आश्रयस्थान मिळेल? असा विश्वकर्म्याने आपल्या मनाशी विचार केला. तेव्हा अग्निचयनाचा दुसरा चिती म्हणजे थर आपल्यास आश्रयस्थान म्हणून उपयोगी पडेल असे त्यास आढळून आले व त्याप्रमाणे त्याने चितिरूपी अग्नीचा दुसरा थर मांडला. तो थरच 'अंतरिक्ष' रूपाने प्रकट झाला व तेथे विश्वकर्मा आश्रय करून राहिला. यज्ञपुरुष प्रजापतीजवळ येऊन त्याला म्हणाला, 'मी तुझ्याजवळ येऊन ह्या पृथ्वीवर राहतो'. प्रजापतीने, 'तुला तेथ स्थान मिळणार नाही', असे यज्ञपुरुषाला उत्तर दिले. तेव्हा यज्ञपुरुष विश्वकर्म्याला म्हणाला, 'मी तुझ्याजवळ या अंतरिक्षात येऊन राहतो'. विश्वकर्मा यज्ञपुरुषाला म्हणाला की, तू कोणत्या साधनाच्या साहाय्याने माझ्याजवळ येऊन राहशील? तेव्हा यज्ञपुरुषाने 'दिश्या' नामक इष्टकांच्या सह मी तुझ्याजवळ येऊन राहीन, असे विश्वकर्म्याला उत्तर दिले. व त्याप्रमाणे दिश्येष्टकांच्यासह यज्ञपुरुष विश्वकर्म्याजवळ गेला आणि त्याने 'राज्ञ्यसि प्राची दिक्' इत्यादि मंत्रांनी 'दिश्या' नामक इष्टकांचे उपधान केले. त्या दिश्यानामक इष्टकाच दिशांच्या रूपाने प्रादुर्भूत झाल्या व त्या दिशांच्या ठिकाणी यज्ञपुरुषाला राहावयास अवकाश मिळाला. परमेष्ठी हा प्रजापतीला म्हणाला, 'मी तुझ्याजवळ येऊन भूमीवर राहतो', प्रजापतीने 'तुला ह्या भूलोकी स्थान नाही', असे सांगितले. तेव्हा परमेष्ठी विश्वकर्मा व यज्ञपुरुष या दोघांच्याकडे गेला व त्यांना म्हणाला 'मी तुमच्याजवळ राहावयास येतो'. परंतु त्या दोघांनीही, तुला या ठिकाणी स्थान मिळणार नाही असे परमेष्ठीला उत्तर दिले. तेव्हा परमेष्ठीच्या विचारदृष्टीला अग्निचयनाचा तिसरा थर आपल्याला आश्रयस्थान म्हणून उपयोगी पडेल, असे आढळून आले. व त्याप्रमाणे त्याने चितिरूपी अग्नीचा तिसरा थर मांडला. तोच द्युलोकरूपाने प्रादुर्भूत झाला व तेथे परमेष्ठी राहिला.

आज द्युलोकात तळपत असणारा आदित्य प्रजापतीजवळ जाऊन त्याला म्हणाला, 'मी तुझ्याजवळ भूलोकी राहावयास येतो'. परंतु प्रजापतीने, तुला ह्या भूलोकी स्थान मिळणार नाही म्हणून सांगितले. तेव्हा आदित्य विश्वकर्मा

व यज्ञपुरुष या दोघांच्याकडे गेला. आणि 'मी तुमच्याजवळ राहावयास येतो', असे म्हणाला. पण त्या दोघांनीही 'तुला राहावयास येथे स्थान मिळणार नाही', असे त्या आदित्याला उत्तर दिले. शेवटी आदित्य परमेष्ठीकडे गेला व त्याला म्हणाला, 'मी तुझ्याजवळ राहावयास येतो'. तेव्हा परमेष्ठी आदित्याला म्हणाला की, तू कोणाच्या साहाय्याने येथे राहावयास येशील? आदित्याने 'मी 'लोकंपृणा' संज्ञक इष्टकेच्या साहाय्याने अर्थात् त्या इष्टकेला बरोबर घेऊन तुझ्याजवळ राहावयास येईन', असे परमेष्ठीला उत्तर दिले. व त्याप्रमाणे 'लोकंपृणा' इष्टकेसह आदित्य परमेष्ठीजवळ गेला आणि त्याने लोकंपृणा इष्टका मांडली व त्या इष्टकेच्या ठिकाणी तो आश्रय करून राहिला. आदित्य हा जगावर उपकार करण्यासाठी पुन्हा पुन्हा जरी उदयास येऊन प्रकाशतो तरी त्याच्या ठिकाणचे प्रकाशरूप सार कधीच क्षीण होत नाही. अर्थात् तो सर्वदा सारसंपन्नच असतो. त्याचप्रमाणे त्याने जाणून मांडलेली 'लोकंपृणा' ही इष्टका देखील सदैव सारसंपन्नच असते. यामुळे अग्निचयनात् मांडलेल्या इष्टकांच्यामध्ये जेथे जेथे फट राहिलेली असते, तेथे तेथे लोकंपृणा नांवाची इष्टका जरी पुन्हा पुन्हा मांडली तरी तिच्या ठिकाणचे सार क्षीण न होता ती अखंड सारसंपन्न अशीच राहते.

प्रजापती, विश्वकर्मा, यज्ञपुरुष, आदित्य व परमेष्ठी यांना ऋषी म्हणाले, की 'आम्ही तुमच्याजवळ राहावयास येतो', तेव्हा प्रजापती इत्यादिकांनी ऋषींना उलट विचारले की, तुम्ही आम्हास देण्यासाठी कोणता भाग बरोबर घेऊन याल? तेव्हा ऋषींनी चितिरूपी अग्नीचे दोन थर आपल्याबरोबर घेतले आणि प्रजापती इत्यादिकांच्या जवळ आले. व त्यांनाही प्रजापती इत्यादिकांच्या सन्निध आश्रय मिळाला. अशा प्रकारे तो चितिरूपी अग्नी पांच थरांनी युक्त होऊन पूर्णतेला प्राप्त झाला. पांच थरांनी युक्त होऊन पूर्णत्वास प्राप्त होणाऱ्या चितिरूपी अग्नीचे माहात्म्य जाणून जो यजमान त्याची मांडणी करतो, तो विद्यादिगुणांनी अत्यंत श्रेष्ठ होतो, पृथिव्यादि तिन्ही लोकांना आपल्या आधीन करून विजयी होतो, देव त्याची कीर्ती जाणतात, इतकेच नव्हे तर तो यजमान सर्व देवांच्या सायुज्यतेला म्हणजे सहभावाला प्राप्त होतो. (अनुवाक ५).

मांडण्यात येणारा अग्निचयन हा पक्षिरूप असतो. यास्तव अग्निचयन करणारा यजमान जर पक्ष्यांचे मांस भक्षण करील, तर त्याने चितिरूपी

अग्नीचेच भक्षण केल्यासारखे होते व त्यामुळे तो मरतो. यासाठी मृत्यूचा परिहार व्हावा म्हणून यजमानाने अग्निचयन केल्यानंतर एक संवत्सर पूर्ण होईपर्यंत पक्ष्यांचे मांस भक्षण न करण्याचे व्रत पाळावे. संवत्सरापेक्षा अधिक काळ पाळावे लागणारे कोणतेच व्रत आढळत नाही. अर्थात्, संवत्सरपर्यंत पक्षिमांस भक्षण न करण्याचे व्रत त्या यजमानाच्या मृत्यूचा परिहार करण्यास पुरेसे होते.

मांडण्यात येणारा चितिरूपी अग्नी हा पशुरूप आहे. यास्तव, पूर्वदिशेने अर्थात् चित्यग्निरूपी पशूच्या मुखाच्या बाजूने जर कोणी त्यावर चढण्याचे साहस करील, तर एखादा मारकुटा बैल त्याच्या मुखाजवळ येणाऱ्या माणसाला आपल्या शिंगांनी ढुशी देऊन मारतो, त्याप्रमाणे चित्यग्निरूपी पशू त्याच्या मुखाकडून त्याच्यावर आरोहण करणाराला मारतो. यासाठी, त्याने आपल्याला मारू नये ह्यासाठी त्याच्यावर आरोहण करणाऱ्याने पूर्व बाजूने त्याच्यावर आरोहण न करता चित्यग्निरूपी पशूच्या पाठीमागे म्हणजे पश्चिमेस प्राङ्मुख उभे राहावे आणि त्यावर आरोहण करावे म्हणजे तो चढणाराची हिंसा करीत नाही.

१ हे हिरण्येष्टके, तू तेजोरूप आहेस त्या अर्थी तू मला तेज दे. पृथ्वी दे, म्हणजे पृथ्वी मला उपकारक होईल असे कर. पृथ्वीपासून माझे संरक्षण कर. अर्थात् पृथ्वी मला उपद्रव न देईल असे कर २ हे हिरण्येष्टके, तू प्रकाशरूप आहेस त्या अर्थी मला प्रकाश दे. अंतरिक्ष मला अनुकूल करून दे. अंतरिक्षापासून मला उपद्रव होऊ न देता माझे संरक्षण कर. ३ हे हिरण्येष्टके, तू स्वर्गसुखस्वरूप आहेस त्या अर्थी मला द्युलोक प्राप्त होऊन तेथे मला सुख प्राप्त होईल असे कर. द्युलोकापासून मला उपद्रव न होता, माझे संरक्षण होईल असे कर.

आता सांगितलेले 'तेजोऽसि तेजो मे यच्छ' इत्यादि तीन मंत्र म्हणून तीन हिरण्येष्टकां मांडाव्यात. कारण, ह्या तीन हिरण्येष्टकांकडून हे तिन्ही लोक धारण केले गेले आहेत. यास्तव, ह्या तीन हिरण्येष्टकांचे जर उपधान केले तर ते तिन्ही लोकांच्या धारणाला कारणभूत होते. 'स्वयमातृण्णा' नामक इष्टकांचे उपधान केल्यानंतर हिरण्येष्टकांचे उपधान करावे. 'स्वयमातृण्णा' म्हणजेच हे पृथिव्यादि तीन लोक असून सुवर्ण हे प्रकाशरूप आहे. यास्तव, स्वयमातृण्णा

इष्टकांचे उपधान केल्यानंतर जर हिरण्येष्टकांचे उपधान केले, तर यजमानाने जणू काय पृथिव्यादि तीन लोकांना प्रकाशयुक्त केल्यासारखे होते. आणि ह्या हिरण्येष्टकांच्या प्रकाशाने हे तिन्ही लोक प्रकाशित होतात.

४ हे अग्निदेवा, दिवसा सूर्यमंडलात समाविष्ट होऊन उदय पावणाऱ्या तुज अग्निदेवाच्या ज्या प्रभा द्युलोकाला व्यापून राहिलेल्या असतात, त्या सर्व प्रभांनी आमच्या यजमानासाठी तू आपणाला उद्दीपित कर. ५ हे देव हो, सूर्यमंडळाच्या ठिकाणी तुमच्या ज्या दीप्ती समाविष्ट होऊन राहतात त्याचप्रमाणे गाईंच्या व अश्वांच्या ठिकाणी ज्या तुमच्या दीप्ती शरीरकांतिरूपाने चमकत असतात त्या सर्व दीप्तींनी हे इंद्राग्नी आणि हे बृहस्पतिप्रभृति देवहो, आमच्याकरता प्रकाश निर्माण करा. ६ हे अग्निदेवा, आमच्या ब्राह्मणांच्या ठिकाणी प्रकाश उत्पन्न कर. आमच्या राजांच्या ठिकाणी प्रकाश निर्माण कर. त्याचप्रमाणे आमच्या वैश्यांच्या आणि शूद्रांच्या ठिकाणीही प्रकाश उत्पन्न कर. तुझ्या ठिकाणच्या कांतीने माझ्या ठिकाणी उज्वल कांती स्थापन कर.

जो यजमान अग्निचयन करतो त्याचे यश किंवा कीर्ती आणि इंद्रियसामर्थ्य ही दोन्ही त्याला सोडून जातात. त्याने मांडलेल्या चितिरूपी अग्नीच्या ठिकाणी ती विलीन होतात किंवा यापूर्वी ज्याने अग्निचयनपूर्वक याग केला आहे, त्याच्या ठिकाणी प्राप्त होतात. यास्तव, अग्निचयन करणाऱ्या यजमानाने आता सांगितलेल्या 'यास्ते अग्ने' इत्यादि तीन मंत्रांनी रुक्संज्ञक तीन आहुती द्याव्यात. म्हणजे त्या योगाने अग्निचयन करणाऱ्या यजमानाने आपले यश किंवा कीर्ती आणि इंद्रियसामर्थ्य ही दोन्ही आपल्या ठिकाणी धारण केल्यासारखे होते. जो यजमान चितिरूपी अग्नीची मांडणी करताना त्यावर पाय देऊन चढतो, तो विनाशाला प्राप्त होण्यास योग्य ठरतो. यास्तव, अशा प्रकारच्या विनाशाचा परिहार होण्याकरिता 'तत्त्वा यामि ब्रह्मणा वन्दमानः' ह्या 'वारुणी' म्हणजे वरुणदेवतात्मक ऋचेने आहुती द्यावी. असे केले असता यजमानाने चित्यग्नीच्या क्रोधाने शमन केल्यासारखे होते आणि चित्यग्नीच्या क्रोधापासून स्वतःचे संरक्षणही केल्यासारखे होते.

जो यजमान अग्निचयनाची मांडणी करतो, तो हविर्द्रव्याच्या स्वरूपाला प्राप्त होत असतो. असे असल्यामुळे अग्निचयन केलेल्या त्या यजमानाने जर स्त्रीसमागम केला तर एखादे हविर्द्रव्य जसे भूमीवर सांडून नष्ट व्हावे,

त्याप्रमाणे त्याच्या ठिकाणी प्राप्त झालेले हविर्द्रव्यस्वरूप नष्ट होईल. यासाठी स्वत:च्या ठिकाणचे हविर्द्रव्यस्वरूप नष्ट होऊ नये म्हणून अग्निचयन केलेल्या यजमानाने 'मित्रावरुण' देवतांच्या संतोषासाठी 'मैत्रावरुणी' म्हणजे मैत्रावरुणदेवतात्मक आमिक्षेचा याग करावा. अशाप्रकारे केलेल्या यजनाने यजमान स्वत: मित्रावरुण देवतांच्या ठिकाणी संबध्दतेला प्राप्त होतो व तशा अवस्थेमुळे अग्निचयनकर्त्या यजमानाने स्त्रीसमागम केला तरी त्याच्या ठिकाणचे हविर्द्रव्यस्वरूप नष्ट होत नाही.

अग्निचयन करणारा जो यजमान चितिरूपी अग्नीच्या ठिकाणी असणारी संवत्सरात्मकता जाणतो, म्हणजे आपण मांडलेला चित्यग्नी हा संवत्सररूप आहे हे जाणतो, त्या यजमानाला तो तो ऋतू आपआपल्या ठिकाणच्या उपभोग्य पदार्थांचे दान करणारा होऊन त्याच्या सन्निध येतो. आणि ऋतूंनी दिलेल्या त्या उपभोगाने यजमान प्रतिष्ठेला प्राप्त होतो. आपण मांडलेला अग्नी हा ऋतूंच्या ठिकाणी अधिष्ठित होणारा संवत्सरच आहे अशी यजमानाने आपल्या मनात भावना करावी. वसंतऋतू हा त्या त्या संवत्सरस्वरूप चित्यग्नीचा शिरोभाग असून ग्रीष्मऋतू हा त्याच्या दक्षिणबाजूचा पक्ष म्हणजे पंख होय. वर्षाऋतू हा त्या संवत्सररूप चित्यग्नीचे पुच्छ असून शरद्‌ऋतू हा त्याच्या उत्तरबाजूचा अर्थात् डाव्या बाजूचा पंख होय. हेमंतऋतू हा त्या संवत्सररूप चित्यग्नीच्या शरीराचा मध्यभाग असून चितिरूपी अग्नीच्या ठिकाणी एकावर एक मांडलेले पांच थर हे त्या संवत्सरात्मक चित्यग्नीचे शुक्लपक्ष होत. पांच थरांच्यावर पसरले जाणारे मातीचे पांच थर हे त्या चित्यग्निरूप संवत्सराचे कृष्णपक्ष असून मांडल्या जाणाऱ्या सर्व इष्टका ह्या संवत्सराची अहोरात्रे होत. सारांश, अशा प्रकारे इष्टकांच्या पांच थरांनी पूर्ण होणारा चितिरूपी अग्नी हाच ऋतूंच्या ठिकाणी अधिष्ठित होणारा संवत्सर आहे, हे जाणून जो त्याचे उपधान करतो त्या यजमानाला प्रत्येक ऋतू स्वोचित भोग देणारा होऊन तो यजमान निश्चयाने प्रतिष्ठेला प्राप्त होतो.

सर्वांमध्ये श्रेष्ठपणा प्राप्त व्हावयाच्या इच्छेने प्रजापतीने अग्निचयन मांडला व त्या योगाने तो सर्वश्रेष्ठतेला प्राप्त झाला. हे जाणून जो यजमान अग्निचयन मांडतो, तो वयाने व गुणाने सर्वांपेक्षा श्रेष्ठतेला प्राप्त होतो. (अनुवाक ६).

१ हे यजमान, 'मी सदैव अक्षय सुख भोगीन' अशा प्रकारचा मन:संकल्प,

श्रुतिस्मृतिदृष्ट अशा कल्याणप्रद उपायांचे चिंतन, त्याविषयी अनुकूलप्रतिकूलरूप चंचल मनोवृत्ती आणि नेत्रादि इंद्रिये यांच्या योगाने पूर्वी होऊन गेलेल्या यजमानसमुदायाने जे फल प्राप्त करून घेतले, तेच फल तू आपल्या सत्कर्मापासून अनुक्रमाने प्राप्त करून घे. तुझ्यापूर्वी होऊन गेलेले पुरातन ऋषी आपल्या सत्कर्माच्या योगाने ज्या स्थानाला आज प्राप्त झालेले आहेत त्या स्थानाला तू आपल्या सत्कर्माने प्राप्त हो. २ आम्हा ऋत्विग्यजमानांच्या सह ह्या यज्ञभूमीच्या ठिकाणी अवस्थित होऊन राहिलेल्या हे अग्निदेवा, मी आपल्या ह्या यजमानाला त्याचे संरक्षण होण्यासाठी तुझ्या हवाली करीत आहे. जन्मजात ज्ञानी असणाऱ्या हे अग्निदेवा, अखिल प्राण्यांच्या योगक्षेमाविषयी तू अभिज्ञ आहेस. आणि म्हणूनच एखाद्या द्रव्यनिधीप्रमाणे संरक्षणीय अशा बुद्धीने ज्या माझ्या यजमानाचा 'हा माझा आहे' असे मानून तू स्वीकार करशील असा माझा भरवसा आहे, त्या ह्या यजमानाला मी तुझ्या स्वाधीन करीत आहे. हे देव हो, यज्ञपती असा यजमान तुमच्या मागे येत आहे. उत्कृष्ट व विशेषत्वाने रक्षणयोग्य अशा तुमच्या निवासस्थानाचे ठिकाणी तुमच्या मागोमाग येणाऱ्या त्या यजमानाला तुम्ही विसरू नका. 'हा सर्वथैव रक्षणीय आहे' ह्या गोष्टीचे स्मरण ठेवा. ३ हे देवहो, परमोत्कृष्ट अशा तुमच्या निवासस्थानामध्ये ह्या यजमानाला न विसरता त्याच्या संरक्षणाची सदैव आठवण ठेवा, यजमानासह त्या पुण्यलोकाच्या ठिकाणी राहणाऱ्या हे देवहो, या यजमानाचे अग्निचयनानुष्ठानयुक्त असे स्वरूप जाणून त्या तुमच्या पुण्यलोकाचे ठिकाणी ह्या यजमानाची वरचेवर आठवण करीत जा. तुमच्या जाण्यायेण्याला योग्य अशा ज्या मार्गांनी जो यजमान तुमच्या मागे येतो, त्या आमच्या यजमानाच्या कल्याणासाठी श्रौत व स्मार्त अशा दोन्ही प्रकारच्या कर्मांची फळे तुम्ही प्रकट करा. 'हे यजमान, तुझ्या श्रौत कर्माचे हे फल आहे, तुझ्या स्मार्त कर्माचे हे फल आहे, असे त्याला सावधानचित्ताने प्रदर्शित करून हे देवहो, त्या यजमानावर तुम्ही अनुग्रह करा. ४ हे अग्निदेवा, तू, सर्वदेव आणि यजमान असे तुम्ही सर्व या भूलोकावरून उच्चतम अशा स्वर्गलोकी जाऊ लागा. स्वर्गलोकी जाऊ लागलात म्हणजे ह्या यजमानाला आपल्या समागमे घेऊन जा. देवांनी जाण्यायेण्याला योग्य असे जे मार्ग आहेत त्याच मार्गांचे तुम्ही आक्रमण करा. यज्ञभूमिरूप अशा ह्या भूलोकाच्या ठिकाणी काय, किंवा उत्तरकाली फलभोग मिळावयाचे स्थान असलेल्या स्वर्गलोकी काय, हा यजमान आणि

तुम्ही एकत्र राहा. ५ हे अग्निदेवा स्वर्गस्थ देवांच्यापर्यंत जाऊन पोचावा, अशा इच्छेने प्रस्तर, परिधी, स्रुची, वेदी, बर्ही आणि ऋङ्‌मंत्र इत्यादि साधनांनी आम्ही अनुष्ठित करीत असलेला हा आमचा यज्ञ तू स्वर्गलोकी नेऊन पोचीव. ६ दर्शपूर्णमासेष्टीरूपाने अनुष्ठित केलेले इष्ट कर्म, तसेच, दीन, अंध, पंगु इत्यादींना अल्पस्वल्प केलेले दान, यज्ञवेदीच्या बाहेर सांग वेदाध्ययन केलेल्या विद्वान ब्राह्मणांना दिलेले द्रव्य, याखेरीज यज्ञामध्ये गाई इत्यादि दिलेली दक्षिणा, इत्यादि आम्ही केलेल्या सर्व कर्मांचा स्वामी असलेला अग्निदेव, आमची ती कर्मे स्वर्गलोकनिवासी देवांच्या ठिकाणी स्थापन करो. ७ हे अग्निदेवा, सहस्र संख्येने दक्षिणा देण्यात येणाऱ्या यज्ञाला ज्या मार्गाने तू नेतोस, सर्वस्वाचे दक्षिणादान ज्यामध्ये केले जाते, त्या यज्ञाला ज्या मार्गाने तू नेतोस, त्याच मार्गाने स्वर्गलोकी जाण्याच्या इच्छेने आम्ही करीत असलेला हा आमचा यज्ञ तू स्वर्गलोकी घेऊन जा. ८ हे अग्निदेवा, अनुष्ठान करण्यास योग्य असे सर्व ऋत्विज, आणि त्यांना दिल्या जाणाऱ्या शास्त्रीय दक्षिणा, ज्या शास्त्रीय मार्गाने यज्ञ पूर्णतेस नेतात, त्याच शास्त्रीय मार्गाने स्वर्गलोकप्राप्तीच्या इच्छेने आम्ही चालविलेला हा आमचा यज्ञ तू स्वर्गलोकी नेऊन पोचीव. ९ हे अग्निदेवा, प्राचीन काळचे केलेले यजमान ज्या मार्गाने जाऊन अत्यंत मधुर अशा अमृताच्या धारांना पुण्य कर्म व्यापून राहिले त्या मार्गानेच, हे अग्निदेवा, स्वर्गलोकी जाण्याच्या इच्छेने आम्ही चालविलेला हा आमचा यज्ञ तू स्वर्गलोकी घेऊन जा. १० ज्या लोकाच्या ठिकाणी मधाच्या आणि घृताच्या धारा अखंड वाहत राहिलेल्या असतात, त्या स्वर्गलोकाच्या ठिकाणी राहणाऱ्या देवसमूहामध्ये सर्व कर्मांचा स्वामी असलेला अग्निदेव, आम्ही अनुष्ठित केलेला हा आमचा यज्ञ स्थापन करो. (अनुवाक ७).

१ हे जन्मजातज्ञानसंपन्न अग्निदेवा, तुला प्रज्वलित करणाऱ्या ज्या समिधा, गार्हपत्यादि जी तुझी स्थाने, तुझ्या काली, कराली इत्यादि नावे धारण करणाऱ्या ज्वालारूप अशा ज्या जिह्वा, तुझे जे प्रकाशनसामर्थ्य, तुझ्या ज्वालांच्या संघर्षापासून उत्पन्न होणारे जे चट् चट् असे शब्द आणि तुझे चंद्राप्रमाणे चमकणारे जे स्फुलिंग त्या सर्वांच्या योगाने चयनप्रकाराचा अभिज्ञ असलेला तू स्वकीय अशा चितिरूपी शरीराची रचना कर.

मांडण्यात येणारा चितिरूपी अग्नी हा जणू 'उत्पन्न यज्ञ' च आहे.

कारण, त्या चितिरूपी अग्नीच्या अनुष्ठानापैकी कोणते अंग केले जाते व कोणते केले जात नाही, हे समजणेच मुष्किलीचे होत असते. आणि त्यामुळे चितिरूपी अग्नीची मांडणी करणारा अध्वर्यू चित्यग्नीच्या अनुष्ठानापैकी एखादे अंग जर अनुष्ठित करावयाचे विसरला, तर तो आपल्या शरीराच्याच एखाद्या अंगाला अंतरतो म्हणजे त्याच्या शरीराचे एखादे अंग नष्ट होते. असे होऊ नये म्हणून अग्निचयन क्षेत्राला अभिमर्शन करताना अध्वर्यूने 'यास्ते अग्ने समिधो' ह्या ऋचेचे पठण करावे. ही ऋचा 'स्वयंचिति' संज्ञेने उल्लेखिली जात असते. ह्या ऋचेचे पठण केले असता चितिरूपी अग्नी स्वतःच्याच शरीराची रचना किंवा मांडणी करतो. आणि त्या योगाने चित्यग्निसंबंधी अनुष्ठानापैकी एखादे अंग अनुष्ठित करण्याचे जरी अध्वर्यूकडून अंतरले गेले, तरी त्याच्या शरीराच्या कोणत्याही अंगापासून तो विमुक्त होत नाही.

आहवनीय इत्यादि जे अग्नी आहेत ते अग्निचयन क्षेत्राच्या ठिकाणी उपधान करून ठेवलेल्या कासवाला स्वर्गलोकाचा मार्ग दिसण्यासाठी पूर्व इत्यादि चारीही दिशांच्या ठिकाणी संचार करोत. म्हणजे चारही दिशा प्रकाशित करोत. अग्निचयनक्षेत्राचे ठिकाणी उपधान करून ठेवलेला हा कूर्म म्हणजे कासव, आम्ही अनुष्ठित केलेले कर्म नीट लक्षात घेऊन विनाशरहित आणि उत्कृष्ट वीर्यप्रद असे मधुमिश्र आज्य प्राशन करून आमच्या या यज्ञाला स्वर्गलोकी नेऊन पोचवो. आहुती देणाऱ्या यजमानांना त्यांनी पठित केलेले मंत्रच स्वर्गमार्गप्रकाशक होत असतात.

चितिरूपी अग्नीला स्वर्गलोकी नेण्यासाठीच त्याच्या ठिकाणी कूर्माचे उपधान केले जात असते. यास्तव त्याचे उपधान करते वेळी अध्वर्यूने 'चतस्र आशाः प्रचरन्त्वग्नयः' या मंत्राचा पहिला चरण पठण करावा. या चरणात कूर्माला स्वर्गलोकाचा मार्ग स्पष्ट दिसावा म्हणून दिशांची प्रार्थना केली आहे. यास्तव या चरणाचे पठण केले असता तो कूर्म अग्नींच्या कडून प्रकाशित केलेल्या दिशांच्या द्वारा स्वर्गलोकाचा मार्ग स्पष्टपणे ओळखतो. पूर्वोक्त मंत्राचा 'इमन्नो यज्ञं नयतु प्रजानन्' हा दुसरा चरण पठण करावा. ह्या चरणात 'स्वर्गलोकाचा मार्ग नीट ओळखून त्या मार्गाने या आमच्या यज्ञाला कूर्म स्वर्गलोकी घेऊन जावो' असे अग्नीला म्हटले आहे. ह्या चरणाचे पठण कूर्माला स्वर्गलोकी यज्ञ घेऊन जाण्याचे कामी उपयुक्त होते. 'आहुती देणाऱ्या

ब्राह्मणांना वेदमंत्र हा स्वर्गलोकाचा मार्ग प्रकाशित करतो', अशा अर्थाचा पूर्वोक्त मंत्राचा शेवटचा चरण म्हटला जात असतो. कारण, आहुती प्रदान करणारे पूर्वीचे देव मंत्रसामर्थ्यानेच स्वर्गलोकाला प्राप्त झाले आहेत.

आता प्रदर्शित केलेल्या ऋचेत 'ब्रह्म' हा शब्द आला असल्यामुळे तिला 'ब्रह्मण्वती' असे नांव पडले आहे. यास्तव, ह्या ब्रह्मण्वतीसंज्ञक ऋचेने जर कूर्माचे उपधान केले, तर मंत्रसामर्थ्याच्या योगाने अग्निचयनकर्ता यजमान स्वर्गलोकाला जातो.

मांडण्यात येणारा चितिरूपी अग्नी हा प्रजापतीच आहे. पशू हे त्या प्रजापतीच्या प्रजा असून निरनिराळे छंद हे त्या प्रजापतीचे स्वरूप आहे. छंद हे भिन्न भिन्न स्वरूपाचे असल्यामुळे त्याची त्यांची रूपे समजण्यासाठी इष्टकांच्या ठिकाणी निरनिराळ्या प्रकारच्या रेघा खोदून त्या भिन्न भिन्न स्वरूपाच्या कराव्यात. अशा प्रकारच्या इष्टकांनी अग्निचयनाची मांडणी केली असता यजमानाला पशू आणि छंद यांची प्राप्ती होते. शिवाय, प्रजा व पशू यांच्या द्वारा यजमानाने चितिरूपी अग्नीला स्वाधीन करून घेऊन त्याची मांडणी केल्यासारखी होते. (अनुवाक ८).

१ भरपूर धन, पुष्टी, उत्कृष्ट अशी पुत्रपौत्रादि प्रजा व आज्ञाधारक चाकर ह्यांची प्राप्ती व्हावी म्हणून इतर यजमानांनी चितिरूपी अग्नीची मांडणी करून तो आपल्या स्वाधीन करण्याच्या पूर्वीच मी चितिरूपी अग्नीची मांडणी करून त्याला आपल्या स्वाधीन करून घेईन. चित्यग्नीच्या अनुग्रहाने प्राप्त होणाऱ्या पुत्रपौत्रादि प्रजा मी आपल्या ठिकाणी स्थापन करीन. चित्यग्नीच्या प्रसादाने प्राप्त होणारे शरीरबल मी आपल्या ठिकाणी स्थापन करीन. उत्कृष्ट अशा पुत्रपौत्रादि संततीने युक्त झालेले आम्ही स्वतःच्या शरीरासह हिंसारहित असे होऊ. २ हे पितरहो, आम्हा मरणयोग्य मानवांच्या शरीराचे ठिकाणी जे इंद्रियविशेष समाविष्ट होऊन राहिले आहेत, त्याचप्रमाणे आमच्या हृदयादि अवयवांच्या ठिकाणी मरणरहित असा जो अग्नी सर्वतोपरी समाविष्ट होऊन राहिला आहे त्या इंद्रियविशेषांना व त्या अमर अग्नीला आम्ही आपल्या शरीराचे ठिकाणी स्थिरतेने धारण करू. तो अग्नी आम्हाला सोडून दूर न जावो.

आता सांगितलेल्या 'मयि गृह्णाम्यग्रे:' 'यो नो अग्नि. पितरो' .ह्या दोन

मंत्रांचे पठण करून जर अध्वर्यूने आपल्या शरीराच्या ठिकाणचा अग्नी स्वतःच्या शरीरात स्थिर करून घेऊन नंतर चितिरूपी अग्नीची मांडणी केली, तर त्याने मांडलेला चितिरूपी अग्नीच यजमानासाठी मांडल्यासारखा होतो. सर्व पशू अग्नीजवळ राहून त्याची सेवा करीत असतात. अर्थात् अग्नी जर अध्वर्यूला सोडून गेला, तर पशूही त्याला सोडून जातात. तसे न व्हावे यासाठी, अग्नीला आपल्या ठिकाणी स्थिर करण्याकरता पूर्वोक्त दोन मंत्र पठण करावेत. त्या योगाने स्वकीय अशा अग्नीचे अध्वर्यूने स्वतःच्या ठिकाणी धारण केल्यासारखे होते. आणि पशूही त्याला सोडून जात नाहीत.

काही ब्रह्मवादी असा प्रश्न विचारतात की, माती आणि उदक ही जर अग्नीचे भक्ष्य होत नाहीत तर माती व उदक यांच्या मिश्रणाने तयार केलेल्या इष्टकांची मांडणी करून चित्यग्नी काय म्हणून निर्माण करण्यात येतो? त्यावर अभिज्ञ असे दुसरे ब्रह्मवादी उत्तर देतात की, उदकांचे मातीशी मिश्रण करून इष्टका तयार केल्याने काही बिघडत नाही. कारण, 'आपो वै सर्वा देवताः' ह्या श्रुतिवचनाप्रमाणे उदके ही सर्वदेवतारूप आहेत. त्याचप्रमाणे प्रेक्ष्यांना ही भूमी रात्रीच्या वेळी वैश्वानराग्निरूप दिसत असल्यामुळेच ते रात्री तिच्या ठिकाणी वस्ती करीत नाहीत, असा श्रुतीमध्ये अर्थवाद आला असल्यामुळे भूमीच्या ठिकाणची मृत्तिका ही वैश्वानराग्निरूप आहे. अर्थात् उदकांचा व मृत्तिकेचा संयोग करून इष्टका तयार केल्याने सर्वदेवतांच्याशी अग्नीला संयुक्त केल्यासारखे होते. एवं च, ही भूमी वैश्वानराग्निरूप असल्यामुळे तिच्या ठिकाणच्या मृत्तिकेचे सर्वदेवतारूप उदकांशी मिश्रण करून बनविलेल्या इष्टकांच्या मांडणीने चित्यग्नी निर्माण केला असता अग्नीकडूनच चित्यग्नीची मांडणी केल्यासारखे होते.

काही ब्रह्मवादी म्हणतात की, मृत्तिका आणि उदक यांच्या मिश्रणाने तयार केलेल्या इष्टकांची रचना करून चित्यग्नीची मांडणी केली जाते, तो काही अंगाररूप अग्नी नसतो. असे जर आहे, तर त्याला 'अग्नी' असे काय म्हणून म्हटले जाते? त्यावर अभिज्ञ अशा ब्रह्मवाद्यांचे असे उत्तर आहे की, केवळ इष्टकांच्या मांडणीनेच काही चित्यग्नी निर्माण केला जात नाही. छंदोमंत्रांचे पठण करून त्या इष्टका मांडल्या जातात. छंदोमंत्रांच्या योगानेच अरणींचे मंथन करून अग्नी निर्माण करण्यात येत असल्याने छंदोमंत्र

हे अग्निरूप आहेत. अर्थात् छंदोमंत्र पठण करून इष्टकांची मांडणी केलेल्या चित्यग्नीला 'अग्नी' म्हटला जाणे योग्यच आहे. त्याचप्रमाणे भूमी ही वैश्वानराग्निरूप असल्यामुळे तिच्या मातीपासून तयार केलेल्या विटांची मांडणी करून चित्यग्नी निर्माण केला जात असल्यामुळेही त्याला अग्नी म्हणणे योग्य आहे. चितिरूपी अग्नीच्या ठिकाणी हिरण्येष्टकांचे उपधान करावे. कारण, हिरण्य हे प्रकाशरूप आहे. यास्तव, हिरण्येष्टकांचे उपधान करून अध्यर्यूने जणू काय चितिरूपी अग्नीच्या ठिकाणी प्रकाशाचे स्थापन केल्यासारखे होते. शिवाय, हिरण्य हे तेजोरूप आहे. यासाठी, हिरण्येष्टकांचे उपधान केल्याच्या योगाने अध्वर्यूने स्वतःच्या ठिकाणी तेज धारण केल्यासारखेही होते.

हिरण्येष्टका ह्या जणू काय चित्यग्नीचे मुख आहेत. चित्यग्नीच्या भोवतालच्या सर्व दिशांच्या ठिकाणी हिरण्येष्टकांचे उपधान केले असता तो 'सर्वतोमुख' संज्ञेस प्राप्त होतो. ह्यास्तव जो कोणी यजमान सर्वतोमुख अशा चितिरूपी अग्नीचे उपधान करतो तो सर्व दिशांच्या ठिकाणी राहणाऱ्या प्रजांचा स्नेह संपादन करून भरपूर अन्नाचे सेवन करतो. सर्व दिशांच्या ठिकाणी सर्व कार्यांमध्ये विजयी होतो. गायत्री नांवाची हिरण्येष्टका चितिरूपी अग्नीच्या पूर्वेस, त्रिष्टुप्नामक हिरण्येष्टका दक्षिणेस, जगतीनामक हिरण्येष्टका पश्चिमेस, अनुष्टुप् नांवाची हिरण्येष्टका उत्तरेस आणि पंक्तिनामक हिरण्येष्टका चित्यग्नीच्या मध्यभागी उपधान करावी. अशा प्रकारे पांच हिरण्येष्टकांची मांडणी करून निर्माण केलेला चितिरूपी अग्नी हा 'सर्वतोमुख' अग्नी होय. अशा प्रकारे सर्वतोमुख संज्ञक चित्यग्नीचे स्वरूप जाणून जो त्याचे उपधान करतो तो यजमान सर्व दिशांच्या ठिकाणी असणाऱ्या लोकांमध्ये सुग्रास अन्नाचे भोजन करतो व सर्व दिशांच्या ठिकाणी सर्व कार्यांत विजयी होतो. शिवाय, वस्त्राचा एक तुकडा जसा दुसऱ्या तुकड्याशी शिवून एकत्र जोडावा त्याप्रमाणे त्या यजमानाने एक दिशा दुसऱ्या दिशेशी जोडल्याप्रमाणे होते. आग्नेय इत्यादि कोणदिशांच्या ठिकाणी दोन दिशांचे अंत परस्परांशी शिवून एकत्र जोडल्यासारखे आपणास दृष्टीला पडतातच. (अनुवाक ९).

प्रजापतीने चितिरूपी अग्नी जेव्हा निर्माण केला, तेव्हा तो प्रजापती पासून पूर्वदिशेस दूर पळून जाऊ लागला. तेव्हा त्याला अडविण्यासाठी प्रजापतीने त्या दिशेस अश्व उभा केला. अग्नी जेव्हा दक्षिणेस पळू लागला

तेव्हा त्याचा प्रतिकार करण्यासाठी प्रजापतीने दक्षिणदिशेस मेंढा उभा केला. जेव्हा अग्नी पश्चिम दिशेकडे वळून पळण्याचा यत्न करू लागला, तेव्हा प्रजापतीने पश्चिमेस एक वृषभ म्हणजे बैल उभा केला. अग्नीने उत्तरदिशेस पळावयाचा उपक्रम केला तेव्हा प्रजापतीने उत्तरदिशेस एक बोकड उभा केला. आणि अग्नीने जेव्हा ऊर्ध्व दिशेस उडी मारून निसटण्याचा प्रयत्न केला तेव्हा प्रजापतीने त्या दिशेस पुरुष उभा केला. 'पशु' हा शब्द अश्वापासून पुरुषापर्यंत सर्वांचा उपलक्षक आहे. यास्तव, अग्निचयन करणाऱ्या यजमानाने आता सांगितलेल्या क्रमाने चित्यग्नीच्या ठिकाणी पाचही दिशांना पशुशिरांचे उपधान करावे. असे केल्याने सर्व दिशांकडून चित्यग्नीला अडथळा करून एका जागी स्थिरतेने त्याची मांडणी केल्यासारखे होते.

ज्या पांच मृत पशूंच्या शिरांचे उपधान केले जाते, ते पशू एके काळी जिवंत असताना प्राण व चक्षुरिंद्रिय धारण करणारेच होते. या दृष्टीने चितिरूपी अग्नीच्या ठिकाणी जी पशुशिरे मांडली जातात, त्यांनाच 'प्राणभृत्' व 'चक्षुष्मती ' इष्टका अशी संज्ञा आहे. यास्तव, पशुशिरांची जर चितिरूपी अग्नीच्या ठिकाणी मांडणी केली, तर तद्रूप अशा प्राणभृत् व चक्षुष्मतीसंज्ञक इष्टकांच्या उपधानप्रभावाने अग्निचयन करणारा यजमान स्वर्गलोकाच्या ठिकाणी चिरकाळ जिवंत राहतो. शिवाय, त्या पशुशीर्षेष्टकांच्या कडून अग्निचयनकर्त्या यजमानानासाठी हे तिन्ही लोक उत्कर्षाने भासमान होत असतात. उपधान करण्यात येणाऱ्या मृतपशूंच्या शिरांच्या ठिकाणी यज्ञयोग्य असे पावित्र्य उत्पन्न व्हावयासाठी त्या शिरांच्या ठिकाणी ओल्या मातीचा लेप द्यावा आणि नंतर त्यांचे उपधान करावे.

चितिरूपी अग्नी हा पशुप्राप्तीचे साधन असल्यामुळे तो पशुरूप असून पशू हे अन्नाचे साधन असल्याने ते अन्नरूप आहेत. आणि पशुशिरे ही अग्निनिष्पादक असल्यामुळे तीच चित्यग्निरूप आहेत. असे असल्यामुळे, ज्या यजमानाला निर्वाहापुरते अन्न न मिळता कमी मिळावे असे अध्वर्यूला वाटत असेल, त्या यजमानाच्या चितिरूपी अग्नीच्या प्रत्येक दिशेच्या अंताला अगदी चिकटून पशुशिरांचे उपधान करावे. म्हणजे त्या यजमानाला निर्वाहापुरते अन्न न मिळता कमी मिळते. आपल्या यजमानाला केवळ जगता येईल, इतकेच अन्न मिळावे, अशी अध्वर्यूची इच्छा असेल, तर त्या यजमानाच्या

चितिरूपी अग्नीच्या प्रत्येक दिशेच्या अंतापासून फार दूर नाही किंवा अगदी चिकटून नाही, इतक्या अंतरावर अध्वर्यूने पशुशिरांची मांडणी करावी. तसे केले असता त्याच्या त्या यजमानाला केवळ जगण्यापुरतेच अन्न प्राप्त होईल. आणि जर यजमानाला भरपूर अन्न मिळावे असे अध्वर्यूला वाटत असेल, तर त्या यजमानाच्या चितिरूपी अग्नीच्या प्रत्येक दिशेकडील अंतापासून लांब अंतरावर पशुशिरांचे अध्वर्यूने उपधान करावे. म्हणजे त्या यजमानाला कुटुंबाच्या निर्वाहास पुरेल इतके भरपूर अन्न प्राप्त होते. चारही दिशांच्याकडून त्या यजमानाकडे अन्न धावत येते व त्याच्याजवळ अन्नाचा भरपूर साठा होतो. (अनुवाक १०).

१ गाईच्या कानात उत्पन्न होणाऱ्या गोचिडांच्या अभिमानिनी देवतेला अश्वाच्या मुखातील दोन सुळ्यांच्या आहुतीने मी संतुष्ट करतो. २ बेडुकांच्या अभिमानिनी देवतेला अश्वाच्या मुखातील दोन दाढांच्या आहुतीने मी संतुष्ट करतो. ३ आदकानामक प्राणाभिमानिनी देवतेला मी अश्वाच्या मुखातील दातांच्या आहुतीने संतुष्ट करतो. ४ ऊर्क्नामक रसाभिमानिनी देवतेला मी अश्वाच्या सतत शेंबूड वाहत असलेल्या दोन्ही नाकपुड्यांच्या आहुतीने संतुष्ट करतो. ५ अरण्याभिमानिनी देवतेला मी अश्वाच्या शरीरातील कोठ्याची आहुती देऊन संतुष्ट करतो. ६ मृत्तिकाभिमानिनी देवतेला मी अश्वाच्या दातांखालच्या हिरड्यांच्या व कठिण अशा अस्थीच्या आहुतीने संतुष्ट करतो. ७ शेवाळाच्या अभिमानिनी देवतेला अश्वाच्या ठिकाणच्या शेवाळासारख्या मांसाची आहुती देऊन मी संतुष्ट करतो. ८ शर्कराभिमानिनी देवतेला अश्वाच्या शरीरातील उंचवट्याच्या आहुतीने मी संतुष्ट करतो. ९ जिव्हेच्या अभिमानिनी देवतेला अश्वाच्या मुखातून उमटणाऱ्या शब्दाच्या स्थानाची आहुती देऊन मी संतुष्ट करतो. १० जिव्हेच्या मूलस्थानाच्या व अग्रभागाच्या सरस्वतीनामक अभिमानिनी देवतेला अश्वाच्या जिह्वाग्राच्या आहुतीने मी संतुष्ट करतो. (अनुवाक ११).

१ अन्नाभिमानिनी देवतेला अश्वाच्या हनुवटीने मी संतुष्ट करतो. २ उदकाभिमानिनी देवतेला अश्वाच्या मुखाची आहुती देऊन मी संतुष्ट करतो. ३ आदित्यांना अश्वाच्या मुखावरील मिशांच्या आहुतीने मी संतुष्ट करतो. ४ पृथ्वीदेवतेला अश्वाच्या मुखाच्या ठिकाणी असणाऱ्या खालच्या ओठाच्या आहुतीने मी संतुष्ट करतो. ५ द्युलोकदेवतेला अश्वाच्या मुखातील वरच्या

ओठाच्या आहुतीने मी संतुष्ट करतो. ६ द्युलोक व पृथ्वी यांच्या मध्यंतराभिमानिनी देवतेला अश्वाच्या दोन्ही ओठांच्या मध्यप्रदेशाच्या आहुतीने मी संतुष्ट करतो. ७ ब्रह्मांडाबाहेरील स्थानाभिमानिनी देवतेला अश्वाच्या शरीरातील प्रकाशस्थानाने मी संतुष्ट करतो. ८ पर्जन्यवृष्टीच्या वेळी होणाऱ्या शब्दाच्या अभिमानिनी देवतेला अश्व चालत असताना उत्पन्न होणाऱ्या शब्दाने मी संतुष्ट करतो. ९ सूर्य व अग्नी ह्या दोन देवतांना मी अश्वाच्या दोन्ही नेत्रांनी संतुष्ट करतो. १० पर्जन्यवृष्टीच्या व इतर वेळी उत्पन्न होणाऱ्या विद्युद्देवतांना मी अश्वाच्या दोन्ही बुबुळांच्या आहुतीने संतुष्ट करतो. ११ विद्युत्‌देवतेला अश्वाच्या मस्तकातील मांसाच्या आहुतीने मी संतुष्ट करतो. १२ बलाभिमानिनी देवतेला अश्वाच्या शरीरावरील त्वचा व मांस यांच्या मध्यंतरी असणाऱ्या मज्जासंज्ञक चिकट पदार्थाच्या आहुतीने मी संतुष्ट करतो. (अनुवाक १२).

१ कूर्माभिमानिनी देवतेला अश्वाच्या चारी खुरांनी मी संतुष्ट करतो. २ कपिंजल पक्ष्यांच्या अभिमानिनी देवतेला मी अश्वखुरांच्या मांसांनी संतुष्ट करतो. ३ सामाच्या अभिमानिनी देवतेला अश्वाच्या पोटऱ्याखालच्या प्रदेशांच्या आहुतीने मी संतुष्ट करतो. ४ वेगाभिमानिनी देवतेला मी अश्वाच्या पोटऱ्यांच्या आहुतीने मी संतुष्ट करतो. ५ आरोग्याभिमानिनी देवतेला मी अश्वाच्या दोन गुडघ्यांची आहुती देऊन संतुष्ट करतो. ६ वीर्याभिमानिनी देवतेला अश्वाच्या पुढच्या दोन पायांच्या संधिप्रदेशांच्या आहुतीने मी संतुष्ट करतो. ७ भयाभिमानिनी देवतेला अश्वाच्या दोन पायांच्यावर असलेल्या प्रदेशांच्या आहुतीने संतुष्ट करतो. ८ अंत:करणाभिमानिनी देवतेला मी अश्वाच्या दोन्ही बरगड्यांच्या आहुतीने संतुष्ट करतो. ९ अश्विनौ देवतांना मी अश्वाच्या खांद्यांची आहुती देऊन संतुष्ट करतो. १० अदितिदेवतेला अश्वाच्या मस्तकाने मी संतुष्ट करतो ११ निर्ऋतिदेवतेला मी अश्वाच्या केशरहित अशा मस्तकप्रदेशाची आहुती देऊन संतुष्ट करतो. (अनुवाक १३).

१ अश्वाला बांधावयाच्या दर्भमय रज्जूच्या अभिमानिनी देवतेला मी अश्वाच्या काखांच्या आहुतीने संतुष्ट करतो. २ कृतत्रेतादि युगांच्या अभिमानिनी देवतेला मी अश्वाच्या मानेच्या प्रदेशाची आहुती देऊन संतुष्ट करतो. ३ चित्ताभिमानिनी देवतेला अश्वाच्या मानेवरील रेषांच्या आहुतीने मी संतुष्ट करतो. ४ घोषाभिमानिनी देवतेला अश्वाच्या नेत्रादि अवयवांच्या ठिकाणी असलेल्या प्राणभूत शक्तीच्या

आहुतीने मी संतुष्ट करतो. ५ त्वगिंद्रियाभिमानिनी देवतेला मी अश्वाच्या बाह्य रूपाने संतुष्ट करतो. ६ अंतराभिमानिनी देवतेला मी अश्वाच्या अंतःस्वरूपाच्या आहुतीने संतुष्ट करतो. ७ चिलटांच्या अभिमानिनी देवतेला मी अश्वाच्या केसांनी संतुष्ट करतो. ८ इंद्रदेवतेला अश्वांच्या ठिकाणच्या वहनशक्तीची आहुती देऊन मी संतुष्ट करतो. ९ बृहस्पतिदेवतेला अश्वाच्या पृष्ठभागी जेथे त्यावर आरोहण करणारा वीर बसतो, त्या प्रदेशाच्या आहुतीने मी संतुष्ट करतो. १० रथाभिमानिनी देवतेला अश्वाच्या मानेवर असणाऱ्या रथवाहन प्रदेशाच्या आहुतीने मी संतुष्ट करतो. (अनुवाक १४).

१ मित्रावरुण देवतांना मी अश्वाच्या दोन्ही जघनभागातील मांसाच्या आहुतीने संतुष्ट करतो. २ इंद्राग्नी देवतांना मी अश्वाच्या दोन्ही जघनांच्या खालच्या मांसाची आहुती देऊन संतुष्ट करतो. ३ इंद्राबृहस्पती देवांना मी अश्वाच्या मांड्यांची आहुती देऊन संतुष्ट करतो. ४ इंद्र व विष्णू ह्या दोघा देवांना मी अश्वाच्या पोटऱ्यांच्या मागील भागी असलेल्या मांसाची आहुती देऊन संतुष्ट करतो. ५ सविता देवतेला मी अश्वाच्या शेपटाच्या आहुतीने संतुष्ट करतो. ६ गंधर्वदेवतांना मी अश्वाच्या शिश्नाची आहुती देऊन संतुष्ट करतो. ७ अप्सरांना अश्वाच्या अंडांची आहुती देऊन मी संतुष्ट करतो. ८ पवमानदेवतेला मी अश्वाच्या गुदद्वाराची आहुती देऊन संतुष्ट करतो. ९ पवित्रदेवतेला पोत्रसंज्ञक अश्वाच्या गुदद्वाराजवळच्या मांसाच्या आहुतीने मी संतुष्ट करतो. १० आक्रमणदेवतेला मी अश्वाच्या गुदद्वाराजवळच्या मांसाच्या आहुतीने संतुष्ट करतो. ११ प्रतिक्रमणदेवतेला मी अश्वाच्या गुदद्वारासमीप असणाऱ्या मांसखंडाची आहुती देऊन संतुष्ट करतो. (अनुवाक १५).

१ इंद्रदेवतेला अश्वाच्या गळ्याच्या ठिकाणच्या मांसाच्या आहुती देऊन मी संतुष्ट करतो. २ अदिती देवतेला अश्वाच्या पायांच्या तळव्यातील मांसाची आहुती देऊन मी संतुष्ट करतो. ३ दिशांच्या अधिष्ठात्री देवतांना अश्वाच्या खांद्याजवळच्या अस्थींची आहुती देऊन मी संतुष्ट करतो. ४ मेघदेवतांना मी अश्वाच्या अष्टदलात्मक हृत्कमलाची व त्यावर मांसरूपाने असणाऱ्या वेष्टनाची आहुती देऊन संतुष्ट करतो. ५ अंतरिक्षदेवतेला मी अश्वाच्या आंतड्यांनी संतुष्ट करतो ६ नभोदेवतेला मी अश्वाच्या उदरातील मांसाने संतुष्ट करतो. ७ इंद्राणीदेवतेला मी अश्वाच्या उदरात असलेल्या पांथरीच्या आहुतीने संतुष्ट

करतो. ८ वारुळांच्या अधिष्ठात्री देवतांना अश्वाच्या उदरातील एका बाजूस असलेल्या क्लोमसंज्ञक मांसखंडाच्या आहुतीने मी संतुष्ट करतो. ९ पर्वतांच्या अधिष्ठात्री देवतांना अश्वाच्या उदरभागासमीप असणाऱ्या मांसखंडाच्या आहुतीने मी संतुष्ट करतो. १० समुद्रदेवतेला अश्वाच्या उदराची आहुती देऊन मी संतुष्ट करतो. ११ वैश्वानर देवतेला मी अश्वाच्या खाली पसरलेल्या जीर्ण तृणाची आहुती देऊन संतुष्ट करतो. (अनुवाक १६).

१ पूषादेवतेला अश्वाच्या जाड आंतड्याची आहुती देऊन मी संतुष्ट करतो. २ अंध अशा सर्पदेवतेला अश्वाच्या गुदकांडापैकी स्थूल भागाच्या आहुतीने मी संतुष्ट करतो. ३ सर्पदेवतांना मी अश्वाच्या गुदद्वाराजवळील आंतड्यांच्या आहुतीने संतुष्ट करतो. ४ ऋतूंच्या अधिष्ठात्री देवतांना अश्वाच्या गुदद्वाराजवळील शिरांची आहुती देऊन मी संतुष्ट करतो. ५ द्युलोकदेवतेला मी अश्वाच्या पृष्ठभागाची आहुती देऊन संतुष्ट करतो. ६ अष्टवसूंना मी अश्वाच्या पृष्ठभागाजवळच्या पहिल्या अस्थीच्या आहुतीने संतुष्ट करतो. ७ अकरा रुद्रांना मी अश्वाच्या पृष्ठभागाजवळील दुसऱ्या अस्थीच्या आहुतीने संतुष्ट करतो. ८ बारा आदित्यांना मी अश्वाच्या पृष्ठभागाजवळच्या तिसऱ्या आहुतीने संतुष्ट करतो. ९ अंगिरसांना मी अश्वाच्या पृष्ठभागानजीकच्या चौथ्या अस्थीची आहुती देऊन संतुष्ट करतो. १० साध्यदेवांना मी अश्वाच्या पृष्ठभागासन्निध असणाऱ्या पांचव्या अस्थीने संतुष्ट करतो. ११ विश्वेदेवांना मी अश्वाच्या पृष्ठभागानजीकच्या सहाव्या अस्थीची आहुती देऊन संतुष्ट करतो. (अनुवाक १७).

१ ओजाच्या अधिष्ठात्री देवतेला अश्वाच्या मानेवरील निरनिराळ्या अवयवांनी मी संतुष्ट करतो. २ निर्ऋतिदेवतेला मी अश्वाच्या मानेतील अस्थींनी संतुष्ट करतो. ३ इंद्रदेवतेला अश्वाच्या पाठीवरील ओझे वाहण्यायोग्य अशा प्रदेशाच्या आहुतीने मी संतुष्ट करतो. ४ रुद्रदेवतेला मी अश्वाच्या खांद्यावर असणाऱ्या अत्यंत चंचल प्रदेशाची आहुती देऊन संतुष्ट करतो. ५ अहोरात्रदेवतांना अश्वाच्या खांद्यापैकी चंचल अशा दुसऱ्या प्रदेशाच्या आहुतीने मी संतुष्ट करतो. ६ अर्धमासदेवतांना अश्वाच्या खांद्यातील तिसऱ्या चंचल प्रदेशाने मी संतुष्ट करतो. ७ मासदेवतांना अश्वाच्या खांद्यातील चौथ्या चंचल विभागाच्या आहुतीने मी संतुष्ट करतो. ८ ऋतुदेवतांना अश्वाच्या खांद्यावरील पांचव्या चंचल प्रदेशाची आहुती देऊन मी संतुष्ट करतो. ९ संवत्सरदेवतेला अश्वाच्या

खांद्याच्या ठिकाणच्या सहाव्या चंचल भागाच्या आहुतीने मी संतुष्ट करतो. (अनुवाक १८).

१ आनंदाभिमानिनी देवतेला अश्वाच्या गुह्येंद्रियाने मी संतुष्ट करतो. २ कामदेवाला अश्वाच्या गुह्येंद्रियाजवळील एका अवयवयुगुलाने मी संतुष्ट करतो. ३ भयाच्या अभिमानिनी देवतेला मी अश्वाच्या गुह्येंद्रियाजवळील दुसऱ्या अवयवयुगुलाने संतुष्ट करतो. ४ गुदद्वाराजवळ असलेल्या 'प्रशिष' संज्ञक अवयवाभिमानिनी देवतेला मी अश्वाच्या गुदद्वाराजवळील तिसऱ्या अवयवयुगुलाने संतुष्ट करतो. ५ सूर्य व चंद्र ह्या दोन देवांना मी अश्वाच्या दोन्ही बरगड्यांच्या खाली असणाऱ्या दोन मांसग्रंथींनी संतुष्ट करतो. ६ श्याम व शबल ह्या दोन देवांना मी पूर्वोक्त 'वृक्य' संज्ञक मांसग्रथींच्या सन्निध असणाऱ्या 'मतस्नु' संज्ञक दोन अवयवांनी संतुष्ट करतो. ७ पहाटेच्या अभिमानिनी देवतेला मी अश्वाच्या सुंदर स्वरूपाने संतुष्ट करतो. ८ सूर्यास्तसमयाभिमानिनी देवतेला मी अश्वाच्या ठिकाणी असणाऱ्या कुरूपतेने संतुष्ट करतो. (अनुवाक १९).

१ दिवसांच्या अभिमानिनी देवतेला मी अश्वाच्या मांसाने संतुष्ट करतो. २ रात्रिदेवतेला मी अश्वाच्या 'पीवा' संज्ञक विशिष्ट मांसरसाने संतुष्ट करतो. ३ उदकदेवतेला अश्वाच्या शिजविलेल्या मांसाच्या रसाने मी संतुष्ट करतो. ४ घृताभिमानिनी देवतेला मी अश्वाच्या मांसातील द्रवरूप रसाने संतुष्ट करतो. ५ श्यानामक निद्राभिमानिनी देवतेला मी अश्वाच्या शिजविलेल्या मांसाच्या वसासंज्ञक विशिष्ट रसाने संतुष्ट करतो. ६ मेघगर्जनेच्या अभिमानिनी देवतेला मी अश्वाच्या नेत्रांतील मलाने संतुष्ट करतो. ७ पृष्वासंज्ञक देवतेला मी अश्वाच्या नेत्राश्रूंनी संतुष्ट करतो. ८ द्युलोकाभिमानिनी देवतेला मी अश्वाच्या नेत्रगोलकांनी संतुष्ट करतो. ९ नक्षत्रदेवतांना अश्वाच्या नेत्रगोलकांत पडणाऱ्या प्रतिबिंबाने संतुष्ट करतो. १० पृथ्वीदेवतेला मी अश्वाच्या पापण्यांनी संतुष्ट करतो. ११ नेत्रांच्या ठिकाणी असणाऱ्या कांतीच्या अभिमानिनी देवतेला मी अश्वाच्या नेत्राच्या ठिकाणी असलेल्या कांतीने संतुष्ट करतो. १२ उपाकरण केलेल्या अश्वाच्या अभिमानी देवाला ही आहुती समर्पण असो. १३ मारलेल्या अश्वाच्या अभिमानी देवाला ही आहुती समर्पण असो. १४ हवन केलेल्या अश्वाच्या अभिमानी देवाला ही आहुती समर्पण असो. (अनुवाक २०).

१ अग्निदेवतेला अश्वाच्या उजव्या बरगडीच्या मुळाशी असलेल्या पहिल्या

अस्थीने २ सरस्वतीदेवतेला अश्वाच्या उजव्या बरगडीतील दुसऱ्या अस्थीने ३ सोमदेवतेला तिसऱ्या अस्थीने ४ उदकदेवतांना चौथ्या अस्थीने ५ ओषधिदेवतांना पांचव्या अस्थीने ६ संवत्सराभिमानिनी देवतेला सहाव्या अस्थीने ७ मरुत् देवांना सातव्या अस्थीने ८ बृहस्पतिदेवतेला आठव्या अस्थीने ९ मित्रदेवतेला नवव्या अस्थीने १० वरुणदेवतेला दहाव्या अस्थीने ११ इंद्रदेवतेला अकराव्या अस्थीने १२ विश्वेदेव देवांना बाराव्या अस्थीने १३ द्यावापृथिवी देवतांना अश्वाच्या उजव्या बरगडीने आणि १४ यमदेवतेला पूर्वोक्त सर्व अस्थी अश्वाच्या पाठीच्या कण्याशी जेथे जोडल्या जातात त्या प्रदेशाच्या आहुतीने मी संतुष्ट करतो. (अनुवाक २१).

१ वायुदेवतेला मी अश्वाच्या डाव्या बरगडीच्या मुळाशी असलेल्या पहिल्या अस्थीने २ सरस्वान् देवाला त्या बरगडीच्या मुळाशी असलेल्या दुसऱ्या अस्थीने ३ चंद्रमा देवतेला तिसऱ्या अस्थीने ४ नक्षत्रदेवतांना चौथ्या अस्थीने ५ सविता देवतेला पांचव्या अस्थीने ६ रुद्रदेवतेला सहाव्या अस्थीने ७ सर्पदेवतांना सातव्या अस्थीने ८ अर्यमा देवतेला आठव्या अस्थीने ९ त्वष्टादेवतेला नवव्या अस्थीने १० धाता देवतेला दहाव्या अस्थीने ११ इंद्राणी देवतेला अकराव्या अस्थीने, १२ अदितिदेवतेला बाराव्या अस्थीने १३ द्यावापृथिवीदेवतांना अश्वाच्या डाव्या बरगडीने आणि १४ यमीदेवतेला पूर्वोक्त सर्व अस्थी अश्वाच्या पाठीच्या कण्याशी जेथे जोडल्या जातात त्या प्रदेशाच्या आहुतीने मी संतुष्ट करतो. (अनुवाक २२).

१ मार्गाभिमानिनी देवतेला अश्वाच्या उदरातील पूर्वोक्त 'वृक्य' संज्ञक मांसग्रंथीच्या जवळ असणाऱ्या मांसखंडांनी २ संततीच्या अभिमानिनी देवतेला अश्वाच्या ठिकाणच्या सूक्ष्म स्नायूंच्या मूलभागाशी असलेल्या शिरांनी ३ शुकपक्ष्यांच्या अभिमानिनी देवतेला अश्वाच्या पित्ताने ४ हिरव्या रंगाच्या अभिमानिनी देवतेला अश्वाच्या पित्तातील विशिष्ट वर्णाने ५ 'हलीक्ष्ण' संज्ञक देवतांना अश्वाच्या अपानवायूने ६ 'कूश्म' संज्ञक देवतांना अश्वाच्या लिदीच्या गोळ्यांनी ७ 'शवर्त' संज्ञक देवतांना अश्वाच्या अपक्व अशा लिदीने ८ कुत्र्यांच्या अभिमानिनी देवतांना अश्वाच्या शरीराची चीरफाड करण्याच्या स्थलाने ९ सर्पदेवतांना अश्वाच्या रक्ताच्या ताज्या गंधाने १० पक्ष्याच्या अभिमानिनी देवतांना अश्वाच्या रक्ताच्या ठिकाणी उत्पन्न होणाऱ्या बुरसलेल्या गंधाने आणि ११ मुंग्यांच्या अभिमानिनी

देवतांना अश्वाच्या शरीराची चीरफाड करताना भूमीवर पडणाऱ्या मांसलेशाच्या आहुतीने मी संतुष्ट करतो. (अनुवाक २३).

१ आतापर्यंत सांगितलेल्या सर्व अवयवांनी युक्त असा हा मरण पावलेला अश्व यज्ञयोग्य अशा त्या त्या अवयवांच्या अभिमानिनी असणाऱ्या सर्व देवतांच्याशी ऐकमत्याला प्राप्त झाला असून तो आपल्या एकापुढे एक टाकलेल्या पावलांनी भूलोकाचे अतिक्रमण करून आता स्वर्गलोकी जाऊन पोचला आहे. हे अश्वा, तू आम्हाला आम्ही केलेल्या सुकृतांचे फल म्हणून प्राप्त होणाऱ्या स्वर्गलोकी नेऊन पोचीव. तुझ्या तृप्तीसाठी आम्ही 'स्वधा' असा शब्द उच्चारून अग्नीच्या ठिकाणी आहुतिरूपाने दिलेल्या आज्यरूप हविर्द्रव्याच्या योगाने तुला हर्ष उत्पन्न करीत आहो. (अनुवाक २४).

हे अश्वा, द्युलोक हा तुझा पृष्ठभाग असून ही पृथ्वी म्हणजे जणू यजमानासह तुझे राहण्याचे स्थलच आहे. अंतरिक्ष हे तुझ्या शरीराचा उदरभाग असून समुद्र हा तुझी जन्मभूमी आहे. सूर्य हा विराट्स्वरूप अशा तुज अश्वाचे नेत्र असून वायू हा तुझा प्राण आहे. चंद्र हा तुझे कर्णेंद्रिय असून मास आणि अर्धमास हे तुझ्या शरीराचे सांधे आहेत. वसंतादिऋतू हे तुझे हस्तपादादि अवयव असून संवत्सर हा युद्धामध्ये विजयरूपाने तुला प्राप्त होणारा महिमा आहे. (अनुवाक २५).

हे अश्वा, अग्नी हा देखील पूर्वी एका जन्मामध्ये तुझ्याचप्रमाणे अश्वमेध यज्ञाला कारणभूत असा अश्व होता. त्या अग्निरूप अश्वपशूचे यजन करून त्या काळच्या काही यजमानांनी अश्वमेध यज्ञ केला. आणि त्या यज्ञात यजमानाच्या कामी योजिलेला अग्निरूपी अश्वपशूच आता अग्निसंज्ञक देव होऊन त्याने हा लोक जिंकला आहे. ज्या ह्या लोकाच्या ठिकाणी आज अग्निदेव राहत आहे, तोच हा लोक तू अग्निरूप झाल्यानंतर तुझेही राहण्याचे स्थान होईल. तूही हा लोक जिंकशील. ह्यासाठी, तू अत्यंत उत्सुकतने हे उदक हुंग. हे अश्वा, अंतरिक्षात आज वाहत असलेला हा वायू पूर्वी एका जन्मामध्ये तुझ्याप्रमाणेच अश्वमेध यज्ञाला कारणभूत होणारा अश्व होता. त्या वायुरूप अश्वपशूचे यजन करून त्या काळच्या काही यजमानांनी अश्वमेध यज्ञ केला. आणि त्या यज्ञात यजनासाठी नियोजित केलेला वायुरूपी अश्वपशूच आता वायुनामक देव होऊन त्याने अंतरिक्ष लोक जिंकला आहे. ज्या अंतरिक्ष

लोकाच्या ठिकाणी आज वायु देव होऊन राहिला आहे, तोच हा अंतरिक्ष लोक तू वायुरूप होशील, तेव्हा तुझेही संचारस्थान होईल. तूही अंतरिक्ष लोक जिंकशील. यासाठी तू अत्यंत उत्सुकतेने हे उदक हुंग. तू जर हे उदक हुंगणार नाहीस तर त्या वायुलोकापासून तू दूर होशील, असे मी करीन आणि वायुलोकापासून तू मजकडून दूर केला गेलास म्हणजे अंतरिक्षलोकापासूनही जेणेकरून तू भ्रष्ट होशील असे मी करीन.

हे अश्वा, द्युलोकात तळपत असलेला आदित्यही पूर्वीच्या एका जन्मात तुझ्याप्रमाणेच अश्वमेध यज्ञाला कारणभूत असा अश्व होता. त्या आदित्यरूप अश्वपशूचे यजन करून त्या काळच्या यजमानांनी अश्वमेध यज्ञ केला. आणि त्या यज्ञात यज्ञीय हविर्द्रव्य झालेला आदित्यरूपी अश्वपशूच आता आदित्यनामक देव होऊन त्यानेही द्युलोक जिंकला आहे. ज्या द्युलोकाच्या ठिकाणी आज आदित्यदेव तळपून राहिला आहे, तोच हा द्युलोक तू आदित्य होशील, तेव्हा तुझेही तळपून राहण्याचे स्थान होईल. अर्थात् तूही द्युलोक जिंकशील यास्तव, तू अत्यंत उत्सुकतेने हे उदक हुंग. हे उदक हुंगलेस म्हणजे तू आदित्य होऊन द्युलोक जिंकशील. (अनुवाक २६).